
बाबा कदम
तूफान

# तुफान

कादंबरी

बाबा कदम

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.®
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०

प्रकाशक
राजीव दत्तात्रय बर्वे
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.,
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०.

द्वा. सौ. कुमुदिनी वीरसेन कदम
'आनंद', बालक मंदिराजवळ,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

आवृत्ती चौथी - १५ सप्टेंबर २००८

प्रकाशन क्रमांक - १५७६

**ebook** - July 2020

मुखपृष्ठ - सुहास चांडक

**website** - www.diliprajprakashan.in

**email** - info@diliprajprakashan.in

माझे प्रिय मित्र मधूमंगेश कर्णिक,
माजी  अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,
यांना प्रेमपूर्वक अर्पण

- बाबा कदम

# एक

चित्रदुर्ग जेलच्या खडकाळ पायथ्याशी भरतीच्या लाटा आदळत होत्या, फेसाळत होत्या आणि फुटत होत्या. खडकावर उडणारे तुषार खूप उंच उडत होते. तरीही ते जेलच्या भिंतीपर्यंत पोहोचत नव्हते. सात-आठशे फूट उंचीवर ते तुषार पोहोचणार तरी कसे?

सीतू सारंग-कैदी नंबर तेहतीस, जेलच्या मागच्या खिडकीतून लाटांची पायथ्याच्या खडकाशी चाललेली झुंज पाहात उभा होता. गेले सहा महिने त्याचा हाच छंद चालू होता. कधी कधी तास न् तास तो पश्चिमेकडे अफाट पसरलेल्या अरबी समुद्राकडेही टक लावून पाहात असायचा. प्रतीक्षा करत नव्हता तो कोणाची; पण असाच वेड्यासारखा पश्चिमेकडे एकसारखं पाहात राहायचा. बराकीतले इतर कैदी त्याच्या या वागण्याकडं दुर्लक्ष करीत. कारण त्यांना ठाऊक होतं, शिक्षा होऊन इथं पहिल्यांदा येणारा कैदी असाच इथल्या वातावरणात रुळेपर्यंत काहीतरी वेड्यासारखे चाळे करीत राहतो. एकदा का तो इथल्या वातावरणात रुळला की मग त्याचं वागणं - बोलणं- सारं व्यवस्थित, शहाण्यासारखं होत जातं! तोपर्यंत हे असंच चालायचं.

"सीतू ऽऽऽऽऽ, ए सीतू ऽऽऽऽऽऽ!" दिवेकर जज्ज बराकीच्या बाजूला येऊन सीतारामाला हाका मारू लागले. सीतारामनं मागे वळून पाहिलं. गालांवर ओघळलेले अश्रू त्याने पुसले आणि तो दिवेकरांच्या जवळ येऊन उभा राहिला.

"अरे, किती दिवस तू असा शोक करीत राहणार आहेस? आता ही जन्मठेपेची सजा पूर्ण झाल्याशिवाय इथून तुझी सुटका नाही. कालच तू हायकोर्टाला केलेलं अपील फेटाळण्यात आल्याचं पत्र आलं आहे. तेव्हा आता मन घट्ट कर. खंबीर हो. मी नाही का पाच वर्षं इथं काढली?"

"पण साहेब, तुम्ही निदान दोन खून केले होते; मी नाही हो कुणाला मारलं! खरंच! माथुकाकांची शप्पथ घेऊन सांगतो- मी नारायणाचा खून केला नाही! त्याला कोणी मारलं मला मुळीसुद्धा ठाऊक नाही."

बोलताना सीतूच्या गालांवरून पुन्हा अश्रू ओघळू लागले. यावेळी मात्र दिवेकरसाहेबांची चर्या काहीशी गंभीर झाली. इतके दिवस त्यांना वाटत होतं की, शिक्षा होऊन इथं तुरुंगात पहिल्यांदा येणारा प्रत्येक कैदी पहिले काही दिवस आपण निरपराध आहोत असं अट्टाहासानं सांगत असतो. पण हळूहळू त्याला समजून येतं, आपण निरपराध आहोत हे कितीही जीव तोडून इथल्या सर्व कैद्यांना सांगितलं तरी ते त्यांना खरं वाटणार नाही; अन् ते खरंही नसतं! मग हळूहळू तो तसा प्रयत्न करायचं सोडून देतो आणि सुतारशाळा, विणकाम विभाग, वेतकाम किंवा लिफाफे करण्याचं शिक्षण निमूटपणे घ्यायला सुरुवात करतो.

चित्रदुर्गाचा तुरुंग तसा फार जुना. अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा बीमोड झाल्यानंतर जे जहाल आणि कट्टर क्रांतिकारक होते त्यांना बंदिस्त अशा जागी ठेवण्यासाठी ब्रिटिश सरकारनं या जेलची इमारत बांधली. चित्रदुर्ग हे जिल्ह्याचं गाव कोकण-किनाऱ्यावर आहे आणि या गावापासून अडीच मैल आत भर समुद्रात जो प्रचंड खडक होता, त्या खडकावर हे कारागृह बांधण्यात आले होते. सात-आठशे फूट उंचीच्या या खडकावर आठ चौरस

फर्लांगाचे 'टेबल ग्राऊंड' होते. या टेबल ग्राऊंडवरच जेलची इमारत बांधण्यात आली होती. इमारतीभोवताली दहा फूट उंचीची काचेचे तुकडे बसवलेली अभेद्य अशी भिंत होती. भिंत नव्हती ती फक्त पश्चिमेला अन् इकडं भिंत बांधण्याचं कारणही नव्हतं. बराकींच्या पश्चिम बाजूला चाकूने कापल्यासारखा सहा-सातशे फूट उंचीचा कडा होता. या पश्चिम बाजूनं कोणी कैदी पळून जाण्याची सुतराम शक्यता नव्हती. जेलच्या आवाराला एक गेट होतं. गेटवर रात्रंदिवस आठ शिपायांचा जागता पहारा होता. प्रत्येक सहा तासांना पहाऱ्यावरचे 'सेंट्री' बदलले जात होते. जेलगेटच्या डाव्या बाजूला जेलर साहेबांचे निवासस्थान होते, अन् उजव्या बाजूला पहारेकऱ्यांसाठी खोल्या होत्या. त्यात ते बहुधा एकटेच राहत. बायका-मुलांसह राहायला कोणाची मना नव्हती. पण बाजारहाट, मुलांचं शिक्षण इत्यादींच्या गैरसोयी असल्यानं पहारेकरी आपली बिऱ्हाडं चित्रदुर्गात ठेवणं पसंत करीत. शिवाय पावसाळ्यात चार महिने समुद्रकिनाऱ्याचा अन् जेलचा संबंध संपूर्ण तुटत असे.

मान्सून सुरू झाला की होड्या समुद्रात जात नसत. नारळी पौर्णिमा झाली, मान्सूनचा जोर ओसरला की मग जेलशी पुन्हा दळणवळण सुरू होई. तसं काही तातडीचं काम निघालं तर सरकारी लाँच जेलकडे येत असे, पण तीसुद्धा पावसाळी हवामान थोडे अनुकूल असेल तरच. म्हणून या जेलला 'छोटे अंदमान' असं काहीजण म्हणत असत.

पूर्वी या जेलवर एकूण दोनशे कैद्यांची व्यवस्था होती. बहुतकरून जन्मठेपेचे आणि सात वर्षांच्या पुढे सक्तमजुरीची शिक्षा झालेले कैदीच इथं ठेवले जात.

कैद्यांना इथं दुसरं काही काम देता येण्यासारखं नसे; म्हणून त्यांना लाकडाच्या शोभिवंत वस्तू, शोभेची फळं, खेळणी करण्याचं शिक्षण दिलं जाई. त्याचप्रमाणं चादरी, जमखाने विणण्याचंही काम शिकवलं जाई. एक मलबारी कैदी 'कोकोनट प्रॉडक्टस्' म्हणजे नारळाच्या करवंटीपासून पळ्या, चमचे, शर्टाची बटणं इत्यादी वस्तू करायला शिकवत असे. हे धंदेशिक्षण घेऊन कैदी तयार झाला की जेलमध्ये त्याला रोज त्याच्या कामाची मजुरीही देण्यात येई.

जेलमध्ये जरी दोनशे लोकांची राहण्याची जागा असली, तरी आताशी तिथं फक्त शंभर-सव्वाशेच कैदी ठेवले जात होते; आणि त्याचं मुख्य कारण म्हणजे गोड्या पाण्याची टंचाई. पूर्वी इथं तीन विहिरी होत्या. मुबलक गोडं पाणी मिळे. पण भूगर्भात काय उलथापालथ झाली कोण जाणे- दोन विहिरी कायमच्याच आटल्या. फक्त एकाच विहिरीतून गोडं पाणी मिळू लागलं होतं. त्यामुळं तिथं शंभर-सव्वाशेंपेक्षा अधिक कैदी ठेवणं शक्य नव्हतं.

वर्षाकाठी वीस-तीस कैदी शिक्षेची मुदत संपली की सुटून जात अन् तितकेच नवीन पुन्हा येत. पण हा एकूण कैद्यांचा आकडा गेल्या पंधरा-वीस वर्षांत शंभर-सव्वाशेंच्या आसपास राहिला होता.

या जेलमधून आजपर्यंत एकही कैदी पळून गेला नव्हता, हे या जेलचं वैशिष्ट्य! पळून जाणं सोपं नव्हतंच! जेलभोवती दहा-बारा फुटांची अभेद्य अशी दगडी भिंत होती. तिच्या पॅरापेटवर अणकुचीदार अशा काचा बसवलेल्या होत्या. एखाद्यानं शक्कल लढवून भिंत ओलांडायचे मनात आणले तरीही ते त्याला शक्य होणार नव्हते; कारण भिंतीच्या खाली शे-दोनशे फूट कातळ उतरून जाणं म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या जबड्यात जाण्यासारखं होतं. आणि इतकंही करून एखादा कैदी ती भिंत अन् तो कातळ पार करून खाली समुद्राकाठाशी आला तर किनाऱ्यापर्यंत दोन-अडीच मैल पोहत जाण्याची छाती होत नसे! जेलच्या आसपास मोठमोठाले शार्क मासे होते. लहान होड्यांना आपल्या शेपटांचा तडाखा देऊन आतल्या कोळ्यांना गिळंकृत केल्याच्या घटना घडलेल्या होत्या. म्हणून जेलमध्ये रवानगी झालेल्या

कैद्याची सुटका व्हायची ती फक्त दोनच मार्गांनी. एक शिक्षेची मुदत संपल्यानंतर, आणि दुसरी म्हणजे शिक्षा भोगत असताना तो मरण पावला तरच!

म्हणूनच या जेलला गमतीनं काहीजण अंदमान असं जरी म्हणत होते, तरी अंदमानसारखी इथली हवा वाईट नव्हती. जेलच्या आवारात उंच अशी फणस आणि आंबा यांची दहा-पाच झाडं होती. ती मुद्दाम खड्डे खणून लावलेली होती. जेलच्या भोवताली दाट अशा 'वुडनरोझ' चे वेल पसरले होते. समुद्रावरून येणारा 'ओझोन' अनेक कैद्यांना मानवत असे. शिवाय त्या गोड्या विहिरीच्या पाण्यात लोहभस्म होतं. भूक भरपूर लागे. बऱ्याच जणांना डाल-रोटीचा खुराक चांगलाच मानवत असे.

गेली अठरा वर्षं या जेलवर देसाई जेलर काम पाहात होते. त्यांची एक दोन -वेळा बदली झाली होती; पण नव्याने आलेल्या जेलरनी पदरखर्चानं आपली बदली करून घेतली. त्यांना तिथं राहणं अशक्य होई. मग पुन्हा देसाई जेलरना तिथं नेमावं लागे. पेन्शनीला येऊन ठेपलेले देसाई जेलर म्हणत, "मी कुठंही राह्यलो तरी मला सारखंच! उलट इथंच माझं मन अधिक रमतं." त्यांच्या हाताखाली शंभर-सव्वाशे कैदी होते. त्यातला कोणी पळून जाण्याची सुतराम शक्यता नव्हती. एक दिवसाआड सरकारी लाँच भाजीपाला, औषधं घेऊन यायची आणि जेलमध्ये तयार झालेला माल, लाकडी खेळणी, कैद्यांनी विणलेले जमखाने, पायपुसणी, करवंटीच्या विविध वस्तू घेऊन परत जायची. कैद्यांना सिगारेट ओढायची बंदी होती पण देसाई जेलर म्हणायचे, तेवढा तरी विरंगुळा बिचाऱ्यांना मिळू दे. त्यांच्या मजुरीच्या पैशांच्या मोबदल्यात ते त्यांना विड्या- सिगारेटी घ्यायला परवानगी देत. पण हे सारं गुपचूप!

या जेलमध्ये येणारे सर्व कैदी काही ना काही धंदेशिक्षण घेत आणि शिक्षण पूर्ण झालं की कामाला लागत. पण पाच वर्षांपूर्वी इथं आलेला एक कैदी कसलंच काम करीत नव्हता. किंबहुना त्यानं काम करावं अशी खुद्द जेलर देसाईंचीच अपेक्षा नव्हती. उलट, सकाळी ड्युटीवर आल्यानंतर देसाई जेलर या कैद्याला अटेन्शनची पोज घेऊन सॅल्युट करीत आणि लाँचमधून आणलेली वर्तमानपत्रं त्याच्या स्वाधीन करीत. हा कैदी दुसरा-तिसरा कोणी नसून ते होते मोहनराव दिवेकर!

दिवेकर डिस्ट्रिक्ट जज्ज असताना त्यांनी आपली पत्नी शारदा आणि पट्टेवाला दाऊद या दोघांचा रिव्हॉलव्हरने गोळ्या घालून खून केला होता. खून केल्यानंतर त्यांनी शांतचित्तानं पोलीस-स्टेशनला फोन करून स्वत:च ही खबर दिली होती. आपल्याजवळचं रिव्हॉलव्हर त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन तर केलंच, पण स्वत:ही पोलिसांच्या स्वाधीन झाले. जिल्हा न्यायाधीशाने स्वत:च्या पत्नीचा आणि पट्टेवाल्याचा खून केल्याची ही घटना इतकी भीषण होती, की घटनास्थळी दहा मिनिटांत हजर झालेल्या मिरांडा डी.एस.पीं.ना सुद्धा काही क्षण गोंधळून गेल्यासारखं झालं होतं. पण मोहनराव शांतचित्तानं त्यांना म्हणाले,

"मिस्टर मिरांडा, अरेस्ट मी! अहो ऽऽऽ, मला अटक करा! दोन खून केलेले आहेत मी!"

मिरांडा डी. एस. पी. नी तरीही त्यांना बेड्या घालण्याचा आदेश दिला नाही. ते त्यांना आपल्याच गाडीतून पोलीस-स्टेशनला घेऊन गेले. मोहनरावांच्या अटकेचा पंचनामा झाल्यानंतर त्यांना मॅजिस्ट्रेटसमोर उभं करण्याचा प्रसंग आला. पण मोहनरावांना मॅजिस्ट्रेटच्या चेंबरमध्ये नेताच खुद्द मॅजिस्ट्रेटही खुर्चीवरून ताडकन उठून उभे राहिले. तेव्हा मोहनराव त्यांना म्हणाले,

"उठता कशाला? मी आज तुमच्यापुढं आरोपी म्हणून उभा आहे! गुन्हेगार आहे मी! आज मी तुमचा डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून तुमच्यापुढे उभा नाही!"

मॅजिस्ट्रेटच्या तोंडातून एकही शब्द उमटत नव्हता. पोलिसांनी मागितलेल्या रिमांड

यादीवर सही करताना मॅजिस्ट्रेटचा हातदेखील थरथर कापत होता.

मोहनराव दिवेकरांच्याविरुद्ध आपली पत्नी शारदा आणि पट्टेवाला दाऊद या दोघांचे खून केल्याचा आरोप ठेवण्यात आला. मोहनरावांनी स्वत:चा बचाव करण्यासाठी कोणीही वकील नियुक्त केला नाही. केस चालू झाल्यानंतर त्यांनी गुन्हाही अमान्य केला नाही पण सरकारतर्फेचा पुरावा संपल्यानंतर त्यांनी दिलेलं निवेदन मात्र अंत:करण हेलावून सोडणारं होतं.

'पिनड्रॉप सायलेन्स' असलेल्या कोर्टहॉलमध्ये मुंगीलादेखील शिरणं अशक्य होतं. नवीन नेमणूक झालेले डिस्ट्रिक्ट जज्ज सालढाणा चेहऱ्यावरचं गांभीर्य लपवू शकत नव्हते. शिरस्तेदार मोहनरावांना विचारत होता.

''सरकारतर्फे झालेल्या पुराव्याबद्दल आपणाला आणखीन काही सांगायचं आहे का?''

''हो, सांगायचं आहे.''

टायपिस्टनं टाईपरायटरमध्ये नवा कागद सरकवला. तेवढाच काय तो आवाज कोर्टरूममध्ये झाला.

मोहनराव सांगू लागले,

''मी या जिल्ह्याला डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून बदलून आलो या गोष्टीला एक वर्ष झालं. इथं मी आणि माझी पत्नी शारदा असे दोघेच आलो. मला एक मुलगा अन् एक मुलगी अशी दोनच मुलं. मुलीचं लग्न होऊन तीन वर्षं झाली. तिचा नवरा नागपूरला प्रख्यात सर्जन आहे. माझा मुलगा यंदा मेडिकलच्या दुसऱ्या वर्षाला आहे. आजपर्यंतचं माझं आयुष्य सुखासमाधानात गेलं. मानसन्मान, पैसा, प्रतिष्ठा यांचा मला कधीही हव्यास नव्हता. तरीही ते सर्व माझ्या मागे मागे येत राहिले. उत्तम सुसंस्कारात घडवलेली माझी दोन्ही मुलं सद्गुणी निघाली. मला कसलीच विवंचना नव्हती. एक आदर्श गृहस्थ असं माझं मीच स्वत:ला समजत होतो. पण माझ्या या कल्पनेला सुरुंग लागला. माझी पत्नी शारदा हिचं वर्तन काहीसं चमत्कारिक होऊ लागलं. पंचेचाळिसाव्या वर्षी निसर्गनियमानुसार म्हणे स्त्रीत्वाला ओहोटी येते. पण शारदेच्या बाबतीत मला निराळाच अनुभव येऊ लागला. तिची परक्या पुरुषाकडं पाहायची नजर बदलत आहे असं माझ्या निदर्शनाला येऊ लागलं. आम्ही क्लबला जायचो. तिथं इतर स्त्रियांशी बोलण्यापेक्षा तिला पुरुषांशी थट्टामस्करी करणं आवडू लागलं. या तिच्या वागण्याबद्दल मी दहा-पाच वेळा माझी नापसंतीही व्यक्त केली पण तिनं त्याकडं दुर्लक्ष केलं.

''त्यानंतर मी तिच्यासोबत क्लबला जाणं बंद केलं. तिलाही जायची मना केली. पण माझ्या या वागण्यानं तिचं वर्तन सुधारण्याऐवजी अधिकच बिघडलं. कामानिमित्त घरी येणाऱ्या पुरुषांशी ती अघळपघळ गप्पा मारू लागली. हळूहळू पट्टेवाले आणि बागेचा माळी यांच्याशी तिचं सलगीचं वागणं सुरू झालं.

''माझं स्वास्थ्य पार बिघडून गेलं. तिच्या स्वभावात कशाप्रकारे स्थित्यंतर घडवता येईल याचा मी रात्रंदिवस विचार करू लागलो. एकदा तर मी तिला स्पष्टच विचारलं.

''शारदा, तू अशी का वागतेस अलीकडे?''

''अशी म्हणजे कशी?''

''अशी म्हणजे तुझ्या नि माझ्या प्रतिष्ठेला न शोभेल असं तुझं वर्तन घडतं आहे तुझ्याकडून अलीकडे. तुला कशाची कमतरता आहे सांग. आपली विद्या लग्न होऊन चांगल्या घरी गेली. विनय पुढल्या वर्षी एम.बी.बी. एस. होईल. त्याला अनुरूप अशी मुलगी शोधावी लागेल आपल्याला.''

''हो; पण हे मला वारंवार कशाला सांगता?''

"तू अलीकडं कशी वागते आहेस याचं थोडं आत्मनिरीक्षण करून पाहा."

"मला सर्व कळतं आहे. तुमचाच स्वभाव संशयी बनला आहे. मी मनमोकळेपणानं लोकांशी बोलते ते तुम्हाला आवडत नाही. तुम्हीच स्वत:ला जरा निरखून पाहायला शिका. डिस्ट्रिक्ट जज्ज झालात म्हणून आपणाला सर्व काही समजतं, हा खोटा अभिमान वाटतो आहे तुम्हाला."

"तसंही असेल कदाचित. पण शारदा, गावात तुझ्या या वागण्याची टिंगलटवाळी चालते हे लक्षात येतं का तुझ्या? मी जिल्हा न्यायाधीश म्हणून प्रत्यक्ष मला कोणी तसं काही सांगत नाहीत. पण आजूबाजूचे लोक काय बोलतात हे जाणण्याइतका चाणाक्ष मी निश्चितच आहे. ज्या गोष्टीत तुला आताशी रस वाटतो आहे त्या करण्याचं तुझं वय नाही. एवढ्यात सर्व काही समजून घे."

"बरं बरं! समजलं! लोक काय बोलतात ते माझ्या वागण्यामुळं मुळीच नाही. ते तुमच्या दुबळ्या मनोवृत्तीला हसतात, तुमच्या संशयी वृत्तीचीच टिंगल होत आहे."

"त्यादिवशी शारदेनं उलट माझ्यावरच संशयी वृत्तीचा आरोप केला.

त्यानंतर एक आठवडा उलटला. कोर्टात दाऊद नावाचा पट्टेवाला होता. गोरा, लाल, घाऱ्या डोळ्यांचा दाऊद युरोपियन सोल्जरसारखा दिसायचा. तो बंगल्यात टपाल घेऊन यायचा पण मी त्याला बाहेरच्या बाहेरच घालवून देत असे.

"त्यादिवशी कोर्टात एक मोठी अफरातफरीची केस चालणार होती. मी साडेअकरा वाजता डायसवर आलो. साक्षीदारांना पुकारणारा दाऊद कोर्टात दिसेना म्हणून मी शिरस्तेदाराला विचारलं,

"आज दाऊद नाही दिसत?"

"तो आजच्या दिवस रजेवर आहे, साहेब."

"सी. ओ. सीं. ना बोलवा."

"सी. ओ. सी. आले आणि त्यांनी मला दाऊदचा एक दिवसाची किरकोळ रजा मागितलेला अर्ज दाखवला.

"मी कामाला सुरुवात केली; पण कुणास ठाऊक, मन अत्यंत अस्वस्थ झालं होतं. साक्षीदारांच्या जबाबाचे डिक्टेशन सांगताना मी चुकू लागलो. भिंतीच्या घड्याळात दोनचे टोले पडले, तसा मी काम थांबवून उठलो. गाडी घेतली आणि बंगल्याकडं निघालो. पण गाडी बंगल्यात न घेता बाहेर रस्त्यावर उभी केली. कंपाऊंडमधून मी शारदेच्या खोलीजवळ जाऊन कानोसा घेतला. तिची खोली बंद होती. आत हळुवार आवाजात शारदा दाऊदशी बोलत होती. मी माझ्या खोलीत गेलो. कपाटातलं रिव्हॉलव्हर घेतलं नि परत शारदेच्या खोलीजवळ जाऊन दारावर थाप मारली. शारदेनं आतूनच विचारलं,

"कोण आहे?"

"मी! दार उघड!" मी क्रोधानं म्हणालो,

"अकरा वाजता मी कोर्टात गेलो की संध्याकाळी सहाशिवाय परत येत नसे हे शारदेला ठाऊक होतं. गेली कितीतरी वर्षं हा नियम होता. तेव्हा मी असा अवेळी आल्याचं पाहून तिला काय करावं समजेना. पण ती काय करणार याचा अंदाज होता. व्हरांड्याकडचं दार उघडून ती दाऊदला बाहेर घालवणार याची मला खात्री होती. म्हणून मी धावतच व्हरांड्याच्या दाराजवळ जाऊन थांबलो.

"दाऊद गडबडीनं दारातून बाहेर पडण्याच्या बेतात असतानाच मी त्याच्यावर गोळी झाडली. तो "या अल्ला ऽ ऽ ऽ" म्हणून खाली कोसळला. शारदा कानांवर हात ठेवून

किंचाळत उभी होती. दुसऱ्या क्षणी तीही माझ्या आणखी एका गोळीचं निशाण बनली.

"मी दोन खून केले, अगदी जाणूनबुजून केले. खून केल्यानंतर काय सजा होते हे ठाऊक असूनही मी दोन मुडदे पाडले! पण त्याबद्दल मला पश्चात्ताप वाटत नाही. मी काही चूक केलेली आहे असं मला वाटत नाही. माझ्या या कृत्याबद्दल मला शिक्षा होणार हे ठाऊक होतं. आता मला कोणती शिक्षा द्यावी असा प्रश्न उद्भवणार आहे. न्यायाधीशांना त्याबाबतीत मला एक विनंती करायची आहे. ही शिक्षा फार सवलतीची असू नये. कारण वर्ष-दोन वर्षात जर मी तुरुंगातून बाहेर आलो, तर या खटल्याची पार्श्वभूमी ताजी असल्यामुळं लोक मला बघितल्या बघितल्या चर्चा करत राहतील. ही शिक्षा प्रदीर्घही असू नये; कारण प्रदीर्घ शिक्षा देण्यासारखा गुन्हा मी केलेला नाही. ही शिक्षा पाच ते सात वर्षांची असावी एवढीच माझी विनंती आहे. मला त्यानंतर माझ्या नातवंडांच्या सहवासात राहायची इच्छा आहे."

कोर्टात जमलेल्या लोकांना ती हकिगत ऐकताना वाटत होते, की मोहनरावांना न्यायाधीशाने निर्दोष सोडावे. न्यायाधीशांना देखील आपल्या एकेकाळच्या सहकाऱ्याला जबर शिक्षा ठोठावणं जिवावर आलं होतं. त्यांनी मोहनराव दिवेकरांना सहा वर्षांची शिक्षा सांगितली.

त्यातली पाच-साडेपाच वर्षे आता सरली होती. त्यानंतर मोहनरावांची सजा संपणार होती. विनय आणि विद्या त्यांना वर्षातून एकदा इथं जेलमध्ये येऊन भेटून जात होती. मोहनरावांना पॅरोलवर सोडावे अशी शिफारस देसाई जेलरनी केली होती. पण मोहनरावांनी स्वत: होऊनच ती सवलत नाकारली होती.

त्यांनी अंगमेहनतीचं काम करावं असं जेलरसाहेबांना कधीच वाटलं नाही. उलट त्यांना दोन्ही वेळचं आपल्या घरचं जेवण, झोपायला गादी इत्यादी सुविधा देसाई जेलरनी कायदा आणि नियम झुगारून दिल्या होत्या. त्याबाबतीत इतर कैद्यांनीही कधीही कुरबूर केली नव्हती. उलट, मोहनरावांचे कपडे धुणं, त्यांचं अंथरूण घालणं इत्यादी लहानसहान कामे इतर कैदी स्वेच्छेने करीत.

सहा महिन्यांपूर्वी याच जेलमध्ये खुनाच्या आरोपावरून जन्मठेपेची शिक्षा भोगायला आलेला कैदी सीताराम सारंग त्यांच्या बराकीत राहत होता.

मोहनरावांना सीतू हा एक अभ्यासाचा विषय वाटत होता. जेलमध्ये आल्यापासून तो मोहनरावांना एकसारखा म्हणत होता- "साहेब, मी निरपराध आहे. मी नारायणाचा खून केलेला नाही."

सहा महिने सीतू हेच वाक्य घोकत होता. मोहनरावांनी सुरुवातीला त्याच्या म्हणण्याकडं दुर्लक्ष केलं, कारण प्रत्येक कैदी सुरुवातीला असंच म्हणत असे. पण आताशी मोहनरावांना खरोखरच वाटू लागलं, की सीतू म्हणतो ते खरं की खोटं याची एकदा शहानिशा करून घ्यायला हवी. नाही तरी न्यायाधीश असताना खरं अन् खोटं हे समजून घ्यायची त्यांना सवयच होती.

बराकीच्या खिडकीजवळ उभं राहून लाटांचं तांडवनृत्य पाहता पाहता अश्रू ढाळणाऱ्या सीतूच्या हाताला धरून ते जेलच्या मध्ये असलेल्या दगडी चबुतऱ्याकडे निघाले. आता त्यांना सीतू म्हणतो ते खरं की खोटं याची खात्रीच करून घ्यायची होती.

गडाच्या पायथ्याशी भरतीच्या लाटा धडकत होत्या. धो-धो असा आवाज जेलच्या भिंतीपलीकडे येत होता.

आकाशात एक एक तारा उमटू लागला. चित्रदुर्ग किनाऱ्यालगतचा द्वीपकल्पाचा लाल दिवा उघडझाप करून गलबतांना धोक्याचा इशारा देत होता.

दिवेकरसाहेब अंथरुणावर पडले; पण त्यांना आज झोप लागत नव्हती. गेले सहा

महिने मनोभावे त्यांची सेवा करणारा सीतू हा खरोखरच अपराधी आहे की निरपराधी आहे शहानिशा करून घ्यायची होती. ते उठले. उशाचा दिवा लावला आणि त्यांनी आपले एकेकाळचे जिवलग मित्र उमाजी रावराणे, रिटायर्ड सी. आय. डी., डी. आय. जी. यांना पत्र लिहायला सुरुवात केली.

चित्रदुर्ग जेल
२१ डिसेंबर, १९७५.
प्रिय उमाजीराव-
सप्रेम नमस्कार,

चि. कु. संध्याच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका मला मिळाली होती. मी त्या लग्नाला इच्छा असूनही हजर राहू शकत नव्हतो. अद्याप थोडा कालावधी मला कारावासातच काढावा लागणार आहे. परंतु मला तुमच्या सहवासातले सुखद क्षण अजूनही आठवतात. आपली मैत्री जमली तीसुद्धा कशी अगदी सहज! मी अकोल्याला असिस्टंट जज्ज म्हणून नेमणुकीला आलो तेव्हा आपली ओळख झाली. ओळखीचं रूपांतर मैत्रीत झालं. त्याच सुमाराला चि. संध्याचा जन्म झाला. तेव्हापासून माझी ज्या ज्या जिल्ह्यात बदली झाली तिथं तुमचीही बदली होत होती. तसं पाहिलं तर तुम्ही पोलीस अधिकारी आणि मी न्यायाधीश. आपला पेशा एकदम भिन्न. पण तरीही आपल्या घनिष्ट मैत्रीत कधीही अंतर पडलं नाही. तुम्ही बढती मिळवून इन्स्पेक्टर झालात, डीवाय.एस.पी. झालात आणि काही काळ वर्ध्याला डी. एस.पी. म्हणून काम केल्यानंतर सी. आय. डी., डी. आय. जी. म्हणून निवृत्त झालात. मीही त्या सुमारास डिस्ट्रिक्ट जज्ज झालो होतो. लवकरच माझी बेंचवर नियुक्ती होणार होती. पण माझ्या हातून तो भयंकर प्रकार घडला. मी माझ्या बदफैली पत्नीचा आणि पट्टेवाल्याचा खून केला. तुम्ही वरिष्ठ पोलीस अधिकारी असूनही तेव्हा माझ्या मदतीला धावून आलात. पण मी माझा खटला लढवायचा नाही, असा निर्धार केला होता. बदफैली पत्नीचा नवरा म्हणून मला उजळ माथ्यानं वावरायची इच्छा नव्हती. म्हणूनच मी माझी केस लढवली नाही. नाही तर 'ग्रेव्ह अँड प्रोव्होकेशन' चा बचाव घेऊन मी वर्ष-सहा महिन्यांच्या आत बाहेर आलो असतो. पण मी मुद्दामच अधिक मुदतीचा कारावास पत्करला. एका अर्थी ते बरंच झालं. कारावासामध्ये खूप आत्मचिंतन करायची संधी प्राप्त झाली. वाचनही खूप झालं. इथले जेलर देसाई मला पितृस्थानी मानतात. माझी इच्छा असूनही मला कसलेच शारीरिक कष्ट करू देत नाहीत. देसायांचं तर सोडूनच द्या, इथले कैदीदेखील एखाद्या राष्ट्रीय नेत्याप्रमाणे माझी सेवा करतात. गेल्या सहा महिन्यांपूर्वी या चित्रदुर्गच्या जेलमध्ये एक तरुण जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी दाखल केला गेला आहे. त्याचं नाव आहे सीताराम, पण त्याला सारेजण सीतू म्हणूनच ओळखतात. या सीतूवर आरोप होता, नारायणन नावाच्या मॅनेजरचा खून केल्याचा! आरोप शाबित झाल्यामुळे त्याला जन्मठेपेची शिक्षा झालेली आहे. हे पोर फारच लोभस आहे. एकसारखं अश्रू ढाळत बसतं. मी त्याला अनेकवेळा विश्वासात घेऊन म्हटलं, "अरे, कायद्याचा भंग केला, गुन्हा केला की शिक्षा ही होणारच. मी न्यायाधीश असूनही शिक्षा नाही का भोगत?" त्यावर तो म्हणतो, "मी गुन्हेगार नाही. मी नारायणनला मारलेले नाही. मी निरपराध आहे."

मलाही अलीकडे तो म्हणतो त्यात काहीतरी तथ्य असावं असं वाटू लागलेलं आहे, पण इथं, या चित्रदुर्गाच्या कडेलोट बंदोबस्तात असलेल्या जंजिरा जेलमध्ये राहून सीतूच्या प्रकरणातलं सत्य काय अन् असत्य काय हे मला समजू शकणार नाही. म्हणून मी हे काम तुमच्यावर सोपवत आहे याची मला जाणीव आहे. कारण तुम्हाला या प्रकरणाची चौकशी

करण्यासाठी निंबर्डी गावी जाऊन राहावे लागेल. नारायणनचे मूळ गाव अर्नाकुलम. तिकडंही तुम्हास जावं लागेल. सीतूचे आई-बाप कोण होते, तो वारंवार ज्या फादर मॅथ्यूस-माथुकाकांचा नामनिर्देश करतो, ते गृहस्थ कोण आहेत याचीही सखोल अशी चौकशी करावी लागेल. कदाचित तुम्हाला वाटेल, दिवेकरसाहेबांना कोणी सांगितला हा उपद्व्याप करायला? पण खरं सांगू, मला त्या पोरानं फारच जीव लावलेला आहे. त्याची प्रेयसी होती सुबी. तिच्याशी आपलं लग्न झालं म्हणतो हा. मला वाटतं की, त्या सुबी प्रकरणातूनच त्याच्या खटल्याची गुंतागूंत निर्माण झालेली असावी. तुम्ही आता रिटायर्ड आहात, तेव्हा वेळेचा प्रश्न उद्भवत नाही. चार पैसे खर्च होतील यात शंका नाही. पण मी पैशांची भरपाई करून देईन असं म्हणालो, तर तेही तुम्हाला आवडणार नाही. तुम्ही म्हणाल, 'मैत्रीसाठी इतकंही मी करू शकत नाही का?' खरंय ना?

तेव्हा कृपा करून आपण लवकरात लवकर निंबर्डी गावी जावं.

निंबर्डीत राहायची व्यवस्था होणार नाही. तुम्हाला निंबर्डीपासून तीन मैलांवर असलेल्या तिठ्ठ्यावर बाशा मामूच्या हॉटेलात राहावं लागेल. तिथं राहून तुम्हाला निंबर्डीत रोज फेरफटका मारता येईल. अंतर तसं फार थोडं आहे. लवकरात लवकर जावं ही पुन्हा एकवार विनंती. सौ. वहिनींना स. न.

आपलाच,

मोहनराव.

उमाजीराव रावराण्यांनी ते पत्र वाचलं अन् नंतर पत्नीला वाचायला दिलं, तेव्हा त्यांनी विचारलं,

"तुम्ही खरोखरच जाणार की काय?"

"काय म्हणजे? जाणार! मोहनरावांनी केलेली विनंती आहे ही. मला जाणंच भाग आहे."

उमाजीराव रावराण्यांनी आपली बॅग भरायला सुरुवात केली.

०००

# दोन

चित्रदुर्गापासून पन्नास मैलांवर समुद्रकाठी सीतू सारंगाचा निंबर्डी गाव होता. दोन छोट्या-छोट्या वाड्या चर्चच्या टेकडीमुळं दुभंगल्या होत्या. इथंही समुद्रकिनाऱ्यावर शे-दोनशे फूट उंचीचा खडक होता. अन् या खडकावर अठराशे पंचाहत्तरला ब्रिटिशांनी एक चर्च बांधलं होतं. चर्च बांधण्यामागचा हेतू एकच होता- निंबर्डीच्या कोळ्यांना आणि भंडाऱ्यांना खिश्चन धर्माची दीक्षा देण्याचा! तो काही अंशी सफलही झाला होता. निंबर्डीतले काही रहिवासी खिश्चन झाले होते. पण देशाला स्वातंत्र्य मिळालं तसं या चर्चचं महत्त्वही कमी झालं. नाही म्हणायला दर रविवारी सकाळी प्रार्थनेसाठी पाच-पंचवीस भाविक खिश्चन चर्चवर येत. गेली तीस वर्षं तिथं धर्मोपदेशक म्हणून फादर मॅथ्यूस राहात होते. चर्च होतं जुनंच; पण त्याचं बांधकाम इतकं उत्कृष्ट होतं, की ही इमारत शंभर वर्षांची जुनी आहे, हे कोणाला सांगूनही पटलं नसतं. एकावेळी शे-दोनशे माणसं प्रार्थना करू शकतील, इतका मोठा प्रार्थनेचा हॉल होता. हॉलमध्ये पूर्वाभिमुख अशी संगमरवरी जीझसची अतिशय देखणी आणि प्रमाणबद्ध अशी 'क्रुसीफाय' केलेली मूर्ती होती. एखाद्या हिंदूनं अगर मुस्लिमानं सहज म्हणून जरी चर्चच्या प्रवेशद्वारातून आत डोकावलं, तरी ती मूर्ती पाहून नकळत त्याचे हात जुळावेत! नाहीतरी निंबर्डीच्या परिसरातील हिंदू आणि मुस्लिमांची त्या चर्चवर श्रद्धा बसावी असा एक प्रसंग घडलेलाच होता. निंबर्डीला नारळीपोफळीची झाडं जोमानं वाढायची, सागरकिनाऱ्यावर सर्व प्रकारची मासळी विपुल मिळायची; पण पिण्याच्या पाण्याची मात्र भलती टंचाई होती. लोकांना गोड्या पाण्यासाठी अर्धा मैल पूर्वेला जावं लागे. तिथं निंबर्डी नदीचं उगमस्थान होतं. पाण्यासाठी इतकी पायपीट किती वर्षे करायची, असा विचार प्रत्येकाच्या मनात येत होता. पण त्यांना मार्ग सुचत नव्हता. अर्ध्या-पाऊण मैलांवर एखादं ऑईल इंजिन बसवून तिथलं पाणी चर्चसमोरच्या टेकडीपर्यंत आणावं व टेकडीवर एक टाकी बांधावी अशी सूचना पस्तीस वर्षांपूर्वी चर्चच्या मागे राहणाऱ्या फादर अँड्रयुज स्टीफन यांनी केली होती. त्यासाठी त्यांनी अमेरिकन चर्च कौन्सिलशी पत्रव्यवहारदेखील सुरू केला. योजनेला रंगरूप येण्याची चिन्हं दिसू लागली. पण इतक्यात फादर अँड्रयूज स्टीफन खिस्तवासी झाले. त्यांच्या जागी रेव्हरंड मॅथ्यूस आले. या रेव्हरंड मॅथ्यूसनी पुन्हा ती योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. पण हिंदुस्थानातली ब्रिटिश राजवट संपुष्टात आल्यानंतर तिथल्या नागरिकांच्या सुखसोयीसाठी चर्च कौन्सिलनं आस्था दाखवण्याची टाळाटाळ सुरू केली. पण रेव्हरंड फादर मॅथ्यूस, ज्यांना निंबर्डीचे लोक 'माथुकाका' म्हणत, ते मात्र हताश झाले नाहीत.

'गॉड इज व्हेरी ग्रेट. ही हॅज क्रिएटेड थर्स्ट, ही वुईल गिव्ह वॉटर!' अशी त्यांची श्रद्धा होती.

मे महिना आला. निंबर्डी नदीचं उगमस्थान आटलं. गावकऱ्यांना पिण्याला पुरेसं पाणीही मिळेना. गाव हवालदिल झाला. चर्चच्या उजव्या आणि डाव्या बाजूचे लोक एकत्र जमून माथुकाकांकडे आले. माथूकाकांनी त्यांचं गाऱ्हाणं ऐकून घेतलं आणि ते म्हणाले,

"तुम्ही कोणत्याही जातिधर्माचे असा, मी तुमच्यातला माणूस पाहतो. ईश्वरानं निर्माण

केलेली आपण लेकरे आहोत. आकाशस्थ प्रभू अत्यंत दयाळू आहे. त्याने अखंड मानवजातीच्या उद्धारासाठी आपला एकुलता एक पुत्र येशू तुमच्या मार्गदर्शनासाठी पृथ्वीवर पाठवलेला होता. दुर्दैवानं माणसाला तो ओळखता आला नाही. त्याची हत्या करण्यात आली. पण त्याच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ती धरणी, तीवर राहणारी माणसं यांनी जर अंत:करणापासून त्याचं स्मरण केलं, तर या जगात दु:ख म्हणून राहणार नाही. आपल्याला पाणी हवं आहे. ज्यानं तोंड दिलं त्याला अन्न देणं भाग आहे. ज्यानं तहान निर्माण केली त्याला पाणी देणं प्राप्त आहे. पण आपण सर्वांनी अंत:करणापासून त्याची प्रार्थना करायला हवी. देअर इज ए ट्रिमेंडस पॉवर इन प्रेअर'' मध्येच माथुकाका एखादं वाक्य बोलून जात. त्यादिवशी ते बऱ्याचजणांना समजलं नाही. म्हणून त्यांनी पुन्हा त्या इंग्रजी वाक्याचं भाषांतर केलं. 'प्रार्थनेमध्ये प्रचंड ताकद आहे. प्रार्थना काय करू शकणार नाही? तेव्हा बंधूंनो, आपण आज मनापासून प्रार्थना करूया.''

निंबर्डीचे शे-चारशे लोक चर्चसमोरच्या पटांगणात हात जोडून उभे राहिले. माथुकाका त्यांना प्रार्थना सांगत होते आणि जमलेले स्त्री-पुरुष ती एकसुरात म्हणत होते. गावचा परिसर त्या ध्वनीमुळे भरून गेला. प्रार्थना संपल्यानंतर सारेजण आपापल्या घरी परतले. संध्याकाळ झाली. हवेतला उष्मा शमला. वादळी हवा सुटली. बघता बघता आकाशातले ढग काळे-निळे झाले. सोसाट्याचा वारा सुटला. नारळी-पोफळीची असंख्य झाडं उन्मळून खाली पडली. आकाशात विजेचे लोळ उठू लागले. कानठळ्या बसवणारा प्रचंड तोफा उडाल्यासारखा एक आवाज चर्चच्या बाजूला झाला. लोकांना वाटलं, वीज पडली आणि चर्च उद्ध्वस्त झालं. पण बाहेर काळोखात आपली शंका खरी की खोटी हे पाहायचं धाडस कोण करणार? धो-धो मुसळधार पाऊस कोसळत होता. पोफळीची झाडं कोसळत होती. नारळाचे घोस तुटून खाली पडत होते. विजेचं तांडवनृत्य सुरूच होतं. दहा वाजेपर्यंत हे चालूच होतं. दहानंतर सारं शांत झालं. कोणाच्या झोपड्या उद्ध्वस्त झाल्या होत्या, तर कोणाची नारळीची राईच्या राई भुईसपाट झाली होती. किनाऱ्यावरच्या होड्या नारळाच्या करवंट्यासारख्या दूर फेकल्या गेल्या होत्या. तरी बरं, तो पाळक दिवस होता. मासे धरण्यासाठी कोळी समुद्रात गेले नव्हते. ते जर गेले असते तर.....

ती भयाण रात्र सरली. पूर्व उजळली. निंबर्डीचे गावकरी आपलं नुकसान अजमावीत होते, तोच निंगू दादली मोठमोठ्यानं ओरडत आला.

''माथुकाकाऽऽऽ! माथुकाकाऽऽऽ''

''अरे, माथुकाकांचं काय झालं?'' एकाने विचारलं.

''माथुकाका बोलावतोय.''

''कशाला बोलावतोय? काल प्रार्थना केली आणि हे आमचं नुकसान झालं! त्याचं तोंड नाय बघणार!'' भंडारी आणि गाबित नुकसानीनं चिडले होते.

तोवर दुसरा ओरडत आला.

''येसू पावला. पान्याचा ह्यो ऽऽऽ मुसंडा!''

दोन्ही हात पसरून तो ओरडू लागला. सगळे गावकरी चर्चच्या टेकडीवर जमले. चर्चजवळच वीज कोसळली होती. तिथं धरणी दुभंगलेली होती. त्या भेगेतून पाण्याचा प्रवाह वाहत असलेला दिसला. लोकांनी चाखून पाह्यलं. शहाळ्यातल्या पाण्यासारखं गोड गोड!

सारे लोक चर्चसमोर जमले. माथुकाका जीझसच्या मूर्तीपुढे गुडघे टेकून प्रार्थना करीत होते.

''ओ लॉर्ड! हाऊ काइंडेस्ट दाऊ आर्ट! द पीपल ऑफ धिस रिजन वेअर थर्स्टी अँड प्रेड

फॉर वॉटर... यू क्वेंच्ड देअर थर्स्ट. ओ लॉर्ड! हाऊ काइंडेस्ट दाऊ आर्ट!''

माथुकाका प्रार्थना करीत होते. पण त्यांच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रू ओघळत होते. त्यांच्या डोळ्यांतले अश्रू पाहून जमलेल्या लोकांनीही आपले डोळे पुसले. निंबर्डीच्या चर्चचे माहात्म्य त्यांच्या प्रत्ययाला आले होते. आजपर्यंत त्यांनी दुंडाई देवीला असंख्य नवस-सायास केले होते. दुंडाईनं अनेकवेळा उजवा कौलही दिला होता, पण असा चमत्कार मात्र तिनं कधी दाखवला नव्हता.

रात्रीच्या वादळानं अपरिमित नुकसान झालं होतं, पण आता गावकऱ्यांना त्याची पर्वा नव्हती. भंडाऱ्यांनी दारूच्या भट्ट्या लावल्या. गावकऱ्यांनी कोंबडी, बकरी कापली. निंबर्डीत आनंदाचा जल्लोष उडाला होता.

चर्चच्या मागे माथुकाकांचं निवासस्थान होतं. माथुकाकादेखील आज गावकऱ्यांच्या आनंदात सहभागी झाले होते. त्यांनी मद्य मात्र घेतलं नाही. हातात हात घालून कोळी, भंडारी, दादली, खिश्चन सर्वजण नाचत होते. चर्चच्या टेकडीतून वाहणारं जिवंत पाणी आज घरोघर आलं होतं. निंबर्डीच्या झोपडीझोपडीतून रटरटणाऱ्या मटणाच्या रश्श्याचा वास आसमंतात दरवळत होता.

माथुकाकांनी नाचणाऱ्या लोकांना शांत करून म्हटलं,''बंधूंनो, आपण मनापासून प्रार्थना केलीत, ती प्रभूनं स्वीकारली. आपल्याला पाणी मिळालं; पण यापुढं आपण सर्वजणांनी प्रभूचं नित्यस्मरण न विसरता करावं. प्रभूच्या पायापासून निघणारं हे जल पवित्र आहे. ते प्राशन करणाऱ्याच्या मनात कधी पाप येऊ नये. कोणी कोणाची निंदानालस्ती करू नका, कोणी...''

निंबर्डीचे लोक आनंदानं बेहोष झाले होते. त्यांना माथुकाका काय बोलतात हे ऐकायला सवड नव्हती.

नाच-गाण्यात सहभागी झाला नव्हता तो रासू सारंग! त्याची पत्नी पदी प्रसूतिवेदनेनं व्याकूळ झाली होती. त्याच्या झोपडीत दोन-तीन बायका तिला धीर देत होत्या. पण तिचं विव्हळणं आणि रडणं ऐकून झोपडीच्या दाराशी बसलेला रासू सारंग बेचैन झाला होता. त्याला काही सुचेना तेव्हा त्यानं टेकडीवरच्या चर्चमधल्या येशूबाप्पाचं स्मरण केलं. पाण्यासाठी गावाची प्रार्थना ऐकलेल्या येशूनं रासूची प्रार्थना मात्र ऐकली नाही. पदीचं विव्हळणं, ओरडणं चालूच होतं. शेवटी तो उठला आणि गावाच्या मध्यभागी जिथं जल्लोष चाललेला होता, तिथं आला. झिंग्या दालदी हातात दारूचा शिसा घेऊन उभा होता. त्यानं त्याच्या हातून शिसा हिसकावून घेतला आणि तोंडाला लावला. त्यानंतर त्याला काय झालं हेच समजलं नाही.

पहाटे जेव्हा रासूची नशा उतरली तेव्हा तो आपल्या झोपडीच्या बाहेर पडलेला होता. कानावर लहान मुलाच्या रडण्याचा आवाज येऊ लागला तसा तो ताडकन उठून उभा राहिला.

सीतूचा जन्म झाला तो असा! तसं पाहिलं तर पदीचे दिवस भरायला अजूनही एक महिना अवधी होता. पण त्यादिवशीच्या भयानक तुफानामुळे आणि विजेच्या गडगडाटामुळे पदी घाबरली आणि अकाली प्रसूत झाली. विजेचा गडगडाट होत असताना जन्मलेला हा सीतू जन्मला तेव्हा अत्यंत कृश आणि दुबळा दिसत होता. रासू सारंगचं ते पहिलं आणि शेवटचंच मूल ठरलं! सीतूच्या जन्मानंतर पदीला मूल झालंच नाही.

सीतूचा बाप रासू सारंग गाबित होता. वयाच्या पाचव्या वर्षी तो प्रथम आपल्या बापाबरोबर दर्यावर गेला होता आणि तेव्हापासून सतत जात राहिला. वयाच्या पंधराव्या वर्षी तो चांगलाच दर्यावर्दी झाला. कधी कधी तो आपली छोटी होडी घेऊन दोन-तीन मैल आत जात असे. भय हा शब्दच त्याला ठाऊक नव्हता. वारा कितीही प्रतिकूल असला तरी होडीला शीड

चढवून तो इच्छित स्थळी अचूक पोहोचत होता. अफाट पसरलेल्या सागरात नेमकी जागा लक्षात ठेवणं जवळजवळ अशक्यच; पण या रासू सारंगाजवळ तेही ज्ञान उपजत होतं. कोणत्या ठिकाणी जाळी पसरली की सुरमई मिळते, सरंगा पकडण्याची जागा कोणती, रावस कसा धरावा हे मोठ्यांनी त्याच्याकडून शिकावं! निंबर्डीचे मच्छिमार कधीकधी हात हलवीत परत येत. पण रासू सारंग रिकाम्या हातानं कधी परत आल्याचं कोणाला आठवत नव्हतं!

सीतू पाच वर्षांचा झाला. रासूनं त्याला पहिल्यांदा दर्यावर नेला. विलक्षण तेजस्वी डोळ्यांचा सीतू आपल्या बापाच्या बारीकसारीक हालचाली न्याहाळत होता. रासूनं टोके पकडण्यासाठी जाळी पसरायला सुरुवात केली तेव्हा सीतूनं पाण्यात गळ सोडला. रासू हसत हसत त्याला म्हणाला,

"काय पकडतोस?"

"मासा!"

"गळाला काय लावलंस?"

"काही नाही!"

"अरे वेड्या, मग मासा तो गळा खाईलच कसा?"

पण त्यावेळी आश्चर्य घडलं. काहीही न लावलेल्या गळाला एक मांद्याळी लटकली होती. सीतूनं ती ओढून वर काढली आणि तो आनंदानं ओरडला,

"हे बघ! काहीही न लावता मिळाली की नाही?"

रासूनं हातातलं जाळं बाजूला ठेवलं आणि तो पुढं झाला. गळात अडकलेली मांद्याळी त्यानं सोडवली आणि सीतूच्या पाठीवर शाबासकी देत तो म्हणाला,

"वाऽऽऽ पठ्ठे! बाप से बेटा सवाई होणार!"

पुढे सीतू दहा वर्षांचा झाला.

आता तो किनाऱ्याकिनाऱ्याने होडी घेऊन फिरू लागला. कधी सरंगा तर कधी सुरमई घेऊन तो घरी यायचा. पण तो परत येईपर्यंत पदीच्या जिवात जीव नसे.

याचवेळी सीतूची आणि माथुकाकांची मैत्री जमली. सीतू एखादा चांगला सरंगा मिळाला, तर टेकडीच्या माथुकाकांकडे घेऊन जाई. माथुकाका हसत हसत तो त्याच्याकडून घेत. पहिल्यांदा जेव्हा माथुकाकांनी सीतूला माशासाठी पैसे दिले तेव्हा सीतू म्हणाला होता,

"काका, मी पैसा नाय घेणार."

"का रे?"

"माय म्हणते, तुम्ही देवमाणूस आहात!"

नकारार्थी मान हलवीत माथुकाका म्हणाले,

"नाही, मीही तुमच्यासारखाच हात, पाय, नाक, डोळे असलेला माणूस आहे! या जगात एकच देवमाणूस झाला- " जीझसच्या संगमरवरी पुतळ्याकडं बोट दाखवून ते म्हणाले, "तो बघ, तो देवमाणूस!"

सीतूने जीझसच्या पुतळ्याकडे पाहून हात जोडले. माथुकाका त्याला चर्चच्या मागे आपल्या राहण्याच्या जागी घेऊन आले आणि त्यांनी तो मासा साफ करता करता सीतूला विचारलं,

"रासू आज दर्यावर गेला की नाही?"

"संध्याकाळी जाणार."

"मग असं कर, मी एक वस्तू देतो ती त्याला नेऊन दे."

असं म्हणत साफ केलेला मासा जाळीच्या कपाटात ठेवून माथुकाकांनी प्लेटमध्ये

ठेवलेला घट्ट असा खव्यासारखा पदार्थ चाकूनं कापला आणि कागदात गुंडाळून सीतूकडे देत ते म्हणाले,

"हे चीज आहे. रासूला फार आवडतं. कालच संध्याकाळी माझ्याकडं आलं."

कागदात बांधलेल्या चीजचा वास घेऊन नाक मुरडत सीतू म्हणाला,

"कशाचं करतात हे काका? वास का असा येतो घाण?"

"अरे, घाण नाही येत, दुधापासून बनवतात हे. गोरे लोक फार आवडीनं खातात. तू खाऊन बघ जरा."

"ना ना! मला खारी मासळीसुद्धा आवडत नाही!"

माथुकाका त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले,

"मासळी आवडत नाही? अरे कोळ्याचा पोर तू-तुला मासळी आवडत नाही, म्हटल्यावर लोक हसतील."

"ताजी मासळी खातो ना. ती खारावलेली नाय आवडत."

"बरं, हे रासूला आठवणीनं दे हं. त्याला फार आवडतं हे. मागे त्याला इथं खायला दिलं होतं पावाबरोबर, तर त्यानं पावाला हातदेखील लावला नाही."

सीतूची आणि माथुकाकांची चांगलीच गट्टी जमली. ज्यावेळी काही उद्योग नसेल तेव्हा सीतू सरळ टेकडीवर येऊन माथूकाकांशी गप्पा मारत बसे.

माथुकाका स्वत: हातानं जेवण बनवायचे. जेवण म्हणजे काय, एक जाड पराठा आणि उकडलेला मासा; रात्रीच्या जेवणाला मूठभर तांदळाचा भात बस्स!

रासूचं आणि माथुकाकांचं बऱ्याच वर्षांचं सख्य होतं. रासू नामांकित दर्यावर्दी होता. सागरात वादळ व्हायचं असलं तर एक-दोन दिवस त्याला अंदाज लागत असे. तो केवळ मच्छिमारीवरच आपली उपजीविका करीत होता असं नव्हे, तर मालवाहू गलबतं दूर सफरीवर जायची असली, तर मार्गदर्शनासाठी व्यापारी लोक रासूला सोबत नेत. महिना महिना रासू बाहेर राहायचा. रासूला मुंबईपासून ते गोव्यापर्यंतचा समुद्र परिचयाचा होता. खडक कोठे आहेत, रात्री मुक्काम करण्याची वेळ आली तर 'लंगर' कोठे सोडावा हे रासूइतकं चांगलं दुसऱ्या कोणत्याच खलाशाला कळत नव्हतं. या कामाबद्दल त्याला भरपूर मोबदला मिळत होता. महिनाभर रासू बाहेर गेला की येताना शे-पाचशे रुपये घेऊन यायचा. पण त्याच्या हाताला कात्री होती. पैसा असा हातात ठरतच नसे. कमाई शंभर असो नाही तर पाचशे असो, आठ-पंधरा दिवसांत त्याचा खिसा रिकामा व्हायचा. या त्याच्या उधळ्या स्वभावाबद्दल माथुकाकांनी त्याला कितीतरी वेळा सुनावलं होतं. सीतूच्या जन्माआधी रासू त्यांना गमतीनं म्हणाला होता,

"काका, पैसा खिशात असला की मला कसंसंच होतं! तो खर्च केला की बरं वाटतं!"

"अरे, पण म्हातारपणासाठी चार पैसे साठवून ठेवलेस तर वाईट होईल का?"

"म्हातारपण?" रासू पोटावर डावा हात ठेवून हसत हसत म्हणाला,

"मी दर्यावर्दी माणूस! रोज मरणाच्या दारात उभा असतो. केव्हा मरण येईल असा भरवसा आहे का सांगा बरं."

"अजून चाळिशी उलटली नाही तोच मरणाची भाषा करायला लागलास?"

"मी मरायला आतुरलोय असं नका समजू काका, पण माझा धंदा धोक्याचा हाय का नाही तुमी सांगा."

"धोक्याचा नाही असं कसं म्हणू मी? पण हा दर्या तुला कधी धोका देणार नाही-खात्री आहे माझी."

रासू पुन्हा हसला आणि म्हणाला, ''काका, पोटाला एक पोर झालं की मी मोकळा झालो.''

''म्हणजे काय होईल?''

''म्हणजे पदीला आधार होईल.''

''तुझी विचारसरणीच काहीशी विचित्र आहे झालं.''

रासूवर माथुकाकांचा फार लोभ होता. इंग्लंड, अमेरिकेवरून माथुकाकांना खूप भेटी येत. त्यात उत्तम कपडे, वुलनचे स्वेटर्स, फेल्टहॅटस् व खायचे जिन्नसही असत. असं एखादं पार्सल आलं की माथुकाका रासूला प्रथम बोलावणं धाडीत.

रासू अंगावर इतर कोळ्यांप्रमाणे कपडे कधीच वापरत नव्हता. दंडात घट्ट बसणारे निळे, लाल पट्ट्यापट्ट्याचे टी-शर्टस्, वूलनच्या कॉर्डाइटस्च्या पँटस्, डोक्यावर फेल्ट! एखाद्या नवख्या माणसानं रासूला पाह्यलं की वाटे, हा कोणीतरी गोव्याकडचा मोठा स्मगलर किंवा शेठ आहे की काय!

रासूला कधीही पैशांची अडचण भासलीच नव्हती. तो कोणावर दादागिरी करत नव्हता. गलबतावर काम नसेल तेव्हा आपली होडी आणि जाळं घेऊन मासे धरायला जायला तयार! कुणाची पंचाईत करीत नसे किंवा माथुकाका सोडून कोणाकडं त्याचं बसणं-उठणंदेखील नव्हतं. गावात त्याला लोक मानत होते ते त्याच्या विनम्र तटस्थपणामुळेच.

त्याला एकच चिंता होती-पदीशी लग्न होऊन आठ वर्षं झाली तरी पोटी संतान झालेलं नव्हतं. आपण विनाअपत्य आहोत, असा विचार मनात आला की तो विचार घालवून द्यायला तो बाटलीचा आश्रय घेई, पण तरीही तो दारुडा नव्हता. महिना-महिना तो दारूच्या थेंबालाही स्पर्श करीत नसे. पण प्यायला लागला की दोन-दोन दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत पीत राह्यचा. पिऊन पिऊन शिसारी आली की पुन्हा बंद! या त्याच्या वागण्याचं कित्येकांना कोडं वाटायचं. निंबर्डीत काही भंडारी, खिश्चन, गाबित असे होते, की ते दिवस मावळला की बैचेन व्हायला लागत.

रासूला माथुकाकांनी एक उत्तम घड्याळ भेट म्हणून दिलं. कपडे, टोप्या तर ते देतच होते. पण घड्याळ भेट दिल्यानंतर रासू म्हणाला,

''माझ्यासारख्या खलाशाला हे कशाला देता काका?''

''अरे, तू दर्यावर गेलास की बिचाऱ्या पदीची काय अवस्था होते याची तुला कल्पना येत नाही. तेव्हा ठरावीक वेळेला तुला परत येण्याचं भान राहावं म्हणून मी हे घड्याळ तुला देतो आहे. तू गेलास आणि परत यायला वेळ झाला की ती इथं टेकडीवर येऊन दूरवर दर्यात डोळे लावून बसते. मला दया येते रे तिची!''

''काका, काही म्हणा-बायकांनी आपल्या नवऱ्यांवर असं प्रेम करू नये!''

''का?''

''असं प्रेम केलेला माणूस अचानक गेला की फार दु:ख होतं.''

''मला समजत नाही, तू अशी का भाषा करतोस? ओ लॉर्ड! गिव्ह हिम विज्डम!'' असं म्हणून माथुकाका गळ्यातल्या क्रॉसला स्पर्श करीत आणि रासूला अभद्र बोलण्याबद्दल दटावीत.

मूल होत नव्हतं तेव्हा रासूचं वागणं बेताल होतं, ते सीतू जन्मल्यानंतर बदलेल असं वाटलं. पण व्यर्थ! तोच उधळमाधळ करणारा स्वभाव, बेपर्वाईचं वागणं, स्वत:च्या आयुष्याबद्दल तीच बेफिकिरी दिसू लागली! सकाळ-संध्याकाळ माथुकाकांच्या आऊट-हाऊसवर जात होता. निंबर्डीच्या गावकऱ्यांना अचंबा आणि आश्चर्य वाटण्याइतकी त्यांची दाट

मैत्री जमली होती. कधीकधी त्याचं रात्रीचं जेवण माथुकाकांकडंच घडू लागलं. माथुकाका देवमाणूस आहे आणि अशा देवमाणसाच्या सहवासात आपला सीतू वावरतो, याचा पदीला अभिमान वाटत होता.

माथुकाकांच्या सहवासात राहायला लागल्यापासून सीतूच्या वागण्या-बोलण्यात फरक पडू लागला होता. सोपी सोपी इंग्रजी बुकं वाचून तो 'माय' च्या ऐवजी पदीला 'मम्मी' आणि रासूला 'डॅड' म्हणू लागला.

सीतूच्या जन्मानंतर तर माथुकाकांनी रासूच्या मागे लागून त्याला पक्कं कातळाचं तीन खोल्यांचं घर बांधायला लावलं. घरात टेबल, खुर्च्या आल्या. एका खिडकीत देवघर स्थापन झालं. देवघरात श्रीकृष्णाच्या फोटोजवळ जीझसचा फोटो सीतूनं जेव्हा आणून लावला तेव्हा निंबर्डीतले काही वृद्ध म्हणू लागले, ''रासू सारंगाचा पोर किरिस्ताव होनार!''

०००

# तीन

निंबर्डी गावाची भौगोलिक रचना काहीशी विचित्र अशी होती. गावच्या मध्यावर चर्च होतं. चर्चच्या उत्तर बाजूला आऊट- हाऊससारख्या ओळीनं चार खोल्या होत्या. ब्रिटिशांचं राज्य होतं तेव्हा काही हौशी गोरे प्रवासी या आऊटहाऊसमध्ये बायकामुलांसह राहायला येत. निंबर्डीची ही जागा अत्यंत रमणीय होती. उंचवटा असल्यामुळं दोन्ही बाजूला समुद्रकिनारा खूप दूरपर्यंत दिसत होता. पिवळीजर्द वाळूची पुळण, तिच्यापुढे निळाभोर सागर आणि पुळणीच्या मागे नारळीची दाट राई यामुळं निळा, पिवळा आणि हिरवा या तिन्ही रंगांचे शुद्ध स्वरूप इथून पाहायला मिळे. किनाऱ्यावर येऊन आदळणाऱ्या लाटा भरतीची वेळ असली की सारी पुळण व्यापून टाकीत व ओळीनं उभ्या असलेल्या नारळीच्या बुंध्याला जाऊन भिडत. निंबर्डी गावच्या दक्षिणेला खाडी होती. ही खाडीची सोंड चार साडेचार मैल आत घुसली होती. उत्तरेकडूनही अशीच दीड मैलाची वेटोळ्या आकाराची सोंड या दक्षिणेकडून आलेल्या खाडीला मिळाली होती. त्यामुळं व्हायचं काय, तर भरतीच्या वेळी निंबर्डी गावचा परिसर एखाद्या लहानशा बेटाप्रमाणं पूर्वेच्या भूभागापासून अलग झाल्यासारखा दिसायचा. खाडीचं पात्र फक्त एकाच ठिकाणी लहान होतं. भरतीच्या वेळी होडीशिवाय पूर्वेकडं जाणं अशक्य असे. याच चिंचोळ्या जागेवर तारेचा एक झुलता पूल होता. एकावेळी एकच माणूस यावरून खाडी पार करून जाऊ शकत असे. दक्षिण- उत्तर अशा मुंबई-गोव्यास जाणाऱ्या सडकेला याच पुलावरून पुढे जाणारी पायवाट मिळत होती. निंबर्डीच्या खाडीत व किनाऱ्यावरून विपुल असे सर्व प्रकारचे मासे मिळत. पण ते डोक्यावरून रस्त्यापर्यंत अडीच-तीन मैल वाहावे लागत. जिथं निंबर्डी- तिठ्ठा ही पायवाट राजरस्त्याला मिळाली होती, त्या ठिकाणाला 'निंबर्डी-तिठ्ठा' म्हणत. या निंबर्डी-तिठ्ठ्यावर चार-पाच हॉटेल्स होती. त्यात बाशा मलबाऱ्याचं हॉटेल प्रसिद्ध होतं. या तिठ्ठ्यावर दलोल होते. हे दलाल निंबर्डीच्या कोळ्यांकडून मासे घाऊक असे विकत घेत आणि ते ट्रकने देशावर रवाना करीत. इथं एक लहानसा बर्फाचा कारखाना होता. तो रुसी नावाचा पारशी चालवत होता. मुंबई सोडल्यानंतर गोव्याला जाणारे ट्रक्स या तिठ्ठ्यावरच मुक्काम करीत. ट्रक्स मुक्कामाला थांबत असल्यामुळे ट्रकड्रायव्हर्सना ज्या -ज्या गोष्टी लागतात त्या तिथं मिळत होत्या. निंबर्डीचे भंडारी नारळाची आणि काजूची फेणी बनवण्यात दर्दी होते. बाटलीत बोट बुडवून बोटाला काडी पेटवून पाहावी अशी फेणी! बाशा मलबाऱ्याकडं 'चिकन' पासून 'सास अन्नक' पर्यंत सर्व काही मिळत होतं. बाशा नावाप्रमाणंच 'बादशहा' होता. रंगानं काळा, टक्कल पडलेला. ओठावरच्या मिशा मात्र पांढऱ्या सफेद! सदैव हसरी मुद्रा! त्याला कोणी रागावल्याचं किंवा दुर्मुखलेल्या चेहऱ्याचं पाह्यलेलं नव्हतं. बाशाला आठ भिन्न-भिन्न भाषा बोलता येत.

बाशाच्या हॉटेलच्या मागे एक पत्र्याची शेड होती. या शेडमध्ये नाकात चमक्या घातलेल्या सात-आठ दाक्षिणात्य वेश्या होत्या.

या मलबारीच्या हॉटेललगत ढेपश्याचं पानपट्टीचं दुकान होतं. हा ढेपशा पान, तंबाखू, सिगारेट यांच्यासोबत आणखीन एक जोडधंदा करीत होता- मटक्याचा!

निंबर्डीचा हा तिठ्ठा सदैव गजबजलेला असे. हायवेवरून जाणाऱ्या खाजगी गाड्यासुद्धा तेलपाणी करण्यासाठी इथं थोडा वेळ हॉल्ट करायच्या. भिकूशेठनं चार वर्षांपूर्वी इथं चालेल की नाही चालेल, या संशयानं पेट्रोलपंप काढला होता. त्याचं बस्तान इतकं चांगलं बसलं होतं, की त्यानं पंपाच्या मागे दोन वर्षांपूर्वी उत्तम असं मंगलोरी कौलांचं दुमजली घर बांधलं होतं. प्रवाशांना ऐनवेळी लागणाऱ्या वस्तूंचा एक लहानसा स्टॉल काढून बाशा मलबाऱ्यानं प्रवाशांची गैरसोय दूर केली होती. या स्टॉलमध्ये हातरुमालापासून ते मुलांना दूध पाजण्याच्या रबरी निपलपर्यंत सर्व काही मिळत असे.

निंबर्डीच्या तिठ्ठ्यावर तास-दोन तास उभं राह्यलं तरी करमणूक होई. मुंबई-गोव्याकडची खाजगी गाड्यांतून येणारी तरुण जोडपी पाय मोकळे करण्यासाठी खाली उतरली तरी एकमेकांच्या कमरेला विळखे घालून फिरत! निंबर्डीच्या कोळ्यांना आणि भंडाऱ्यांना तिठ्ठ्यावर जायला आवडत असे. पण तिठ्ठा फार मोहमयी होता. खिशात चार-दोन रुपये असेले, तर ते कसे उडून जायचे हे समजत नसे! पण तरीही निंबर्डीच्या छंदीफंदी लोकांना आठवड्यातून एक-दोन वेळा तरी तिठ्ठ्यावर गेल्याशिवाय चैन पडत नव्हतं.

माथुकाकाला तिठ्ठ्यावर जाणारी माणसं आवडत नव्हती. माथुकाका गेली तीस वर्षे निंबर्डीत वास्तव्य करून होते, पण कारणाशिवाय ते तिठ्ठ्यावर कधीच गेले नव्हते. गोव्याला सेंट झेवियरच्या दर्शनाला जाण्यासाठी मात्र त्यांना तिठ्ठ्यावर जावं लागे. तशी मुंबईहून गोव्याला जाणारी बोट निंबर्डीपासून वीस मैलांवर असलेल्या 'राजगड' या बंदरावर उभी राहात असे पण आताशी निंबर्डीला बोटीतून येणारे प्रवासी विरळाच. दिवसभर गोवा-मुंबईकडे जाणाऱ्या मोटारी मात्र वीस-पंचवीस होत्या. तोच प्रवास सोयीस्कर पडे.

माथुकाकांच्या समवेत सीतू आज तिठ्ठ्यावर आला होता. बेंगलोरवरून गोवामार्गे मुंबईला जाणाऱ्या रेव्हरंड विल्यम्स यांनी माथुकोकांना आपणाला भेटावे अशी विनंती केली होती. रेव्हरंड विल्यम्स हे लवकरच चर्च कौन्सिलच्या कामासाठी अमेरिकेला जाणार होते. भारतातली ब्रिटिश राजवट संपुष्टात आल्यापासून 'अल्केसियास्टिकल ॲक्टिव्हिटिज' कडं अमेरिकेचं दुर्लक्ष होतं आहे, अशी तक्रार ते तिथल्या सर्वोच्च धार्मिक संस्थेत गुदरणार होते. त्यासाठी भारतातल्या विविध ठिकाणच्या 'क्लर्जीज' आणि 'फादर्स' यांच्याकडून त्यांनी निवेदनं मागवली होती.

माथुकाका त्यांना भेटायला गेले.

पण जाताना त्यांनी कसलंही निवेदन सोबत नेलं नव्हतं.

जेव्हा माथुकाका आणि सीतू तिठ्ठ्यावर पोहोचले तेव्हा तिथं बरी गर्दी जमली होती. निळ्या रंगाची एक इंपाला कार रस्त्याच्या बाजूला आंब्याच्या झाडाखाली उभी होती. गाडीभोवती तिठ्ठ्यावरची प्रतिष्ठित माणसं जमली होती.

माथुकाका बाशा मलबारीच्या हॉटेलजवळ आले. त्यांना पाहताच पांढऱ्या धोतराची खोचलेली लुंगी घातलेला बाशा हसत हसत पुढे आला. त्यानं माथुकाकांना नमस्कार केला.

"काय काका, आज काय काम काढलं?"

"काम आहे. रेव्हरंड विल्यम्स आज या मार्गानं मुंबईला जायचे आहेत. त्यांना भेटण्यासाठी आलो आहे."

"या, आत या" माथुकाकांच्या हाताला धरून त्यांना काऊंटरजवळच्या खुर्चीवर बसवत तो म्हणाला,

"हा मुलगा कोणाचा?"

"हा सीतू- रासू सारंगाचा पोर!"

''मोठा गोड आहे हं पोरगा! काय खाणार रे? लाडू, पेढा, बर्फी, गुलाबजाम-''

सीतू 'काही नको' अशा अर्थाने मान हलवीत राहिला.

''घे तुला काय हवं ते.'' माथुकाकांनी सीतूला सांगितलं. बाशानं नोकराला बर्फी आणायची खूण केली आणि माथुकाकांकडे वळून तो म्हणाला,

''आपण काय घेणार?''

''मला फक्त एक कप लाईट चहा दे.''

चहा झाल्यानंतर माथुकाकांनी बाशाला विचारलं,

''ही गाडी कोणाची? बरीच माणसं जमलेली दिसतात भोवताली.''

''ते एक सिंधी उद्योगपती आहेत-मनमोहनशेठ! या भागात त्यांना एक कॅनिंग फॅक्टरी आणि एक कोल्ड स्टोअरेज सुरू करायचं आहे. 'व्हाईट प्रॉन्स' अमेरिकेला आणि जपानला सोन्याच्या भावानं विकले जातात ना! तेव्हा निंबर्डीच्या आसपास फॅक्टरी उभी करण्यासारखी जागा आहे की काय हे पाहण्यासाठी सोबत मच्छिमारतज्ज्ञ घेऊन आले आहेत.''

''म्हणजे हे लोक निंबर्डीचं स्वास्थ्य बिघडवणार तर!'' माथुकाका चटकन बोलून गेले.

''असंच नाही काका. इथल्या लोकांना मच्छिमारीचं शास्त्रोक्त शिक्षण मिळेल, बाया-मुलांना कॅनिंग फॅक्टरीत आणि कोल्ड स्टोअरेजमध्ये भरपूर मजुरी मिळेल. आज निंबर्डीचा माणूस रोज किती कमावतो हे आपणच मला सांगा.'' बाशानं विचारलं.

''तरी तीन-चार, तीन-चार रुपये कमावतो. का!''

''पण हे लोक जर इकडं आले तर प्रत्येकाला रोज दहा रुपयांना मरण नाही!''

माथुकाका बाशाकडं टक लावून पाहात म्हणाले, ''बाशा, तुला कल्पना नाही. रोजगार वाढला म्हणून माणूस सुखी होत नसतो. उद्योगधंद्याचं यांत्रिकीकरण हे देशाच्या प्रगतीचं एक लक्षण जरूर मानलं जावं; पण ते सोबत काही शापही घेऊन येत असतं हे विसरू नकोस.''

बाशा म्हणाला, ''पण निंबर्डीच्या परिसरातील लोकांचं राहणीमान तरी सुधारेल की नाही?''

''सुधारेल, सुधारेल!'' माथुकाका एक दीर्घ नि:श्वास सोडून म्हणाले, ''निंबर्डीच्या चर्चची घंटा आज इथपर्यंत ऐकू येते, ती मात्र पुढे ऐकू येणार नाही!''

माथुकाका कोणत्या अर्थाने हे वाक्य म्हणाले, हे बाशाला समजलं नाही. उलट निंबर्डीला दोन मोठमोठ्या फॅक्ट्या झाल्या की दळणवळण वाढेल; आणि दळणवळण वाढलं की आपला धंदाही वाढेल हे व्यवहारी गणित डोक्यात घोळवणाऱ्या बाशाला वाटलं, माथुकाका अजून पन्नास वर्ष मागं आहेत! असं जरी असलं तरी 'तुमचं म्हणणं मला पटत नाही- हे विचार मागासलेले आहेत,' असं माथुकाकांना उघडपणे सांगण्याची बाशात हिंमत नव्हती. माथुकाकांच्या प्रार्थनेत केवढी प्रचंड ताकद आहे हे सर्वांना कळून चुकलं होतं. या गोऱ्या, घाऱ्या डोळ्यांच्या म्हाताऱ्यात काहीतरी दैवी शक्ती आहे असं प्रत्येकाला वाटत होतं म्हणून माथुकाकांचे काही विचार जरी पटत नसले तरी ते चुकीचे आहेत असं म्हणण्याचं कोणाचं धाडस होत नसे. बाशाचंदेखील त्यावेळी झालं नाही.

थोड्या वेळातच रेव्हरंड विल्यम्स यांची गाडी आली. माथुकाकांची अन् त्यांची भेट झाली पण माथुकाकांनी त्यांना कसलंही निवेदन दिलं नाही. ते एवढंच म्हणाले, ''इंग्रजांचं आधिपत्य या देशावर होतं तेव्हा इथल्या खिश्चन बांधवांकडं पाहण्याची पाश्चिमात्यांची जी दृष्टी होती ती आता राहिली नाही. पूर्वी खिसमसला इथल्या गोरगरीब खिश्चन बांधवांना किती भेटी येत होत्या. वूलनचे कपडे, टीन्ड फूड, चीज... आता काही काही येत नाही. चर्चच्या इमारतीसाठी वर्षाला एक हजार रुपये यायचे पण आता पाचशे रुपये देतानासुद्धा त्यांना

जिवावर येते! गेल्या वर्षी रंगकाम करून घेतलं. त्यालाच सातशे रुपये लागले. मी आहे तोवर हे चर्च टिकेल. माझ्यामागे याचं काय होईल सांगता येत नाही. निवेदन सादर करून धर्मप्रसार होत नसतो; तो उत्स्फूर्तच व्हायला हवा.''

रेव्हरंड विल्यम्स माथुकाकांशी हस्तांदोलन करून म्हणाले, ''तुमच्या विचारांशी मी पूर्णत: सहमत आहे. इथल्या खिश्चन बांधवांना 'ना अरत्र ना परत्र' असं वाटू लागलेलं आहे खरं. खिश्चन म्हणून इथले सत्ताधारी आपल्याकडं एका परकेपणानं पाहतात आणि ज्यांनी आपणाला दीक्षा दिली ते हा देश स्वतंत्र झाला; आता आपण इथल्या जातिबांधवांचे काही देणे लागत नाही, अशा जाणिवेनं वावरतात.''

''चंद्रावर जाण्यासाठी इतका अलोट पैसा खर्च करत आहेत. पण इथं पृथ्वीतलावरचं दैन्य, दारिद्र्य दूर करण्याकडं कोणी लक्ष देत नाहीत. काही अर्थ नाही. जीझसची शिकवण एकही प्रगत पाश्चिमात्य राष्ट्र पालन करीत नाही याचा खेद होतो आहे मला.'' माथुकाका आकाशाकडं पाहात म्हणाले.

रेव्हरंड विल्यम्स मानेनेच 'हो हो' म्हणत राहिले आणि नंतर माथुकाकांचा निरोप घेऊन गेले.

''काका, आता जेवण करूनच जा ना.'' बाशा म्हणाला.

''नको. पुन्हा कधीतरी येईन. तू मात्र बऱ्याच दिवसांत चर्चकडं आला नाहीस.''

''या व्यापातून सुटका व्हायला पाहिजे ना!''

''ती व्यापारी वृत्तीच्या माणसाला मरेपर्यंत मिळत नसते! चार-पाच लाख मिळवले असशील आजपर्यंत!''

हात चोळत, हसत हसत बाशा म्हणाला,

''एवढे कुठले आलेत मिळायला! तरीपण पोटापुरतं मिळतं.''

''अरे, तुला एक सांगतो बाशा- राग नको मानू. आपण माणूस आहोत आणि आपल्या पोटाला काही मर्यादा आहेत. रोज दहा रुपये मिळवलेस तरी तुझं पोट भरेल. पण तुला रोज हजार-पाचशे हवेत! मग याला जर तू पोटापुरतं म्हणत असशील, तर तुझं पोट हे हत्तीच्या पोटासारखं प्रचंड आहे असं मानावं लागेल मला! आता माझं बघ. पूर्वी चर्च कौन्सिलकडून मला पाचशे रुपये दरमहा मिळत होते, ते त्यांनी दोनशेवर आणले. पण तरीही माझं भागतं त्यात. त्यातलेही कधी कधी दहा -वीस रुपये उरतातच.''

''तुमचं ठीक आहे काका. निंबर्डीचे गाबित तुम्हाला रोज ताजा मासा पुरवतात. खर्च म्हणजे तांदूळ आणि आट्याचा. तुम्हाला दोनशेच कशाला, दीडशे दिले तरी बस्स होतील.''

''व्यापारी मनोवृत्तीच्या माणसाचा तू अगदी उत्कृष्ट नमुना आहेस बघ. अरे, आता माझं वय झालं. पूर्वीसारखं हातानं करता येत नाही. जेवण बनवायला एखादी मुलगी घरी ठेवावी म्हटलं तरी ते शक्य होणार नाही. निदान पंचवीस तीस रुपये तरी द्यायला हवेत तिला.''

''तुम्हाला खरोखरच कामाला मुलगी हवी आहे का?''

''हो. खरंच. हे बघ!'' पोळ्या करताना जागोजागी मनगटावर भाजलेले डाग दाखवीत माथुकाका म्हणाले.

''तसं बरं वाटत नसेल तेव्हा या सीतूची आई पदी येऊन करून जायची. पण रोज उठून दुसऱ्याला आपण किती त्रास द्यायचा. सांग.''

''ते राहू दे. कालच माझ्याकडं भिकू भंडारी आला होता. माझ्या घरी कामासाठी आपली मुलगी ठेवून घे म्हणत होता. पण ती पोर आहे लहान. रोज निंबर्डीतून तिठ्ठ्यापर्यंत तिला ये-जा करणं जमणार नाही. तुमच्याकडं पाठवतो तिला. जरी लहान असली तरी

चुणचुणीत आहे. एकदा तुम्ही एखादं काम समजावून दिलं की पुन्हा तिला सांगावं लागणार नाही.''

''तो भिकू मुलखाचा दरिद्री आहे. शिवाय व्यसनाधीन आहे तो.''

''ते असू दे. मुलीला तुम्ही घरी ठेवून घ्या जेवायला खायला. तुमच्याकडेच राहील. घेण्या-देण्याचं काय असेल ते मी आणि भिकू बघून घेऊ. मग तर झालं?''

''अरे, पण त्या मुलीच्या कामाचे पैसे नकोत का काही द्यायला?''

''काका, तुमच्यासाठी एवढं तरी मला करू दे.'' बाशा हात जोडून म्हणाला, ''तुमच्या आशीर्वादानं माझं उत्तम चाललं आहे.''

''आता कसा छान बोललास! बरं, उद्यापासून येऊ दे त्या पोरीला. वेल आणि लहान मूल एकसारखेच असतात. जसं वळण लावावं तसं लागतं! पण मला शंका आहे बाशा, भिकू आपली मुलगी माझ्याकडे कामाला ठेवायचा नाही.''

''का?''

''त्याच्या पिण्याबद्दल मी एक-दोन वेळा त्याला चांगला झाडला होता. त्यावेळेपासून तो माझ्या वाऱ्यालासुद्धा उभा राहात नाही. माझ्याकडे आपली मुलगी कामाला ठेवायला तो तयार होईल असं वाटत नाही.''

''ती चिंता नको तुम्हाला काका, उद्या सकाळी आठ वाजता त्याची मुलगी तुमच्याकडे येईल.''

''ठीक आहे.''

माथुकाका आणि सीतू परत निंबर्डीला निघाले. जाताना माथुकाका काहीसे चिंताग्रस्त दिसत होते. निंबर्डीला जर कॅनिंगची फॅक्टरी आणि कोल्ड स्टोअरेजचं वेअरहाऊस निघालं तर इथलं नितांत रमणीय वातावरण भंग पावणार होतं. लाटांचा खळखळाट मच्छिमार बोटींच्या आणि ट्रॉलरच्या भोंग्यातून विरून जाणार होता. समुद्रावरून येणारी शुद्ध हवा दूषित होणार होती. शिवाय इथं रहदारी वाढणार होती. बाहेरची भली-बुरी माणसं कामधंद्यासाठी गर्दी करणार होती. पण आता पन्नाशी उलटलेले माथुकाका या स्थित्यंतराला प्रतिबंध घालू शकणार होते थोडेच?

निंबर्डीच्या परिसरातील साधीभोळी खिश्चन, गाबित, भंडारी जातीची माणसं सुखानं जगावीत, ही माथुकाकांची अंत:करणापासूनची इच्छा होती. बराच वेळ न बोलता माथुकाका हातातली काठी टेकीत विचारमग्न असे चाललेले पाहून छोट्या सीतूनं विचारलं,

''काका, तुम्ही बोलत का नाही?''

सीतू आपल्यासोबत आहे, याचीसुद्धा माथुकाकांना आठवणच राह्यलेली नव्हती. त्याच्या प्रश्नानं ते एकदम भानावर आले आणि म्हणाले,

''अं? सीतू, अरे तू सोबत आहेस हेसुद्धा मी विसरून गेलो होतो.''

''मघाशी तुमच्या डोळ्यांत पाणी का आलं?''

''बेटा, खरं म्हणजे डोळ्यांत अश्रू येणं हा मनाचा दुबळेपणा आहे. पण काय करू सांग. ज्या शहरी जीवनाला कंटाळून मी हा संन्यास घेतला तेच शहरी जीवन इथं येऊ पाहतं आहे. या तिठ्यावर पहिल्यांदा त्याची लागण झाली. आता ते दोन कारखाने निंबर्डीला आले की संपलंच!''

''कसले कारखाने काका?''

''मासे, कोळंबी तयार करून डब्यात भरण्याचा एक कारखाना आणि दुसरा -मासे, कोळंबी बर्फात गोठवून परदेशी निर्यात करण्याचा.''

"मग काय होईल त्यामुळे?"

"काय होईल? हंऽऽऽऽ!" माथुकाका खोटं-खोटं हसले आणि म्हणाले, "इथं आज डोळ्यांनी जी माणसं दिसतात ती तिथं गुलाम दिसतील. सकाळपासून संध्याकाळपर्यंत मजुरीसाठी राबणारे गुलाम!"

"गुलाम म्हणजे काय काका?"

"जेव्हा माणसाला माणूस जनावराप्रमाणं राबवून घेतो तेव्हा त्या राबणाऱ्या माणसाला गुलाम म्हणतात. आज निंबर्डीत कोणीच कोणाचं गुलाम नाही. पण एकदा या दोन फॅक्ट्या इथं चालू झाल्या, की तुम्ही सर्वजण गुलाम होणार. तू अजून लहान आहेस. तू जेव्हा मोठा होशील तेव्हा तुला समजेल सारं. पण नाही रे, गुलामगिरीची एकदा सवय जडली की खलाशी म्हणून आज दर्यावर जातो, लहर लागली तर जाळं घेऊन मासे धरायला जातो त्याला कोणाचं बंधन नाही आज. पण उद्या हाच रासू या फॅक्टरीत नोकरीला राह्यला तर त्याला मन मानेल तसं वागता नाही येणार. जाऊ दे, सोड तो विषय."

दोऱ्याचा पूल समोर आला होता. एकावेळी एकच माणूस तो पार करू शकत होता. सीतू पूल ओलांडून पुढं गेला आणि मागे पुलावरून येणाऱ्या माथुकाकांकडं पाहू लागला. तो दोऱ्याचा पूल माथुकाकांच्या प्रत्येक पावलांबरोबर हलत होता. माथुकाका पूल ओलांडून पलीकडे आल्यावर सीतू म्हणाला,

"काका, आपल्या निंबर्डीत कारखाने होणारच नाहीत."

"का?"

"ते लोक या पुलावरून अलीकडं कसे येतील?"सीतूच्या खांद्यावर हात ठेवून पुढे जाता जाता माथुकाका म्हणाले,

"अरे, या जागी सिमेंट काँक्रीटचा पूल बांधतील. तिठ्यापासून गावापर्यंत पक्की सडक तयार होईल. पैसे कमावणारी माणसं सगळ्या अडीअडचणींचा अगोदरच विचार करीत असतात."

"मग तिठ्यावरची हॉटेलं चालणार नाहीत?"

"जोरात चालतील. हा बाशा स्वत:चं असं निंबर्डीतसुद्धा हॉटेल सुरू करील."

गावाजवळ येताच त्यांना वाटेत रासू भेटला.

"काका, तुम्हाला समजलं? निंबर्डीत दोन मोठे कारखाने सुरू होणारेत." रासू आपण प्रथमच ही वार्ता माथुकाकांना सांगतो आहे अशा आविर्भावात म्हणाला.

"समजलं. तुला कोणी सांगितलं?"

"ते काय?" समुद्राकडे बोट दाखवून रासू म्हणाला, "सकाळपासून दोन लाँच बोटी इथल्या समुद्रात कोणकोणते मासे मिळतात याची तपासणी करू लागल्या आहेत. एक गोरा साहेबही आहे त्यात."

"गोरा काय अन् काळा काय! असू दे. काळ बदलतो आहे. मी एकटा त्याला रोखू शकणार आहे थोडाच?"

"काका, ही गोष्ट गावच्या भल्यासाठीच होतेय. इथल्या सर्व लोकांना भरपूर रोजगार मिळेल. अगदी लहान लहान मुलांना आणि आमच्या बायकांनासुद्धा कोल्ड स्टोअरेजमध्ये कोळंबी साफ करायला दिवसाला सहा -सहा रुपये मजुरी मिळेल म्हणतात. घरातली सर्व माणसं जर रोजगार मिळवू लागली, तर कश्शाकश्शाची कमतरता पडणार नाही." रासू उत्साहानं म्हणाला.

"हूंऽऽऽऽ!" माथुकाका रासूकडं विचित्र नजरेनं पाहत म्हणाले.

"रासू, गावचं भलं होणार असेल तर त्या योजनेला माझी केव्हाही सहानुभूतीच राहील. पण मी मोठमोठ्या शहरांतून नोकर आणि मालक यांचे संबंध पाहात आलो आहे रे. सुरुवातीला धंद्यात जम बसेपर्यंत हे मालक लोक मजुरांना हात जोडतात; पण एकदा का बसलं चांगलं बस्तान की त्या मजुरांचे हात तोडायलाही ते कमी करीत नाहीत!"

"तुम्ही काय म्हणता आहात काका, मला समजत नाही."

"ते समजायचं नाही इतक्यात. चल सीतू."

सीतूच्या खांद्यावर एक हात ठेवून दुसऱ्या हातानं काठी टेकत टेकत माथुकाका चर्चची टेकडी चढू लागले. त्यांना आजपर्यंत कधी नाही इतका थकवा जाणवत होता.

०००

# चार

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता माथुकाका चहा घेऊन आऊट-हाऊसच्या व्हरांड्यात ट्रान्झिस्टर लावून बातम्या ऐकत बसले होते. अलीकडे त्यांना त्या बातम्यादेखील ऐकू नयेसं वाटत होतं. रोज उठून त्याच त्या बातम्या ऐकायचा त्यांना कंटाळा आला होता. व्हिएतनामचं युद्ध! दक्षिण व्हिएतनाम आणि उत्तर व्हिएतनाम यांच्या सशस्त्र संघर्षात होणारी प्रचंड जीवितहानी ऐकताना त्यांना वाटायचं, ही पृथ्वीतलावरची माणसं खरंच कुठं चाललेली आहेत? पाश्चात्य राष्ट्रांनी जगातल्या इतर राष्ट्रांत संघर्ष निर्माण होईल, प्राणहानी होईल अशा कारवाया का कराव्यात? अरब-इस्त्रायलचा तंटा मिटत नाही. गोलटेकडीच्या परिसरात रणगाड्यांचे युद्ध सुरूच आहे. आजचा मानव प्रगत झाला आहे असं म्हणण्यात काय अर्थ आहे? उलट आजच्याइतका मानव क्रूर कधीच दिसला नव्हता.

माथुकाकांनी रेडिओचं बटण बंद केलं. त्याचवेळी टेकडी चढून वर येणारी एक चौदा-पंधरा वर्षांची मुलगी त्यांना दिसली. माथुकाकांनी तिच्याकडं निरखून पाहिलं. ती सरळ व्हरांड्यात येऊन उभी राहिली.

"कोण ग तू?" माथुकाकांनी स्नेहपूर्ण शब्दांत तिला विचारलं.

"सुबी!" लाजत लाजत ती म्हणाली.

"हांऽऽऽ, आलं लक्षात! भिकू भंडाऱ्याची लेक तू?"

सुबीनं मानेनंच हो म्हटलं.

"भिकूनं तुला इकडं जायला परवानगी दिली?"

पुन्हा एकदा सुबीनं होकारार्थी मान हलविली.

"आश्चर्य आहे! काल मला बाशा म्हणाला होता, तू इथं कामासाठी येशील म्हणून; पण मला खरं नाही वाटलं."

"काल रात्री बाशामामू येऊन सांगून गेले." ती बोलली.

"पण तू लहान आहेस अजून. तुला स्वयंपाक करता येतो?"

"होऽऽऽऽ!"

"काय काय करतेस?"

"सगळं! भात, कालवण, चपाती...."

माथुकाका सुबीकडं बारकाईनं पाहात म्हणाले,

"जेवण करायला कधी शिकलीस?"

सुबी काही न बोलता खाली पाहत राहिली.

इतक्यात सीतू दोन सरंगे घेऊन माथुकाकांकडे आला. काथ्यात ओवलेले सरंगे नुकतेच धरलेले होते. अद्याप त्यांचे कल्ले वर खाली होत होते. पट्ट्या वळवळत होत्या.

"काका, दादानं हे सरंगे आणले. ताजे-ताजे आहेत!" सीतू सुबीकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकून म्हणाला.

माथुकाका सीतूच्या हातातले सरंगे घेऊन म्हणाले, "तू हिला ओळखतोस?"

सीतूनं सुबीकडं पाहात म्हटलं, "ही सुबी-भिकूनानांची."

"काल बाशामामू म्हणाला होता आणि आज पाठवलीच त्यानं हिला?"

सुबीकडं पाहात माथुकाका म्हणाले, "माश्याचं कालवण बनवतेस?"

सुबी मानेनंच हो म्हणाली,

"ठीक आहे. सीतू, हिला काय लागतं ते दे... आज मी किचनकडे येणार नाही. बघू ती कशी कालवण बनवते."

सीतूच्या मागे सुबी किचनमध्ये गेली.

माथुकाकांचं किचनरूम अगदी लहानसंच होतं. पण अतिशय स्वच्छ. खिडक्यांना बारीक तारेची जाळी होती. दोन चुली होत्या, एक स्टोव्ह होता. कपाटात काचेच्या प्लेटी, चमचे, टी-सेटस् अशी क्रोकरी होती. कोपऱ्यात मसाला वाटण्यासाठी दगडी पाटा-वरवंटा होता. पण गेल्या कित्येक दिवसांत त्याचा वापर केला नव्हता. करणार कोण? माथुकाका काहीतरी उकडून घ्यायचे. फारच कंटाळा आला तर रासू सारंगाला निरोप धाडायचे. रासू डब्यातून माश्यांचं कालवण आणि भात घेऊन यायचा. पण अलीकडं बऱ्याच दिवसांत पदीकडून जेवण आलं नव्हतं. वारंवार रासूला आणि पदीला त्रास देणं माथुकाकांनाही पसंत नव्हतं. माथुकाका स्वत:च जेवण बनवायचे.

सीतूनं सरंगे साफ केले आणि सुबीला विचारलं, "तुकडे करून देऊ का?"

"सगळ्याचं कालवण करायचं का थोडे तळून घ्यायचे?" सुबीनं पाटा साफ करता करता विचारलं.

"तुला येतं का तळायला?"

सुबी हसत हसत म्हणाली,"आज तळून दाखवते, मग येतं का नाही ते बघ. कालवणासाठी मला एक नारळ फोडून दे. सोलं आहेत?"

"हो! या बरणीत आहेत बघ. पण काकांना फार तिखट चालत नाही, लक्षात असू दे. तिखट जेवण झालं तर काका 'भूक नाही' म्हणून खात नाहीत. 'जेवण तिखट होतं' असंसुद्धा म्हणणार नाहीत."

सुबी सीतूचा शब्द न् शब्द लक्ष देऊन ऐकत होती. खिडकीतून येणाऱ्या वाऱ्याने तिचे केस भुरभुरत होते, ते ती हाताने एकसारखे मागे करीत होती. तेव्हा सीतू म्हणाला,

"स्वयंपाकाला बसण्यापूर्वी केसांना रुमाल बांध. जेवणात केस निघाला तरीही काका जेवत नाहीत. मम्मीनं एकदा रावसाचं कालवण दिलं होतं. त्यात केस निघाला, तेव्हा काका अर्ध जेवण टाकून उठले. जेवणात केस निघाला असंदेखील कोणाला सांगत नाहीत. काका खातात अगदी थोडं. पण ते स्वच्छ असावं लागतं. या प्लेटी फार महाग आहेत. स्वच्छ करताना जरा जपून हाताळत जा. प्लेटी फुटल्या तर ते रागावणार नाहीत; पण त्या न फुटतील याची खबरदारी घे."

सीतू सुबीला एखाद्या पोक्त माणसासारखा सूचना देत होता. त्यादिवशी त्यानं सुबीला कुठं काय आहे, हे दाखवून दिलं. तांदूळ किती रांधायचे हे दाखवलं आणि तो जाळीचं दार उघडून बाहेर आला.

काकांनी मघाशी बातम्या बंद करून ट्रान्झिस्टरवर इंग्रजी म्युझिक लावलं होतं. इंग्रजी म्युझिक ऐकत आरामखुर्चीवर पडून समुद्राकडं पाहत राहणं हा माथुकाकांचा आवडता छंद होता. संध्याकाळी खुर्चीत पडल्या पडल्या सूर्यास्त बघत राहणंदेखील काकांना खूप आवडे. जसजसं वय वाढत होतं तसतसं काकांना एकटं एकटं वाटू लागलं होतं.

वीस वर्षांपूर्वी जेव्हा ते या निंबर्डीला आले होते, तेव्हा इथलं वातावरण फारच शांत

होतं. इथले गाबित (मच्छिमार), भंडारी, किरिस्ताँव आपापला उद्योग करून पोट भरून खात होते. त्यांच्या गरजा कमी होत्या. मिळेल त्यात समाधान मानायची त्यांची वृत्ती होती. पण अलीकडे इथल्या लोकांच्या वृत्तीत फरक पडत चालला होता. कष्ट करून जगण्याची सवय मोडत चालली होती. तरुण पोरं आपल्या बापजाद्यांचा पूर्वापार चालत आलेला धंदा पुढं चालवण्यात कमीपणा मानत होती. मुंबईला गेल्यानं भरपूर रोजगार मिळतो, चैन करता येते, म्हणून एकाच्या संगतीनं एक अशी तरुण पोरं मुंबईची वाट सुधारत होती. चित्रदुर्ग बंदरावर गोव्याहून मुंबईला जाणारी बोट थांबायची, तेव्हा अशी पोरं दहा-वीस रुपये जमवायची आणि चित्रदुर्ग बंदर गाठायची.

गाबित समाजात अठराविश्वे दारिद्र्य होतं. मासे जास्त मिळाले तर ते विक्रीसाठी तिठ्ठयावर न्यावे लागत. तिठ्यावर दलाल होते. ते रुपया-दीड रुपया किलो दराने मासे घ्यायचे आणि ते बर्फात घालून पुणे, कोल्हापूर, कऱ्हाड अशा भागांत देशावर धाडायचे. प्रत्येक किलोमागे दलाल बसल्या जागी तीन-चार रुपये कमावत असे; पण रात्रंदिवस दर्यावर राबणारा मच्छिमार मात्र अर्धपोटीच राहायचा.

भंडारी जमात नारळाची आणि काजूची फेणी बनवायची. पण दारूबंदीच्या धोरणामुळे तोही धंदा त्यांना उघडपणे करता येईना. जिल्ह्याच्या ठिकाणी टास्कफोर्स नावाचं खातं उघडण्यात आलं होतं. या टास्कफोर्सच्या लोकांची केव्हा धाड येईल, याचा नेम नसे. ते आले की फेणीसाठी आंबवत ठेवलेल्या रसायनांच्या घागरी फटाफट फोडून टाकत. त्यातूनही चोरून-मारून दारूचा धंदा करणारे काही भंडारी होते. पण बहुसंख्य भंडारी जमातीवर बेकारीचं संकट कोसळलं होतं. या भंडाऱ्यांचीही काही मुलं नोकरीसाठी गाव सोडून गेली. जिल्ह्याची पुढारी मंडळी निवडणुका जवळ आल्या की निंबर्डीला येत. कोकणविकासासाठी आता आम्ही संघटित प्रयत्न करणार आहोत, अशी तोंडभरून आश्वासनं देत. निवडणुका झाल्या अन् मतांचं दान गोळा करून ही मंडळी निघून गेली, की निंबर्डीकडे चुकूनही येत नसत.

माथुकाकांनी निंबर्डीच्या लोकांसाठी काहीतरी उद्योग निर्माण करावा म्हणून गाबित, भंडारी आणि किरिस्ताव जमातीच्या लोकांना एकत्र आणून चर्चाविनिमय केला. गाबित लोकांनी आपणास दलाल लोक अतिशय नाडवतात, तेव्हा आपण स्वत:च एखादी सोसायटी स्थापन करून ट्रक्स खरेदी करावेत व मासे बाहेरगावी पाठवावेत, अशी कल्पना मांडली. भंडारी म्हणाले, सरकार दारूबंदीचं धोरण शिथिल करणार असल्याच्या बातम्या आहेत; तेव्हा पुन्हा दारूची दुकानं उघडणार असली तर आम्हालाच लायसेन्स द्यावीत. माथुकाकांनी मुंबईच्या सूचनांना फक्त पाठिंबा दिला. 'तुमची सूचना शासनासमोर मांडत आहोत. त्याबाबतीत जरूर ती कार्यवाही होताच तुम्हांस कळवण्यात येईल, ' असे तोंड भरून आश्वासन मात्र त्या आमदारांनी दिलं. शेवटी त्या योजना कल्पनेतच बारगळल्या.

माथुकाका या सर्व प्रकारानं नाराज झाले होते. त्यांच्या मनात तळमळ खूप होती; पण त्यांना काहीच करता येत नव्हते अशी त्यांची स्थिती झाली होती. रविवारी चर्चमध्ये प्रार्थना व्हायची. निंबर्डीचं वैशिष्ट्य असं की, या प्रार्थनेला तिथले दालदी, मच्छिमार, भंडारी आणि हे किरिस्ताव बरोबरच येत. माथुकाकांच्या पेरमामुळं असो किंवा माथुकाकांजवळ काही दैवी अंश आहे या भावनेनं असो, पण निंबर्डीच्या सर्व जातीच्या लोकांची माथुकाकांकडं पाहण्याची दृष्टी आदराची होती.

पण अलीकडं वर्षा-दोन वर्षांत माथुकाकांना आपल्याला लोक पूर्वीइतकं मानत नाहीत असं वाटायला लागलं होतं. तिठ्ठयावर जाऊन चंगीभंगीपणा करू नका असं माथुकाका तरुणांना सांगत. पण हे तरुण खिशात चार पैसे खुळखुळू लागले की सरळ तिठ्ठा गाठत.

बाशामामूच्या दुकानात तास न् तास मुक्काम ठोकत.

आपण इतकी वर्षं धर्मोपदेशकाचं काम केलं, पण खरा धर्म हा कोणालाच समजला नाही याचा माथुकाकांना खेद होत असे. अलीकडे ते जास्त कोणाशी मिसळत नव्हते, कुठं जात नव्हते. त्यांची ठरावीक ठिकाणं होती; पण तीही त्यांनी कमी करून टाकली होती. रासूच्या घरी मात्र अधूनमधून त्यांची चक्कर असे.

सीतू माथुकाकांच्या जवळ आला आणि म्हणाला, "काका, ती स्वत: सगळं करणार म्हणते... करू द्या."

माथुकाका सीतूकडं पाहून क्षीण हसले आणि म्हणाले,

"पोर सुलक्षणी दिसते. बघू, तिला काय करायचं ते करू दे."

माथुकाका आणि सीतू बोलत असताना दूर समुद्रातून एक मोटारबोट निंबर्डीच्या किनाऱ्याकडं येत असल्याचा आवाज आला.

"मोटारबोट का रे?" दूरवर पाहात काकांनी विचारलं.

"होय. लाल रंगाची आहे."

"ती दुर्बीण घे बरं."

सीतूनं आत जाऊन खुंटीला टांगलेली दुर्बीण काढून आणली आणि माथुकाकांच्या हातात दिली. माथुकाकांनी फोकस जमवून दुर्बीण डोळ्यांना लावली. सीतूला तो लाल ठिपका जवळ जवळ येतो आहे असं जाणवू लागलं. त्यानं काकांना विचारलं.

"इकडंच येते आहे. कोण आहे त्यात?"

"तिघेजण दिसतात. एक तुझ्या वयाचा किंवा तुझ्यापेक्षा थोडा मोठा दिसतो आहे. दुसरा पन्नास- एक वर्षांचा आहे आणि तिसरा तीस-पस्तीस वर्षांचा आहे. पण जवळ आल्याशिवाय ते नक्की कोण आहेत हे सांगता यायचं नाही." डोळ्यांवर तशीच दुर्बीण धरून माथुकाका बोलत होते.

बघता बघता ती मोटारबोट चर्चच्या पायथ्याशी जो खडक होता त्या खडकाजवळ येऊन थांबली.

माथुकाकांनी दुर्बीण परत ठेवायला दिली आणि ते विचार करू लागले. कोण कोण असतील हे?

पण त्यांना फार काळ असा विचार करावा लागला नाही. ते तिघेही पश्चिम बाजूने चर्चची टेकडी चढून वर आले. पन्नाशीचे जे गृहस्थ होते ते पुढं आले. ती मंडळी आपल्याकडेच आलेली आहेत, असं पाहून माथुकाका उठून पुढे आले.

"गुड मॉर्निंग, फादर मॅथ्यूस."

"गुड मॉर्निंग टु यू."

"माझं नाव मनमोहन. हा माझा पुतण्या रवींद्र आणि हे नारायणन, माझे मॅनेजर."

माथुकाकांनी सर्वांशी हस्तांदोलन केलं. सीतूनं न सांगता आतल्या तीन वेताच्या खुर्च्या व्हरांड्यात आणून ठेवल्या. आलेले लोक त्यावर बसले.

मनमोहन म्हणाले,

"व्हॉट ए वंडरफुल साईट! खरंच, किती सुरेख जागा शोधलेली आहे ही चर्चसाठी! मला वाटतं, प्रार्थनेला या जागेइतकी दुसरी नितांत रमणीय अशी जागा या परिसरात नसेल. केव्हा बांधलं गेलं हे चर्च?"

"अठराशे पंचाहत्तरच्या डिसेंबरमध्ये हे पूर्ण झालं." माथुकाकांनी सांगितलं.

"बाकी काही म्हणा, त्यावेळच्या लोकांना धार्मिक भावनेबरोबरच सौंदर्यदृष्टीही होती."

मनमोहन म्हणाले.

त्यावेळी या निंबर्डीत दहा-बारा मच्छिमार होते आणि तेवढेच भंडारी होते, पण आता जवळजवळ पाचशे ते सातशे लोक राहतात!''

''वंडरफुल! मी या चर्चचं बरंचसं माहात्म्यही ऐकलं आहे.''

''कोणतं?''

''लोकांना पाणी प्यायला मिळत नव्हतं, तेव्हा तुम्ही सामुदायिक प्रार्थना केलीत आणि त्यादिवशीच रात्री वीज पडून इथं गोड्या पाण्याचा जिवंत असा झरा निर्माण झाला म्हणे!''

माथुकाका हसले आणि म्हणाले, ''माझी जीझसवर नितांत श्रद्धा आहे. तेव्हा नुकताच मी इथं आलो होतो. लोकांचे पाण्यासाठी होणारे हाल बघवेनात म्हणून सर्वांना घेऊन एक प्रार्थना केली होती खरी.''

''फादर,'' मनमोहन हसले आणि म्हणाले, ''आज आमच्या हिंदुस्थानात ह्या हजारो देवळांतून! लाखो लोक प्रार्थना करतात. प्रत्येकजण मनात काहीतरी अपेक्षा धरून असतो. पण मला सांगा, कितीजणांची प्रार्थना फलद्रूप होते? तेव्हा तुम्ही काही म्हणा, तुमच्या प्रार्थनेत काहीतरी शक्ती होती. त्याशिवाय का इथं गोड्या पाण्याचा जिवंत झरा निर्माण झाला? वळवाच्या दिवसांमध्ये अनेक ठिकाणी वीज पडते. कुठं कुठं निष्पाप आणि निरपराध माणसं मरतात, गुरंढोरं भाजून राख होतात; पण इथं वीज कोसळून जिवंत पाण्याचा झराच निर्माण व्हावा? तर याला कारण तुमची प्रार्थना, तुमची जीझसवरची नितांत श्रद्धा.''

माथुकाका त्या गृहस्थांच्या वक्तव्याने काहीसे सुखावले यात वाद नाही; पण जेव्हा त्या गृहस्थांनी आपला निंबर्डीत येण्याचा उद्देश सांगितला, तेव्हा मात्र माथुकाकांची मघापासून प्रफुल्लित झालेली चर्या अचानक चिंताग्रस्त झाली.

ते गृहस्थ होते मनमोहनशेठ! निंबर्डीत यांनाच ते दोन उद्योगधंदे सुरू करायचे होते. कॅनिंग फॅक्टरी अन् कोल्ड स्टोअरेज.

''मी इथं माझ्या पुतण्याला, या रवींद्रला हे दोन उद्योग सुरू करून देण्याचा मानस केलेला आहे.''

''इथं दळणवळणाची अडचण आहे.'' माथुकाका.

''त्याची चिंता नाही. माझ्या बोटी आहेत. शिवाय तिठ्यापासून निंबर्डीपर्यंत पक्की सडक बांधली जाईल.''

''वाटेत खाडी आहे.''

''तीवर भक्कम असा पूल उभारला जाईल. फादर मॅथ्यूस, मी परदेशावरून जे तज्ज्ञ बोलावले होते त्यांनी मला माझ्या या दोन्ही कन्सर्न्ससाठी हीच जागा योग्य आहे असा सल्ला दिला आहे. एक तर या समुद्रात भरपूर सागरी संपत्ती आहे आणि दुसरं म्हणजे इथं मॅन-पॉवर उपलब्ध आहे. निंबर्डीत पाचशे लोक राहतात. या सर्वांना भरपूर काम मिळू शकेल. त्यांचं राहणीमानही सुधारेल. एकदा का आमच्या दोन फॅक्ट्या इथं सुरू झाल्या की, इथल्या लोकांना कसलीच अडचण भासणार नाही. त्यांच्या धर्माचा योग्य असा मोबदला त्यांना मिळेल.''

''पण श्रमांच्या योग्य अशा मोबदल्यात त्यांना स्वत:चं स्वातंत्र्यही गमवावं लागणार आहे.'' माथुकाका दूर क्षितिजाकडे पाहात म्हणाले,

मनमोहनशेठ धूर्त होते. त्यांना माथुकाका काय म्हणतात हे तात्काळ समजलं, पण तरीही ते वेड पांघरून म्हणाले, ''दारिद्र्यात लडबडलेल्या स्वातंत्र्यापेक्षा सुखासीनतेचं पारतंत्र्य बरं.''

"पण मी स्वतंत्रतेच्या दारिद्र्यातलं मरणदेखील अधिक श्रेयस्कर समजतो."

त्यावर मनमोहनशेठ अधिक काही बोलले नाहीत. ते आपले नारायणन यांच्याकडे पाहात गालातल्या गालात हसत राहिले. 'हा म्हातारा थोडा चक्रम आहे,' असा आविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला होता.

"अरे सीतू, पाव्हण्यांना चहा देतोस ना?"

माथुकाकांनी सीतूला सांगितलं.

"हो!" असं म्हणत सीतू किचनकडे निघाला.

पण त्याला थांबवून मनमोहनशेठ म्हणाले, "अरे थांब, आम्ही आता नुकताच चित्रदुर्गावर प्रांतसाहेबांच्या घरी चहा घेतला."

माथुकाकांनी त्यांना फारसा आग्रह केला नाही. हे लोक माथुकाकांकडं असताना टेकडीच्या पूर्व बाजूनं सहा-सात लोक तिथं आले. हे गावचेच होते. मनमोहनशेठना नमस्कार करून ते म्हणाले,

"सगळी तयारी झालेली आहे. गावकरी दुर्गामंदिरासमोर जमलेले आहेत."

"चला. फादर, आपण याल?" मनमोहनशेठनी विचारलं.

"कुठं?"

"निंबर्डीच्या गावकऱ्यांना आमच्या या योजनेची माहिती द्यायची आहे." नारायणन म्हणाले.

"मला कोणीच कसं अद्याप बोललं नाही?" माथुकाका आश्चर्य व्यक्त करीत म्हणाले.

"आपण आलात तर बरं होईल. आपणालाही आमच्या व्यवसायाची कल्पना येईल. ती इथल्या लोकांच्या फायद्याची कशी आहे हेही आपल्याला समजेल. अशा कार्याला तुमच्यासारख्या वडीलधाऱ्या माणसाचे आशीर्वाद हवेत."

"आपण चला, मी आलो असतो; पण आज माझी तब्येत थोडी बरी नाही."

"ठीक आहे. निदान फॅक्टरीच्या पायाभरणी समारंभाला तरी आपण याल अशी आशा धरतो." हात जोडून मनमोहनशेठ म्हणाले.

ते सर्वजण गेल्यानंतर माथुकाकांनी एक दीर्घ नि:श्वास सोडला. हात हवेत उडवत ते जवळ उभ्या असलेल्या सीतूला म्हणाले,

"मी नको म्हणालो म्हणून हे काही व्हायचं राहणार नाही. होऊ द्या. जीझसची तशी इच्छा असेल. मी रोखणार कोण?"

सीतूला स्वातंत्र्य म्हणजे काय, दारिद्र्य म्हणजे काय अन् या दोन फॅक्ट्यांमुळे कोणती परिस्थिती निर्माण होणार आहे, यापैकी कशाचीही कल्पना करता येत नव्हती. पण जे काही घडणार आहे ते माथुकाकांच्या इच्छेच्याविरुद्ध आहे एवढं मात्र त्याला समजत होतं.

गावच्या मध्यभागी असलेलं दुर्गेचं देऊळ छोटं होतं. पण देवळापुढे पटांगण मात्र मोठं होतं. ते पटांगण निंबर्डी गावच्या स्त्री-पुरुष आणि पोराटोरांनी भरलं होतं. देवळासमोर लोखंडी ड्रम्सवर फळ्या घालून तात्पुरतं स्टेज उभं केलं होतं. स्टेजवर चार खुर्च्या ठेवल्या होत्या. मनमोहनशेठ, त्यांचा पुतण्या आणि एक गाबित जमातीचा पुढारी अन् दुसरा भंडारी जातीचा पुढारी बाकीच्या दोन खुर्च्यांवर बसले. बॅटरीवर चालणारे दोन लाऊडस्पीकर लावण्यात आले होते.

मनमोहनशेठ यांचे मॅनेजर नारायणन प्रथम बोलायला उभे राहिले.

"श्रीमानशेठ मनमोहनजी, श्रीमान रवींद्रकुमार आणि निंबर्डीचे सभ्य स्त्रीपुरुष हो-

"मी आपल्यासमोर आता जो उभा आहे तो आपणाला आमच्या दोन मोठ्या

योजनांची कल्पना देण्यासाठी.''

''एक योजना आहे, ती कॅनिंग फॅक्टरीची. आपणाला कॅनिंग फॅक्टरी म्हणजे काय याची मी थोडक्यात माहिती सांगतो. आपण तार्ली, सुंगठ, बांगडे अशा प्रकारचे लहान-लहान मासे पकडता. ते तेलामध्ये तयार करून हवाबंद डब्यात भरतात. त्याला 'कॅनिंग' म्हणतात. निंबर्डीच्या खाडीत आणि किनाऱ्यावर अशा प्रकारचे 'कॅनिंग' करण्यास योग्य असे भरपूर मासे मिळतात. आजपर्यंत तुम्ही लोक असुरक्षित अशा होड्यांतून आणि गलबतांतून मच्छिमारीसाठी समुद्रात जात होता. अचानक झालेल्या वादळात तुमच्यापैकी कितीतरी बांधवांना आजपर्यंत जलसमाधी मिळालेली आहे. घरं उजाड झालेली आहेत. पण यापुढे तुम्हाला मच्छिमारीसाठी आमच्या ट्रॉलर्समधून जाता येईल. तुमच्या होड्यांना आणि गलबतांना भरती-ओहोटी आणि वारा यांच्या लहरीवर विसंबून राहावं लागत होतं. पण आमचे ट्रॉलर्स स्वयंचलित, डिझेल मशीन बसवलेले आहेत. आता तुम्हाला कितीही दूर, खोल समुद्रात जाऊन ही अमर्याद अशी सागरी संपत्ती लुटता येईल आणि सुरक्षितपणे आपल्या बालबच्च्यांकडं परत येता येईल.

''तुम्हाला मिळालेला माल विक्रीसाठी दोन-अडीच मैल डोक्यावरून वाहावा लागत होता. बरं एवढे कष्ट करून तिथपर्यंत नेलेल्या मालाला दर काय मिळत होता? रुपया नाहीतर दीड रुपया किलो! म्हणजे रात्र-रात्र जागून समुद्रावर मच्छिमारी करायची आणि जेमतेम पोटापुरतं मिळवायचं; आणि तेही निश्चित नाहीच! मासे मिळाले तर मिळाले; नाही तर कित्येक वेळा हात हलवत परत यावं लागतं. पण आता तुमच्या या सर्व विवंचना मिटणार आहेत. आमच्या कंपनीमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाला रोज दहा रुपये मजुरी आम्ही देणार आहोत. मासे स्वच्छ करून देण्यासाठी स्त्रियांची गरज लागेल. त्यांना सात रुपये मजुरी मिळेल. म्हणजे एखाद्या घरात नवरा, बायको, मुलगा एवढीच माणसं असली, तरी त्यांना दिवसाकाठी बावीस रुपये मजुरी मिळणार, जास्त असली तर अर्थात अधिक.''

जमलेल्या स्त्री-पुरुषांच्यामध्ये कुजबूज झाली. तीन माणसांच्या कुटुंबाला रोज बावीस रुपये मिळणार, या कल्पनेनेच ते सुखावले. नारायणन पुढे म्हणाले, ''तुमच्यावर कसल्याही प्रकारची जबाबदारी नाही. तुम्ही नोकरीत कायम झालात तर तुम्हाला निश्चित असा पगारही मिळेल, मग आमची फॅक्टरी बंद असो वा चालू असो.

''माझ्या बंधूंनो, तुम्ही जे आजपर्यंत राबलात, दारिद्र्याशी झगडलात त्याची आता समाप्ती होत आहे. तुमची बायका-मुलं यापुढं सुखासमाधानानं जगतील. तुमच्या आयुष्यात एकप्रकारचं स्वास्थ्य लाभेल, जीवन सुखावह होईल.

''आमचा दुसरा प्रकल्प. प्रकल्प या शब्दाचा अर्थ कदाचित तुम्हाला समजणार नाही. आम्ही जो दुसरा उद्योग सुरू करणार आहोत तो आहे कोल्ड स्टोअरेजचा. याची आपल्याला थोडक्यात माहिती देतो. आपल्या या किनाऱ्यावर लॉबस्टर्स आणि कोळंबी विपुल प्रमाणात मिळतात. पण आपणाला त्यासाठी तत्काळ गिऱ्हाईक मिळत नाही, म्हणून कोळंबीचे सोडे तयार करावे लागतात. पण ते करताना तुमचा जितका वेळ खर्च होतो तितक्या प्रमाणात तुम्हाला त्याचा मोबदला मुळीच मिळत नाही. ही कोळंबी अमेरिकेला आणि जपानला निर्यात करण्याची आमची योजना आहे. जपानला या कोळंबीचे आणि लॉबस्टरचे चांगले मार्वेâट आहे. आपण इथं पकडलेली कोळंबी साफ करायची आणि प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये घालून ती बर्फात गोठवायची. हा माल गोठवलेल्या स्थितीतच परदेशी रवाना होतो. निंबर्डीच्या सर्व महिलांना कोळंबी साफ करण्यासाठीच काम मिळेल.

''एकूण काय तर आमचा हा व्यवसाय इथल्या लोकांचं दैन्य आणि दारिद्र्य दूर करील. तुमचं राहणीमान उंचावेल. इथं हे दोन कारखाने निघाल्यानंतर तुमच्या निंबर्डीला किती

महत्त्व येईल हे तुम्ही समक्षच पाहाल. त्याबाबतीत मला अधिक काही सांगायची गरज नाही. आता तुम्हाला तिठ्ठयाला जायचे म्हणजे तो जीर्ण दोऱ्यांचा पूल ओलांडावा लागतो. पण एकदा का आमचे हे दोने कारखाने सुरू झाले, की तिठ्ठयाला जाण्यासाठी खाडीवर पूल बांधला जाईल. निंबर्डी नदीचं पात्र अर्धा मैल दूर आहे, पण आमच्या कारखान्यांना गोडं पाणी लागणार. तेव्हा निंबर्डी नदीचं पाणीही गावापर्यंत येईल. अद्याप इथं वीज नाही, वीज येईल आणि काय हवं तुम्हा लोकांना?''

''काही नको-काही नको!'' सामुदायिक आवाज उठला.

''आता आमचे शेठ तुमच्यासमोर चार शब्द बोलतील.''

मनमोहनशेठ यांचं व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रसन्न होतं. गोरे, गरुडासारखं नाक, किचिंत भुऱ्या मिशा, केस मागे वळलेले- असे मनमोहन बोलायला उभे राहिले.

''निंबर्डीच्या बंधू-भगिनींनो,

''आज आत्ता आमचे मॅनेजर नारायणन यांनी आम्ही इथं सुरू करणार असलेल्या व्यवसायाची तुम्हाला कल्पना दिलेलीच आहे. त्या बाबतीत अधिक काही सांगणार नाही. इथले दोन्ही कारखाने माझा पुतण्या रवींद्रकुमार याच्या नावे आहेत. तो अजून लहान असल्यामुळं माझे मॅनेजर नारायणन हेच प्रत्यक्ष कामाची जबाबदारी स्वीकारतील. मी काही इथं राहणार नाही. माझे दुसरे काही व्यवसाय मुंबईत आहेत; मला तिकडंच राहावं लागणार आहे. तेव्हा आपण सर्वांनी आमच्या या उद्योगाला सहकार्य द्यावं, ही नम्र विनंती आहे. आम्ही जरी मालक असलो, तरी मालक आणि नोकर असा भेद आपणाला कधी जाणवणार नाही. पण काही लोक जुन्या, बुरसटलेल्या विचारांचे असतात. त्यांना या फॅक्टरीज् इथं सुरू होणार आहेत हे कदाचित आवडणारही नाही. पण काळ बदलतो आहे. तुमच्या गावचे सर्व गाबित मिळून दिवसभर जितके मासे पकडतील त्यापेक्षा दुप्पट मासे आमची अत्याधुनिक अशी एक ट्रॉलर एका दिवसात पकडते. अशा प्रथम चार आणि नंतर सहा ट्रॉलर्स इथं आणल्या जातील. गरज पडलीच तर आणखीन ट्रॉलर्स घेतल्या जातील.

''कामगार आणि कारखानदार यांच्यात मतभेद होणारच नाहीत असं मी आज म्हणत नाही. जिथं माणूस आहे तिथं मतभेद हे असणारच. पण आपण असे निर्माण झालेले मतभेद वाटाघाटीने, समजुतीने आपसांत मिटवून टाकू. हे कारखाने स्वत:चे आहेत असं समजा. या कारखान्यांपासून आम्हाला जेव्हा नफा मिळायला लागेल तेव्हा त्या नफ्यातली काही टक्के रक्कम बोनस म्हणून कामगारांना वाटली जाईल. केवळ पैसा कमावणं हेच काही आमचं ध्येय नाही. याची आपणांस प्रचिती येईल. इथल्या लोकांना त्यांच्या श्रमांचा योग्य असा मोबदला मिळावा, त्यांचं दारिद्र्य दूर होऊन त्यांचं राहणीमान सुधारावं- ही माझी मनापासून तळमळ आहे.'' इतकं बोलून शेठ मनमोहन खाली बसले तेव्हा लोकांनी टाळ्यांचा गजर केला.

त्यानंतर मच्छिमारांचे आणि भंडारी जमातीचे पुढारी बोलले. त्यांनी मनमोहनशेठना आपण सर्वतोपरी पाठिंबा देत असल्याचं सांगितलं.

इकडं चर्चच्या मागे माथुकाकांच्या आऊट-हाऊसमध्ये सुबीनं केलेलं सरंग्याचं कालवण खाता खाता माथुकाका म्हणाले,

''तू इतकं छान जेवण करत असशील याची मला कल्पना नव्हती. काय रे सीतू खरं की नाही?''

''अगदी खरं. आमच्या मम्मीलासुद्धा इतकं चांगलं कालवण करता येत नाही.'' भातावर माशाचं कालवण ओतून घेत सीतू म्हणाला.

माथुकाका एकीकडं सुबीचं कौतुक करीत जेवत होते- पण त्यांच्या चेहऱ्यावर आलेलं

निराशेचं पटल मात्र दडवता येत नव्हतं. दुर्गेच्या पटांगणातला गोंधळ त्यांचं मन अस्वस्थ करीत होता.

०००

# पाच

त्या रात्री रासू सारंग मोठ्या खुषीत येऊन पदीला सांगत होता-

"पदी, शेठनं मला सभा झाल्यावर बोलवून घेतलं."

"कशाला?"

"मच्छिमारीसाठी यंत्रांची गलबतं येणार, ती सगळी माझ्या ताब्यात देणार आहेत."

पदी कौतुकानं रासूकडं पाहतच राहिली.

"आणि पगार किती म्हणून विचार."

"किती?"

"दोनशे रुपये!"

"काय सांगता?"

"सीतूच्यान!"

"अगो बाय गो!" तोंडावर हात ठेवत पदी म्हणाली.

"पन ह्यो म्हातारा का असा करतो?"

"कोन?" पदीनं विचारलं.

"माथुकाका! एवढा सगळा गावचा भला होणार तर म्हातारा म्हणतो, गावचा नुकसान होणार. त्याचं डोकं बिघडलंय!"

"तसं म्हणू नका़ देवमाणूस आहे माथुकाका."

"मी त्याला तसाच समजत होतो, पदे. पण आता खरंच त्याचं डोकं बिघडलं आहे असं वाटू लागलं आहे."

रासू जेवायला बसायच्या तयारीत होता तोच फटू गावडा दाराशी येऊन म्हणाला,

"रासू, तुला शेठनं बोलावलंय."

रासूचे डोळे चमकले. त्यानं बनियनवर शर्ट चढवला आणि तो पदीकडे पाहत म्हणाला.

"माझी वाट बगू नको."

निंबर्डीच्या किनाऱ्यावर जिथं पुळण सुरू होते, त्याच्या अलीकडे दोन तंबू ठोकले होते. एका तंबूत शेठ मनमोहन, नारायणन आणि रवींद्र होते. दुसऱ्या छोट्या तंबूत त्यांनी सोबत आणलेला स्वयंपाकी स्टोव्हवर सरंगा तळत होता.

रासू येताच मनमोहनशेठ उठून पुढे आले आणि रासूचा हात हातात घेऊन म्हणाले,

"मघाशी तुम्हाला जेवायला या म्हणून सांगायचं विसरलो. जेवला नाहीत ना अजून!"

"नाही. बसणार होतो, तोवर फटू आला."

"बरं झालं. सारंग, तुमच्यासारखी सागराच्या सहवासात आजपर्यंतचं आयुष्य घालवलेली माणसं आमच्याजवळ हवीत. फॅक्टरी चालू करण्यासाठी आमच्याजवळ पैसा आहे, कुशल तंत्रज्ञ आहेत- पण या निंबर्डीच्या सागराची खोलवर माहिती असणारा असा माणूस मात्र आमच्याजवळ नव्हता. आम्ही तुमच्याबद्दल खूप ऐकलं आहे. काही व्यापारी गलबतांना

तुम्ही ऐन वादळातून वाचवल्याचंही आम्हाला समजलेलं आहे.''

रासू स्वत:च्या स्तुतीनं काहीसा सुखावला. खाली मान घालून तो विनयानं हात चोळू लागला. शेठ मनमोहनने नारायणनला खुणावलं. त्यानं स्कॉचची बाटली आणि ग्लास पुढ्यात आणून ठेवले.

बाटलीचं सील खोलता खोलता शेठ म्हणाले,

''आम्हाला एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं.''

''कोणत्या?''

''माथुकाकांना आम्ही इथं फॅक्टरीज सुरू करतो आहे ते का आवडत नाही? आम्हाला काही कारणच समजत नाही. आमचा नारायणन त्यांच्याकडे आऊट-हाऊसमध्ये आजची रात्र आम्हाला राहण्यासाठी परवानगी मागायला गेला होता. त्यांनी चक्क परवानगी नाकारली. असा का विक्षिप्तपणा करतात समजत नाही.''

रासू म्हणाला, ''आता वय झालंय. त्यांना बऱ्या- वाइटातला फरक समजत नाही.''

''तुमच्या मुलावर मात्र त्यांचा भारी लोभ आहे म्हणे.''

''हां. लहानपणापासून त्यांच्याजवळच असतो.''

नारायणन रासूचं सूक्ष्म निरीक्षण करीत शेठ मनमोहनला म्हणाला,

''स्वत:ला धर्मोपदेशक समजतात आणि धर्मोपदेशकानं इथल्या गोरगरीब जनतेचं भलं होत असताना आपला विरोध दर्शवावा, याला काय म्हणावं?''

रासू काही बोलला नाही. शेठ मनमोहनने एक ग्लास स्वत:साठी व दुसरा रासूसाठी भरला. तेव्हा रासू संकोचून म्हणाला,

''मला कशाला?''

''घ्या होऽऽ!'' ग्लास उचलून रासूच्या हाती देत मनमोहन म्हणाले,

''तसं पाहिलं तर आज आनंदाचाच दिवस आहे. निंबर्डीच्या जनतेनं आज प्रचंड प्रतिसाद दिला आहे. तुम्हा लोकांच्या पाठिंब्याशिवाय आम्ही इथं काहीच करू शकलो नसतो.''

रासूनं आता मात्र संकोच दर्शवला नाही. त्यानं ग्लास उचलला.

शेठ मनमोहनने रासूला तिथल्या परिसरातील खूप माहिती विचारून घेतली. नारायणन हा तिथला सर्व व्यवहार पाहणार होता आणि त्याला सर्व प्रकारचं साहाय्य देण्याचं रासूनं वचन दिलं.

रासू जेव्हा मध्यरात्री आपल्या घरी परतला तेव्हा पदी गाढ झोपेत होती. रासूनं दारावर थाप मारल्यानंतर तिनं आतून दार उघडलं.

आत सीतू झोपला होता. तो जागा झाला. बापाकडं रोखून पाहू लागला. रासूला स्वत:चा तोल सांभाळता येत नव्हता. त्याची नजर अस्थिर झालेली होती. तो दारातून आत आला आणि सीतू जागा असलेला पाहून म्हणाला,

''काय म्हणतो तुझा बुढ्ढा?''

खरं म्हणजे सीतू संतापला होता. त्याला रासूनं शेठ मनमोहन यांचा उदो उदो करावा आणि अगदी पहिल्या दिवसापासून शेठलोकांच्या सेवेत रुजू व्हावं हे पसंत नव्हतं. माथुकाकांवर त्याची नितांत श्रद्धा होती, भक्ती होती. माथुकाकांनी इथं आलेल्या या शेठलोकांचं स्वागत केलं नाही ते सीतूला ठाऊक होतं. कारखानदारी सुरू होण्यानं इथल्या साध्या, सरळ जीवनात प्रचंड बदल घडणार आहे याची त्याच्या बालबुद्धीला जाणीव नव्हती. पण केवळ माथुकाकांना ते संमत नाही म्हणून त्यालाही ते बदल संमत नव्हते. त्या संध्याकाळी गावात झालेली सभा व गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे शेठ मनमोहन यांना दर्शवलेला पाठिंबा यांचे

दूरगामी परिणाम काय होणार याची त्याला कल्पना नव्हती.

रासू आल्याचं समजताच पदीनं रासूला वाढण्यासाठी ताट घेतलं, तेव्हा कोपऱ्यात बसलेला रासू बरळला,

"मी जेवलो- शेठलोकांच्या ताटाला ताट लावून जेवलो. पदीऽऽऽ, आता आपल्याला चांगले दिवस येणार! शेठ फार खूष आहेत माझ्यावर. मॅनेजरचा मी असिस्टंट होणाऽऽऽर! सीत्या, त्या म्हाताऱ्याचा नाद सोड! अरे, निंबर्डीत लक्ष्मी चालून आली. लक्ष्मीऽऽऽ!"

सीतू चिमणीच्या दिव्याच्या उजेडात रासूकडं टक लावून पाहत होता. पण बोलत मात्र काहीच नव्हता.

बऱ्याच वेळानंतर रासू झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी रासू उठायच्या आत सीतू चर्चच्या मागे माथुकाकांच्या आऊट-हाऊसवर येऊन ठेपला.

चर्चच्या डाव्या बाजूला पुळणीवर होड्यांची रांगच्या रांग होती. त्यापलीकडे भंडाऱ्यांच्या वस्तीजवळ नारळाची राई होती. तिथले माड आणि पोफळी सकाळच्या मंद वाऱ्यावर डोलत होत्या. काल संध्याकाळी माथुकाका इथंच उभं राहून म्हणाले होते,

"सीतू, हा खाडीचा कोपरा, इथले माड-पोफळी, पुळणीवरच्या त्या छोट्या-छोट्या होड्या यापुढं तुला दिसणार नाहीत. आत्ताच डोळे भरून पाहून घे."

माथुकाका असं का म्हणाले तेदेखील सीतूला त्यावेळी समजलं नाही. त्यांना काय म्हणायचं होतं हे न समजल्यानं सीतू त्यांच्या चेहऱ्याकडं पाहत राहिला होता, तेव्हा माथुकाका त्याच्या पाठीवर फक्त हात ठेवून होते.

माथुकाका आणि सीतू या दोघांत एक अतूट असं नातं निर्माण झालेलं होतं. माथुकाकांचा स्पर्श, त्यांची दृष्टी, त्यांचं बोलणं हे सीतूला कधी कधी पदीच्या स्पर्श, दृष्टी आणि बोलण्यापेक्षा अधिक प्रेमळ असल्यासारखं वाटत होतं. माथुकाकांना निंबर्डीत नव्यानं सुरू होणाऱ्या कारखान्याबद्दल नापसंती का, हे मात्र त्याला अद्याप समजत नव्हतं. आज मात्र त्यानं त्याबद्दल माथुकाकांना स्पष्टच विचारायचं ठरवलं होतं.

सीतू जेव्हा चर्चच्या मागे आऊट-हाऊसवर गेला तेव्हा सुबी केर काढत होती. कपाळावर झिपऱ्या पुढं आल्या होत्या. एका हातात केरसुणी धरून दुसऱ्या हातानं तिनं डोळ्यांवरच्या झिपऱ्या मागं सारल्या. सीतूला अलीकडं सुबीला पाहताच काहीतरी निराळं वाटू लागलं होतं. सीतूच्या ओठावरच्या कोवळ्या मिशा किंचित दाट दिसत होत्या. आवाजात फरक पडत होता. तारुण्याची अस्पष्ट अशी जाणीव त्याच्यात निर्माण होत होती. सुबीकडं एकटक पाहण्यात त्याच्या नजरेला सुख होत होतं. काही देताना-घेताना तिच्या हाताचा, बोटांचा स्पर्श झाला तर तोही त्याला हवाहवासा वाटत होता. पोलक्यातून छोट्या मोसंबीएवढाले उठून दिसणारे तिचे उरोज न्याहाळत बसण्याचा त्याला छंदच लागला. सुबीला ते समजत होतं. पण तिलाही सीतू दिसला नाही की कसं चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं. नकळत ते दोन कोवळे जीव एकमेकांकडे आकर्षिले जात होते. तांबूस डोळे असलेली सुबी गोरी होती. तिच्या केसांना किंचित भुऱ्या रंगाची झाक होती. स्वत:च्या शरीरात झपाट्यानं काहीतरी बदल होतो आहे, याची त्याला जाणीव होत होती. ती जाणीव तिच्या लज्जेतून प्रकट होऊ लागली. माथुकाकांच्या जीर्ण नजरेलाही परस्परांतील ओढ जाणवत होती. पण त्यात अनैसर्गिक असं काहीच नव्हतं. त्या दोघांवर माथुकाकांचे नितांत पे्रम होते. सारा गाव नवीन निघणाऱ्या कारखान्याच्या घोषणेने वेडा झालेला होता. जो तो आता आपण खूप पैसे कमवणार, सुखासमाधानात जगणार या कल्पनेत दंग होता. सीतू आणि सुबी या दोघांना मात्र वाटत होतं,

जे माथुकाकांना पसंत नाही ते आपल्यालाही पसंत नाही.

तिठ्ठ्यावरून निंबर्डीला आठवड्यातून दोन वेळा टपाल यायचं. निंबर्डीतली काही मुलं मुंबईला गिरणीत कामाला होती. बहुधा त्यांनीच पाठवलेली ही पत्रं असायची. पण केव्हातरी एखादं पत्र माथुकाकांनाही यायचं.

फादर मॅथ्यूस हे जरी तसे विनापाश असले, तरी त्यांनी आपल्या प्रेरमळ स्वभावामुळे खूप माणसं जोडलेली होती. त्यांची बरीचशी मित्रमंडळी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटनला परत गेली होती. या लोकांनी फादर मॅथ्यूस यांना 'इंग्लंडला या' असं अनेकदा विनवूनही ते तिकडे गेले नव्हते. निंबर्डीच्या परिसरात दहा-वीस खिश्चन कुटुंबं होती, ती प्रत्येक रविवारी प्रार्थनेसाठी चर्चला येत. ती 'संडे सर्व्हिस' चुकेल म्हणून फादर मॅथ्यूस यांना निंबर्डी सोडण्याची इच्छा होत नव्हती. वर्षातून दोन-चार वेळी त्यांना भेटण्यासाठी मात्र भारतातून आणि भारताबाहेरून काही लोक येत. फादर मॅथ्यूस मागच्या आऊट-हाऊसमध्ये त्यांची राहण्याची सोय करीत.

आज माथुकाकांना एक पत्र आलं होतं, इंग्लंडवरून! तीन हौशी युगुलं लाँचनं भारताच्या प्रवासाला निघालेली होती.

त्यांनी दोन दिवस फादर मॅथ्यूस यांच्या सहवासात घालवण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. ते पत्र वाचून पाहिल्यानंतर माथुकाकांनी सीतूला अन् सुबीला जवळ बोलावून म्हटलं,

"विलायतेवरून आपल्याकडं पाव्हणे येणार आहेत. मागचं आऊट-हाऊस स्वच्छ करून ठेवायला हवं."

"किती दिवस राहणार आहेत ते आपल्याकडं?" सीतू.

"राहतील एक दोन दिवस. इतक्या दुरून येत आहेत. तेव्हा आपण त्यांना नको कसं म्हणायचं? शहरी जीवनाला कंटाळलेली आहेत ती माणसं. या पत्रात म्हणतात, आम्ही भारतीय पद्धतीचं जेवण घेणार आणि कोकण किनाऱ्यावरचे भारतीय लोक कसे राहतात तसे चार दिवस राहणार आहोत. सीतू, सुबी-तुम्हा दोघांना फार काम पडणार म्हणून मी आज तिठ्ठ्यावर जाऊन बाशाकडून त्या वेळेपुरतं काम करायला दोन नोकर मागून घेतो."

"काही नको." सीतू आणि सुबी दोघेही एकदम बोलले.

"अरे, त्या सहा लोकांची उस्तवार करता करता तुम्ही दोघे हैराण होऊन जाल."

"काका, सहाच काय-दहाजण येऊ द्यात." सीतू म्हणाला.

"ठीक आहे. मग लिहू त्यांना?"

"जरूर!"

ती मंडळी मुंबईत येऊन दाखल झालेली होती.

माथुकाकांनी त्यांना आपल्याकडे येण्याविषयी पत्र धाडलं. त्यांनी सीतू आणि सुबी यांची अप्रत्यक्ष अशी त्या पत्रातून ओळखही करून दिली.

सुबीनं परकराचा काचा मारला. सीतूनं वेळूच्या काठीला केरसुणी बांधून आऊट-हाऊसच्या भिंतीवरची कोळिष्टकं आणि झावळ्या काढायला सुरुवात केली. सुबी शिडीवर चढली होती आणि सीतूनं भिंतीची शिडी फरशीवर घसरू नये म्हणून घट्ट धरली होती. काठीला बांधलेल्या केरसुणीनं सुबी भिंती साफ करीत होती, तेव्हा तिला सीतू आपल्या उघड्या मांड्यांकडे निरखून पाहतो आहे हे दिसत नव्हतं.

"सीतूऽऽ," झाडता झाडता मध्येच थांबून सुबी म्हणाली.

"विलायत किती लांब आहे रे?"

"खूऽऽऽप लांब! सात समुद्र ओलांडावे लागतात!"

"हे लोक कशातून आले आहेत?"

"लाँचीतून. परवा त्या शेठलोकांनी लाँच आणली होती ना, तसल्या. अगं ते लोक खूप श्रीमंत असतात. पैसे पाण्यासारखे खर्च करतात. आता ते येतील तेव्हा बघशीलच."

चार खोल्यांतल्या दोन खोल्या सीतूनं आणि दोन खोल्या सुबीनं साफ केल्या. सीतूनं झऱ्यावरून पाणी आणलं. आऊट-हाऊसचा सारा व्हरांडा धुऊन काढला.

साहेबलोक स्वच्छता आणि टापटीप यांचे भोक्ते असतात, त्यांना केरकचरा आवडत नाही- हे अनेकवेळा माथुकाकांच्या बोलण्यात आलं होतं. तेव्हा इथं येणाऱ्या पाव्हण्यांनी कसलीच चूक काढता कामा नये म्हणून सीतू मन लावून काम करीत होता. इतक्यात तिथं भिकू भंडारी-सुबीचा बाप- येऊन ठेपला. परकराचा काचा मारून सीतूबरोबर आऊट-हाऊस साफ करायला लागलेल्या सुबीकडं त्यानं पाहिलं आणि तो म्हणाला,

"आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस घराकडं येत नाहीस ती?"

"आतासुद्धा लवकर येणार नाही. आमच्याकडं पाव्हणे यायचे आहेत."

कपाळावर आलेले केस डाव्या हातानं मागं सारीत, उजव्या हातातली केरसुणी पेलत सुबी म्हणाली,

"पाव्हणे? कुठचे पाव्हणे?"

"विलायतचे. परवा काकांना पत्र आलंय."

"हूंऽऽ!" भिकू तिरस्कारानं हुंकारला आणि माथुकाकांच्या खोलीकडं जाता झाला. माथुकाका डोळ्यांवर चष्मा चढवून 'न्यू टेस्टामेंट' वाचत होते.

"काकाऽऽ!" दारातूनच भिकूनं हाक मारली.

"कोण-भिकू का? ये आत ये."

भिकू आत आला आणि बाजूच्या भिंतीला टेकून उभा राहिला. रात्री ढोसलेल्या दारूचा दर्प त्याच्या श्वासाबरोबर बाहेर पडत होता.

बाजूच्या छोट्या स्टुलाकडं बोट दाखवून माथूकाका म्हणाले,

"यावर बस."

"नको. इथं ठीक आहे मी."

"बोल, का येणं केलं होतंस?"

"सुबीला वापस घेऊन जायला आलो."

माथुकाका चटकन खुर्चीवरून उठले आणि म्हणाले, "वेडबीड लागलंय का तुला? परवा माझ्याकडं पाव्हणे यायचे आहेत. चार-दोन दिवस ते लोक राहणार आहेत माझ्याकडं. ही सुबी इथून गेली तर मी काय करू?"

"सुबीच्या आईला धाडून देतो- पन सुबीला मी इथं नाय ठेवणार."

"का रे? तुझ्या मनात कोणी काय भरवलं?"

"भरवायला कशाला पाहिजे? मी हितं त्या रासूच्या पोराबरोबर हिला ठेवायला नाय मागत."

"पण का?"

"गावातले लोक काय वाट्टेल ते बोलायला लागलेत."

"काय बोलतात?"

"ते मला विचारू नका. मी सुबीला आत्ता घेऊन जाणार!"

सीतूला माथुकाकांनी हाक मारली.

कपाळाचा घाम शर्टाच्या बाहीनं पुसत सीतू तिथं आला.

"अरे, हा भिकू आत्ताच्या आत्ता सुबीला घेऊन जायला आलेला आहे."

सीतूच्या मागोमाग सुबीही दाराच्या तोंडाशी येऊन उभी राहिली.

"सुबे चल!" भिकू सुबीला पाहताच म्हणाला.

"कुठं घेऊन जातोस हिला?" सीतूनं विचारलं.

"तू कोण रे विचारणार? नवरा काय तिचा तू?"

"असं बोलू भिकू नये मुलांच्या समोर."

माथुकाका भिकूला समजावयाच्या सुरात बोलले.

"काका, माझी पोरगी न्हातीधुती आहे. ती इथं ह्या सीत्याबरोबर राहात होती म्हणून समजलं लोकांना, तर तिचं लग्न होईल का?"

"तुला इतक्यातच तिच्या लग्नाची घाई का झाली?"

भिकू काही बोलणार तोच तिथं भिकूची बायको आली आणि म्हणाली,

"काका, पोरीला तुमच्याजवळून सोडू नका. दारूसाठी पोरीचं लग्न करायला उठलाय हा राक्षस! चित्रदुर्गातल्या सटव्या भंडाऱ्याकडून यानं पाचशे रुपये घेऊन त्याच्याशी सुबीचं लग्न लावून द्यायचं कबूल केलं आहे. सटव्याची अगोदर दोन लग्नं झालेली आहेत."

भिकू बायकोच्या अंगावर चवताळून ओरडला,

"रांडं, हितं कशाला मरायला आलीस?"

माथुकाकांच्या डोक्यात आता मात्र चक्क प्रकाश पडला. भिकू भंडारी सकाळी सकाळी सुबीला घेऊन जायला का आला, याचा त्यांना उलगडा झाला. हा सारा प्रकार पाहून सुबी मात्र हुंदके देऊन रडत होती. माथुकाकांनी तिला जवळ घेऊन समजावण्याचा प्रयत्न केला. पण भिकू आता मात्र हट्टाला पेटला होता.

तो 'सुबीला घेऊन गेल्याशिवाय राहणार नाही,' असं मोठमोठ्यानं म्हणत पुढं आला आणि त्यानं सुबीच्या हाताला धरून तिला ओढलं. सीतू चिडला आणि त्यानं भिकूच्या अंगावर चित्यासारखी झेप घेतली. दारू आणि विड्या पिऊन छातीचा 'डब्बा' झालेला भिकू त्यामुळं क्षणार्धात खाली कोसळला.

माथुकाकांना काय करावं समजेना. त्यांनी सीतूला बाजूला घेऊन म्हटलं, "अरे, किती झालं तरी तो या सुबीचा बाप आहे. तुझ्यापेक्षा वयानं मोठा आहे. असं अंगावर धावून जाणं बरं नाही. रानटीपणाचं लक्षण आहे हे."

त्यावर सुबीची आई म्हणाली, "रोज रोज हा मेला नवरा मला रडवतो. एकदाचा मातीत का जात नाही? पोरगी सुखानं दोन घास इथं खात होती हेदेखील मेल्याला बघवलं नाही."

भिकूच्या जवळ जात, त्याच्या खांद्यावर हात ठेवून माथुकाका म्हणाले,

"भिकू, तुला काही पैशांची गरज असेल तर मी देईन पैसे, पण या कोवळ्या वयात या पोरीचा सौदा मात्र करू नकोस."

"काका, तुमच्यासाठी हिला हितं ठेवायला तयार झालो; पण हे नालायक कार्ट हितं आहे. मी तिला हितं ठेवणार नाही." सीतूकडं बोट दाखवून भिकू बोलला.

"तुला याची भीती का वाटते?"

"आत्ता माझ्या अंगावर धावून आला. इतका नालायक आहे. उद्या पोरीचं लग्नसुद्धा होऊ द्यायचा नाही. याला आजच्या आज इथून हाकलून देणार असाल तर सुबीला ठेवतो. हाऽऽऽ, आणि मला दोनशे रुपयांची गरज आहे आज!"

माथुकाका भिकूची पैशांची अट पूर्ण करू शकत होते- पण सीतूला इथून घालवून

देण्याची अट पूर्ण करणं शक्य नव्हते.

"डाव्या हाताच्या मोबदल्यात तू माझा उजवा हात कलम करू पाहतोयस भिकू!" माथुकाका हताश होऊन म्हणाले,

त्यासरशी सुबीची आई म्हणाली, "काका, तुम्हाला हात जोडते. याला एक पैसा देऊ नका. घरात अन्नाचा कण नाही. मी मुळे, कालवं काढून कसंबसं पोट भरते. याला तुम्ही पैसे दिले की चार-सहा दिवसांत त्याची वाट लावेल हा. रात्रंदिवस पितो! सगळ्या गावाला शिव्या घालतो!"

"ये रांड, तू इथनं जाते की नाही?" भिकू तिच्यावर उखडला.

माथुकाका आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावरून हात फिरवीत या अचानक निर्माण झालेल्या प्रसंगातून कोणता तोडगा काढायचा याचा विचार करीत होते. शेवटी ते शांतपणे म्हणाले,

"भिकू, मी या सीतूलादेखील इथून जा म्हणून सांगितलं असतं रे- पण विलायतेवरून आलेली सहा माणसं मुंबईवरून माझ्याकडं यायला निघाली आहेत. त्यांना आजूबाजूला फिरायला घेऊन जाणं, हा प्रदेश दाखवणं हे सीतूशिवाय कोण करणार सांग. सारा गाव त्या नवीन आलेल्या शेठच्यामागे मागे करतो आहे. इकडं कोणी येत नाही. या सीतूचा बापदेखील अलीकडं इकडं फिरकेनासा झाला आहे. माझ्या अडचणीच्या वेळी या दोघांपैकी एकजण जरी इथून गेला तरी माझी पंचाईत होणार आहे रे!" अगतिकपणा व्यक्त करीत माथुकाका म्हणाले,

"मग तुमचे पाहुणे इथून गेल्यानंतर हा इथून गेला पाहिजे!" भिकूनं आपली अट थोडीशी शिथिल केली.

माथुकाकांनी ती एकदम मान्य केली.

"हांऽऽऽ!" लगेच भिकू म्हणाला, "दोनशे रुपये बघू!"

माथुकाकांनी क्षणाचाही विचार केला नाही. ते लगेच आपल्या झोपायच्या खोलीत गेले आणि त्यांनी पेटीतून दोनशे रुपये काढून आणले. सुबीची आई केविलवाणी चर्या करून बसली होती. तिच्याकडं पाहत माथूकाका म्हणाले, "हे माझ्यासाठी करतो आहे मी सुबीची आई, माफ कर मला!"

नोटा मोजून त्या बंडीच्या आतल्या खिशात ठेवीत भिकू निघून गेला. त्याच्या पाठोपाठ आकृतीकडं पाहत माथुकाका म्हणाले,

"देव त्याला सद्बुद्धी देवो!"

"त्याला सद्बुद्धी मेल्याशिवाय येणार नाही!" असं म्हणत सुबीची आई उठली आणि माथुकाकांना म्हणाली, "या पोरीला एवढं इथून सोडू नका. हा राक्षस तिला विकून टाकायला बसला आहे. सटव्या भंडाऱ्याकडून यानं आगाऊ पैसे घेतलेले असतील."

हवेत हात उडवून माथुकाका आकाशाकडं पाहात म्हणाले, "तू मनुष्यप्राण्यांना अशी दुष्टबुद्धी का देतोस याचं मला कोडंच उलगडत नाही."

सुबीची आई जायला निघाली तेव्हा माथुकाका तिला म्हणाले,

"सुबीची आई, तू मन शांत ठेव. चर्चमध्ये जा आणि प्रार्थना कर. आपल्या लेकरांची प्रार्थना पूर्ण करायला तो एकटाच समर्थ आहे." गळ्यातल्या चांदीच्या क्रॉसला स्पर्श करीत माथुकाका म्हणाले,

सुबीची आई उठली. चर्चच्या प्रवेशद्वारापाशी जाऊन उभं राहून तिनं जीझसच्या मूर्तीला हात जोडले. मनातल्या मनात ती म्हणत होती, "गावाला पाणी नव्हतं; तू पाणी दिलंस. आता माझी एकच इच्छा-माझ्या सुबीला या राक्षसापासून वाचव."

माथुकाकांनी त्यांच्या दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या सीतू आणि सुबीकडं पाहत एक दीर्घ नि:श्वास सोडला आणि निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या चर्चच्या क्रॉसकडं पाहात ते त्या उभयतांना म्हणाले,

"फार मोठी पंचाईत आली होती; पण माझी चिंता याला आहेच की."

टेकडीच्या पायथ्याशी सागराच्या लाटा येऊन आदळत होत्या. दूरवरची माडांची राई डोलत होती.

०००

# सहा

पाव्हणे येण्याच्या दिवशी माथुकाका पहाटेच उठले. सीतूही अजून उजाडायचं आहे तोवरच चर्चकडे आला. सुबी मुक्कामाला तिथं असायची. सीतू आणि सुबी या दोघांच्या आधारावरच माथुकाकांनी पाव्हण्यांना आपल्याकडे बेशक 'राहायला या' असं कळवलं होतं.

पूर्वेच्या दाट झाडीतून सूर्यबिंब जसं वर सरकलं तसं चर्चचं शिखर दिसू लागलं. निंबर्डी गावच्या आसपास रात्रभर तरळणारं धुकं निवळू लागलं. सूर्य जरा आणखीन वर चढला तशी चर्चवरून दिसणारी दक्षिणेची आणि उत्तरेची पिवळसर पुळण उजळून पिवळीधमक दिसू लागली. ओहोटीची वेळ असल्यानं किनारा शांत वाटत होता.

नऊच्या सुमारास माथुकाका आपली दुर्बीण घेऊन समुद्राकडे नजर रोखून बसले. बराच वेळ त्यांची दुर्बीण पश्चिम क्षितिजावर ती लाँच धुंडत होती; पण लाँचचा काही पत्ता लागेना. क्षणभर वाईट विचार मनात येऊन गेला -कुठे अपघात तर झाला नसेल? नकळत त्यांनी गळ्यातल्या क्रॉसला स्पर्श केला आणि चर्चच्या टोकाकडं पाहिलं. लंडन सोडल्यापासून मुंबईपर्यंत हे लोक सुखरूप आल्याचं समजलेलं आहे. मुंबईपासून इथपर्यंत यायला असं वाटेत काय घडणार आहे? त्यांनी 'ठीक नऊच्या ठोक्याला निंबर्डीच्या किनाऱ्यावर पोहोचत आहोत.' असं निश्चित कळवल्यानं चिंता वाटते झालं.

ॲडॅम्स आणि ब्राऊन हे प्रसिद्ध दर्यावादी होते. रॅटक्लिफ हा मेकॅनिक होता. समुद्रप्रवासात त्यांची दिशाभूल होण्याची शक्यता मुळीच नव्हती; लाँचच्या इंजिनमध्ये काही बिघाड झाल्यास तो दुरुस्त करण्यास एकटा रॅटक्लिफ समर्थ होता. तिघांच्या बायकाही त्यांच्यासमवेत होत्या.

साडेदहाच्या सुमारास पश्चिम क्षितिजावर एक लहानसा ठिपका दिसला तो प्रथम सीतूला.

"काका, काका -तो बघा - त्या तिथं लाल ठिपका कसला दिसतो तो?"

माथुकाकांनी आपला चष्मा व्यवस्थित डोळ्यांवर चढवला आणि हातातली दुर्बीण त्या दिशेला वळवली. नऊ वाजल्यापासून चिंताग्रस्त दिसणारी त्यांची मुद्रा उजळली. दुर्बीण तशीच डोळ्यांवर धरून माथुकाका म्हणाले,

"सीतू, काय तीक्ष्ण आहे रे तुझी नजर! लाँचच आहे ती पाव्हण्यांची, युनियन जॅक फडफडतो आहे. ते लोक अगदी सरळ आपल्याच दिशेनं येत आहेत. किती अचूक दिशा धरलेली आहे बघ!"

"काका, ते लोक अगोदर कधीच इकडे आले नसताना त्यांना इथं यायचं बरोबर कसं समजलं?"

"यालाच म्हणतात अभ्यास! अरे, त्यांच्याजवळ होकायंत्र असतं. त्यावरून आपण निश्चित कोणत्या दिशेला जायचं याचा त्यांना अचूक अंदाज करता येतो. जा, सुबीला बोलव. कपडे बदलले का तिनं?"

माथूकाकांनी सुबीला नवीन स्कर्ट आणि ब्लाऊज शिवलेलं होतं. ते नेसून अबोलीच्या

फुलांचा गजरा माळून तीही पाव्हण्यांच्या स्वागताला तयार झाली होती.

आता लाँच अगदीच जवळ आली. इंजिनचा आवाजदेखील स्पष्ट येऊ लागला. चर्चमागच्या खडकावर उभ्या असलेल्या अन् शुभ्र पायघोळ झगा घातलेल्या माथुकाकांनी हात हलवला. लाँचच्या बाहेर येऊन उभ्या असलेल्या पाच व्यक्तींनी हातातले रुमाल फडकावले. सीतू लगबगीनं खडकावर खाली उतरला. लाँच नांगरण्यासाठी योग्य अशी जागा दाखवण्यासाठी तो पुढं झाला.

हजारो मैल समुद्रातून सफर करीत आलेले ॲडॅम्स आणि ब्राऊन काय कच्चे होते थोडेच? त्यांनी दोन खडकांमधल्या चिंचोळ्या जागी लाँच घातली. ॲडॅम्सनं मजबूत अशा नायलॉनच्या धाग्यानं ती बाजूच्या एका झाडाच्या ओंडक्याला बांधून टाकली. ब्राऊननं खडकापर्यंत फळी सरकवली आणि तिघांच्या बायका हसत, एकमेकींची मस्करी करीत किनाऱ्यावर उतरल्या.

"माय नेम इज सीतू, आय स्टे विथ फादर मॅथ्यूस." सीतूनं त्या लोकांना आपली ओळख करून दिली.

"ओहऽऽ! व्हेअर इज सुबीऽऽऽ?" रॅटक्लिफनं विचारलं.

"शी इज देअर!" सीतूनं वर खडकावर माथुकाकांजवळ उभ्या असलेल्या सुबीकडं बोट दाखवलं.

"प्लीज,कम ऑन." सीतू त्यांना म्हणाला.

तेव्हा ब्राऊन म्हणाला, "वेट ए मिनिट, यंग मॅन."

त्यानं भराभर आपलं सामान बाहेर काढलं. ॲडॅम आणि रॅटक्लिफनं ते उतरवून घेतलं. त्यातले काही डाग त्या बायकांनी पटापट उचलले. त्यात हवेच्या गाद्या, उशा, कपड्यांच्या बॅगा अशा कितीतरी वस्तू होत्या. रॅटक्लिफजवळ एक सुरेख अशी रायफलही होती.

आपसांत थट्टामस्करी करीत सर्वजण पश्चिमेच्या बाजूचा खडक चढून वर आले.

फादर मॅथ्यूसनी पुढे येऊन त्या सर्वांशी हस्तांदोलन केलं. वरून निंबर्डीचा बीच पाहाताना मिसेस ब्राऊन म्हणाली, "व्हॉट ए वंडरफुल साईट! मर्सी लुक ॲट दीज कोकोनट ट्रीज!"

"याऽऽऽह, दे लुक लाइक द सी-शोअर गार्डस्!"

फादर मॅथ्यूसनी त्या सर्वांना प्रथम चर्चसमोर आणले. ते केव्हा बांधले गेले, तेथे आजपर्यंत कोण कोण फादर्स होते याची त्यांनी थोडक्यात माहिती दिली आणि नंतर त्यांना मागच्या आऊट-हाऊसकडे आणले.

"मिस्टर ब्राऊन, हे निंबर्डी गाव. या बाजूला हा कोळीवाडा आणि इकडे आहे हा भंडारीवाडा. या भंडाऱ्यापैकी काहीजण खिश्चन आहेत."

"आय सीऽऽ! पण हे चर्च याठिकाणी बांधण्याची कल्पना करणाऱ्या बिशपला 'हॅट्स ऑफ'! काय सुरेख जागा निवडली आहे पाहा. दोन्ही बाजूंना विस्तीर्ण असे 'बीच', त्यामागे ओळीनं दिसणारे हे माड... आपल्याकडेही समुद्रकिनारा आहेच; पण असं विलोभनीय दृश्य नाही दिसायचं." ब्राऊन म्हणाला.

"आपल्याकडे समुद्रकिनाऱ्यावर जी फॅक्ट्यांची अन् कारखान्यांची दाटी झालेली आहे. त्यामुळं समुद्रकिनाऱ्याचं सौंदर्य लोप पावलेलं आहे." मिसेस ब्राऊन बोलल्या.

"इंडिया तसा भाग्यवान आहे. अद्याप इथं आमच्यासारखे कारखाने आणि फॅक्टरीज बोकाळल्या नाहीत." मिसेस ॲडॅम्स उजव्या बाजूने खाडीच्या बाजूला पसरलेल्या कोळ्यांच्या

झोपड्यांकडं पाहात म्हणाल्या.

त्यावर माथुकाका म्हणाले, "आज तुम्हाला हा परिसर शांत आणि सुंदर दिसतो तसा तो पुढच्या वर्षी दिसणार नाही."

"का?" रॅटक्लिफनं सिगारेट शिलगावून विचारलं.

"इथंही दोन फॅक्टऱ्या लवकरच होणार आहेत. फिश कॅनिंग आणि कोल्ड स्टोअरेज!"

"व्हॉट! कोल्ड स्टोअरेज?"

"हांऽऽ! या समुद्रात मोठ्या आकाराचे 'प्रॉन्स' विपुल मिळतात." फादर मॅथ्यूस म्हणाले.

"प्रॉन्स? आता मिळतात?"

त्यावर फादर मॅथ्यूस हसत हसत म्हणाले, "अगदी ताजे ताजे प्रॉन्स आज तुमच्यासाठी आणून ठेवले आहेत. सुरमई, सरंगा असा चविष्ट मासाही विपुल सापडतो या भागात. म्हणून इथं फॅक्टरीज सुरू करण्याचं त्या शेठनं ठरवलेलं आहे."

"फादर!" मिसेस ब्राऊन चेहऱ्यावर विषण्णता व्यक्त करीत म्हणाली, "फॉर जीझस सेक, त्यांना इथं कारखाने सुरू करू देऊ नका. या जागेचं पावित्र्य अन् शांतता नष्ट होऊन जाईल. इंडस्ट्रिअलायझेशनचे शाप, आम्ही पाश्चात्य आज भोगतो आहोत, ते या लोकांना भोगायला लागू नयेत असं प्रामाणिकपणे वाटतं." मिसेस ब्राऊन बोलल्या.

"मिसेस ब्राऊन!" ॲडॅम्स गॉगलची काच रुमालानं पुसत म्हणाला, "जोपर्यंत या देशाची लोकसंख्या डुकरासारखी वाढते आहे तोपर्यंत इंडस्ट्रिअलायझेशन वाढतच राहणार. हे कॅनिंग आणि कोल्ड स्टोअरेजचं एक सोडून द्या. त्यामुळं इथल्या लोकांना कामधंदा तरी मिळेल. काय फादर, मी म्हणतो ते खरं ना?"

"अगदी बरोबर! हे लोक पिढ्यान् पिढ्या दारिद्र्यानं पिचून गेलेले आहेत. त्यांना चार पैसे निश्चित मिळतील; पण यांचं जीवनमान सुधारेल असं नाही वाटत."

व्हरांड्यासमोर ते लोक बोलत असतानाच सुबी ट्रेमधून चहा घेऊन आली. व्हरांड्यामध्ये एक लांब असं टेबल होतं. त्या टेबलाभोवती सर्वजण जमले. मिसेस ब्राऊननं सुबीला जवळून पाहिलं, अन् ती सुबीच्या सौंदर्याची तारीफ करू लागली. तिचा गव्हाळी रंग, तांबूस झाक असलेले पाणीदार डोळे आणि लांबसडक काळे कुळकुळीत केस पाहून मिसेस ॲडॅम्स म्हणाली, "इट्स अ रिअल इंडियन ब्यूटी! फादर, ही मुलगी माझ्यासोबत येईल तर मी तिला इंग्लंडला घेऊन जाईन." सुबीचा हात हातात घेत मिसेस ॲडॅम्स म्हणाली, "वुईल यू कम वुईथ मी?"

सीतूला इंग्रजी समजत होतं, थोडं थोडं बोलताही येत होतं! पण सुबीला मात्र इंग्रजीचा गंध नव्हता. ती लाजून मान खाली घालून तशीच उभी राहिली. पण आपल्या सौंदर्याची स्तुती होते आहे, हे ती समजून चुकली होती.

मिसेस रॅटक्लिफनं सर्वांसाठी चहा बनवला. उभ्या उभ्याच त्या सर्वांनी चहा घेतला. त्यानंतर माथुकाकांनी त्यांना त्यांच्या निवासाच्या खोल्या दाखवल्या. त्यांनी आपापल्या खोल्यांत आपलं सामान नेऊन लावलं.

"तुम्हा लोकांना एक वाजता लंच मिळालं तर चालेल ना! का त्या अगोदर लागेल?"

"फादर, प्लीज, डोन्ट बॉदर अबाऊट लंच. आम्ही थोड्याच वेळापूर्वी ब्रेकफास्ट केलेला आहे. आता आम्हाला थंड पाण्यानं अंघोळी करायच्या आहेत. कसं मिस्टर ब्राऊन?"

"सर्टनली!" ब्राऊन म्हणाला.

"या सीतूनं हौदात पाणी भरलेलं आहे. पण तुम्हाला खाली उतरून झऱ्याजवळ जाता

आलं तर पाहा. स्वच्छ आणि थंड अशा गोड्या पाण्याचा झरा वाहतो आहे इथून जवळच.''

''दॅटस् गुड!''

आलेले तिघे आणि त्यांच्या बायका- सर्वजण झऱ्याकडं गेले. सीतू त्यांना जाता जाता आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजी झऱ्याचा इतिहास सांगू लागला. त्यानं आपल्या आई-वडिलांकडून तो ऐकलेला होता. ते सर्वजण लक्षपूर्वक ऐकत होते. एवढे साहस करणारे, लाँचमधून भारताला आलेले ते इंग्रज अंधश्रद्धावादी मुळीच नव्हते. पण त्या घटनेनं इथल्या जनतेत फादर मॅथ्यूस यांच्याबद्दल आदर निर्माण झालेला आहे हे ऐकून ते सुखावले.

पुरुषांनी जसे कपडे उतरवले, तसेच बायकांनीही अंगावर फक्त लांगेसारख्या चड्ड्या आणि वर फक्त ब्रेसियर्स घातल्याचं पाहताच पौगंडावस्थेत पदार्पण करणाऱ्या सीतूच्या काळजात धडधडायला लागलं. पण तीन गोऱ्या स्त्रिया कसलाही विधिनिषेध न पाळता झऱ्याजवळच्या त्या कुंडात डुंबू लागल्या, एकमेकींच्या अंगावर पाणी उडवू लागल्या. ते तिघे पुरुषही त्या दंग्यात सामील झाले. स्त्री आणि पुरुष इतक्या मोकळेपणानं एकमेकांच्या अंगचटीला येतात हे आयुष्यात पहिल्यांदाच सीतू पाहात होता.

''कम ऑन, यंग मॅन.'' सीतूलाही ब्राऊननं बोलावलं; पण सीतू पुढे न जाता दुरूनच म्हणाला, ''नो, नो! नो, नो! आय हॅव टेकन बाथ इन द मॉर्निंग''

अंघोळीनंतर ते परत चर्चकडं आले. मिसेस ब्राऊन भिजलेले सोनेरी केस पाठीवर सोडून म्हणाली, ''उद्या बीचवर पोहायला जायचं.''

''खरंच, अतिशय सुंदर आहे बीच पोहायला.''

सुबीच्या मदतीला सुबीच्या आईला बोलवावं असं माथुकाकांच्या मनात आलं होतं. पण सुबीनंच त्या कल्पनेला विरोध केला होता. आपण एकट्याच त्या पाहुण्यांची व्यवस्था करायला समर्थ आहोत हे तिला दाखवून द्यायचं होतं. ती तळत असलेल्या 'प्रॉन्स' चा खमंग वास आऊट-हाऊसपर्यंत दरवळत होता. तो जोरजोरानं हुंगत रॅटक्लिफ म्हणाला,

''ब्राऊन, आपण जोपर्यंत इथं राहणार आहोत तोपर्यंत संपूर्ण भारतीय जेवण घ्यायचं. बघू तरी काय होतं.''

''पोट बिघडवून घेशील. हे इंडियन लोक भरमसाट मिरची खातात.''

''ओ ऽऽ!नो, नोऽऽ!'' माथुकाका त्यांचं बोलणं ऐकून पुढे आले आणि म्हणाले,

''मी आमच्या सुबीला मिरचीचा बिलकूल वापर करायचा नाही अशी ताकीद दिलेली आहे. तिनं बनवलेली नारळाच्या रसातली 'इसवण' एकदा खाऊन पाहा. कोकोनट करी विथ फिश अँड राईस!''

''ओऽऽकेऽऽ फादर! ॲग्रीऽऽड!'' ब्राऊन म्हणाला.

त्यानंतर त्यांनी जाताना हौदात ठेवलेल्या बिअरच्या बाटल्या खोलल्या. फादर मॅथ्यूसना ठाऊक होतं, की मजा करण्यासाठी ही जोडपी बाहेर पडलेली आहेत, मन मानेल तसं त्यांना वागू द्यावं. म्हणून मुद्दामच माथुकाका तिकडं गेले नव्हते.

त्या लोकांना सुबीनं केलेला स्वयंपाक इतका आवडला, की एकसारखे ते तिची स्तुती करू लागले. माथुकाकांना या लोकांचं प्रथम पत्र आलं तेव्हा माथुकाकांनी त्यांना पत्रातून सीतू आणि सुबी यांच्यासंबंधी थोडक्यात माहिती दिली होती. जेवणानंतर आऊट-हाऊसच्या माथुकाकांच्या खोलीत सर्वजण जमले तेव्हा रॅटक्लिफ म्हणाला, ''या दोघांसाठी आम्ही मुंबईहून आणलेले कपडे त्यांना येतात का ते पाहा. येत नसेल तर आपण आहोत तोवर त्यामध्ये मिसेस ब्राऊन दुरुस्ती करून देईल.''

''ऑऽऽऽ! करेक्ट!'' असं म्हणून ब्राऊन आपल्या खोलीत गेला आणि तो त्या दोघांचे

कपडे असलेली बॅग घेऊन आला. ती त्यानं उघडली. त्यात सीतूसाठी वूलनच्या दोन पँटस्, दोन मॅनिले, सुबीसाठी स्कर्टस्, ब्लाऊज आणि पेटिकोटस् होते. ते कपडे पाहून सीतूला अतिशय आनंद झाला. पाव्हणे लोक आपल्यासाठी असे उंची कपडे आणतील याची त्याला मुळीच कल्पना नव्हती. सुबीनं इतके भारी कपडे आजपर्यंत वापरलेच नव्हते. तिनं असले कपडे पाहिलेले देखील नव्हते. ती हरखून गेली. दोघांनाही ते कपडे, थोड्याशा दुरुस्त्या करून वापरता येण्यासारखे होते.

एरव्ही माथुकाकांकडे कोणी पाहुणे आले की गावची जाणती मंडळी त्यांच्या भेटीसाठी येत. पण मनमोहनशेट दोन कारखाने सुरू करणार आहेत त्या कारखान्यांना माथुकाकांचा विरोध आहे म्हणून लोक नाराज होते. एवढे इंग्लंडवरून लोक आल्याचं समजूनही कोणी तिकडं फिरकलं नाही. रासू सारंग-सीतूचा बाप- याचं माथुकाकांकडं सदैव येणं-जाणं असे; पण तोदेखील फिरकला नाही. माथुकाका मनातल्या मनात खूप नाराज होते. बाहेरून ते आपल्या मनातली नाराजी मुळीसुद्धा व्यक्त करीत नव्हते.

दुपारच्या जेवणानंतर पाव्हणेमंडळी आपापल्या खोल्यांत झोपली होती. सीतू आणि सुबी माथुकाकांच्या खोलीत होते. तेव्हा माथुकाका म्हणाले,

"सीतू, मघा तू ऐकलंस ना पाव्हणेलोक काय म्हणत होते ते?"

"काय म्हणत होते?"

"इथं ते कारखाने सुरू झाले की इथली शांतता अन् पावित्र्य नष्ट होईल."

"काका, मलासुद्धा वाटतं, त्या लोकांना इथं कारखाने उभे करूच देऊ नयेत."

"तुला वाटून काय उपयोग आहे पोरा? सारा गाव त्यांच्या पाठीशी उभा आहे. गेल्या रविवारी सकाळी प्रार्थनेला नियमितपणे येणारी माणसंसुद्धा आली नाहीत. अरे, माझ्याशी मतभेद असतील; पण देवानं काय वाकडं केलंय?"

"त्या लोकांच्या ट्रॉलर्स इकडं आल्या तर त्यांना बुडवून टाकायला हवं कोणीतरी!"

"छे छे! असा विचारसुद्धा मनात आणू नको सीतू. आपण दुसऱ्याचं नुकसान करण्याची कल्पनादेखील मनात आणू नये. या जगात जे-जे घडतं ते जीझसच्या इच्छेनुसारच घडतं असं समजून चालायला हवंय. चल. तो विषयच आपण काढायला नको. सुबी, या पाव्हण्यांसाठी आज संध्याकाळी काय बनवतेस?"

"तुम्ही सांगाल ते बनवते. सुंगठाचे सुके आणि तिसऱ्याचं कालवण बनवू? खाडीत खूप तिसऱ्या मिळतात आताशी. ते लोक खातील ना?"

"न खायला काय झालं? बाकी तुझ्या जेवणावर ते लोक एकदम खुष आहेत हं!"

"काका, तुम्ही आमच्यासाठी कपडे घेऊन या असं लिहिलं होतं?" सीतूनं विचारलं.

"छे रे! मी फक्त 'माझ्याजवळ जे दोघे आहेत, त्यात एक सोळा-सतरा वर्षांचा मुलगा आणि दुसरी चौदा-पंधरा वर्षांची मुलगी आहे.' एवढंच लिहिलं होतं. तेवढ्या वर्णनावरून हे लोक तुमच्यासाठी कपडे घेऊन आले."

"तुम्हाला काय आणलं?" सुबीनं विचारलं.

माथुकाका हसले आणि म्हणाले,

"मला म्हाताऱ्याला काय आणायचं? वाईनची एखादी बाटली आणली असेल. तेवढीच खिसमससाठी उपयोगाला येईल."

"हे लोक बाटली बाटलीभर दारू पितात, तरीही त्यांना चढत कशी नाही हो?" सीतूनं विचारलं.

"अरे, ती दारू नव्हे, ती बिअर आहे. एकच काय, पण चारचार बाटल्या प्यायल्या तरी

त्यानं काही परिणाम होत नसतो. आता संध्याकाळी मात्र ते व्हिस्की घेतील- पण तीसुद्धा किती प्रमाणात घेतात ते बघ.''

''नाहीतर आमच्या निंबर्डीतही पितातच की! धड नीट चालतासुद्धा येत नाही. कुठेही घाणीत पडतील! काय वाट्टेल ते बरळत सुटतील!'' सीतू म्हणाला.

हे त्यांचं बोलणं चालू असतानाच खाली निंबर्डीत कोणीतरी जोरजोरानं बोंब मारल्याचा आणि रडल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. सीतू धावत पूर्वेच्या कड्याकडं गेला आणि झाडाच्या खोडाला धरून कोणाच्या घराकडून गोंगाट ऐकू येतो ते पाहू लागला.

इतक्यात फटू भंडारी धावत चर्चच्या दिशेनं येत असलेला त्याला दिसला. झऱ्याकडेच्या बाजूनं तो टेकडी चढून वर आला. तो माथुकाकांच्याकडेच येतो आहे, अशी खात्री झाल्यानं सीतूही माघारी वळला.

घामाघूम झालेला फटू टेकडी चढून धापावला होता. माथुकाकांना काहीतरी घोटाळा झालेला आहे, याची जाणीव झालेली होती. धाप लागलेल्या फटूला एक क्षणभर शांत बसू देण्याची गरज होती.

फाटलेल्या शर्टानं त्यानं कपाळावरचा, मानेवरचा घाम टिपला आणि सुबीकडं सहानुभूतीनं पाहात तो माथूकाकांना म्हणाला,

''ह्या सुबीचा बाप, भिकू भंडारी मेला!''

''काय सांगतोस?'' माथुकाकांनी फटूच्या दंडाला धरून विचारलं, ''काय झालं त्याला?''

''सकाळी मला तिठ्ठ्यावर भेटला. बाशामामूच्या हॉटेलसमोर 'हाल्ट' होऊन बसला होता. मी म्हणालो,'चल, तुलो निंबर्डीला घेऊन जातो. तर म्हणाला, 'मी नाय येणार.' मी इकडे आल्यानंतर त्याला बाशामामूनं शिव्या घातल्या आणि हाकलून लावला. तो खाडीवरच्या दोरपुलावरून येताना तोल जाऊन खाली कोसळला; डोक्यावर पडला आणि जागीच खलास झाला!''

''अरेरे! सुबी, अगं वाईट प्रसंग ओढवला तुझ्या घरावर!''

सुबी रडू लागली. सुबी रडते आहे असं पाहून सीतूचेही डोळे ओलावले.

पण इकडची गडबड ऐकून ब्राऊन पती-पत्नी जागे झाले आणि ते बाहेर आले.

सुबीच्या बापाच्या मृत्यूची हकिगत समजताच त्यांनी रॅटक्लिफ आणि ॲडॅम्स यांनाही उठवलं. त्यांनाही ती हकिगत समजताच वाईट वाटलं. माथुकाकांच्यासमवेत आपणही खाली येणार असं ते म्हणू लागले.

''तुम्ही लोक कशाला येता? इथले लोक एखादा माणूस मेला की आरडूनओरडून गोंधळ करून टाकतात. त्यापेक्षा तुम्ही इथंच थांबा.'' माथुकाका त्यांना म्हणाले.

''लेट अस सी, हाऊ धिस अनहॅपी ॲक्सिडेंट ऑकर्ड'' असं म्हणत रॅटक्लिफ कपडे चढवायला खोलीकडं गेला.

शेवटी सर्वजणांसमवेत माथुकाका सुबीला घेऊन भंडारीवाड्याकडं आले. सुबीच्या घरासमोर उभा भंडारीवाडा जमला होता. भिकूचे लांबचे नातेवाईक रडत-ओरडत होते; पण आश्चर्य असं की, सुबीच्या आईच्या डोळ्यांत पाण्याचा थेंब नव्हता. तो असेल कसा? भिकूनं तिला हयातभर छळलं होतं. दारूसाठी पैसा हवा म्हणून त्यानं तिला कित्येकवेळा तोंड सुजेपर्यंत मारझोड केली होती. तिच्या अंगावर एक फुटका मणीदेखील त्यानं ठेवला नव्हता. घरी उपासमार व्हायची म्हणून पोरीला तिनं माथुकाकांकडं कामाला ठेवलं. पण त्याही पोरीचा सौदा करावा म्हणून त्यानं चित्रदुर्गातल्या सटव्या भंडाऱ्याशी वाटाघाटी केल्या होत्या. दारूसाठी

स्वत:च्या पोटचा गोळा विकायला निघालेल्या भिकूबद्दल सुबीच्या आईला काडीमात्र पे्रम नव्हतं. तिच्या लेखी तो जिवंत असूनही केव्हाच मेला होता.

'भिकू खाडीवरच्या दोरपुलावरून दारूच्या नशेत तोल जाऊन खाली कोसळला आणि मेला' ही वार्ता सुबीच्या आईला समजल्यानंतर तिच्या चेहऱ्यावर तसूभरदेखील फरक झाला नाही. उलट भिकूचे दूरचे नातेवाईक मात्र उगाच आरडाओरडा करून दु:ख झाल्याचं नाटक करीत होते.

सुबीला घरी सोडून माथुकाका आणि त्यांच्याकडं आलेले सहा पाव्हणे खाडीवरच्या दोरपुलाकडं गेले.

खाडी कोरडीच होती. खाली खडक होते. एका खडकाशेजारी डोकं फुटून गतप्राण झालेल्या भिकूचं निश्चेष्ट असं पे्रत पडलं होतं. तिठ्ठयावरचा हवालदार पंचनामा करण्यासाठी खाली उतरला होता. पुलावर लोकांची गर्दी होऊ नये म्हणून एकावेळी एकच माणूस पलीकडे सोडला जात होता.

ब्राऊन आणि त्याचे सहकारी यांनी वरूनच ते प्रेत पाहिले. ॲडॅम्स म्हणाला, ''व्हॉट ए ट्रॅजिक डेथ!''

''याऽऽह! ही वॉज ए हॅबिच्युअल ड्रंकर्ड!'' माथुकाका म्हणाले.

''बॅड लक!''

खरं म्हणजे सफरीवर आलेल्या पाहुण्यांच्या आनंदावर पाणी पडू नये यासाठी माथुकाका धडपडत होते. पण आज आलेल्या या लोकांना इकडं येऊ नका असं सांगूनसुद्धा त्यांनी त्यांचं ऐकलं नाही.

मिसेस ॲडॅम्स या बाई अत्यंत भावनाप्रधान होत्या. त्यांना आठवला होता तो आपल्या बापाच्या मृत्यूचा प्रसंग! मँचेस्टरपासून दक्षिणेला एका छोट्या गावाला जोडणाऱ्या पुलाचं बांधकाम करताना मिसेस ॲडॅम्सचे वडील पाय घसरून खाली पडले आणि जागच्या जागी मरण पावले होते.

तेथून परत येताना फादर मॅथ्यूस म्हणाले,

''परवाच त्यानं माझ्याकडून दोनशे रुपये नेले होते. तो अतिशय व्यसनाधीन होता. पण त्याला असं दुर्दैवी मरण येईल असं वाटलं नव्हतं तेव्हा.''

''पण फादर!'' रॅटक्लिफनं विचारलं, ''भारत हा उष्ण कटिबंधातला देश असताना इथले लोक हॉट ड्रिंक्स कसे काय घेतात?''

''मिस्टर रॅटक्लिफ, काय सांगायचं तुम्हाला- भारतीय लोकांच्या वागण्याच्या तऱ्हाच काही निराळ्या आहेत. हा भिकू आपल्या बायकोला प्रत्येक चार-आठ दिवसाला मरेपर्यंत मारत असे... ती सुटली एकदाची!''

ते लोक बोलत बोलत चालले असताना त्यांना बाशामामू भेटला. तोही अपघात झाल्याचं समजल्यानं तिथं आला होता. त्याच्या मध्यस्थीमुळे सुबी फादर मॅथ्यूस यांच्याकडे कामाला राहिली होती.

''बघितलंत काका, काय करून घेतलं भिक्यानं? तुमच्याकडून पैसे आणल्यापासून रात्रंदिवस पीत होता. तुम्ही कशाला दिलेत त्याला इतके पैसे?''

''काय करणार? सुबीला ओढून घेऊन जायला आला होता. हे पाव्हणे यायचे होते. मला सुबीला सोडून चालण्यासारखं मुळीच नव्हतं.''

''तुम्ही त्याला माझ्याकडंच धाडून द्यायचं होतं. मी त्याला बरोबर पाणी लावलं असतं.''

"काय करू सांग. आत्तादेखील मला तसंच वाटायला लागलंय, की त्याच्या मृत्यूला अप्रत्यक्षरीत्या मीच कारणीभूत झालो."

"छे! तसलं काही मनात आणू नका. त्याचं मरणच दारूत ठेवलेलं होतं. त्याला तुम्ही काय करणार?"

माथुकाकांच्यापुढे आता एक नवीनच समस्या निर्माण झालेली होती. या पाव्हणेमंडळींच्या जेवणाची व्यवस्था काय करायची?

"बाशा, मला सूबी परत येईपर्यंत दुसरी एखादी बऱ्यापैकी जेवण करणारी मुलगी पाठवून दे. हे लोक दोन-चार दिवस राहणार आहेत."

"ठीक आहे. मुलगी नाही मिळाली तर माझ्या हॉटेलमधल्या जेवण करणाऱ्या रांजणकरला देतो पाठवून."

"कोणीतरी पाठव बुवा."

माथुकाका सुबीच्या आईला सांत्वनपर दोन शब्द बोलावे म्हणून सुबीच्या घराकडं आले. तेव्हा सुबीच्या घरातली गर्दी थोडी विरळ झाली होती. कुडाच्या भिंतीला टेकून सुबीची आई बसली होती. सुबी तिच्या शेजारीच होती. आत दहा-बारा भंडाऱ्यांच्या बायका सांत्वनासाठी आल्या होत्या. माथुकाका पाच-एक मिनिटं तिथं थांबले आणि परतले.

निंबर्डी गावावर दु:खाचं सावट पडलं होतं. तसा भिकू कोणाला हवाहवासा वाटणारा माणूस मुळीच नव्हता. उलट, दिसेल त्या ओळखीच्या माणसाकडं चार-आठ आण्यांसाठी तो हात पसरत असे. पैसे नाही दिले तर एखादी शिवी हासडून रस्ता सुधारत असे. तो मेला म्हणून कोणाचं अडून राहणार नव्हतं-त्याच्या बायकोचं देखील! पण ज्या प्रकारानं त्याला मृत्यू आला होता, तो प्रकार मात्र सर्वांना विषण्णता आणणारा असा होता.

पाव्हण्यानां घेऊन माथुकाका परत चर्चवर आले तेव्हा ते काहीसे कष्टी होऊन म्हणाले, "आता संध्याकाळचं जेवण आपणालाच बनवायला हवं."

"डोन्ट वरी, फादर. त्याची तुम्ही मुळीसुद्धा चिंता करू नका. आम्ही लंडन सोडून दीड महिना होत आला. लाँचवर आम्हाला दुसरं कोण स्वयंपाक करून देत होतं? आमचं आम्हीच बनवत होतो ना!" ब्राऊन म्हणाला.

"ते मला ठाऊक आहे, मुलांनो. पण इथं माझ्याकडं आल्यानंतर ते तुम्हाला बनवायला लागतं म्हणून वाईट वाटतं. तो बाशा कुक पाठवतो म्हणाला आहे; पण त्याला सुबीसारखं बनवता येईल असं मला वाटत नाही. एवढीशी चिमुरडी पोर, पण फार हुशार झालीय स्वयंपाक बनवण्यात. आता चार-आठ दिवस ती येऊ शकणार नाही."

दुपारी चारच्या सुमारास बाशानं पाठवलेला तो कुक आला. पण त्याच्या अंगावरचे ते मळके घाणेरडे कपडे पाहून माथुकाकांनी त्याला परस्परच घालवून दिलं.

भिकूच्या प्रेताचा पंचनामा झाल्यानंतर तालुक्यावरून डॉक्टरला आणून भिकूच्या प्रेताचे पोस्टमार्टेमही खाडीच्या बाजूलाच करण्यात आले. तालुक्याला प्रेत घेऊन जाण्यापेक्षा डॉक्टरलाच इकडे आणणं सोयीचं होतं. त्यानंतर निंबर्डी नदीच्या काठी भिकूच्या प्रेताला अग्नी देण्यात आला. या साऱ्या प्रकारात दिवस मावळून गेला.

रात्रीचे आठ वाजायला आले होते. किती जरी नाही म्हटलं तरी आलेले पाव्हणे काहीसे नाराज दिसत होते. चर्चसमोरच्या पटांगणात ब्राऊन, ॲडॅम्स आणि रॅटक्लिफ फादर मॅथ्यूस यांच्याशी बोलत बसले होते. इतक्यात पूर्वेकडून एक व्यक्ती येत असल्याचं दिसलं. दुरून ती ओळखता आली नाही. पण जवळ आल्यानंतर मात्र सीतू म्हणाला, "काका, सुबी आली!"

"काय सुबी आजच आली?"

अंघोळ करून, पाठीवर केस मोकळे सोडून, आईची साडी नेसून सुबी चर्चकडे आली होती. माथुकाकांच्या जवळ जाऊन ती म्हणाली,

"आई म्हणाली, पाहुण्यांची गैरसोय होईल."

"धन्य आहे बाईची त्या!"

"तीच येते म्हणत होती."

"आणली नाहीस ते बरं केलंस. अगोदरच गाव माझ्याशी टाकून वागायला लागलाय; त्यात नवरा मेल्याच्या पहिल्याच दिवशी ती घर टाकून इथं कामासाठी आली म्हटल्यावर सगळा भंडारी समाज बोंब मारत बसला असता! जा किचनमध्ये. मिसेस ब्राऊन, ॲडॅम्स आणि रॅटक्लिफ काय बनवताहेत बघ. आज तू काही करू नकोस. विश्रांती घे."

सुबी संथपणे किचनकडे गेली. तिच्यासमवेत सीतूही गेला. ती दोघे गेल्यानंतर माथूकाका त्या तिघा पाव्हण्यांना उद्देशून म्हणाले,

"ही दोन पोरं इथं आहेत म्हणून माझं एकाकी जीवन थोडं सुसह्य होतं आहे. माझ्यावर या दोघांचं किती प्रेम आहे पाह्यलंत ना?"

०००

# सात

चार दिवसांचं वास्तव्य करून पाहुणे निघून गेले. जाताना त्यांनी माथुकाकांचे आभार मानलेच, पण सीतू आणि सुबीचेही आभार मानले. जन्मदाता बाप मेला तरी माथुकाकांच्याकडं आलेल्या पाहुण्यांची गैरसोय होऊ नये म्हणून ती चर्चकडे आली होती. सीतूने त्यांना निंबर्डीचा सारा परिसर फिरून दाखवला होता. बीचवर त्या सर्वांना तो पोहायला घेऊन गेला होता. आपल्या मोडक्या-तोडक्या इंग्रजीत त्यानं त्या परिसरातल्या अनेक प्रादेशिक कथाही त्यांना सुनावल्या होत्या. सीतूनं त्यांना आपल्या छोट्या होडीतून आत नेऊन मासे पकडून दाखवले होते. खाडीतलं पाणी ओसरल्यावर त्यानं खुरपीनं खडकावरचे कालव पाहुण्यांसाठी गोळा केले होते, किर्ल्या पकडल्या होत्या. त्या तिघांना बायकांनी सुबीच्या गालाचं चुंबन घेऊनच तिचा निरोप घेतला होता. माथुकाकांचे डोळे ओलावले होते. चर्चमध्ये निरोपाचा सोहळा पार पडला. दूरपर्यंत पसरलेल्या समुद्रातून त्यांची ती प्रवासी लाँच आली तशीच त्या समुद्रातून गेली.

माथुकाका बराच वेळ खडकावर बसून होते. खाली पायथ्याला लाटा येऊन आदळत होत्या. खडकाखडकातून त्यांचं फेसाळ पाणी फिरत होतं.

माथुकाकांची नजर दक्षिणेच्या काठाकडं गेली. त्या ठिकाणी आता दोन फॅक्टरीज उभ्या राहायच्या होत्या. त्यासाठी तिथं इंजिनियर्स, ओव्हरसियर्स फिरत होते. लवकरच पायाभरणी समारंभ व्हायचा होता; त्याची पूर्वतयारी सुरू होती. गावात त्या लोकांच्या राहण्या-उतरण्याची सोय करण्यात आली होती. इंजिनियर्ससाठी माथुकाकांच्याकडं आऊट-हाऊसची मागणी केली गेली होती. पण माथुकाकांनी आपल्याकडं पाहुणे येणार आहेत म्हणून ती नाकारली होती.

पुळणीवर ओळीने उभ्या असलेल्या होड्यांकडं पाहत माथुकाका सीतूला म्हणाले,

"सीतू, या बघ- या तुम्हा लोकांच्या होड्या आणखी काही वर्षांनी इथं दिसणार नाहीत. फॅक्टरीला जागा कमी पडली तर हे ओळीनं दिसतात ते सारे माडदेखील तोडून काढतील. या किनाऱ्यावरचं हे हिरवं वैभव पुन्हा म्हणून डोळ्याला दिसणार नाही."

"पण काका, सर्वजण म्हणतात, आपण सुखी होऊ. घरोघरी पैसा येईल, सुबत्ता येईल."

"पैसा जरूर येईल! पण आज पैसा न येतादेखील इथली माणसं जगू शकत होती ना?"

"होऽऽ! पण आमचा बाबा म्हणतो, खूप पैसे मिळाले की आपण सुखी होऊ."

माथुकाका त्या निष्पाप अन् भाबड्या सीतूकडं पाहून हसले आणि म्हणाले, "आपल्याकडं आलेली पाहुणेमंडळी खूप पैसा आणि समृद्धी मिळवलेली अशी होती. पण सुख शोधण्यासाठी ती अशी देशोदेशी भटकंती करू लागली आहेत. त्यांच्या देशातले काही हिप्पीही झालेत, तर काही वैफल्यानं ग्रासून मद्यपि बनलेत. काहीजणांना गुंगीच्या औषधांच्या सवयी लागल्या आहेत. अति सुख अन् समृद्धी शेवटी माणसाची ही अशी दैन्यावस्था करते. माझा जो विरोध आहे तो त्याला. पण इथं जे कारखाने निघणार आहेत, त्यानं तुम्हा लोकांना एवढी

सुखसमृद्धी निश्चितच मिळणार नाही. त्यामुळं होणार आहे काय, तर औद्योगिकीकरणाचे दुष्परिणाम इथं लवकर जाणवणार आहेत. जादा पैसे मिळाले की तुझ्या गाबित समाजाचे लोक काय किंवा या सुबीच्या भंडारी समाजाचे लोक काय, पैसा म्हणून साठवणार नाहीत.''

''काय करतील?''

''जुगारात, दारूत, चैनीत उडवतील! आज जे इथले लोक स्वतंत्र आहेत त्यांचं स्वातंत्र्य नष्ट होईल. ते त्या मनमोहनशेठचे गुलाम बनतील. त्यांना स्वत्व असं काही उरणार नाही.''

''पण लोक म्हणतात...''

''काय म्हणतात?''

''आम्हाला सुखासमाधानाचे चार दिवस लाभणार ते तुम्हाला आवडत नाही.''

बसलेल्या जागेवरून उठता उठता माथुकाका म्हणाले, ''चालायचंच. त्यांना तसं वाटणं स्वाभाविक आहे. पण मी दुनिया फार बघितलेली आहे. सीतू चल, वेळ फार झाला.''

माथुकाका जन्मले भारतातच-पासष्ट वर्षांपूर्वी, कारवारच्या किनाऱ्यावर! शिक्षणासाठी बेळगावला गेले. बेळगावात ते ज्यांच्या घरी शिक्षणासाठी राहिले होते, ते होते बेळगावच्या मराठा लाइट इन्फंट्रीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल ह्युजेस. या कर्नलसाहेबांचा छोट्या मॅथ्यूसवर लोभ जडला. निवृत्त झाल्यावर ते आपल्यासोबत मॅथ्यूसला इंग्लंडला घेऊन गेले. तिथे शिक्षणाऐवजी माथुकाकांचा ओढा धार्मिकतेकडं दिसू लागला. माथुकाकांनी तिथं खिश्चन धर्माचा सखोल असा अभ्यास केला. चर्च कौन्सिलनं त्यांची नियुक्ती करण्याच्या वेळी त्यांना कोणत्या देशात जायची इच्छा आहे हे विचारलं. त्यावेळी फादर मॅथ्यूसनी ज्या भूमीत आपण जन्मलो त्या भूमीतच आपले कार्यक्षेत्र असावे, अशी इच्छा प्रदर्शित केली. त्यांची नेमणूक झाली ती निंबर्डीच्या चर्चवर. तेव्हापासून आजतागायत फादर मॅथ्यूस हे अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या निंबर्डीच्या चर्चजवळच्या आऊट-हाऊसमध्ये वास्तव्य करून होते. अलीकडे त्यांना जगात खिश्चन धर्माचं पालन करणारे बरेचसे देश खिश्चनांच्या सच्च्या तत्त्वनिष्ठेपासून च्युत झालेले आहेत, असं वाटू लागलं होतं. खुद्द इंग्लंडचं युद्धोत्तर परराष्ट्रीय धोरण, अमेरिकेच्या मध्यपूर्वेकडील हालचाली, कोरिया-व्हिएतनाममधील युद्धं, जगाच्या राजकारणात सत्तेचा समतोल आम्हाला राखावयाचा आहे या नावाखाली प्रगत पाश्चात्य राष्ट्रांनी जगातल्या इतर राष्ट्रांच्या राजकीय क्षेत्रात केलेला हस्तक्षेप फादर मॅथ्यूस यांना समर्थनीय वाटत नव्हता. अशी इतर राष्ट्रांत लावालावी किंवा लुडबूड करणाऱ्या राष्ट्रांच्या परदेशी धोरणाला उद्देशून ते म्हणत, Americans and the British have no Right to poke their dirty nose in the political affairs of the East.

याचबरोबर फादर मॅथ्यूसना आणखीन एक गोष्ट खटकत होती. खिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी इंग्रजांनी इथल्या 'नेटिव्ह' जनतेला धर्माची दीक्षा दिली खरी; पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्याच पाश्चिमात्य खिश्चनांनी इथल्या नेटिव्ह खिश्चनांच्या हिताकडे दुर्लक्ष केलेलं आहे, अशी मॅथ्यूस यांची तक्रार होती. ज्यावेळी ते 'इक्लेसियॅट्रिकल कॉन्फरन्स' साठी दहा वर्षांपूर्वी पुन्हा इंग्लंडला गेले होते तेव्हा त्यांनी ही आपली तक्रार नोंदवली होती. पूर्वी इथल्या नेटिव्ह खिश्चनांना उच्च शिक्षणासाठी परदेशी शिष्यवृत्त्या मिळायच्या, जे इथले दुर्बल जातिबांधव होते त्यांना आर्थिक साहाय्य मिळायचे. पण भारत स्वतंत्र झाल्यापासून पाश्चात्यांच्या वागणुकीत बदल झालेला आहे असा आक्षेप घेणारे मॅथ्यूस हे एकमेव धर्मोपदेशक होते. पण सत्य हे नेहमीच कटू असतं. 'जगातले सर्व खिश्चन एक आहेत' ही घोषणा देणाऱ्यांना मॅथ्यूस यांची ही तक्रार अर्थातच रुचली नाही. घोषणा देणारा हा एक वर्ग

प्रत्येक क्षेत्रात असतो आणि तो मोठा लबाड असतो. मग ते क्षेत्र धार्मिक असो, सामाजिक असो किंवा राजकीय असो. माथुकाकांना दंभ मुळीच खपत नसे. त्यामुळं त्यांना या घोषणावादी वर्गाबद्दल मनस्वी चीड होती.

अलीकडे जसजसं वय होत जाईल तशी फादर मॅथ्यूस यांची मानवतेकडे पाहण्याची दृष्टी विशाल होत होती. हा खिश्चन म्हणून जवळ करावा, तो इस्लामी किंवा हिंदू म्हणून दूर करावा,असं त्यांना वाटत नव्हतं. उलट, एखाद्या माणसाकडं तो एका विशिष्ट धर्माचा आहे या दृष्टीनं पाहणं म्हणजे आपणाला 'धर्म' या शब्दाचा अर्थच समजलेला नाही असा निष्कर्ष ते काढत होते. माथुकाकांची धर्माची व्याख्या अत्यंत विशाल अन् व्यापक होती. माणसाकडे माणूस म्हणून ज्याला पाहता येत नाही त्याला धर्माचा अर्थच समजलेला नसतो असं ते मानत. त्यामुळं सीतूसारखा गाबित किंवा सुबीसारखी भंडारी मुलगी यांच्याकडं पाहताना ती कोणत्या धर्माची आहेत ही गोष्ट माथुकाकांच्या दृष्टीनं अगदीच गौण होती.

मागे तीस वर्षांपूर्वी वीज पडून चर्चच्या आवारात गोड्या पाण्याचा झरा निर्माण झाला तेव्हा एक खिश्चन धर्मोपदेशक फादर मॅथ्यूसना म्हणाले होते, "या झऱ्याचं पाणी हवे असेल त्यांनी खिश्चन धर्म स्वीकारावा असा तुम्ही नियम करा. इथले लोक अंधश्रद्धावादी आहेत. तुमच्याजवळ काहीतरी अलौकिक अशी किमया आहे अशी त्यांची आज खात्री झालेली आहे. आपला धर्मप्रसार करण्याची ही संधी दवडू नका."

पण फादर मॅथ्यूस हसून त्या धर्मोपदेशकांना म्हणाले होते, "रेव्हरंड, आमचा धर्म स्वीकारा अन् मगच झऱ्याचं पाणी घ्या असं म्हणणं म्हणजे मी खिश्चानिटीची बदनामी केल्यासारखं होईल. पाणी आणि तेही प्यायचं पाणी नाकारणं म्हणजे केवळ धर्मच नव्हे तर क्रूरपणाचं कृत्य आहे!"

माथुकाकांच्या या विचारसरणीमुळे निंबर्डी गावच्या लहानांपासून थोरापर्यंत सर्वांना ते आपलेच असे वाटत होते. पण या मनमोहनशेठच्या आगमनापासून माथुकाकांच्याबद्दल निंबर्डीच्या लोकांना वाटणारी आत्मीयता ओहोटीला लागल्यासारखी झाली होती. माथुकाका 'या फॅक्टरीमुळं निंबर्डीच्या लोकांचं स्वत्व हरवणार आहे' असा उघड प्रचार करीत होते. पण लोकांना वाटत होतं की, माथुकाका आता वृद्ध झालेले आहेत. वृद्धापकाळी माणसाची सारासार विचारसरणी लुप्त होते. त्याला हित आणि अहित कशात आहे हे कळेनासं झालं होतं. म्हणून माथुकाकांचा निंबर्डीत कोणी तिरस्कार करीत नसेल, पण त्यांच्याबद्दलचा आदर मात्र संपुष्टात आला होता यात वाद नव्हता.

रासू सारंगासारखा त्या भागातला प्रख्यात दर्यावर्दी- तोदेखील 'म्हाताऱ्याची बुद्धी गहाळ झालीय', असं उघड उघड म्हणत होता. सारा गावच जवळ जवळ माथुकाकांपासून दुरावला होता. दूर झालेली नव्हती ती ही दोन पोरं- सीतू आणि सुबी!

सीतूच्या खांद्यावर हात ठेवून माथुकाका आऊट- हाऊसकडं येत होते. चार दिवसांसाठी म्हणून आलेले पाहुणे एक आठवडाभर राहिले. मोठ्या शहरापासून दूर असलेल्या या निंबर्डीच्या चर्च आणि आऊट-हाऊसच्या आवारात त्यांचं मन रमलं होतं. सीतू आणि सुबी या दोघांनी त्यांच्या देखभालीमध्ये कसलीच कमतरता पडू दिली नव्हती. सुबीनं बाप मेलेल्या रात्रीच परत चर्चवर येऊन सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता. माथुकाकांनादेखील ती त्यादिवशी परत चर्चकडे येईल असं वाटलं नव्हतं.

"सीतूऽऽ!" माथुकाका आऊट-हाऊसच्या व्हरांड्यात आरामखुर्चीवर बसता बसता म्हणाले, "त्या लोकांनी माझ्याजवळ तुझी खूप तारीफ केली."

"काका, माझे आणि सुबीचे त्यांनी कितीतरी फोटो काढून घेतले. मला म्हणाले, 'तुला

आमच्यासोबत नेला असता; पण आमच्या फादर मॅथ्यूसना तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही आधार नाही.' पण येत्या खिसमसला मला एक छानशी भेट पाठवून देणार आहेत ते.''

''देतील हं. ते लोक वचनाचे सच्चे आहेत.''

''काका, खरंच मला सोबत न्यायची इच्छा होती त्यांची.''

''तुझा बाप बरा सोडेल! आता तर तो त्या नवीन कारखान्यात मोठ्या पगारावर नेमला जाणार आहे म्हणे! तुझ्यासाठीही तो एखादी शे-दोनशे रुपयांची नोकरी पाहील.''

''मी नाय त्या लोकांची नोकरी करणार.''

माथुकाका सीतूच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, ''सीतू, अरे असं करून चालणार नाही. या गावात राहायचं असेल तर बाबासारखंच तुला वागावं लागेल. मी काय तुझ्या जन्माला पुरणार आहे थोडाच?''

''मग मी त्या फॅक्टरीत नोकरी करू?''

''हो! का करू नये? तू करावीस - सुबीनंदेखील करावी. साऱ्या गावच्या लहान-मोठ्यांना तिथं रोजगार मिळणार असेल तर नोकरी करायला काय हरकत आहे?''

''तुम्हीच म्हणालात, की ती गुलामगिरी आहे.''

''म्हणालो खरा, पण त्यावर आता मी खूप विचार केला आहे. सीतू माझी इच्छा असो वा नसो, मनमोहनशेठ इथं फॅक्ट्या उभ्या करणारच! तुम्ही लोकांनी तिथं काम करावं, न पेक्षा तो शेठ दुसरीकडचे मजूर आणून फॅक्ट्या सुरू करील. त्यापेक्षा तुम्हीच इथं काम करणं हिताचं आहे.''

सीतूला माथूकाका आज आपल्या इच्छेच्या विरुद्ध बोलत आहेत हे स्पष्ट दिसत होतं. पण एकदा निंबर्डीचं स्वातंत्र्य नष्ट होणार, पावित्र्य मलीन होणार म्हणणारे माथूकाका 'तुला व सुबीला तिथं काम करावं लागेल' असं का म्हणतात हे सीतूला कळेना.

सीतू माथुकाकांना भेटून किचनकडे आला तेव्हा सुबी ॲल्युमिनियमची मोठी भांडी धुवत बसली होती. परकराचा काचा मारून ती हौदाजवळ भांडी धुवत होती. तिच्या गोऱ्या पुष्ट मांड्या आणि भांडी घासताना तिच्या अवयवांची होणारी ती हालचाल तो निरखून पाहात उभा होता. सीतूला ती म्हणाली,

''सीतू, काय म्हणतात रे काका?''

''काका म्हणतात, आपण दोघांनी फॅक्टरी सुरू झाली की तिथं काम करावं.''

''अंऽऽ? पहिल्यांदा तर नको म्हणाले होते.''

''हांऽऽ. तेच ना!''

सीतू सुबीच्या उरोजांकडं पाहात होता. परवा आलेल्या त्या तीन जोडप्यांनी आपापसांत समुद्रकिनारी बीचवर जी दंगामस्ती केली होती ती पाहून सीतूच्या मनात अंकुरलेली कामवासना उफाळून आली होती. सुबीला घट्ट कवटाळून धरावं, तिच्या ओठांचं, गालांचं चुंबन घ्यावं असं त्याला एकसारखं वाटू लागलं.

भांडी घासून, धुऊन झाल्यानंतर सुबी सीतूला म्हणाली,

''चल, आतल्या फळीवर एवढी भांडी लावून टाक.''

सीतूनं थोडी भांडी घेतली, सुबीनं थोडी घेतली. उंच टेबलावर सुबी चढली. सीतू तिला खाली उभा राहून एक-एक भांडं देत होता. पण सुबीकडं भांडी देताना त्याचं सारं लक्ष आज तिच्या मांड्यांकडं लागून राहिलं होतं. भांडी लावून झाल्यानंतर सुबी स्टुलावरून खाली उतरू लागली तेव्हा पटकन सीतूनं सुबीला मिठी मारली. सुबीला तो काय करतो आहे याची कल्पना यायच्या आतच त्यानं तिच्या गालांची अन् ओठांची असंख्य चुंबनं घेतली!

सुबी घाबरली, गोंधळली, पण तिनं सीतूला प्रतिकार केला नाही. सीतू तिला आवडत होता. गेले कित्येक दिवस ते दोघे एकमेकांच्या सहवासात होते. कळत-नकळत त्या दोघांमध्ये एक नाजूक अशी ओढ निर्माण झाली होती. पण सीतू इतक्या लवकर आपल्याबद्दलच्या आकर्षणाचं असं प्रदर्शन करील याची मात्र तिला कल्पना नव्हती.

"सोड मला. काकांनी पाहिलं तर काय म्हणतील?" विस्कटलेले केस सावरीत ती म्हणाली.

"काका आरामखुर्चीत गाढ झोपी गेलेत. ते आता इथं येत नाहीत."

"पण तू हे असं का केलंस?"

"सुबी, परवा आपल्याकडं आलेले पाहुणे असंच करीत होते. हे काहीच नाही. तू समुद्रावर आली नव्हतीस. बायकांना खांद्यावर उचलून घेऊन आत समुदात टाकत होते आणि त्या हसत हसत परत किनाऱ्यावर येत होत्या. त्यांनाही तसं करून घ्यायला आवडत होतं."

"चल! चावट कुठला!" असं म्हणून सुबीनं खोटं खोटं त्याला मारण्यासाठी हात उगारला, तो त्यानं वरच्यावर धरला आणि परत तिला जवळ ओढून तिचं आणखीन एक चुंबन घेतलं.

त्यानंतर हे प्रकार नित्यच घडू लागले. काका कधी तिठ्ठयावर बाशामामूच्या हॉटेलकडं गेले किंवा चर्च कौन्सिलच्या मीटिंगसाठी चित्रदुर्गाला गेले की सीतू आणि सुबी यांच्या प्रणयाला ऊत येई.

अन् होता होता एक दिवस सीतूनं सुबीचा कौमार्यभंगही केला. त्यादिवशी ती खूप घाबरली. आपल्या हातून काहीतरी अक्षम्य असा अपराध घडल्याची जाणीव होऊन रडलीसुद्धा., पण सीतूनं तिची समजूत घातली. फक्त लग्न झालेल्या नवरा-बायकोतच असे प्रकार घडतात, आपण जे केलं ते काहीतरी पापकर्म आहे या जाणिवेनं सुबी चिंताग्रस्त झाली. तरीही तिला सीतू फार वेळ दिसला नाही की चुकल्या चुकल्यासारखं वाटू लागलं.

माथुकाकांची नजर क्षीण झाली होती. तरीही त्यांना या दोन निष्पाप आणि भाबड्या जिवांची परस्परांविषयीची ओढ निदर्शनाला आल्याशिवाय राहिली नाही. त्यांनी सुबीच्या आईला बोलावणं धाडलं. ती आली.

"तुला काही समजलं की नाही?" माथुकाकांनी तिला विचारलं.

"कशाबद्दल?"

"सीतू आणि सुबीबद्दल?"

"नाही."

"ती दोघं एकमेकांवर खूप प्रेम करतात. दोघंही जाणती झालेली आहेत. एखाद्या वेळी काहीतरी भलता प्रकार करून ठेवतील. त्याअगोदर त्यांचं लग्न करून टाकावं हे बरं!"

"काकाऽऽऽऽऽ!" सुबीची आई आश्चर्यचकित होऊन म्हणाली.

"ह्ये कसं होणार?"

"का नाही होणार?"

"सीतू गाबित- आम्ही भंडारी!"

"अगं, पण ती दोघं माणसंच आहेत ना?"

"नाही नाही! काका, ह्ये असलं काही आपल्या हातून व्हायचं नाही. मी सुबीला घरी घेऊन जाते. आमच्या जातीतल्या कोणाशीतरी तिचं लग्न लावून टाकते. मी जात नाही बाटवायची." सुबीची आई पटकन म्हणाली.

"जात? सुबीची आई, अगं पोरांचं एकमेकांवर प्रेम आहे. त्यांची ताटातूट कशाला

करतेस?''

''ते होणार नाही काका! हिच्या बापानं तुमच्याकडून दोनशे रुपये घेतले, ते मी मोलमजुरी करून फेडीन; पण जात नाही बाटवायची!'' हातवारे करीत सुबीची आई उद्गारली.

माथुकाकांना तिची कशी समजूत घालावी हे काही समजेना. त्यांनी सुबीला हाक मारली. आतल्या खोलीतून सीतू आणि सुबी ते संभाषण ऐकतच होते. सुबीच्या आईनं घेतलेला पवित्रा अनपेक्षित होता. भंडारी आणि गाबित यांच्यात रोटी-व्यवहार होत होते. पण बेटी-व्यवहार होत नव्हते. माथुकाकांना हे ठाऊक होतं; पण तरीही त्यांना आपण या दोन जमातींत एक आदर्श असा पायंडा घालून देऊ असा आत्मविश्वास वाटत होता. सुबीच्या आईनं त्यांच्या कल्पनेला आज जबरदस्त असा धक्का दिला.

माथुकाका काहीसे हताश होऊन म्हणाले, ''तुझ्या सुबीला तरी विचार. तिच्या मनाचा विचार करशील की नाही?''

बाहेर येऊन उभी राहिलेली सुबी मुळुमुळू रडण्याव्यतिरिक्त काहीच करू शकत नव्हती. सुबीची आई काही क्षण थांबून म्हणाली,

''ह्या सुबीला चित्रदुर्गातल्या सटव्या भंडाऱ्याला दिली नाही तो वयानं मोठा म्हणून. पण म्हणून काही मी गाबिताला माझी लेक द्यायची नाही होऽ!''

''नको देऊस. तू तिची आई आहेस- मी तिचा कोऽऽऽणी नाही! घेऊन जा तुझ्या पोरीला. पण लक्षात ठेव- तू फार मोठं पाप करते आहेस. दोन कोवळ्या जिवांची ताटातूट करण्यासारखं या पृथ्वीतलावर दुसरं मोठं पाप नाही!''

''पाप-पुण्य गेलं समुद्रात काका! मला माझी जात तोंड वर काढू द्यायची नाही.''

''ठीक आहे. तुला तुझ्या मुलीच्या सुखापेक्षा तुझ्या जातीचीच जर चिंता अधिक असेल तर माझं काहीएक म्हणणं नाही. सुबी, रडू नकोस पोरी -जा.''

''काका!'' सुबीची आई क्षणभर विचार करून म्हणाली,

''समजा, मी परवानगी दिली, तरी या सीतूची आई परवानगी देईल असं वाटतं?''

''का नाही देणार?''

''ती पदी कशी आहे ते मला ठाऊक आहे. तुम्ही विचारून तरी बघा.''

''ठीक आहे, आत्ताच तिला बोलावतो. जा रे सीतू, बोलावून आण तुझ्या आईला.'' सीतूला आपल्या डोळ्यांसमोर चक्रीवादळ निर्माण झाल्याचा भास होत होता. त्या चक्रीवादळात एक नौका सापडली होती. उसळत्या लाटांवर ती हेलकावे खात होती. ती सुखरूप किनाऱ्याला लागते की बुडते, याचा त्याला अंदाजच करता येत नव्हता. प्रत्यक्षात त्यानं असलं वादळ खूप वेळा अनभुवलं होतं. रासूसोबत अनेकवेळा तो दर्यावर गेला होता. दहा-पाच वेळा अचानक निर्माण झालेल्या वादळात ते बाप-लेक सापडले होते. पण रासू सारंग जन्मजात दर्यावर्दी होता. त्यानं उफाळलेल्या लाटांमधून आपलं गलबत प्रत्येक वेळी सुखरूप असं किनाऱ्याला लावलं होतं. पण आज सीतूच्या डोळ्यांसमोर जे वादळ निर्माण झालेलं होतं, त्या वादळात जी नौका सापडली होती त्यात तो अन् सुबी दोघेच होते.

सुबी एकसारखी ओरडत होती. 'मी बुडणार, मला वाचव!' पण सुकाणू हाती धरलेल्या सीतूला ती नौका सावरावी की सुबीला सावरावं हे समजत नव्हतं. तो मोठमोठ्यानं ओरडत होता.'हात सोडू नको. मला तिथं तुझ्याजवळ येता येत नाही; पण मी ही नाव मात्र सुखरूप अशी किनाऱ्याला लावणार आहे.'

सीतू घरी पोहोचला तेव्हा पदी तांदूळ निवडीत बसली होती. सीतूला पाहून ती म्हणाली,

"का रे, धावतसा आलास?"

"माथुकाकांनी तुला बोलावलंय."

"मला? का?"

"काय की!"

"तुझा बाप येईल आत्ता. त्यानं ताकीद दिलीय मला, माथुकाकांकडं जाऊ नको म्हणून!"

"आई, पण आज काकांचं फार महत्त्वाचं काम आहे ग, लगेच परत ये."

काकुळतीला येऊन सीतू म्हणाला.

"चल." त्याच्या आग्रहास्तव पदी चर्चकडे जायला निघाली.

पदीला घेऊन सीतू चर्चवर पोहोचला तेव्हा माथुकाकांच्या समोर सुबीची आई बसलेली तिला दिसली, तेव्हाच पदीनं ओळखलं की प्रकार काहीतरी निराळा आहे.

"पदी." माथुकाका शांतपणे म्हणाले, "तुझं काय म्हणणं आहे? या सीतूचं अन् सुबीचं लग्न झालं तर कसं होईल?"

"लग्न? काका, लग्न म्हणजे काय पोरखेळ वाटतो तुम्हाला? भंडारी आणि गाबित यांच्यात लग्न नाही होत." पदी क्षणाचाही विलंब न लावता म्हणाली,

"या दोन पोरांचं एकमेकांवर नितांत प्रेम आहे पदी. सुखी होतील दोघंही."

"याच्या बापाला विचारा."

"तो माझ्याशी अलीकडे बोलतदेखील नाही. मी कसं विचारू त्याला?"

"तो कारभारी आहे."

"तुझ्या मनात नाही म्हणून स्पष्ट सांग की."

"नवरा जिवंत असताना पोराच्या लग्नाची वाटघाट बाईनं करायची नसते."

"पण समज, तुला रासूनं तो अधिकार दिला, तर तू कोणता निर्णय घेशील?"

"मी भंडाऱ्याची पोर सून म्हणून घरात नाही घेणार!" पदी स्पष्टपणे बोलून गेली.

"ठीक आहे. तुमच्या दोघींचं असं मत असेल तर मी एकटा काय करणार? सुबी, पोरी तू जा आता. जीझसची इच्छा नाही दिसत तुम्हा दोघांना एकत्र आणण्याची. माणसांच्या इच्छेपेक्षा परमेश्वराची इच्छा प्रबळ असते."

सुबी त्याच रात्री रडत रडत आईसोबत भंडारीवाड्यात गेली.

०००

# आठ

मनमोहनशेठ यांनी आपल्यासोबत आणलेल्या सर्व्हेअर आणि मत्स्यविषयक तज्ज्ञांची पाहणी पूर्ण झाली होती. कोळीवाड्यापलीकडची जागा फॅक्टरीसाठी मुक्रर करण्यात आली होती. 'कोल्ड स्टोअरेज' आणि 'कॅनिंग' अशा दोन्ही फॅक्ट्या लवकरच तिथं सुरू व्हायच्या होत्या.

बांधकामाला सुरुवात झाली. शेठनी मुंबईहून मजूर आणले. चित्रदुर्ग बंदरापर्यंत अवजड यंत्रसामुग्री आली. ती निंबर्डीत आणण्यासाठी निंबर्डी नदीवर एकावेळी एक वाहन जाऊ शकेल असा पूल बांधण्याचंही काम सुरू झालं. फॅक्टरी सुरू व्हायला अद्याप अवकाश होता, तरीही निंबर्डीच्या सर्व स्त्री-पुरुषांना काम मिळालं. आपलं राहणीमान उंचावणाऱ्या या योजना लवकरात लवकर पूर्ण व्हाव्यात म्हणून निंबर्डीतले भंडारी, गाबित आणि खिश्चनही कामाला लागले.

रासू सारंगानं आपल्या शिरावर खूपच जबाबदारी घेतली होती. बांधकामासाठी आलेले इंजिनियर्स आणि ओव्हरसियर्स यांच्या राहण्याची सोय करण्याची जबाबदारी शेठनी रासूवर टाकली होती. फॅक्ट्या सुरू व्हायला अद्याप वर्ष- सहा महिन्यांचा अवधी होता. पण रासूला मात्र दरमहा चारशे रुपयांचा तनखा शेठनी सुरू केला होता. शेठ तसे धूर्त होते. त्यांनी ओळखलं होतं की, हा रासू सारंग आपण आपलासा करून घेतला की इथला गाबित समाज आपल्या पाठीशी उभा राहील. त्याचप्रमाणे त्यांनी भंडारी आणि खिश्चन समाजाचेही पुढारी नेमके आपल्या हाताशी धरले होते. तिठ्ठ्यावरचा बाशामामूदेखील विशेष खुष होता. कारण त्यानं मुंबईवरून आलेल्या तज्ज्ञांना व कामगारांना जेवण द्यायचं कॉन्ट्रॅक्ट घेतलं होतं. तिठ्ठ्यावर दिवसाकाठी शे-पन्नास जमायची मारामार व्हायची, तिथं आता शेकड्यावारी पैसा मिळू लागला होता. शिवाय ही त्याची प्राप्ती बांधकामाच्या वेळेपुरती मर्यादित राहणार नव्हती- तर उद्या फॅक्ट्या सुरू झाल्या की बाहेरून येणाऱ्या माणसांचीही वर्दळ वाढणार होती. अन् याच हेतूनं बाशामामूनं खुद्द निंबर्डीत आपल्या हॉटेलची एक शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला. खुद्द निंबर्डीच्या लोकांमध्येच नव्हे, तर आसपासच्या लोकांमध्येदेखील नवीन सुरू होणाऱ्या या फॅक्ट्यांबद्दल जिज्ञासा निर्माण झाली होती.

मुंबईवरून ट्रॉलर्स आले. एक लाँचही आली. लाल रक्ताच्या रंगाची, मध्येच निळा पट्टा असलेली लाँच सात लाख रुपये किमतीची आहे असं समजताच सारी निंबर्डी ती लाँच पाहायला लोटली. आतलं केबिन, त्यानंतर कडेचं डेक, वरती फिरता लाल दिवा, फडफडणारं निशाण, संकटकाळी उपयोगात आणली जाणारी 'लाईफ जॅकेटस्', या साऱ्या गोष्टी निंबर्डीच्या लोकांना अपूर्वाईच्या होत्या. आणलेल्या ट्रॉलर्समध्ये साठ अश्वशक्तीचं प्रचंड डिझेलचं मशीन होतं. या मशीनच्या साहाय्यानंच यापुढं ट्रॉलर्सवरची ती प्रचंड नायलॉनची जाळी समुद्रात सोडली जाणार होती- सागरतळाशी वावरणारे प्रॉन्स, लॉबस्टर्स, सार्डीन्स असे परदेशी चलन मिळवून देणारे मासे पकडले जाणार होते. आजपर्यंत निंबर्डीचे गाबित शिडांच्या होड्यांतून मच्छिमारी करायला जायचे. त्यांना वाऱ्याच्या लहरीवर अवलंबून राहावं लागे. पण आता हे ट्रॉलर्स वारा अनुकूल असो वा नसो- सागरतळाची संपत्ती ते टनाच्या हिशोबात लुटणार होते.

हे सर्व घडत असताना पिढ्या न् पिढ्या दारिद्र्याशी झगडणाऱ्या निंबर्डीच्या लोकांना सुख आणि समृद्धी यांची भरभरून लयलूट करता येणार होती.

माथुकाका पश्चिमेकडे असलेल्या खडकावर बसले होते. शेजारी सीतू होता. सुबीला घरी जाऊन एक महिना झाला होता. माथुकाकांना तिची खूप आठवण यायची; पण ते तसं उघडपणे सीतूसमोर बोलून दाखवत नव्हते. आजही त्यांना सुबीची खूपच आठवण झाली, ती लंडनवरून पत्र आल्यामुळं. मिसेस रॅटक्लिफनं लंडनला पोहोचल्यानंतर माथुकाकांना आभारप्रदर्शन करणारं पत्र पाठवलं होतं आणि त्या पत्रात खास करून सुबीचा उल्लेख होता. बापाच्या मृत्यूचं दु:ख बाजूला ठेवून आपल्या सेवेसाठी राबलेल्या सुबीला त्यांनी खूप खूप धन्यवाद दिले होते.

"सीतूऽऽ, सुबी दिसली का रे अलीकडं?" माथुकाकांनी विचारलं.

कातळीवरचा एक वाळूचा खडा उचलून खाली टाकत सीतू म्हणाला, "होऽऽ!"

"केव्हा भेटली?"

"परवा. चार दिवसांपूर्वी तिचा मामा आला आहे देवगडवरून. देवगडला घेऊन जाणार आहे म्हणे."

"देवगडला? कशाला?"

"काही कल्पना नाही. पण खूप रडली."

काही क्षण माथुकाकांना काय बोलावं हे समजलं नाही. घशात काहीतरी अडकल्यासारखं वाटल्यानं त्यांनी घसा साफ केला आणि एक प्रदीर्घ नि:श्वास सोडून ते म्हणाले,

"पोरीचं नुकसान करणार ती बाई! भिकू मेला तेव्हा वाटलं, सुबी सुटली. पण तिची आईही इतकी मूर्ख असेल असं वाटलं नव्हतं."

"काका, सुबी म्हणते, मला जर देवगडला नेलं तर मी तिथं गेल्यावर जीव देऊन मोकळी होणार. मी सुबीच्या आईला मारून टाकतो!" सीतू दाताखाली ओठ दाबून म्हणाला.

माथुकाका त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले.

"तसला माथेफिरूपणा करू नको, सीतू. आपल्या सुखासाठी माणसानं दुसऱ्याचं रक्त कधीही सांडू नये. रक्तरंजित सुख दीर्घकाळ माणसाला लाभत नसतं."

"ही सुबीची आई आणि तिचा भाऊ सुबीचं कोणाशी तरी लग्न लावून देण्याच्या तयारीत आहेत."

"आपण काय करू शकतो?"

"काका, मी तुम्हाला आजपर्यंत एक गोष्ट सांगितली नाही. सुबीशी मी लग्न केलंय."

"लग्न?" माथुकाका हसत हसत म्हणाले, "खरं म्हणजे लग्न हे दोन जिवांचं मंगल असं मनोमिलन असतं. पण लौकिकदृष्ट्या गाजावाजा झाल्याशिवाय ते कोणी खरं मानीत नाहीत. अगदी इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांतसुद्धा लग्न हे त्या-त्या समाजाच्या प्रचलित चाली-रूढींनुसारच व्हावे लागते."

"काका, तुम्हाला ठाऊक नाही. मी अन् सुबीनं चर्चमध्ये एकमेकांच्या गळ्यात फुलमाळा घातलेल्या आहेत. जीझससमोर आम्ही शपथ घेतलेली आहे. आम्ही पती-पत्नी झालेलो आहोत!"

"आता तुम्हाला एकत्र आणायचं असेल तर तो एकटाच समर्थ आहे." चर्चच्या क्रॉसकडं बोट दाखवून माथुकाका म्हणाले.

त्यानंतर आठ दिवस झाले. सीतू माथुकाकांना सांगत आला, सुबी देवगडावरून पळून

आली. खरोखरच सुबी देवगडावरून परत आली होती; पण तिला परत न्यायला तिचा मामा काही आला नाही. सुबीनं त्याला धमकी दिली होती- 'तू न्यायला आलास तर जीव देणार' म्हणून! आपल्या घरात असा काही प्रकार होऊ नये म्हणून मनू भंडारीही देवगडावरून आला नाही.

सुबी निंबर्डीला परत आल्यानंतर गावात आणखीन एक आवई उठली- सुबीला दिवस गेल्याची! रोज सकाळी अन् संध्याकाळी तिला उलट्या होऊ लागल्या. सुबीच्या आईनंच काय, पण निंबर्डीच्या उभ्या भंडारीवाड्यानं ते कशाचं लक्षण आहे हे तत्काळ ओळखलं. लग्नाअगोदर गरोदर होणाऱ्या सुबीनं आपल्या घराण्याला कलंक लावला म्हणून सुबीच्या आईनं अकांडतांडव सुरू केलं. तिनं निंबर्डीच्या गावपंचायतीला गाऱ्हाणं घातलं.

दोन भंडारी, दोन गाबित आणि एक खिश्चन अशी पाच माणसं या गावपंचायतीची सदस्य होती. तिनं सीतूवर आपली पोर बाटवल्याचा आरोप घातला. माथुकाकांच्या प्रोत्साहनानंच ते कृत्य घडवल्याचा दावा केला. अगोदरच माथुकाका गावकऱ्यांच्या मनातून उतरले होते-तशात असा भयानक आरोप त्यांच्यावर केल्यामुळे ते अत्यंत दु:खी झाले. त्यांनी सीतूला त्या आरोपाच्या खरेखोटेपणाबद्दल विचारलं, तेव्हा त्यानं स्पष्ट सांगून टाकलं,"माझा आणि सुबीचा संबंध आला होता."

"काय करून ठेवलंस तू हे?"

"काका, सुबी माझी बायको आहे. मी जीझससमोर अगोदर तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला आहे."

"फार मोठी चूक केलीस पोरा! खरं म्हणशील तर तुझ्या हातून काही वावगं घडलेलं नाही. निसर्गनियमानुसार तुम्हा दोघांत ते नातं निर्माण झालं होतं. पण या निंबर्डीतल्या माणसांना ते पटायचं नाही रे! वेडी आहेत माणसं ही! जातपात अद्याप त्यांच्या डोक्यातून गेलेली नाही. काही असो. आता यातून काहीतरी मार्ग हा काढायलाच हवा."

"एक मार्ग सुचलेला आहे." सीतू निर्धारानं म्हणाला.

"कसला?"

"सुचलाय; पण तो तुम्हाला नाही सांगणार. तुम्ही त्याला संमती नाही देणार."

"सुबीच्या आईला मारण्याचा?"

"अंहं!"

"मग?"

"नंतर समजेल तुम्हाला."

चार दिवसांतच सीतूची कारवाई कळून चुकली. सीतू आणि सुबी दोघंही निंबर्डीतून बेपत्ता झाली.

माथुकाका अस्वस्थ झाले होते. ज्या घटना घडल्या होत्या त्याची त्यांना बिलकूल कल्पना नव्हती. पण समस्त भंडारी आणि गाबित समाजाचे लोक सीतू आणि सुबीला दोष न देता दोष देत होते ते माथुकाकांना. या थेरड्यानेच त्या दोघांना पळून जायला सांगितलं असलं पाहिजे असं दोन्ही जमातींच्या लोकांना वाटल्यानं त्याचा जाब विचारण्यासाठी रासू सारंग, सुबीची आई आणि गावची पाच-पन्नास माणसं चर्चच्या टेकडीवर आली.

"कुठायत आमची पोरं?" लोकांनी विचारलं.

"मला काही ठाऊक नाही." शांतपणे माथुकाका म्हणाले.

"माथुकाका, ही गोष्ट चांगली केली नाही." रासू सारंग म्हणाला.

"रासू, आजपर्यंत मी कधी खोटं बोललेलो नाही. यापुढंही बोलणार नाही. सीतू आणि

सुबी कुठं गेली ते मला ठाऊक नाही.''

''पोरांना चिथावणी देऊन तुम्हीच त्यांना कुठंतरी जायला सांगितल आहे.''

''मला काय त्याचा फायदा?''

''त्या दोघांचं लग्न व्हावं म्हणून तुम्हीच हा प्रयत्न केलेला आहे. तुम्हीच त्यांना पळून जायला सांगितलं.''

''मी काही चूक केली असेल तर हा प्रभूचा एकुलता एक पुत्र येशू मला क्षमा करणार नाही!''

लोक संतप्त झाले होते; पण माथुकाकांनी येशूचं नाव घेतलं तेव्हा ते काहीसे शांत झाले. कारण माथुकाकांजवळ काही तरी आध्यात्मिक ताकद आहे अशी सर्वांची खात्री होती. माथुकाकांनी गावाला पाणी मिळत नव्हतं तेव्हा आकाशस्थ प्रभूला विनवलं; अन् जिवंत असा गोड्या पाण्याचा झरा निर्माण झाल्याचं निंबर्डीच्या लोकांना ठाऊक होतं. कधीकधी गाबित दर्यावर गेल्यानंतर वादळ व्हायचं. त्यांच्या बायका हवालदिल होऊन चर्चकडं यायच्या. माथुकाका त्यांना धीर देऊन त्यांच्यासमवेत प्रार्थना करीत आणि वादळात सापडलेले गाबित परत किनाऱ्यावर येत. यात माथुकाकांच्या प्रार्थनेचा परिणाम किती आणि वादळात सापडलेल्या गाबितांचे कौशल्य किती हे कुणाला पटकन समजत नसे. पण असे अनेक प्रसंग घडले होते की त्यामुळं माथुकाकांजवळ काहीतरी अदृश्य शक्ती आहे असा बऱ्याच लोकांचा समज झाला होता. त्यामुळं सीतू आणि सुबी प्रकरणी माथुकाकांवर जरी लोक रागावले तरी तसा घाणेरडा आरोप त्यांच्यावर करू नये असं बऱ्याचजणांना वाटत होतं.

आज रासू सारंगनं त्या प्रकरणी माथुकाकांना दोष दिल्यामुळं त्यांचं मन दुखावलं. ते शेवटी एवढंच म्हणाले,

''ती दोघं एकमेकांची झाली असती तर सुखी झाली असती असं अजूनही मला वाटतं. याचा अर्थ मी त्या दोघांना चिथावणी देऊन येथून घालवून दिलं असा मुळीच नाही.''

''पण ही पोरं एकमेकांची होऊ शकत नाहीत हे तुम्हाला ठाऊक होतं.'' रासू म्हणाला,

''हां. ते नंतर-तुझी बायको आणि सुबीची आई इकडं आल्या तेव्हा समजलं.''

''त्या पोरांचं काही कमी-जास्त झालं तर जबाबदार कोण?'' रासूनं विचारलं.

त्यावर माथुकाका शांतपणे उद्गारले. ''तू आणि सुबीची आई, दोघेही जबाबदार राहाल!''

''का? आम्ही कसे जबाबदार राहणार?''

''आपण एकमेकांचे होऊ शकत नाही म्हणून त्या दोघांनी मिळून आत्महत्या केली तर त्याचं पातक तुमच्याच माथी येणार!''

''पाप-पुण्याच्या गोष्टी सोडा. आता जमाना बदलला आहे.'' रासू उपहासानं म्हणाला.

''जमाना बदलला? हंऽऽऽऽ! रासू, तू अजून लहान आहेस. जमाना बदललेला असेल; पण माणूस अजून बदललेला नाही. तो बदलायला हवा. या निंबर्डीच्या मातीत तू लहानाचा मोठा झालास. तुला अजून बाहेरचं जग समजलेलं नाही. जा, मुलं जिथं असतील तिथं सुखरूप राहू देत अशी प्रार्थना कर.''

माथुकाकांच्या सांगण्याप्रमाणं तो प्रार्थना मुळीच करणार नव्हता. तावातावानं चर्चच्या टेकडीवर गेलेली माणसं परतली. येताना रासूच्या डोक्यात एक दुष्ट विचार घोळत होता. माथुकाकांवर बहिष्कार घालायचा. कोणी त्यांना धान्य द्यायचं नाही. दूध द्यायचं नाही, मासे द्यायचे नाहीत किंवा कोणी त्यांच्याकडं जेवण बनवायलासुद्धा जायचं नाही.

गावात परतल्यानंतर रासूनं ती कल्पना इतरांना सांगितली. सर्वांनुमते ती संमत झाली.

माथुकाका कच्च्या दिलाचे नव्हते. ते माणसांच्या बहिष्काराला भीक घालणार नव्हते. ते भीत होते फक्त आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला! आजपर्यंत माथुकाकांनी आपल्या विवेकाशी प्रतारणा केलेली नव्हती- अन् भविष्यातही करणार नव्हते.

आठ दिवस झाले. सीतू-सुबीचा पत्ता लागत नव्हता. निंबर्डीनं माथुकाकांवर बहिष्कार घातला; पण निंबर्डीतले काही खिश्चन मात्र या कल्पनेच्या विरुद्ध होते. अंतोन गोन्साल्विस हा खिश्चनांचा पुढारी होता. तो रात्री चर्चकडे आला. सोबत त्याचे एक-दोन जातभाईही होते.

"फादर, गावच्या लोकांनी तुमच्यावर बहिष्कार घातला; पण आम्ही त्यांच्याशी सहमत नाही. तुम्ही त्या लोकांच्या लफड्यात पडताच कशाला?" अंतोननं विचारलं.

त्यावर माथुकाका म्हणाले, "कसलं लफडं? अरे, तो सारंगचा पोर आणि भिकूची मुलगी इथं लहानपणापासून एकमेकांच्या सहवासात होती. दोघंही सद्गुणी अन् सालस! एकमेकांकडं आकर्षली गेली. त्यात लफडं कसलं आलंय सांगा."

"ते खरं. पण भंडारी आणि गाबित यांची रोटी-बेटी होत नाही ना?"

"मूर्ख आहेत ते! मला काय बोलले त्याचं त्यांना भानच नव्हतं. जाऊ दे, सोडा तो विषय. तुम्ही लोक कशाला इकडं येता? तुम्हाला हे गाववाले त्रास देतील. माझं आता वय झालंय. मी जिवंत राहिलो काय अन् मेलो काय, दोन्हीही सारखंच! तुम्हाला मात्र त्या दोन्ही जमाती एक होऊन त्रास देत राहतील."

"तसं काही होणार नाही. तुम्ही आमचे धर्मगुरू आहात. तुम्हाला वाळीत टाकलेलं आम्ही स्वस्थपणे पाहात बसू?"

"अंतोन, अरे मी जरी तुमचा धर्मगुरू असलो तरी मला माणसामाणसांमधला भेद संमत नाही. माणूस केवळ दुसऱ्या धर्माचं पालन करतो म्हणून त्याच्याकडं निराळ्या दृष्टीनं पाहायचं हे मला मान्य नाही. तो सीतू -रासूचा पोर-माझं त्याच्यावर पोटच्या पोरासारखं प्रेम होतं. ती सुबीही तशीच. पण मला ती खिश्चन नाहीत म्हणून कधीही विषमता वाटली नाही. या निंबर्डीला ते ठाऊक होतं; पण तरीही त्यांनी माझ्याबद्दल गैरसमज करून घ्यावा याचं दु:ख होतंय. कधीतरी त्यांना त्यांची चूक समजून येईल. प्रभू त्यांना क्षमा करो."

"मी इथं जेवण करण्यासाठी माझ्या मुलीला पाठवतो." अंतोन म्हणाला.

"नको रे अंतोन, मीच येत जाईन खाली काही गरज पडली तर. बरं, काय म्हणतो तो शेठ?"

"शेठ जोरात आहे. परवा त्यानं काही तज्ज्ञ असे मच्छिमार सागरात पाठवले होते. व्हाईट प्रॉन्स या भागात विपुल आहे म्हणतात. हे व्हाईट प्रॉन्स जपानला जर कोल्ड स्टोअरमधून पॅकेटस् करून पाठवले तर जवळ जवळ शंभर रुपये किलो असा दर येईल म्हणतात."

"काय तरी काय सांगतोस अंतोन?"

"बाय गॉड! फादर, खरंच या पांढऱ्या सुंगठांना अमेरिका आणि जपान इथून फार मागणी आहे. जपानी लोक तर पांढऱ्या सुंगठांसाठी जीव सोडतील!"

"म्हणजे इथं गुंतवलेल्या भांडवलाचा त्या शेठला भरपूर फायदा होईल तर!"

"नक्कीच! आता बघा- बायकांना दहा रुपये मजुरी आणि पुरुषांना पंधरा रुपये मजुरी द्यायची तयारी आहे त्याची. म्हणजे त्याला किती फायदा होईल पाहा ना"

"मिळू देत. गरिबांना चार पैसे मिळाले तर बरंच होईल. पण मला भीती वाटते."

"कसली?"

"या निंबर्डीत आजपर्यंत जे 'इव्हिल' नव्हतं ते यापुढं हळूहळू येत राहणार. हा रासू

सारंगच बघ ना. किती वर्षं माझ्याकडं येत होता. पण तोच मला काय वाट्टेल ते बोलून गेला परवा. कशामुळं? पैसा! इथल्या माणसांतली माणुसकी नष्ट होणार आहे ती या पैशामुळं.''

''होईना! तुम्हाला काय करायचंय? तुम्ही आपले माझ्याकडं दोन वेळा जेवायला येत चला.'' अंतोन म्हणाला.

''दोन्ही वेळा चढ-उतार जमणार नाही रे! एक वेळ येत जाईन मी.''

''ठीक आहे. मग येतो मी.''

''ये.''

अंतोन टेकडी ओलांडून खाली जाईपर्यंत माथुकाका त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होते.

सूर्य मावळला. भरतीची वेळ होती. एकामागून एक अशा लाटा खडकाच्या पाण्यावर येऊन आदळत होत्या. आकाशात एक -एक तारा डोकावू लागला. चर्चच्या बाजूला एक छोटं कंपाऊंड होतं-त्यात फादर अँड्रूयूज यांचं दफन झालं होतं. त्या बाजूला थोडी रिकामी जागा होती. त्या जागेकडं पाहताना फादर मॅथ्यूस विचार करू लागले. 'ही माझी जागा! इथंच मी चिरविश्रांती घेत राहणार! एक ना एक दिवस मला या जगाचा निरोप घ्यावा लागणार आहे. मग मी कोणाचा द्वेष का करावा? आजपर्यंत मी तो केलेलाच नाही. पण इथल्या लोकांनी माझ्यावर बहिष्कार घातला म्हणून कदाचित द्वेषाची भावना माझ्या मनात निर्माण होईल. हे प्रभो, मला या घटकेला मरण दिलंस तरी मी आनंदानं स्वीकारीन; पण माझ्या विवेकाला एवढा कलंक लावू नको.'

माथुकाका हळूहळू आऊट-हाऊसकडं आले. खोलीत अंधार पडला होता. माथुकाकांनी मोठा पितळ्याचा स्टँड असलेला रॉकेलचा आरगन पेटवला. त्यावर काच ठेवली. खोली पिवळसर प्रकाशाने भरली. माथुकाका दिवा पेटवून मागे वळले आणि त्यांना दिसला तो सीतू! अंधारात केव्हा येऊन बसला होता कोणास ठाऊक.

''सीतू, पोरा असा अचानक कोठून उगवलास? सुबी कुठं आहे? सुखरूप आहे ना?''

माथुकाकांनी सीतूला गळ्याला लावून घेतलं होतं. त्याच्या पाठीवर ते हात फिरवीत होते. त्यांच्या डोळ्यांना धार लागली होती.

''काका, गावानं तुमच्यावर बहिष्कार घातला?''

माथुकाका क्षीण हसून म्हणाले, ''अरे, सोड तो विषय. वेडी आहेत ती माणसं!''

''नाही. मला सगळं समजलं म्हणून मी आलो. माझ्या बापानं तुम्हाला वाळीत टाकायला पुढाकार घेतल्याचं मला समजलेलं आहे. मी त्याला धडा शिकवणार आहे! असला बाप जिवंतसुद्धा राहाता कामा नये!''

त्याच्या तोंडावर हात ठेवीत माथुकाका म्हणाले, ''सीतू, मागेही तू सुबीच्या आईचा खून करतो असं म्हणाला होतास. माझ्या सहवासात राहून लोकांचे खून करण्याची ही भाषा तुझ्या तोंडी शोभत नाही रे! रासू तो तर तुझा जन्मदाता बाप! त्यानं तुला या जगात आणलं. मला भीती वाटते- कधी काळी तुझ्या हातून मनुष्यवध होईल! तसं काही करू नकोस. माझी शपथ आहे तुला, यापुढं तू कोणाचा जीव घेण्याची भाषा करशील तर!''

भावनावेगानं माथुकाका थरथरू लागले.

''बोल, तोंडानं बोल- यापुढं कोणाचे प्राण घेईन असं बोलणार देखील नाहीस! अरे, उक्ती ही कृतीची जननी असते. वारंवार जे तुझ्या डोक्यात घोळेल ते केव्हा ना केव्हा आचरणात उतरेल. म्हणून म्हणतो, तसा विचारदेखील मनात येऊ देऊ नकोस.''

सीतू मान खाली घालून उभा होता. तो पुढं काहीएक बोलला नाही. काही क्षण दोघेही

स्तब्ध होते. नंतर माथुकाकांनी विचारलं,

"कुठं सोडून आलास तिला?"

"फोंड्यात. तिची एक दूरची मावशी तिथं राहते. कोणी नाही तिला. एकटीच असते. तिच्याकडे गेलो होतो आम्ही."

"ठीक झालं. पण सुबी बरी आहे ना?"

"होय. बाळंत होईपर्यंत तिथंच राहील."

"माय गॉड! सीतू तू बाप होणार?" माथुकाकांनी सीतूचा हात प्रेमभरानं आपल्या हातात घेतला. "माझ्या सान्निध्यात राहिलेल्या दोन कोवळ्या जिवांना आणखीन एक जीव निर्माण होणार! पण आता तू इथं थांबू नकोस. इथले लोक फार संतापले आहेत. तू सापडलास तर तुला मारपीट करतील. जा, पण थांब थोडं." काहीतरी आठवण झाल्यासारखं करीत माथुकाका जाळीच्या कपाटाजवळ गेले. बाशानं केक पाठवला होता. त्याचा एक तुकडा सीतूला देत ते म्हणाले, "हे खा. बाशानं माझा वाढदिवस होता म्हणून मुद्दाम आठवणीनं पाठवला होता."

सीतूनं केकचा तुकडा तोंडात टाकला.

माथुकाकांच्या निर्व्याज प्रेमाचा असा अनेकवेळा त्याला साक्षात्कार घडला होता. लोकांनी स्वत:वर बहिष्कार घातल्याचं दु:ख कुठेही व्यक्त न करता केकचा तुकडा खाणाऱ्या सीतूच्या पाठीवर ते हात फिरवीत राहिले.

०००

# नऊ

सीतू आणि सुबी निंबर्डीतून बेपत्ता झाले त्यावेळी वातावरण गरम झालं होतं; ते दोन महिन्यांनंतर थोडंसं शांत झालं. रासू सारंग सीतूचा खून करायची भाषा करीत होता; तोही आताशी थंड झाला होता. आता त्याला सीतूला पाहावंसं वाटत होतं. मुलानं चूक केली हे खरं; पण त्या चुकीबद्दल त्याला मारण्याची भाषा करणं किंवा जन्मभर त्याचं तोंड न पाहणं हे काही बरं नाही असं त्याला वाटू लागलं होतं. शिवाय पदी रात्रंदिवस सीतूच्या चिंतेनं अस्वस्थ होती. तिनं सीतूचा ध्यास घेतला होता.

त्यादिवशी रासू कामावरून परतला. हवेत खूप उष्मा वाढला होता. त्यानं आल्या आल्या थंड पाण्यानं अंघोळ केली. मनमोहनशेठच्या नवीन आलेल्या मुनिमानं दोन बिअरच्या बाटल्या दिल्या होत्या. त्या त्याने अंघोळीला जाण्यापूर्वी थंड पाण्याच्या मडक्यात ठेवून दिल्या. अंघोळीनंतर त्यानं अंगावर फक्त लुंगी गुंडाळली आणि बिअरच्या बाटलीचं टोपण दातानंच खोललं. बाटलीतून फसफस असा फेस बाहेर आला. त्यानं बाटलीच तोंडाला लावली. एक घोट घेतल्यानंतर त्यानं पदीला विचारलं,

"जेवायला काय केलंस?"

"बांगडा तळला आहे, कर्लीचं कालवण केलंय"

"एक बांगडा दे बशीत घालून मला."

पदी खरपूस तळलेला बांगडा बशीतून घेऊन त्याच्यापुढे आली आणि म्हणाली,

"मग काय करायचं ठरवलंत?"

"कशाचं?"

"सीतूला शोधता की नाही?"

तो मान हलवीत म्हणाला,

"पदे, सीत्या जातो कुठं! आज ना उद्या येईल."

"मला आता दम धरवत नाही. सुबीला घेऊन ये म्हणावं असशील तिथनं."

"अगं, पण तो कुठं आहे हे समजल्याशिवाय ये म्हणून कुणाला सांगू?"

"तपास केल्याशिवायच त्याचा पत्ता तुम्हाला समजणार आहे?"

"आता कुठं तपास करू? तो म्हातारा काही दाद लागू देत नाही."

"त्याला नक्कीच सीतूचा ठावठिकाणा ठाऊक असणार. पण तुम्ही त्यांना विश्वासात घेऊन विचारून तरी बघा."

"मला तो सांगायचा नाही. तूच जर एखादवेळेस गेलीस तर कदाचित सांगेल."

पदीनं क्षणभर विचार केला अन् ती पटकन म्हणाली, "कर्लीचं कालवण घेऊन जाते. फार आवडतं माथुकाकांना."

"बांगडासुद्धा घेऊन जा." बाटली पुन्हा तोंडाला लावत रासू म्हणाला.

सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता. तरीही पश्चिम क्षितिजावरती तांबूस छटा तरळत होती. सागराच्या लाटा पुळणीवर एकापाठोपाठ एक अशा येत होत्या. किनाऱ्यावरचे

माड दोन्ही बाजूंना झुलत होते. हवेत किंचित गारवा वाटत होता.

पदी चर्चची टेकडी चढून वर आली तेव्हा माथुकाका आरगनच्या प्रकाशात भाजी चिरत असल्याचं पदीनं पाहिलं.

"काकाऽऽऽ!"

"कोण?"

"मी, पदी!"

माथुकाकांच्या कपाळावर आठ्यांचं जाळं उमटलं; पण क्षणभरच. कारण गेले कित्येक दिवस रासू किंवा पदी त्यांच्याकडं फिरकले नव्हते. इतकेच नव्हे, तर आपल्या सीतूला फितवून पळून जायचा सल्ला दिला तो माथुकाकांनीच, असा अपप्रचार निंबर्डीत करीत होता तो रासू!

"ये. का आलीस?"

"कर्लीचं कालवण आणलंय. तुम्हाला आवडतं ना!"

"हांऽऽ! पण अशी अचानक माझी आठवण कशी काय झाली?"

पदी बाजूच्या बाकावर बसली आणि म्हणाली,

"सीतूचा ठावठिकाणा समजेना झालाय. मला बघायची तळमळ लागून राहिलीय."

"तुझा नवरा त्याचा जीव घ्यायची भाषा करीत होता की!"

"होय. पण आता त्यांनीच मला तुमच्याकडं पाठवलंय."

"अस्सं! म्हणजे तुझ्या मुलाला मीच कुठेतरी दडवून ठेवलेला आहे असा अजूनही तुम्हा लोकांचा समज आहे तर!"

"खरं सांगू काका, सीतूचं आणि सुबीचं लग्न सुरुवातीला मला पसंत नव्हतं. पण नंतर मी विचार केला- एकमेकांवर त्यांचा जीव आहे तर काय बिघडलं लग्न केलं तर!"

"पदेऽऽऽ!" माथुकाका भिवया उंचावून म्हणाले, "तू माझा अंदाज काढण्यासाठी तर इथं आली नाहीस ना?"

"दुर्गेची आण! नाही काका, खरंच मला आता दम निघत नाही."

"आणखीन एक गोष्ट सांगितली तर अजिबातच निघणार नाही." माथुकाका हसत हसत म्हणाले.

"कोणती?"

"तू आज्जी होणारेस!"

पदीला इतका आनंद झाला की ती खो-खो हसू लागली अन् हसता हसता तिच्या डोळ्यांत अश्रू तरळू लागले.

माथुकाकांनी कर्लीच्या कालवणाचा डबा उघडून त्याचा वास घेतला आणि ते म्हणाले,

"आहाऽऽऽ! पदे, किती दिवसांनी तुझ्या हातची कर्ली खायला मिळतेय ग!"

पदी आपले आनंदाश्रू टिपत म्हणाली, "खरं सांगू काका, मला रोज जेवताना तुमचीदेखील आठवण यायची. पण काय करणार? रासूचा राग ओसरेपर्यंत मला थांबणंच भाग होतं."

"तो एक ना एक दिवस ओसरणार हे मला पुरतं ठाऊक होतं. एवढा मोठा दर्या, तोसुद्धा भरतीच्या वेळेला कसा गरजतो! पण त्यालादेखील ओहोटी येतेच! माणसाच्या क्रोधाचंदेखील तसंच आहे, पदे. त्यात रासू हाडाचा सज्जन आहे. माझ्याविरुद्ध निंबर्डीच्या गावकऱ्यांनी बहिष्कार पुकारला. चोरून मला सर्वजण येऊन भेटायचे हे रासूला समजत होतं. पण त्यानं नंतर काही अकांडतांडव केला नाही. तरीपण आज माझ्यासाठी कालवण घेऊन

जायला त्यानं परवानगी दिली हे विशेष आहे.''

''काका, ते सगळं खरं; पण सुबी आणि सीतू कुठं आहेत?''

माथुकाकांनी क्षणभर विचार केला आणि ते म्हणाले, ''सुबीला सून म्हणून घरी घ्यायला तयार आहेस तू?''

''तुमची शप्पथ! एका पायावर तयार आहे मी!''

''माझी शप्पथ नको घेऊ, रासूची शप्पथ घे. होऽऽऽ, माझी खोटी शप्पथ घेतलीस अन् मी मेलो तर तुला थोडंच सुतक येणारेय?''

''असं नका बोलू काका, रासूच्या मनात काही नाही- आणि माझ्यादेखील.''

''हांऽऽऽ, बघ, नाहीतर माझ्याकडून त्यांचा ठावठिकाणा काढून घेशील आणि...''

''नाही. नाही. काका, मी आज्जी होणार म्हटल्यावर.'' पुन्हा पदीचे डोळे भरले.

तेव्हा माथुकाका म्हणाले, ''फोंड्याला तुझी मावसबहीण का कोण आहे ना?''

''हो- ती आवशी!''

''आवशी का मावशी मला ठाऊक नाही, पण तिच्याकडेच आहेत ते दोघं.''

तेवढं माथुकाकांनी सांगायचा अवकाश, पदी चटकन उठली आणि घराकडं आली. एव्हाना रासूनं दोन्ही बिअरच्या बाटल्या संपवल्या होत्या. बशीत बांगड्याचा सांगाडा उरलेला होता. किंचित जड झालेल्या डोळ्यांनी त्यानं पदीकडं पाहिलं आणि विचारलं.

''काय म्हणतो म्हातारबा?''

''अहो, ती दोघं आवशीकडं आहेत. सुबीला दिवस गेलेत. त्या दोघांना लवकरात लवकर इकडं आणायला पाहिजे.''

''उद्याऽऽऽ!''

''उद्या कसं आणता?''

''मालकाची टूरिंग घेऊन जातो. मी मागितली तर नाही म्हणतो का?''

''काय तरी करा. पण पोरांना लवकरात लवकर घेऊन या.''

''तू चल की सोबत.''

''मी येऊ?''

''हांऽऽऽ, तेच बरं. आई बघितली की पोराला विश्वास वाटतो.''

दुसऱ्या दिवशी सकाळी रासूनं मनमोहनशेठना सारा प्रकार सांगितला. त्यांनी रासूला आपला ड्रायव्हर आणि मोटार न्यायची परवानगी दिली. शेठची मोटार तिठ्ठयावर थांबत होती. तेथूनच रासू ती घेऊन गेला. संध्याकाळी निंबर्डीच्या दोरपुलापर्यंत मोटार ओली. अद्याप पुलाचं बांधकाम चालूच होतं. दोरपुलावरून सुबी जेव्हा चालली तेव्हा तिचे डोळे भरले. याच पुलावरून भिकू भंडारी खाली कातळावर पडला होता. तिच्या मागोमाग येणाऱ्या पदीनं ते ओळखलं आणि तिच्या पाठीवरून हात फिरवून तिला धीर दिला.

निंबर्डीत पोहोचल्यावर सीतू धावतच चर्चकडे गेला. माथुकाकांनी त्याला गळ्याला लावून घेतलं आणि म्हणाले, ''प्रभू अत्यंत दयाळू आहे. तुझी नि माझी ताटातूट त्याला पाहवली नाही म्हणूनच त्यानं रासूचं मतपरिवर्तन घडवलं!''

''पण काका, आम्ही इथंच राहणार!''

''म्हणजे?''

''मी घरी नाही राहणार.''

माथुकाका हसले आणि म्हणाले, ''सीतू, हट्ट धरायला आता तू लहान नाहीस. बाप होणारेस लवकरच. रासूला काय वाटेल तू पुन्हा इथं राहिलास तर?''

त्या दोघांचं संभाषण चालू असतानाच रासू, पदी आणि सुबी तिथं आले.

सुबीची काया पिवळीजर्द झाली होती. तिच्या चेहऱ्यावरचे सारे बालिश भाव ओसरले होते. सागरसंपत्ती लुटून किनाऱ्याकडं येणाऱ्या होडीसारखी ती हळूहळू चालत आली होती. रासू काही न बोलता आऊट-हाऊसच्या बाहेरच्या कट्ट्यावर सिगारेटचा धूर सोडत बसला होता. आता रासूची खात्री होऊन चुकली होती, की माथुकाका जोपर्यंत जिवंत आहेत तोपर्यंत ते त्याच्यावर आणि निंबर्डीतल्या अनेक लोकांवर प्रभुत्व गाजवणार होते.

माथुकाका बाहेर आले तसा रासू आपली सिगारेट फेकून देऊन उभा राहिला. माथुकाकांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि ते म्हणाले, "रासू!" तो एकच शब्द रासूला खूप काही सांगून गेला. "रासू, मी तुला माझ्या मुलासारखा मानलेला होता. पदी माझ्यावर जन्मदात्या बापासारखं प्रेम करीत होती. तुझा मुलगा सीतू याचं अन् माझं कित्येक जन्माचं नातं असेल! सुबी तुझी सून; पण ती एक रत्न आहे रत्न! अशी सून हजारात नव्हे, लाखातदेखील शोधून सापडणार नाही. माणसा-माणसांतला फरक विसरून जा आता. सुबीचा जन्म सीतूसाठी झाला आहे- अन् तोही तिच्यासाठीच जन्मला आहे असं समज."

'रासू' हा माथुकाकांचा एकच शब्द. पण त्याला प्रत्यक्षात इतकं सर्व काही सांगून गेला. पुढं माथूकाका म्हणाले,

"आज मला खूप बरं वाटलं, पण या सुबीच्या आईला नाही सांगितलं.?"

"तिचा राग अजून थंड झालेला नाही. परवा येऊन पदीला शिव्या घालून गेली." रासू म्हणाला.

"असू दे, असू दे. सुबीला बाळ होणार आहे, एवढं तिच्या कानावर घालण्याची व्यवस्था कर. मग बघू किती दिवस उड्या मारते ती!"

पण त्यांना फार काळ वाट पाहावी लागली नाही. दुसऱ्या दिवशी दिवस उजाडायला ती चर्चच्या टेकडीकडं आली. सीतू आणि सुबी खडकावर बसून खाली उसळणारा समुद्रफेस पाहात होते.

सुबीनं आपली आई जवळ येताच सीतूला खुणावलं. तो उठून माथुकाकांच्या खोलीकडं गेला.

सुबीला जवळून पाहताच तिच्या आईला काय प्रकार आहे ते समजून चुकलं. तिच्या मनात होता नव्हता तेवढाही क्रोध वितळून गेला. ती सुबीला पोटाशी धरून हमसाहमशी रडू लागली. नंतर तिला समजवता समजवता माथुकाकांची पुरेवाट झाली.

सीतू आणि सुबीच्या पुनरागमनामुळे निंबर्डीत उठलेलं छोटंसं वादळ शमलं होतं.

०००

# दहा

मुंबईवरून आलेले इंजिनियर्स अत्यंत हुशार होते. त्यांनी 'कोल्ड स्टोअरेज' आणि 'कॅनिंग फॅक्टरी' या दोन कारखान्यांच्या इमारती महिन्याच्या अवधीत तयार केल्या. कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री तिठ्ठ्यावर येऊन पडली. पुलाचं बांधकामही आवरत आलं. मनमोहनशेठ यांचा मॅनेजर म्हणून निंबर्डीत आलेला नारायणन अतिशय सालस माणूस होता. निंबर्डीतल्या लोकांशी त्यानं आपल्या विनयशील वागण्यानं अल्पावधीतच जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले होते. रासू सारंगाचं नि त्याचं सूत फारच लवकर जमलं. नारायणनवर मोहनशेठचा नितांत विश्वास होता. मालकाचे सारे आर्थिक व्यवहार तोच सांभाळत होता.

फॅक्टरीच्या बांधकामासमोर तो आणि रासू एकाच छत्रीखाली उभे होते. दुपारचं ऊन रणरणत होतं.

"सारंग, आपल्या छोट्या मालकांना राहण्यासाठी इथं एक छोटासा बंगला बांधावा असं मला सुचवलं गेलं आहे."

"बरं होईल. त्यांना मोठ्या शहरात राहायला आवडतं."

"त्यांना इथं करमेल असा सुंदरसा बंगला बांधायला हरकत नाही."

"पण मी काय म्हणतो, आहे का ठाऊक?"

"काय?"

"या मालकांचा हा पुतण्या अतिशय चंचल आणि लहरी आहे. तो इथं सलग महिना-दोन महिने राहील असं वाटत नाही. उगाच त्या बंगल्यात पाच-पन्नास हजार खर्च करण्यापेक्षा चर्चच्या मागे आऊट -हाऊस आहे ते माथुकाकांनी भाड्यानं दिलं तर बरं होईल."

"ते नाही जमणार मॅनेजरसाहेब. तो म्हातारा जरी स्वभावानं चांगला असला तरी तसा थोडा तऱ्हेवाईकच आहे. मागे इथल्या किनाऱ्यावर कोणत्या प्रकारची मासळी मिळते याची पाहणी करण्यासाठी तुमचे तज्ज्ञ लोक आले होते. त्यांच्यासाठी एक पंधरा दिवस राहण्यासाठी आऊट-हाऊस द्या म्हणून मी मालकांच्या सांगण्यावरून विनंती केली नव्हती? त्यानं चक्क नाही म्हणून सांगितलं."

"तुमच्या मुलाचं आणि त्याचं एवढं कसं काय सख्य आहे?" नारायणनं विचारलं.

"लहान असताना मी त्याला टेकडीवर घेऊन जायचो. म्हातारा एकटाच. लहान मुलांचं आणि त्याचं जमायचं. माझा सीतू आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस म्हाताऱ्याजवळच राहायचा. म्हाताऱ्याला रोज कालवणापुरते मासे पकडून द्यायचा. त्याला दुखलं-खुपलं तर सीतूच त्याची देखभाल करायचा. आता कल्पना करा, आम्ही काही खिश्चन नव्हे; पण म्हाताऱ्याचा सीतू जीव की प्राण आहे. मध्यंतरी सीतूच्या लग्नप्रकरणापासून मी थोडासा म्हाताऱ्यावर रागावलो होतो. पण खरं सांगू-मनापासून त्यांचा रागच येत नाही."

मॅनेजर हसला आणि म्हणाला, "किती वर्षं यांचं वास्तव्य आहे इथं?"

"तीसएक वर्षं होऊन गेली असतील. तो आल्यानंतर दुष्काळ पडला होता. निंबर्डी नदी साफ आटली होती. निंबर्डीतले सारे 'बाव' देखील कोरडे ठणठणीत झाले होते."

"हांऽऽ, आलं लक्षात. या माथुकाकांनी सर्वांसमवेत प्रार्थना केली आणि त्या रात्री वीज कोसळून तो झरा निर्माण झाला."

"बरोबर! आणि तेव्हापासून निंबर्डीतल्या लहानापासून थोरापर्यंत सर्वांत त्या म्हाताऱ्याविषयी आदर निर्माण झालेला आहे. मी सीतूच्या लग्न प्रकरणानंतर त्याच्यावर गावकऱ्यांनी बहिष्कार घालावा असं आवाहन केलं होतं; पण ते चार-दोन दिवसच टिकलं. अंतोन गोन्साविल्स अगोदर गेला आणि त्यानंतर आमचेही लोक जाऊ-येऊ लागले."

"म्हणजे निंबर्डीच्या जीवनाशी माथुकाका एकरूप झालेले आहेत असं म्हणा की!"

"अगदी बरोबर बोललात. इथं कुणाच्याही घरात चांगला पदार्थ केला तर घराचा मालक किंवा मालकीण त्यातला थोडा टेकडीकडं घेऊन जाणारच. तसं म्हणाल तर म्हाताऱ्याचा साऱ्या गावावरच लोभ आहे."

"पण हे खिश्चन धर्मोपदेशक इतर जातीजमातीच्या लोकांत इतक्या उघडपणे मिसळतात म्हटल्यावर त्यांच्या खिश्चन जमातीला काही वाटत नाही?"

"तसं वाटत नाही हीच तर खरी गंमत आहे! जातीच्या कारणावरून आमच्या निंबर्डीत एकदाही मारामारी झालेली नाही. आता तर काय-भंडारी आणि गाबित यांच्यात लग्नाला प्रोत्साहन देऊन त्यानं या दोन्ही जातींची एक जात करायचं ठरवलेलं आहे."

"तुमच्या मुलाच्या लग्नानंतर आणखी तशी लग्नं झाली?"

"अजून काही झाली नाहीत; पण आता सुरुवात तरी एकदाची झाली. पुढे काही वर्षांनी भंडारी आणि गाबित कोण हे ओळखूदेखील येणार नाही!"

"कमाल आहे! वास्तविक पाहता आपल्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करणं हेच माथुकाकांचं काम असताना त्यांनी या उलाढाली कराव्यात याचं आश्चर्य वाटतं."

"तो माणूसच तसा आहे."

"मला वाटतं, मी एकवेळ त्यांच्याकडे जागेसाठी प्रयत्न करून पाहावा."

"कितीही विनवणी केली तरी तो बधायचा नाही."

"चर्च कौन्सिलकडून दबाव आणला तर?"

"हांऽऽ, मग मात्र सांगता येत नाही. पण हा चर्च कौन्सिलच्या देखील चुका काढतो. अहो, इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांच्या परराष्ट्रीय धोरणावर जहरी टीका करतो. तो म्हणतो, ही पाश्चिमात्य राष्ट्रं कितीही प्रगत झाली तरी रानटीच आहेत! त्याची युद्धपिपासा, त्यांची जगाच्या राजकारणात ढवळाढवळ करण्याची खोड यांवर कडाडून टीका करतो."

नारायणन हसला आणि म्हणाला,

'निंबर्डीच्या या टेकडीवर उभं राहून केलेली टीका ती! ती कोणापर्यंत ऐकू जाणार आहे थोडीच? पण जर ती ऐकू गेली तर मात्र."

"तर काय होईल?"

"तर म्हाताऱ्याची इथून उचलबांगडी होईल किंवा त्याला धर्मोपदेशकपदावरून काढूनही टाकलं जाईल."

"पण मला वाटतं, तसं कोणी करणार नाहीत. सांगितलं ना! थोडा तऱ्हेवाईक असला तरी चांगला आहे तो."

"चांगला नि वाईट! जो आपल्या वेळेला उपयोगी पडत नाही तो लाख चांगला असून काय कामाचा? शिवाय इथं या फॅक्टऱ्या निर्माण व्हायलाही त्याचा विरोध होता असं मी ऐकलेलं आहे."

"खरं आहे ते. पण आता मात्र त्यांचा काही विरोध नाही हं."

"विरोधाला जुमानतो कोण म्हणा. पण सारंग, तुम्हाला एक गंमत बघायचीय का?"

"कसली?"

रासू सारंगाच्या त्या प्रश्नाचं नारायणननं उत्तर दिलं नाही. तो फक्त हसला आणि म्हणाला, "जाऊ द्या. म्हातारा माणूस आहे. गावाचाही त्याच्यावर लोभ दिसतो. आपण कशाला जा त्याच्या वाटेला?"

इतक्यात सीतू धावत धावत तिथं आला आणि रासूला म्हणाला,

"बाबा, सुबी झऱ्यावरून येताना पाय घसरून पडली. डोक्याला लागलंय."

"कुठंय?"

"काकांच्या आऊट-हाऊसवर."

"चल."

रासू सारंग झपझप पावलं उचलीत टेकडीवर येऊन पोहोचला. व्हरांड्यात सुबीला आडवी झोपवली होती. पदी तिला पंख्यानं वारा घालीत होती. माथुकाका अशा समयी फक्त प्रार्थना करायचे. त्यावेळीही ते तेच करीत होते. सुबीची आई मात्र एकसारखी रडत होती.

रासू सारंग तिथं पोहोचला तेव्हा माथुकाका त्याला म्हणाले,

"डोक्याला लागलं आहे. अंगालाही खूप मुका मार लागलेला दिसतो. तिठ्ठ्यावरच्या डॉक्टराला बोलावून आणायला हवं."

रासू जेव्हा डॉक्टराला घेऊन आला तेव्हा सुबीनं डोळे उघडले होते. माथुकाकांनी तिला कॉफी करून दिली होती. पदी आणि सुबीची आई दोघी बोलत बसल्या होत्या.

डॉक्टरनं सुबीला तपासलं आणि सांगितलं,

"चिंता करण्याचं काही कारण नाही. पण कपाळाला ही जी जखम झालेली आहे तिच्यासाठी टिटॅनसचं एक इंजेक्शन मात्र द्यावं लागेल."

पदी म्हणाली, "मी हळद भरते त्या जखमेत पण हिला टोचू नका."

पदीचं कोणी ऐकलं नाही. डॉक्टरनं धनुर्वात होऊ नये म्हणून सुबीला इंजेक्शन दिलं. त्या इंजेक्शनमुळं तिला तात्काळ 'रिॲक्शन' झाली. सारं शरीर थाड थाड उडू लागलं. डोळे निस्तेज दिसू लागले. ओठ काळे पडले. प्राण जातात की काय असं वाटू लागलं. इंजेक्शन देणारा डॉक्टरही घाबरून गेला. माथुकाकांना टिटॅनस इंजेक्शनने अशी रिॲक्शन कधी कधी येते हे ठाऊक होतं. त्यांनी सुबीला कढत कढत अशी बिनदुधाची कॉफी करून पाजवली. अर्ध्या तासानंतर सुबीला आराम वाटू लागला. डॉक्टरचा जीव भांड्यात पडला. सुबीचं काही कमीजास्त झालं असतं तर रासू सारंगानं आपणाला परत जाऊ दिलं नसतं, याची डॉक्टरांना खात्री होती.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सुबीचा गर्भपात झाला. सर्वांना दु:ख झालं. कोणी इंजेक्शन देणाऱ्या त्या डॉक्टरला दूषणं लावली, तर कोणी जातिधर्माची बंधनं झुगारल्याबद्दल देवानं सुबीला अशी सजा दिली, असाही तर्क करायला कमी केले नाही. माथुकाका म्हणाले,

"त्या बालकाने या जगात जन्माला यावे ही प्रभूची इच्छा नव्हती. कोणाला दोष देण्यात अर्थ नाही."

सुबीनं मुलाला लहानाचं मोठं कसं करायचं याची खूपच स्वप्नं रंगवली होती; ती सर्व क्षणार्धात ढासळून पडली. मुलगा होणार की मुलगी होणार यावर तिची आणि सीतूची पैज लागत असे. सीतू म्हणे, 'मला मुलगी हवी आणि मुलगीच होणार;' तर सुबी मुलगाच जन्मणार असा विश्वास बाळगून होती. चार महिने झाल्यानंतर सुबीला आपल्या पोटातला गोळा आतल्या आत हलत असल्याचा भास व्हायचा आणि आपण एका बाळाची आई होणार या सुखद

संवेदनेनं ती हुरळून जायची. पण ते आता संपलं.

सीतूही त्या प्रसंगापासून काहीसा अबोल आणि खिन्न दिसू लागला. सुबीला मूल होणार या कल्पनेनंच रासू सारंगाचा राग निमाला होता. पदीही सुबीला सून म्हणून स्वीकारायला तयार झाली होती. सुबीच्या आईची कुरबूरही नाहीशी झाली होती. पण आता तेच सुबीचं मातृत्व हिरावलं गेलं आहे, या जाणिवेनं ते सर्वजण दु:खी अन् कष्टी झाले.

माथुकाका सर्वांना समजावण्याचा प्रयत्न करीत होते; पण त्यांनाही त्या दुर्दैवी घटनेनं अतोनात दु:ख वाटत होतं. 'जी गोष्ट माणसाच्या स्वाधीन नाही त्याबद्दल खेद करून काय उपयोग?' असं म्हणून ते ती घटना सर्वांनी विसरावी असं सुचवत होते.

एक महिना उलटला. दुसरी एक विषण्णता निर्माण करणारी घटना घडली. चर्च कौन्सिलकडून माथुकाकांना एक हातभर लांब असं पत्र आलं होतं. त्या पत्रात त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. काही आरोप असे होते.-

'तुम्ही धर्मोपदेशक आहात हे विसरून निंबर्डी गावच्या 'प्रायव्हेट मॅटर्स' मध्ये निष्कारण ढवळाढवळ करीत असता. आपल्या धर्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा याकडं तुमचं संपूर्ण दुर्लक्ष झालेलं आहे. तुम्ही ज्या लोकांना चर्चच्या आऊट-हाऊसमध्ये राहायची मुभा दिली आहे ती मंडळी खिश्चन नाहीत. आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे हे तुमचं कार्य नव्हे. पण तुम्ही उघड उघड अशा प्रकारच्या विवाहांना प्रोत्साहन देत आहात. शिवाय चर्चच्या मागे असलेल्या चार क्वार्टर्स गरजू लोकांना तात्पुरत्या भाड्यानं न देता त्या मोकळ्या ठेवून तुम्ही कौन्सिलचं आर्थिक नुकसान करीत आहात.'

माथुकाकांच्यावर असे आरोप करण्यात कोणाचा हात असावा, बाकीच्या आरोपांवरून कदाचित समजलं नसतंही; पण शेवटचा आऊट-हाऊसच्या क्वार्टर्सचा उल्लेख वाचल्यानंतर मात्र माथुकाकांच्या डोळ्यांपुढं उभा राहिला तो नारायणन मॅनेजर!

याच नारायणनने त्या क्वार्टर्स दीर्घ मुदतीनं भाड्यानं मागितल्या होत्या. ती सूचना माथुकाकांनी नाकारली होती. प्रत्येक क्वार्टरला पन्नास रुपये याप्रमाणे चार क्वार्टर्सचे दोनशे रुपये भाडे दरमहा चर्च कौन्सिलला मिळणार होते. निवासस्थानात माणसं राहिल्याने ती व्यवस्थित राहतात. उलट बंद ठेवल्यानं त्यांची नुकसानी होते, याकडेही माथुकाकांचं लक्ष त्या पत्रात वेधण्यात आलं होतं.

ते प्रदीर्घ पत्र हातात धरून ते उभे असताना सीतू आला.

"कोणाचं पत्र काका?"

"घे- वाच." सीतूच्या हातात माथुकाकांनी ते पत्र दिले आणि ते परत टेकडीच्या मागे खडकावर जाऊन बसले. मन विषण्ण झालं की माथुकाका त्याच ठिकाणी जाऊन बसत.

सीतूनं ते पत्र वाचलं; पण त्याला हे कारस्थान कोणी रचावं याचा काही बोध होईना. तो पत्र घेऊन माथुकाका बसले होते, त्याठिकाणी गेला आणि म्हणाला,

"हे असं काय झालं?"

"हंऽऽऽ!" माथुकाकांनी एक हुंकार भरला आणि आभाळाकडं पाहात म्हणाले, "ही इथं आलेल्या फॅक्टरीवाल्यांच्या कारस्थानाची पहिली झलक!"

"कोणी हे कारस्थान रचलं त्याचं नाव मला सांगा काका- त्याचं डोकंच फोडतो!"

"हांऽऽऽ! सीतू, तू मला दिलेलं वचन विसरलास? कोणाच्या जिवावर उठायचं नाही याची माझ्याजवळ शप्पथ घेतल्याचं विसरलास?"

सीतू ओशाळला. त्याला त्या शपथेची आठवण झाली. तरीही तो म्हणाला,

"मला त्याचं नाव सांगा. मी त्याला हे पत्र दाखवून जाब विचारतो."

"मला ठाऊक नसताना मी कोणाचं नाव कसं घेऊ सांग. जाऊ दे, सोड तो विषय. हे एवढ्यावरच थांबलं तर नशीब."

सीतूनं संध्याकाळी ते पत्र आल्याचं रासूला सांगितलं. रासू मात्र विचारात पडला. त्यालाही हे कारस्थान नारायणनचं आहे हे तत्काळ कळून आलं. पण सीतूला तसं न बोलता तो म्हणाला, "माथुकाकांवर अलीकडं कौन्सिलची मंडळी नाखूष आहेत खरी."

"काकांना जर यांनी त्रास द्यायचंच ठरवलं तर आपण काय करायचं?"

"काय करू शकतो आपण?"

त्यावर पदी म्हणाली,

"माझे वडील जर आज जिवंत असते तर कुठं राह्यले असते?"

आईच्या या वक्तव्याने सीतू सुखावला. तो तेथून सुबीकडं गेला. सुबी अजून घराबाहेर पडत नव्हती. ती आपल्या आईकडेच राहात होती. सीतू गेला तेव्हा सुबी आपल्या आईची फाटलेली साडी शिवत बसली होती.

"कुठंय मामी?"

"बस इथं सांगते."

सीतू तिच्याजवळ बसला.

"काल तिठ्ठ्यावरून शेटयाचा माणूस आला होता."

"का?"

"बाप्पानं चारशे रुपये घेतलेत त्याचे व्याजासकट पाचशेसाठ झालेत. ते ताबडतोब भागव, नाही तर भांडी बाहेर काढतो, म्हणून सांगून गेला आहे!"

"मग ती तिकडं जाऊन काय करणार आहे?"

"त्या शेट्याचे पाय धरून येते म्हणाली. शेटे सावकार कसा आहे ठाऊक आहे ना तुला?"

"हरामखोर आहे! भिकूनानाला चाळीस रुपये दिले असतील आणि त्याचे चारशे केले असतील! सुबी, खूप लोकांना त्यानं आजपर्यंत असं फसवलेलं आहे. अंतोन गोन्साविल्सवरदेखील त्यानं असाच दावा केला आहे. मला वाटतं, एकदा जावं आणि..."

"सीतू, तुला काकांनी काय सांगितलं विसरलास?"

"नाही, नाही- मला शेट्याच्या जीविताला अपाय करायचा नाही."

"मग?"

"एक निराळीच गंमत करतो त्याची!"

"अगोदरच आपले दिवस बरे नाहीत. काहीतरी करायला जाशील आणि अडकून, आईऽऽ!" सुबीला बोलता बोलता हाताला सुई टोचली. तिनं ते बोट तोंडात घातलं.

सीतू तिथं असतानाच सुबीची आई तिठ्ठ्यावरून परत आली.

"काय म्हणतो?" सुबीनं विचारलं.

"पैसे भागवता येत नसतील तर पोरीला एक वर्ष घरात कामाला ठेव म्हणतो."

सीतू चटकन उठून बसला आणि दाताखाली ओठ धरून म्हणाला,

"मग तू काय सांगितलंस?"

"मी म्हणाले, विचारून बघते."

"आई, मी काही शेट्याच्या घरी जाणार नाही. तुला जायचं असलं तर तू जा."

"दोघींपैकी कोणीही जायचं नाही!" सीतू उठून उभा राहत शर्टाची बाही आखडत म्हणाला,

"कर्जाची फेड कशानं व्हायची? मी कुणाचं कर्ज बुडवून नरकात जायची नाही." सुबीची आई म्हणाली,

"तुला वाटतं मामी, भिकूनानाला त्यानं चारशे रुपये दिले असतील?"

"त्याला कोणी दहा-वीस रुपयांच्या वर देत नव्हतं. तुझ्या काकानं मात्र त्याला एका रकमेनं दोनशे तेवढे दिले होते."

"काकांची गोष्टच वेगळी मामी. पण तुला एक सांगतो- तू किंवा सुबी दोघींपैकी कोणीही शेट्याकडे कामासाठी जायचं नाही. लोक त्याच्याबद्दल चांगलं बोलत नाहीत."

"मला काय ते ठाऊक नाही सीतू? पण ते चारशे रुपयांचं कर्ज कसं फिटायचं सांग."

"फिटेल ते कर्ज." खिडकीतून बाहेर पडत सीतू म्हणाला.

सीतू इतकं बोलून तेथून जायला निघाला तेव्हा सुबी उठून दारापर्यंत आली. समोर स्वच्छ असं सारवलेलं अंगण होतं. घराच्या भोवतालचे माड मंद वाऱ्यावर डोलत होते. जाळीदार पानांमधून स्वच्छ असं चंद्रबिंब दिसत होतं. आजूबाजूच्या घरातून उतू जाणाऱ्या भाताचा आणि शिजणाऱ्या बांगड्याकोळंबीचा वास सुटला होता.

घरासमोरच्या कुंपणापर्यंत सीतूसोबत सुबी आली आणि म्हणाली,

"तू उगाच काहीतरी माथेफिरूपणा करू नकोस. आपण काकांच्याकडून पाचशे रुपये उसने घेऊन शेट्याचं ते कर्ज फेडू."

"माथुकाकांनाच यापुढं आपल्याला पोसावं लागेल! कौन्सिलनं भलं मोठं आरोपपत्र पाठवलंय काकांना."

"काय सांगतोस?"

"शप्पथ! काकांना टेकडीवर राहायला तरी मिळतं की नाही कुणास ठाऊक."

"असं कसं रे?"

"तसंच असतं ते. दिवस फिरले की आपले स्वत:चेच फिरतात असं नव्हे, तर आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांवरदेखील आपत्ती येत असते. मग दैव हसत हसत म्हणतं, 'कोण कोणाचा आधार घेतं बघू.'

खिन्न झालेल्या सुबीला जवळ ओढून तिचं चुंबन घेऊन सीतू म्हणाला, "काहीएक चिंता करू नको. आता मी पूर्वीइतका हळवा राहिलेलो नाही."

सीतू सुबीचा निरोप घेऊन जायच्या बेतात असताना आतून सुबीची आई म्हणाली, "तिसऱ्या आणि भात खाऊन जातो का विचार तो."

"नको नको, मला काही नको!" असं म्हणत सीतू शिऱ्यानं बंद केलेलं कुंपणाचं दार उघडण्याची वाट न पाहता उंच उडी मारून कुंपणाच्या पलीकडे निघून गेलादेखील!

०००

# अकरा

बघता बघता दोन्ही फॅक्टऱ्यांच्या इमारती उभ्या राहिल्या. कोल्ड स्टोअरेजसाठी लागणारी मशिनरीही येऊन पडली. निंबर्डीच्या खाडीवरचा पूल पूर्ण झाला होता. आता तिठ्ठ्यावरून येणारे ट्रक्स, जीप्स अगदी थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत येऊ शकत होते. तिठ्ठ्यावरची दोन-तीन हॉटेल्स खुद्द निंबर्डीत आली. बाशामामूनं आपल्या मलबारी खाणावळीची एक शाखाही निंबर्डीत खोलली. जातिवंत धंदेवाइकाची दूरदृष्टी असल्यामुळे बाशामामूला पुढचं चित्र स्पष्ट दिसत होतं. यापुढं निंबर्डीत तयार होणारा माल, 'टीन्ड फिश' आणि इतर मासळी नेण्यासाठी बाहेरगावची वाहनं येणार होती. आजपर्यंत खाडीमुळं इतर भागांपासून अलग झालेली निंबर्डी पुलामुळं इतर भागांशी कायमची जोडली जाणार होती. व्यापारी, ड्रायव्हर्स, मेकॅनिक्स अशा सर्व स्तरांतले लोक यापुढं वारंवार निंबर्डीला येणार होते. बाशामामूनं समुद्रकिनारी नारळीपोफळीच्या बनात आपलं 'न्यू मलबार कॅफे अँड लंच होम' सुरू केलं. हॉटेल झालं म्हटल्यावर चार-दोन पानपट्टीची दुकानं आली. तिठ्ठ्यावरच्या मोटार-मेकॅनिकनं एक लहानसं गॅरेजही खोललं. किराणाभुसार मालाची दोन दुकानं झाली. पूर्वी चहाची पूड किंवा काड्याची पेटी आणण्यासाठी दोन-अडीच मैल पायपीट करावी लागत होती. तीही थांबली. निंबर्डीतल्या लोकांना झपाट्यानं बदलणारी ही स्थिती पाहून वाटलं की, सुख आणि समृद्धी दाही दिशांतून निंबर्डीला येत आहे.

पहाटे ट्रॉलर्स समुद्रावर जायचे ते दुपारी तीन-चारच्या सुमारास परत यायचे. जाताना जलदगतीनं पाणी कापत जाणारे ट्रॉलर्स येताना मात्र संथ गतीनं येत. कारण त्यात काठोकाठ चमचमणारे सरंगे, सुरमई, मांद्याळी, कर्ली, पापलेट, रिबन फिश असे असंख्य प्रकारचे मासे भरलेले असत. काही ट्रॉलर्स खास 'प्रॉन्स' पकडण्याच्या मोहिमेवर जायचे. व्हाईट प्रॉन्सला जगाच्या बाजारपेठांतून मागणी होती. कोल्ड स्टोअरेजमध्ये निंबर्डीच्या चिमुरड्या पोरी सुंगठं सोलून रोज पाच-पाच रुपये कमावू लागल्या. मोठ्या बायका त्याहूनही अधिक कमावत होत्या. पुरुष मंडळींना ट्रॉलर्सवर काम मिळाले होते. यापूर्वी आठवड्याला पंधरा रुपये निंबर्डीच्या गाबित किंवा भंडाऱ्यांच्या बापजाद्यांनी कधी मिळवले नव्हते, ते निंबर्डीतला प्रत्येक धट्टाकट्टा रोज मिळवू लागला.

कॅनिंग फॅक्टरीतदेखील अशीच निंबर्डीतल्या लोकांना कामं मिळत होती. या फॅक्टरीत कर्ली आणि मॅक्रेल (बांगडा) हवाबंद डब्यात भरला जायचा. या कारखान्यात सुरुवातीला काम शिकवण्यासाठी 'लाँगसन कॅनिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचे कुशल कामगार आणि तंत्रज्ञ यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांच्याबरोबर स्कॉटलंडवरून 'फूड प्रिझर्व्हेशन' या विषयात नैपुण्य मिळवलेले दोन संशोधकही आले होते. ते लाँचवरच मुक्कामाला राहिले. माथुकाकांनी त्यांचे स्वागत केले. बराच वेळ गप्पा रंगल्या. त्या संशोधकांना मनमोहनशेठनी माथुकाकांच्याविषयी काही सांगितलं होतं की काय न जाणे, पण ते लोक बोलता बोलता बोलून गेले, 'या देशाच्या कोट्यवधी लोकांना जगवायचं असेल तर औद्योगिकीकरणाला आणि उत्पादनवाढीला प्रत्येकाने आपला पाठिंबा द्यायला हवा.''

त्यावेळी माथुकाकांनी तो विषय फारसा वाढवला नाही.

कॅनिंग फॅक्टरीत तयार होणारा माल अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने हवाबंद केला जात आहे असं पाहिल्यानंतर ते स्कॉटिश तंत्रज्ञ समुद्रमार्गे मुंबईला रवाना झाले. तेथूनच ते विमानाने मायदेशी परतणार होते. पण त्यांची फ्लाइट काही कारणाने लांबणीवर पडली आणि त्यांना पुढे आठ दिवस मुंबईत राहावं लागलं. या त्यांच्या वाढलेल्या मुंबईच्या मुक्कामात रविवारी ते चर्चला गेले. तिथं बोलता बोलता फादर मॅथ्यूस यांचा विषय निघाला. तेव्हा त्यातला एक स्कॉटिश तंत्रज्ञ म्हणाला, "वास्तविक पाहता निंबर्डी गावच्या चर्चजवळचे आऊट-हाऊस आणि क्वार्टर्स ही कोणत्याही लोकांना राहायला मिळायला हवीत. पण तो म्हातारा मॅथ्यूस मोठा चमत्कारिक आणि हेकेखोर दिसतो." त्याआधी माथुकाकांच्याविरुद्ध चर्च कौन्सिलनं काही आरोप केलेलेच होते- त्यात या स्कॉटिश तंत्रज्ञाच्या सूचनेने भर पडली.

पुढे पंधरा दिवसांनी आणखीन एक लखोटा माथुकाकांना मिळाला. त्यात आऊट-हाऊसलगतचे चार क्वार्टर्स मनमोहन कॅनिंग कंपनीस पाच वर्षांच्या करारानं भाड्यानं दिल्याचा उल्लेख होता व माथुकाकांनी त्या चार क्वार्टर्सचा कब्जा ताबडतोब मनमोहन कॅनिंग कंपनीच्या मॅनेजरकडे सुपूर्द करावा अशा आशयाचा आदेश होता.

माथुकाकांनी ओळखलं, मनमोहनशेठचे हात खूप लांब आहेत. आपणाला वेळोवेळी क्वार्टर्स मागूनही आपण त्या दिल्या नाहीत म्हणून शेठनी कौन्सिलपर्यंत धाव घेतली. पण या सर्व प्रकारामागे एक अत्यंत हुशार व कावेबाज मेंदू आहे याबद्दल माथुकाकांची खात्री होती.

मॅनेजर नारायणन वागायला, बोलायला अत्यंत मिठ्ठास होता. इंग्रजी भाषेवर त्याचं असामान्य असं प्रभुत्व होतं. समोरच्या माणसाला तो आपल्या विनयशील वर्तनानं भारून टाकत असे. पण तरीही माथुकाका त्याच्याकडं संशयानंच पाहत होते.

हाच नारायणन चर्च कौन्सिलच्या त्या ऑर्डरची एक प्रत घेऊन माथुकाकांच्याकडं आला आणि म्हणाला,

"आय ॲम व्हेरी सॉरी फादर! आपल्याला कदाचित वाटेल, की या क्वार्टर्ससाठी मीच काही हालचाली केल्या आणि कौन्सिलकडून ही जागा मिळवली. पण मला यातलं काहीएक ठाऊक नाही. मी आमच्या शेठना सांगत होतो, इथं या कडेपासून त्या कडेपर्यंत समुद्रकाठ मोकळा पडलेला आहे. लाखो रुपये या फॅक्टरीसाठी आणि ट्रॉलर्ससाठी तुम्ही खर्च करता, मग पाच-पंचवीस हजारांचं आऊट-हाऊस का नाही बांधत स्वत:साठी? पण खरं सांगू फादर, हे व्यापारी लोक फार धोरणी असतात. त्यांना इथं राहायला जागा तर हवी, पण त्याचबरोबर इन्व्हेस्टमेंट करायची इच्छा नाही! आम्ही काय, हुकमाचे ताबेदार! खरं म्हणजे चर्चसारख्या पवित्र वास्तूच्या सान्निध्यात बिझिनेस मेंटॅलिटीच्या लोकांना आसरा द्यायला नको होता."

"मिस्टर नारायणन, आता वरूनच ही ऑर्डर आलेली आहे, तेव्हा मला अधिक काही बोलण्याची इच्छा नाही. या किल्ल्या." असं म्हणून माथुकाकांनी त्या चारही क्वार्टर्सच्या किल्ल्या नारायणनच्या स्वाधीन केल्या.

त्यानं त्या किल्ल्या हातात घेतल्या आणि तो गंभीर चेहरा करून म्हणाला,

"तसं पाहिलं तर इमारतीत माणसं राहिल्यानंच त्या व्यवस्थित राहतात. शेठ ही जागा अगदी आपली स्वत:ची असल्यासारखी सांभाळतील यात वाद नाही."

"हूंऽऽ!"

माथुकाकांना नारायणनशी अधिक बोलायची इच्छा नव्हती. चर्च कौन्सिलनं त्यांना न विचारताच परभारे ती जागा शेठ मनमोहन यांना पाच वर्षांच्या कराराने दिल्याने माथुकाका काहीसे अस्वस्थ झाले होते. ते आपल्या खोलीत आले. खोलीत टेबलावर जीझसचा छोटा

पुतळा होता, त्यावर त्यांची नजर स्थिरावली. अत्यंत उद्विग्न अशा प्रसंगी माथुकाका जीझसचं स्मरण तरी करीत किंवा त्याच्या प्रतिमेकडं एकाग्रचित्तानं पाहात तरी राहात. स्मरणात आणि दर्शनात मानवी मनाचे क्लेश नाहीसं करण्याचं सामर्थ्य आहे, अशी त्यांची नितांत श्रद्धा होती.

आरामखुर्चीवर पडून ते जीझसच्या प्रतिमेकडं पाहात असताना जाळीच्या दाराबाहेर उभं राहून अंतोन गोन्साल्विस म्हणाला,

"मे आय कम इन, फादर?"

"ये- ये. यावेळी कसा काय आलास तू? तुला आज फॅक्टरीत काम नाही?"

"आहे ना. कॅनिंग फॅक्टरीत सीमिंग मशीनवर सध्या काम करतो मी. पण एक घोटाळा आहे फादर- म्हणून इकडं आलो."

"कसला घोटाळा?"

"तुमचा सीतू आणि माझा बिल या दोघांच्या शोधात पोलीस आलेत."

"पोलीऽऽस?" माथुकाका आरामखुर्चीवरून चटकन उठून बसले आणि त्यांनी विचारलं, "कशासाठी? काय केलं त्यांनी?"

"तुम्हाला काहीच कळलेलं नाही?"

"नाही."

"गेल्या दोन वर्षांपूर्वी तिठ्यावरच्या शेटे सावकाराकडून मी साठ रुपये हातउसने घेतले होते. शेटे सावकारानं माझ्यावर ऐकशेनव्वद रुपयांचा दावा केला होता. त्याने जिंकला. तो आता रकमेच्या वसुलीसाठी माझ्यावर जप्ती घेऊन येणार म्हणतो."

"साठ रुपयांचे एकशेनव्वद कसे झाले?"

"साठ या आकड्यामागे शेट्यानं एकचा आकडा टाकून एकशेसाठ केले. दोन वर्षांचं व्याज म्हणून तीस रुपये- असे एकशेनव्वद रुपये वसूल करण्यासाठी माझ्यावर दावा केला होता."

"अंतोन, ते तुझ्या दाव्याचं सोड; पोलीस सीतू आणि बिलच्या मागे का आहेत ते सांगू." अधीर होऊन माथुकाकांनी विचारलं.

"काल रात्री शेट्याचं तिठ्यावरचं कापड-दुकान कोणीतरी चोरट्यांनी फोडलं."

"आणि?"

"शेट्या सावकारी करीत होता. त्याच्याकडं बऱ्याच लोकांकडून घेतलेल्या प्रॉमिसरी नोटा होत्या. त्या प्रॉमिसरी नोटा ज्या लाकडी पेटीत तो ठेवायचा ती पेटीच चोरट्यांनी मागच्या बाजूला नेऊन जाळून टाकली आहे."

"माय गॉड! पण सीतूचा आणि बिलचा काय संबंध?"

"सीतू आणि बिल हे एकमेकांचे दोस्त आहेत. सुबीच्या बापानं त्या शेट्याकडून चारशे रुपये घेतले होते म्हणे. ते पैसे द्या, नाहीतर कोर्टात दावा गुदरतो, अशी एक महिन्याखाली शेटे सुबीच्या आईला धमकी देऊन गेला होता. तेव्हा सीतूनं बिलच्या साहाय्याने शेट्याचं दुकान फोडून त्याच्याजवळच्या प्रॉमिसरी नोटा जाळून टाकल्या असाव्यात असा पोलिसांना संशय आहे."

"त्या दोघांचाच संशय का यावा?"

"गेल्या सात-आठ दिवसांमागे सीतू आणि बिल तिठ्यावर एकत्र फिरत असल्याचं बऱ्याचजणांनी बघितलेलं आहे म्हणे."

"छेऽऽऽ! सीतूच्या हातून असा प्रकार कधीच घडणार नाही." माथुकाका आत्मविश्वासानं बोलून गेले.

"तसं तुम्हाला वाटणं साहजिक आहे. पण परवापासून आमच्या बिलचा पत्ता नाही."

"कुठे गेला?"

"तेच तर ठाऊक नाही."

"अंतोन, पोरांनी हे दुष्कृत्य केलं नसावं असं मला वाटतं; पण बिल बेपत्ता आहे म्हटल्यावर थोडी शंका येतेय."

"सीतू कुठं आहे?"

"सकाळपासून तोही इकडे आला नाही. सुबीच्या घरी आहे का पाहायला हवं."

"ठीक आहे. पण तुम्ही एक गोष्ट करा." अंतोन माथुकाकांच्या कानाजवळ तोंड नेत म्हणाला, "खरं -खोटं काही असो, पोलिसांनी जरी बोलावणं केलं तरी कसलीही कबुली देऊ नका असं सांगा सीतूला."

"म्हणजे? त्यानं जर गुन्हा केला असेल तरीही त्याला खोटं बोलण्यास भाग पाडू?"

"फादर, तुम्ही आमचे गुरू, तुम्हाला काही शिकवणं मला शोभत नाही; पण फादर, अगदी जीझसची शपथ घेऊन सांगतो, शेटे सावकारानं खूप गोरगरीब आणि अज्ञानी लोकांची फसवणूक केलेली आहे. त्याच्याजवळच्या सगळ्या प्रॉमिसरी नोटा जळाल्या हे उत्तम झालं. यापुढं निंबर्डीच्या लोकांना कोणाचं कर्ज घेण्याची वेळ येणार नाही. या कारखान्यामुळं सर्वांचीच आर्थिक स्थिती सुधारणार आहे. शेटे सावकाराला कोणीतरी अशी अद्दल घडवणं भागच होतं. म्हणून म्हणतो, यात काही अधर्म घडला असेल असं मला वाटत नाही. मी फक्त साठ रुपये हातउसने घेतले असताना त्यानं त्याचे एकशेसाठ केले; आणि कोर्टानं त्याचंच म्हणणं मान्य करून त्याच्या बाजूनं निकाल दिला. माझ्या घरावर जप्ती आणणार आहे तो माणूस- की नराधम!"

"अंतोन! तो चुकला म्हणून आपणही चुकावं का?"

"ही चूक नाही फादर, माणसानं निर्माण केलेली न्यायव्यवस्था जेव्हा आंधळी होते तेव्हा कायदा हातात घेतला तर त्यात पाप नसतं!"

"नाही रे नाही! अंतोन, मला हे तुझे विचार पटणार नाहीत."

"अन्याय झाला तरीही माणसानं काहीही धडपड न करता मरून जावं?"

अंतोनच्या या प्रश्नाचं उत्तर मात्र माथुकाकांना चटकन देता येईना. ते हवेत हात उडवून म्हणाले, "तुझा प्रश्न सहज उत्तर देण्याइतका सोपा नाही खरा."

सीतू आणि बिल दोघांना पोलिसांनी तालुक्याला नेले. त्या दोघांच्यावरच शेटे सावकारांनी वहीम व्यक्त केला होता. त्यांना धरून नेल्याचं समजताच माथुकाका, अंतोन व सुबी तालुक्याला फौजदार-कचेरीकडे निघाले.

फौजदारांनी त्या दोघांना खोदून विचारलं; पण त्या दोघांनी साफ कानावर हात ठेवले. शेवटी फौजदारांनी त्या दोघांना दोन तासांचा अवधी दिला. "दोन तासांच्या आत खरं काय ते नाही सांगितलं तर उलटं टांगून फोडून काढण्यात येईल!" अशी धमकी देऊन दोघांना निरनिराळ्या खोल्यांत कोंडून ठेवण्यात आलं.

माथुकाका, अंतोन आणि सुबी पोलीस स्टेशनसमोरच्या फणसाच्या झाडाखाली बसले होते. फौजदारांनी त्यांची भेट घेण्याचंदेखील नाकारलं. पोलीसखात्याला धर्मोपदेशक आणि सामान्य माणूस यांच्यातला भेद समजत नव्हता. पोलिसांनी सीतू आणि बिल यांना दोन तासांचा अवधी दिल्याची वार्ता बाहेर समजली तेव्हा माथुकाकांसहित सर्वजण अस्वस्थ झाले. सुबीच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. अंतोनदेखील कपाळाला हात लावून बसला होता.

इतक्यात तिठ्ठ्याच्या बाजूने फॅक्टरीची जीप धुरळा उडवीत आली. जीपमध्ये नारायणन आणि रासू होते. नारायणननं जीपमधून उतरल्या उतरल्या झाडाखाली बसलेल्या लोकांकडे पाहिलं आणि तो जवळ आला.

"फादर, पोरांना परत घेऊन जायला आलो आहे!" आत्मविश्वासानं तो म्हणाला.

"सोडतील असं वाटत नाही." माथुकाका म्हणाले,

"असं! फादर, मला मनमोहनशेठनी पाठवलंय. मी पोरांना घेऊन जाणारच!"

"कोणी का पाठवेना. तो फौजदार मोठा हेकेखोर दिसतो."

"त्याचा हेका घालवण्याची किमया आहे माझ्याजवळ!" नारायणन हसत हसत म्हणाला आणि तो सरळ फौजदारांच्या ऑफिसकडं जाता झाला.

रासू माथुकाकांच्या जवळच थांबला होता, तो म्हणाला, "शेठना समजलं पोरांना धरून नेल्याचं, तेव्हा लगेच त्यांनी मॅनेजरना बोलावून घेतलं. शेठ फारच दयाळू आहेत."

माथुकाका काहीच बोलले नाहीत. सुबी मात्र मनातून मनमोहनशेठना दुवा देत होती. अर्ध्या तासात बोलल्याप्रमाणे नारायणन दोन्ही पोरांना बाहेर आला. हसत हसत त्याने माथुकाकांना म्हटलं,

"फादर, आता आमच्यासोबत जीपमधून चला."

नारायणन हा कारस्थानी माणूस आहे अशी धारणा असलेल्या माथुकाकांना आता मात्र नारायणनच्या स्वभावाचा अंदाज करता येईना. रासू मात्र मनमोहनशेठ आणि नारायणन यांच्या उपकाराखाली वाकून गेल्यासारखा दिसत होता. पोरांच्या सुटकेसाठी मनमोहनशेठनी कोणत्या मार्गाचा अवलंब केला, हे समजायला काही मार्ग नव्हता.

०००

# बारा

''मे आय कम इन, फादर?'' माथुकाकांच्या खोलीपुढे येऊन नारायणननं विचारलं.

''येस, प्लीज कम इन!'' न्यू टेस्टामेंट वाचत बसलेले माथुकाका उत्तरले. जाळीचं दार उघडून नारायणन आत आला. माथुकाकांनी त्याला खुर्चीकडं बोट दाखवून म्हटलं, ''प्लीज सिट डाऊन.''

खुर्चीवर बसल्यानंतर तो म्हणाला,

''आमच्याकडे चर्च कौन्सिलनं जो भाग भाड्यानं दिला आहे तो परवा मी सर्व फिरून बघितला. बऱ्याचशा सुधारणा कराव्या लागतील असं दिसलं. तेव्हा परत कौन्सिलशी संपर्क साधून इमारतीत काही किरकोळ बदल करण्याची परवानगी मागितली होती- ती त्यांनी आजच पाठवली.''

माथुकाकांना खिशातला लखोटा काढून दाखवत तो पुढं म्हणाला,

''आपल्यालाही या जागेत काही सुधारणा करून घ्यायची असेल तर सांगा; कामात काम होऊन जाईल.''

माथुकाकांनी डोळ्यांवरचा चष्मा कपाळावर सरकवला आणि किलकिले डोळे करून त्यांच्याकडं पाहत म्हटलं, ''तुम्ही हव्या त्या सुधारणा करवून घेण्यासाठी कौन्सिलची परवानगी घेतलीत हे बरं केलं. यापूर्वी मीदेखील खूप वेळा कौन्सिलला कळवलं होतं; पण त्यांना निंबर्डीच्या या कौन्सिलच्या मालकीच्या इमारतीत सुधारणा कराव्यात असं काही वाटलं नव्हतं. बरं झालं, निदान तुमच्यामुळं तरी या इमारतीला ऊर्जितावस्था प्राप्त होत आहे! काय वापर करणार या जागेचा?'' माथुकाकांनी कपाळावरचा चष्मा परत डोळ्यांवर आणून विचारलं.

''त्याचं काय आहे फादर, मोठे शेठ आहेत ना, त्यांच्यामागे खूप व्याप आहेत. दिल्ली, अमृतसर, लुधियाना इथं त्यांचा व्यापार आहे. रवींद्र हा त्यांच्या भावाचा मुलगा. दिल्ली युनिव्हर्सिटीतून तो एम. ए. झाला आहे. अर्थशास्त्र घेऊन तो अर्थशास्त्राचा एम.ए. झाला; पण अर्थप्राप्ती केल्याशिवाय त्याच्या पदवीला काहीच अर्थ नाही असं शेठ मनमोहनना वाटतं. फाळणीनंतर जी काही निर्वासित कुटुंबं भारतात येऊन स्थायिक झाली, त्यातलं हे अतिशय मशहूर असं कुटुंब आहे. या दोन फॅक्ट्या शेठनी रवीच्या नावावर केलेल्या आहेत. रवी इथं निंबर्डीत राहणार आहे. त्याचं निवासस्थान म्हणून आम्हाला ही आऊट-हाऊसची जागा हवी होती.''

''अच्छा! पण रवीला निंबर्डीसारख्या या आडवळणी गावी राहायला आवडेल का? दिल्लीत तो लहानाचा थोर झाला म्हणता ना?''

''बरोबर शंका काढलीत फादर. रवी तसा अजून लहानच आहे. चोविसाव्या वर्षी तो एम.ए. झाला, म्हणून व्यवहारात तो निपुण आहे असं मुळीच मानता येणार नाही. सुरुवातीला जेव्हा आम्ही इकडे आलो होतो तेव्हा तो म्हणालादेखील, 'इथं काही आपल्याला करमायचं नाही. हवं तर मुंबईला एखादा कन्सर्न द्या.''

''मग काय झालं?''

"मोठ्या शेठनी खूप प्रयत्न केलाही मुंबईच्या आसपास जागा मिळवण्याचा; पण आता सरकारचं धोरण काय आहे, तर मोठे उद्योगधंदे मुंबईचा परिसर सोडून बाहेर व्हावेत आणि त्यांचं बरोबरच आहे हो. काय अफाट वाढलीय मुंबई आज! छे ऽ छे! मुंबईची लोकसंख्या आणि तिथं बाहेरून येणाऱ्यांचा ओघ जर लवकर नाही थांबला तर 'पॉप्युलेशन एक्सप्लोजन' ज्याला म्हणतात, तसा प्रकार निश्चित घडणार आहे. अहो, त्या क्रॉफर्ड मार्केâट आणि फोर्ट भागात ट्रॅफिक इतक्या वेळा जाम होतं की काही विचारू नका. वाहनं अडकूनच राहतात. माणसाला रस्त्यावरून सुलभपणे संचार करता येऊ नये इतकी जर एखाद्या शहराची लोकसंख्या वाढत असेल तर ती नक्कीच चिंतनीय बाब ठरते."

"बरोबर आहे तुमचं म्हणणं!" एकाग्रतेनं नारायणनचं बोलणं ऐकणारे फादर मॅथ्यूस म्हणाले.

"शेठ परवा स्कॉटलंडला गेले होते."

"बरं, कशासाठी?" फादर मॅथ्यूसनी विचारलं,

"त्यांचा कापडाचाही व्यापार आहे ना मोठा, त्या संदर्भात गेले होते. पण तिथं त्यांना एक स्कॉटिश गृहस्थ भेटले. ते म्हणाले, "तुमच्या भारतात सोनंचांदी विपुल असताना तुम्ही इतर देशांच्या मेहेरबानीवर राहावं याचं आश्चर्य वाटतं."

"असं का म्हणाले ते?"

"सांगतो. ते गृहस्थ स्कॉटलंडमध्ये प्रख्यात असे मत्स्यशास्त्रज्ञ आहेत. लहानपणापासून 'फिशरी' हा विषय त्यांना आवडायचा. त्यात त्यांनी डॉक्टरेट मिळवली. जगाचा दौरा केला. आशिया खंडातील अविकसित राष्ट्रांची उपासमार थांबविण्यासाठी त्या देशांनी आपलं लक्ष मच्छिमारीवर केंद्रित केल्यास त्यांच्या सर्व समस्या दूर होतील असं त्यांनी प्रयोगासहित सिद्ध करून दाखवलेलं आहे. अहो, या निंबर्डीच्या किनाऱ्यावर जे पांढरं सुंगठं मिळतं, हे एकच जर मोठ्या प्रमाणावर पैदास केलं तर आपला भारत अमेरिकेइतका सधन होईल म्हणतात! साऱ्या जगातून 'व्हाइट प्रॉन्स' ला मागणी आहे."

"पण ही पैदास कशी होणार?"

"एक सुंगठ म्हणजे 'प्रॉन' वर्षाला चार लाख अंडी घालतो!"

"काय सांगता काय?"

"हे सत्य आहे. पण या चार लाखांतली पंचवीस टक्के पिल्लं जिवंत राहतात. म्हणजे एक प्रॉन वर्षाला एक लाख नवीन सुंगठ निर्माण करतो. सुंगठाचं आयुष्य वर्ष ते दीड वर्ष इतकंच असतं. तेव्हा हे अल्पजीवी सुंगठ आपल्या देशात 'सी फार्मींग' करून जर पैदास केले तर या कोकणच्या लोकांचंच काय, पण साऱ्या देशाचं भाग्य उजळून निघेल. एक एकर जागेमध्ये समुद्राचं पाणी अडवून जर व्हाइट प्रॉन्सची पैदास केली तर तो व्यवसाय करणारा प्रत्येकजण वर्षाला कमीत कमी दहा हजार रुपये कमावेल!"

"वंडरफुल! कोकणपट्टीचा कायापालटच होईल!"

"अर्थात! शहराकडं धाव घेणाऱ्यांची संख्या आपोआपच घटेल. मला सांगा आपण, इथले निंबर्डीतले लोक कसे जगताहेत? दोन्ही वेळचं अन्न तरी पोटभर मिळत होतं का यांना? आता आम्ही फॅक्टरी सुरू केल्यापासून आपण पाहता आहातच, की त्यांच्या आर्थिक स्थितीत किती झपाट्यानं सुधारणा घडत आहेत. मग शास्त्रशुद्ध पद्धतीनं आपल्या देशाला परकीय चलन मिळवून देणाऱ्या या मत्स्योद्योगाला जर प्रेरणा मिळाली तर देश समृद्ध बनेल की नाही?"

माथुकाका नारायणनचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होते. तो जी विधानं करीत होता ती अत्यंत तर्कशुद्ध अशी होती. माथुकाका ती ऐकून म्हणाले,

"तुम्हीही या विषयाचा इतका सखोल अभ्यास केव्हा केलात?"

नारायणन किंचित स्मित करून म्हणाला, "माझाही जन्म सागरकिनाऱ्यावरचाच आहे. केरळमध्ये अर्नाकुलम हे माझं जन्मस्थान. मच्छिमारी हा लहानपणापासून माझ्या आवडीचा विषय होता. पण वर्षानुवर्षं जुन्या पद्धतीनं चालणारी ही मच्छिमारी सुधारायला हवी असं वाटल्यानं मी त्या विषयावर खूप अभ्यास केला. बी. एस्सी. झाल्यानंतर मीही नोकरीच्या शोधात होतो. तेव्हा मनमोहनशेठ नुकतेच स्कॉटलंडवरून परत आले होते. त्यांच्या डोक्यात एखादी फिशरी काढावी, असा विचार घोळत होताच. माझी आणि त्यांची भेट झाल्यावर त्यांनी निर्णयच घेतला. मग आम्ही मुंबईपासून फार दूर नाही, फार जवळ नाही असं एखादं ठिकाण शोधायचं ठरवलं- तर आम्हाला निंबर्डी पसंत पडली. 'डीप सीज अँड शोअर टेस्ट' मध्ये आम्हाला इथं विपुल सागरसंपत्ती आढळून आली. मोठ्या शेठनी आणलेल्या तज्ज्ञांचंही माझ्याप्रमाणेच मत पडलं."

"बरं झालं! शेठना स्वार्थ आणि परमार्थ एकदमच साधता येईल!"

"ते खरं, पण फादर, सुरुवातीलाच आपण या उद्योगांना विरोध करावा याचं आश्चर्य वाटलं."

फादर मॅथ्यूस हसत हसत म्हणाले, "त्याचं काय आहे मिस्टर नारायणन, मी आहे थोडा जुन्या विचारसरणीचा. पाश्चात्त्यांच्या भौतिक प्रगतीनं त्यांच्या आयुष्यात किती दुःख निर्माण झालेलं आहे हे मी अगदी जवळून पाहात आलो आहे त्यामुळं माझा सुरुवातीला तुमच्या या प्रकल्पांना विरोध होता हे अगदी खरं; पण आता तुम्ही ही सर्व माहिती सांगितल्यानंतर असं वाटू लागलं आहे की, मी तुमचा या योजनेचा दूरगामी होणारा परिणाम विचारात न घेता माझं मत बनवलं होतं."

"चालायचंच. इथल्या लोकांच्यावर आपला निरागस असा लोभ असल्यामुळं त्यांचं स्वातंत्र्य नष्ट होईल असं आपणाला वाटणं साहजिकच होतं. लोकांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हायचं असेल किंवा ते प्राप्त करून घ्यायचं असेल, तर आपल्या स्वातंत्र्याच्या पूर्वापार चालत आलेल्या कल्पनांना थोडी मुरड घालावीच लागते."

"मिस्टर नारायणन, तुम्ही इतक्या खोलवर जाऊन विचार करीत असाल याची मला कल्पना नव्हती."

नारायणन हसला आणि म्हणाला, "विचारधन असो किंवा सागर संपत्ती असो, खोलवर शिरल्याशिवाय ती हाती येतच नसते!"

"छान! पण आपली बायका-मुलं नाही आणणार इकडं?" माथुकाकांनी पुन्हा चष्मा कपाळावर चढवून विचारलं.

"बायका-मुलं? फादर, मी बॅचलर आहे!" हसत हसत नारायणन म्हणाला.

"काय सांगता ? का लग्न केलं नाहीत आपण?"

"नाही केलं, झालं!"

"मग गावी कोण असतं?"

"एक सावत्र भाऊ आहे."

"ते काय करतात?"

"काही नाही. शेती होती, घरं होती, दोन पडावही होते. सर्व काही विकून मोकळा झालेला आहे."

"का?"

"तो एक इतिहासच आहे फादर. सारी वाट लावली त्यानं! वर्षातून दोन-तीन वेळा

माझ्याकडं येतो. शे-पाचशे रुपये घेऊन जातो. वाया गेलेला माणूस आहे तो.''

''अरेरे!''

हवेत हात उडवून नारायणन म्हणाला, ''चालायचंच. सर्वांनीच व्यवस्थित वागायचं ठरवलं तर हे जग कसं चालेल? मूर्ख लोक जगात आहेत म्हणून शहाण्यांना जगात किंमत मिळते, अज्ञानी आहेत म्हणून ज्ञानी लोकांचं महत्त्व कळतं, दुर्जन आहेत म्हणून सज्जन वंदनीय ठरतात. तेव्हा विधात्यानं हेतुपुरस्सरच माणसा-माणसांमध्ये हा भेद घडवला असला पाहिजे अशी माझी कल्पना आहे. इतके साधूसंत या पृथ्वीतलावर होऊन गेले, इतके धार्मिक ग्रंथ लिहिले गेले; पण माणूस हा जगाच्या अंतापर्यंत 'माणूसच' राहणार आहे! चला, जाऊ द्या तो विषय. आपल्याला राहण्याच्या या जागेत काही बदल करून हवा असला तर कृपा करून सांगा. हजारो खर्च होणार आहेत. जाता जाता तुमच्यासाठी काही काही सुखसोयी करून देता आल्या तर पहावे म्हणून आलो होतो.''

''थँक्स अ लॉट! मिस्टर नारायणन, माणसाच्या स्वभावाची पूर्ण ओळख पटल्याशिवाय कोणीही त्याच्याविषयी एकदम दूषित ग्रह करून घेऊ नये हे खरं. सुरुवातीला मला तुमच्याबद्दल.....''

''चालायचंच. मी कोण आहे, कसा आहे हे तुम्हाला माझ्या कृतीने स्पष्ट झाल्याशिवाय कसं समजणार? मला त्यात आपली काही चूक झालेली आहे असं मुळीसुद्धा वाटत नाही.''

''पण मला एक सांग- सीतू आणि बिलवरची ती केस तुम्ही कशी काय दडपून टाकलीत?''

त्यावर नारायणन मोठ्यानं हसला आणि म्हणाला, ''फादर, खरं सांगू? शेटे सावकाराला असा कोणीतरी धडा शिकवायलाच हवा होता. दहा रुपये उसने देऊन त्या दहावर एक पूज्य देऊन शंभर रुपये वसूल करणारा हा शेटे अट्टल बदमाष आहे. त्यानं निंबर्डीच्या अनेकांना कर्ज देऊन त्यांच्याकडून दामदुपटीनं वसूल केल्याच्या हकिगती मला त्यापूर्वीही समजल्या होत्या. अशा माणसाचं दुकान फोडून ज्यांनी त्यांच्या प्रॉमिसरी नोटा जाळून टाकल्या त्यांनी एका अर्थी समाजसेवाच केलेली आहे. मग तो बिल असो किंवा सीतू. मला जेव्हा रासू सारंगानं सीतूला पकडल्याचं सांगितलं तेव्हाच मी निर्णय घेतला, की पोरांना सोडवून आणायचं.''

''पण ते शक्य कसं काय झालं?''

''झालं! त्यावर अधिक चर्चा कशाला?''

''नाही- पण मला थोडी जिज्ञासा वाटते म्हणून विचारतो.''

''फादर, काही गोष्टींचा फक्त परिणामच विचारात घ्यायचा असतो. कोणत्या मार्गाने असा इष्ट परिणाम घडला याची चिकित्सा करायची नसते.''

नारायणननं धूर्तपणानं तो खुलासा करायचं टाळलं; अन् मग माथुकाकांनीही त्याला त्याबाबत विचारलं नाही. पण शेवटी त्यांचा निरोप घेऊन जाताना त्याला ते म्हणाले,

''काही झालं तरी गुन्हेगारांना तुम्ही पाठीशी घालता ही जाणीव जर पैâलावली तर त्याचा परिणाम काही बरा व्हायचा नाही.''

''फादर, असा प्रत्येक गुन्हेगाराला मी पाठीशी घालणार आहे थोडाच? त्या प्रकारात सीतू सापडला होता आणि तोही शेट सावकाराच्या संबंधात म्हणूनच मी मध्ये पडलो.''

नारायणन निघून गेल्यानंतर माथुकाका बाहेर आले. दिवस संपत आला होता. क्षितिजावर दिसणारी समुद्राची गोलाकार निळी रेघ आता किंचित तांबूस दिसत होती. माथुकाका त्यांच्या नित्याच्या खडकावर जाऊन बसले. नारायणनच्या स्वभावाचा त्यांना

अंदाज लागत नव्हता. एकीकडे चर्च कौन्सिलपर्यंत ज्याचे हात पोहोचले होते तोच नारायणन 'तुमच्यासाठी काही सुखसोयी हव्या असल्यास सांगा' म्हणून माथुकाकांकडे आला होता. पण खरं म्हणजे सारंग हाताशी धरला तर निंबर्डी हातात सापडल्यासारखी आहे, या एकाच जाणिवेनं त्यानं सीतूला सोडवून आणलं. पोलीसखात्यातदेखील आपल्या शब्दाला किती महत्व आहे हेही त्याबरोबरच त्यानं दाखवून दिलं होतं.

निंबर्डीत एक काळ असा होता, की तिथं माथुकाकांच्या सल्ल्याशिवाय झाडाचं पान हलत नव्हतं; पण आता तेच स्थान नारायणननं मिळवलं होतं. विनापाश असा नारायणन शेठ मनमोहनदास यांचा सल्लागार होता, मॅनेजर होता अन् सर्व काही होता.

आऊट-हाऊसच्या दुरुस्तीला सुरुवात झाली. खिडक्यांच्या फुटक्या काचा काढून त्या जागी दुसऱ्या बसवण्यात आल्या. भिंतींना नवीन रंग चढला. छतांना आतून पांढऱ्या रंगाचं सीलिंग बनवलं गेलं. तिठ्यापासून फॅक्टरीपर्यंत वीज आली होती, ती आता चर्चच्या टेकडीवर येऊन पोहोचली. माथुकोकांना न विचारताच नारायणननं इलेक्ट्रिशियनकडून त्यांच्या राहण्याच्या जागेत फिटिंग करवून घेतले. चर्चच्या टोकावर लाल रंगाचा दिवा बसवण्यात आला. ट्रॉलर्सना सागरातून परत यायला कदाचित वेळ लागला अन् अंधार पडला तर सहा-सात मैलांवरून हा दिवा दिसेल व अचूक मार्गदर्शन होईल, हाच नारायणनचा मुख्य उद्देश होता. पण तो म्हणाला काय, तर 'हे चर्च जरी एका विशिष्ट धर्माचं असलं तरी निंबर्डीचं वैभव आहे. त्याची शान वाढविणं हे इथं वास्तव्य करणाऱ्या प्रत्येकाचं कर्तव्य आहे. रात्रीच्या वेळी चर्चच्या शिखरावर लाल दिवा लावल्यानं त्याची शोभा वाढेल.'

कॅनिंग फॅक्टरी आणि कोल्ड स्टोअरेजमध्ये त्यांच्या मालाच्या निर्मितीला आता गती प्राप्त झाली होती. निंबर्डीला नवजीवन लाभलं होतं. घरोघरी आनंद फुलत होता. अशातच एक दुर्दैवी घटना घडली.

सुबीची आई कालवं काढायला गेली असताना खडकाखालचा एक अत्यंत विषारी पाणसाप तिला चावला. खाडीतून तिला निंबर्डीत आणेपर्यंत तिच्या तोंडाला फेस आला होता व सर्व शरीर काळंनिळं पडलं होतं. नारायणननं फॅक्टरीच्या डॉक्टरांना तात्काळ बोलवून घेतलं. डॉक्टरनं स्टेथास्कोप तिच्या अंगाला लावण्याआधीच सांगून टाकलं,

"ही मेली आहे!"

त्यादिवशी दुपारनंतर नारायणननं फॅक्टरी बंद ठेवली. सारा गाव तिच्या अंत्ययात्रेला जमला. दहनाचा सारा खर्च नारायणननंच केला. सुबीला धीर देताना तो म्हणाला, "काहीएक चिंता करू नको. आजपर्यंत माथुकाका तुझ्या पाठीशी होते. यापुढं त्यांच्यापाठोपाठ मीही आहे असं समज."

आताशी माथुकाका फॅक्टरीबाबत किंवा नारायणनबाबत काहीच वक्तव्य करीत नव्हते. सुरुवातीला जागेची पाहणी करताना निंबर्डीला आलेला आणि नंतर मुंबईला गेलेला रवींद्र आता परत निंबर्डीला आला होता. नारायणन त्याला धंद्यात तयार करणार होता. पण नारायणनचा व्यवहार, चाणाक्षपणा, दूरदृष्टी रवींद्रजवळ मुळीच नव्हती. गोरागोमटा रवींद्र अर्थशास्त्र घेऊन लहान वयातच एम.ए. झाला होता; पण जगाच्या महाविद्यालयात अजून तो एफ.वाय. देखील नव्हता. त्याचं मन निंबर्डीत रमावं म्हणून नारायणननं त्याच्यासाठी उत्तम असं निवासस्थान बनवलं. करमणुकीसाठी रेकॉर्डप्लेअर, स्टिरिओ, रेडिओ आणवले. त्याला वेस्टर्न पद्धतीचं जेवण लागतं म्हणून गोव्यातल्या प्रख्यात हॉटेलमधला कुक दरमहा पाचशे रुपये देऊन आणला.

सकाळी दोन तास आणि दुपारी दोन तास रवींद्र कॅनिंग फॅक्टरी आणि कोल्ड

स्टोअरेजकडं जायचा. सुंगठं सोलणाऱ्या पोरी, बायका तो आला की अदबीनं उठून उभ्या राहायच्या. नारायणननंच त्यांना तशा सूचना दिल्या होत्या. सुरुवातीपासूनच निंबर्डीत त्याला जे हवं ते मिळवून द्यायला नारायणन समर्थ होता. पण त्यादिवशी कोल्ड स्टोअरेजमध्ये लॉबस्टर सोलत असलेली गोरी, घाऱ्या डोळ्यांची, गालांवर नैसर्गिक लाली असलेली पोरगी आपल्याला हवी असं जेव्हा रवींद्रनं नारायणनला सांगितलं तेव्हा त्यानं कपाळावर हात मारून गेतला.

जी पोरगी हवी असा रवींद्रनं आग्रह धरला होता, ती होती रासू सारंगची सून आणि सीतूची बायको- सुबी!

०००

# तेरा

"आय से आय वाँट दॅट गर्ल!" रवींद्र आपल्या केबिनमध्ये आलेल्या नारायणनला म्हणाला.

"छोटे शेठ! ती रासू सारंगाची सून आणि सीतूची बायको आहे!"

"ती कोणी असो- मला ती हवीय!"

"आपण थोडा विचार करा रविबाबू. एखाद्याची बायको सुंदर आहे म्हणून आपण तिची अभिलाषा बाळगणं हे चुकीचं आहे."

"मॅनेजर, मी सारी चौकशी केलेली आहे. त्या दोघांचं लग्न झालेलं नाही."

"पण ती सीतूपासून गरोदर होती. चार-पाच महिन्यांपूर्वी तिचा गर्भपात झालेला आहे. साऱ्या निंबर्डीला ही गोष्ट ठाऊक आहे." रवीला परावृत्त करण्याच्या हेतूनं नारायणन म्हणाला.

"सो व्हॉट? मला ती पोरगी आवडलेली आहे. ती मला हवीय! आय वाँट दॅट गर्ल!"

"ती मिळणं अशक्य आहे. तुम्ही त्या कारखान्यात काम करणारी दुसरी कोणतीही पोरगी दाखवा. मी तिला तुमच्यासमोर हजर करीन; पण कृपा करून त्या सुबीचा विषय मात्र डोक्यातून काढून टाका."

"तो जाणं अशक्य आहे. मॅनेजर, मी तिला दोन महिन्यांपूर्वी पाहिली, त्यानंतर मी तिला रोज पाहतोय. असलं सौंदर्य मला कुठंच पाहायला मिळालेलं नव्हतं. तिला पाहिल्यापासून मी बेचैन आहे. ती माझ्या स्वप्नात येते. मला अस्वस्थ करते. तुम्ही काही करा, पण मला ती सुबीच हवी!"

"मालक, आता तुम्हाला कसं पटवून देऊ समजत नाही" हताश होऊन नारायणन म्हणाला.

"ते तुम्हाला अशक्य नाही. त्या सीतूचं तिच्याशी लग्न झालं असल्याची तुम्हाला खात्री असेल तर त्याला म्हणावं सुबीला सोडपत्र दे. दहावीस हजार हवे असले तर घे!"

"मला नाही वाटत केवळ पैशांसाठी सीतू सुबीला सोडपत्र द्यायला तयार होईल. त्या दोघांचं अगदी बालपणापासून एकमेकांवर नि:स्सीम असं प्रेम आहे. घरच्यांचा लग्नाला विरोध होता म्हणून ती दोघं इथून पळून गेली होती."

"ते काही असो मॅनेजर, तुम्ही तुमची सर्व शक्ती पणाला लावा- पण मला ती सुबी हवी आहे. तो म्हातारा मॅथ्यूस या कामी उपयोगी पडतो का बघा."

"फादर मॅथ्यूस?" कपाळाला हात लावून नारायणन म्हणाला,

"ते प्रकरण त्याहूनही कठीण! तो म्हातारा सीतू आणि सुबीवर जिवापाड प्रेम करतो. सीतूची आपल्या आई-बापांवर नाही इतकी भक्ती फादर मॅथ्यूसवर आहे आणि फादर मॅथ्यूसच्या साहाय्यानंच ती दोघं विवाहबद्ध झालेली असावीत."

"पण त्यांचं लग्न कोणी पाह्यलंय?" रवीनं पाचशे पंचावन्न सिगारेट शिलगावून विचारलं.

"लग्न झाल्याचं कोणी पाहिलं नसेल; पण ते दोघे पती-पत्नी आहेत हे साऱ्या

निंबर्डीला ठाऊक आहे.''

''नॉन्सेन्स! लग्नाविना ते पती-पत्नी होऊच कसे शकतील?''

''ती सीतूपासून गरोदर होती.''

''बॉल्स! तुम्ही एकदा त्या बाबतीत सीतूशी आणि फादर मॅथ्यूसशी बोलणी तर करून पाहा.''

''आता तुम्हाला कसं सांगू रविबाबू- फादर मॅथ्यूस हा तत्त्वनिष्ठ आहे. सीतू प्राण गेला तरी सुबीचा सौदा करायला तयार होणार नाही.''

''त्याचा प्राण गेल्यानं जर सुबी मला मिळणार असेल तर.''

''काय भयंकर कल्पना तुमच्या डोक्यात घोळते आहे रविबाबू!''

''तुम्हाला कल्पना येणार नाही, मॅनेजर. त्या पोरीनं मला पागल बनवलंय!''

नारायणन सचिंत होऊन केबिनमध्ये उभा होता. त्या एअरकंडिशन्ड रूममध्येदेखील रवींद्रच्या वक्तव्यानं त्यास घाम फुटला होता.

खिशातल्या रुमालानं कपाळावरचा घाम टिपून घेत नारायणन म्हणाला, ''मला तरी हे सर्व अशक्य दिसतं आहे. पण आपण मला एक-दोन महिन्यांची मुदत द्यावी. मी थोडा प्रयत्न करून बघतो.''

''दोन का चार महिन्यांची मुदत घ्या. पण मला ती सुबी हवीय! लाँचमधून तिला एकटीला घेऊन फिरायचंय मला मॅनेजर. तिचे केस छाटून बॉबकट केला आणि मिनीस्कर्ट घातला तर ती कशी दिसेल?''

''मिनीस्कर्ट?''

''हांऽऽऽ! तिच्या मांड्या किती गोऱ्यापान आहेत! तिला मिनीस्कर्टच हवा! मला वाटतं, तिला पोहताही येत असावं. नसेल तर मी तिला शिकवीन!''

नारायणन 'आ' वासून रवींद्रकडं पाहात होता. नकळत तो म्हणाला,''पोहायला शिकवणार?''

''होऽऽ! स्वीमिंग सूटमध्ये ती काय मस्त दिसेल! कॅन यू इमॅजिन? खरंच, कल्पना करा. बीचवर मी वाळूत सकाळचं कोवळं ऊन खात पडलो आहे आणि माझ्या शेजारी बॉबकट केलेली, स्वीमिंग सूटमधली सुबी बसलेली आहे. माझा एक हात तिच्या कमरेभोवती आहे. छेऽऽ! तुमच्यासारख्या ब्रह्मचाऱ्याला ती कल्पना सांगून काही उपयोग नाही! मॅनेजर, डु व्हॉट यू लाईक, बट सी आय गेट दॅट गर्ल! आय ॲम मॅड आफ्टर हर!''

नारायणन केबिनचं दार उघडून बाहेर पडला. एकदम त्याला बाहेरची झळ लागली. तो तसाच निंबर्डीच्या पोरी सुंगठं सोलत होत्या त्याठिकाणी आला. सुबीच्या कपाळावर भुरकट रंगाची एक बट आली होती. कोळणीसारखं घट्ट कासोटा मारलेलं लुगडं ती खूप वर नेसली होती. तिच्या केळीच्या कोंबासारख्या प्रमाणबद्ध गोऱ्या मांड्यांकडं त्याचं लक्ष गेलं आणि त्याला वाटलं की सुबीनं या पद्धतीचं लुगडं यापुढं नेसू नये.

''सुबी, जरा बाहेर ये.'' नारायणन गंभीर स्वरात म्हणाला.

''का?''

''काम आहे.''

सुंगठं सोलून तिचे हात भरले होते. बाजूच्या बादलीत हात बुडवून तिनं हात धुतले आणि पदरानं हात पुसत ती त्याच्यामागोमाग बाहेर आली. ऊन रणरणत होतं. समुद्राकाठची पिवळी वाळू तापून झळा उठत होत्या.

कोल्ड स्टोअरच्या बाहेर असलेल्या एका माडाला टेकून नारायणन म्हणाला,

"सुबी, उद्यापासून तुझ्या साडी नेसायच्या पद्धतीत बदल कर."

सुबीला प्रथम तो काय बोलतो आहे हेच समजेना. ती वेड्यासारखी त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली. नारायणन काही क्षण माडाच्या टोकाकडं पाहात राहिला आणि सुबीला म्हणाला,

"सुबी, तू उद्यापासून फॅक्टरीत कामाला येऊ नकोस."

"का?"

"मी सांगतो म्हणून!"

"माझ्या हातून काय चुकलं?" घाबरून सुबीनं विचारलं.

"तुझ्या हातून नाही, पण तुला जन्माला घालणाऱ्या विधात्यानं चूक केलीय! तुला नको इतकं रूप दिलंय त्यानं!"

सुबीला नारायणन आज असं का बोलतो हे समजेना. ती एकटक त्याच्याकडं पाहात राहिली. तेव्हा तो म्हणाला,

"सुबी, उद्यापासून तू कामाला येऊ नकोस. कामाबद्दल मिळणारी मजुरी तुला घरीच देण्याची व्यवस्था करतो मी."

"असं का?"

"ते मला विचारू नको. तू जा आता."

"लगेच?"

"हां- आत्ताच्या आत्ता!"

नारायणन आवाज चढवून ओरडला. खरं म्हणजे त्याला सुबीला विश्वासात घेऊन सर्व परिस्थिती समजावून सांगायची होती; पण त्याला ते जमलंच नाही.

सुबीचे डोळे पाण्याने भरले. काहीही अपराध नसताना आपणाला मॅनेजरनी कामावरून का दूर करावे हे काही केल्या तिला समजेना.

सुबीची आई वारल्यापासून सुबी काहीशी अबोल आणि एकलकोंडी दिसत होती. सकाळी नऊ वाजता कामाला आली की संध्याकाळी साडेचार-पाचला ती परत जायची. कामावर कोणाशी जास्त बोलायची नाही, हसायची नाही. गर्भपात झाल्यापासून तिच्या मनावर एक प्रकारचं दु:खाचं सावट आलेलं होतं. तशात अचानक आई मरून गेल्यानं ते अधिकच दाट झालं होतं. आता मॅनेजरनं तिला कसलंही कारण न सांगता कामावर यायचं बंद करून टाकल्यानं तिला दुर्दैव आपला एकसारखा पाठपुरावा करायला लागलं आहे असं वाटू लागलं.

सुबी घरी आली तेव्हा रासू सारंग पावसाळ्यात खाडीतले मासे पकडायचं जाळं दुरुस्त करीत बसला होता. सुबी अवेळी आल्याचं पाहून त्यालाही थोडं आश्चर्य वाटलं.

"लवकर आलीस?" त्यानं सुबीला विचारलं.

सुबी काही न बोलता आत गेली आणि कोपऱ्यात बसून मुसमुसून रडू लागली. रासूनं जाळं तसंच अंगणात ठेवलं आणि तो आत आला.

"रडतेस का?"

"मॅनेजरनं मला कामावर येऊ नको म्हणून सांगितलं."

"का?"

"कारण नाही सांगितलं."

"पण काहीतरी कारण असल्याशिवाय त्यानं तुला कामावर यायची बंदी का करावी?"

"मला ठाऊक नाही."

"थांब, मीच विचारतो त्याला."

रासूनं आपलं जाळं गुंडाळून ठेवलं.

रासू सारंगालाही फॅक्टरीचा पगार चालू होता. अधूनमधून तो रापणीसाठी ट्रॉलरवर जात होता; पण त्याच्यावर ठरावीक वेळ काम केलंच पाहिजे असा कोणताही दंडक नव्हता. रासू सारंग दर्यावर्दी होता. निंबर्डीत त्याच्या शब्दाला वजन होतं. फादर मॅथ्यूसनी निंबर्डीच्या लोकांना 'फॅक्टरीमुळं व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात येईल' असा इशारा जेव्हा दिला होता, तेव्हा तसं 'काही घडणार नाही' हे सांगायला रासू सारंगाला शेठ मनमोहननी आणि नारायणननं हाताशी धरलं होतं. त्याला सिक्युरिटी खात्यातून दरमहा दोनशे रुपये पगारही चालू होता. नारायणनला ठाऊक होतं की, रासूला नेमायची काही गरज नाही; पण निंबर्डीसारख्या अनोख्या प्रदेशात तिथला एखादा वजनदार माणूस आपल्या हाताशी असावा, या हेतूनं नारायणननंच ती शक्कल काढली होती. मनमोहनशेठनी त्याला संमती दिली होती. रासू मन मानेल तेव्हा फॅक्टरीकडं जायचा. मन मानेल तेव्हा दर्यावर जायचा अन् लहर लागली तर आपली छोटी होडी घेऊन भरतीच्या वेळी खाडीत जायचा. इतर नोकरांसारखं त्याच्यावर वेळेचं काही बंधन असं नव्हतंच.

नारायणनला आज खरोखरच संकटात सापडल्यासारखं वाटू लागलं. रासू सारंगाला रवीच्या मनातला हा हेतू समजला तर तो काय करेल अन् काय नाही याचा पत्ता नव्हता.

रासू सारंग सरळ नारायणनच्या ऑफिसात आला. नारायणनला कदाचित त्याचं आगमन अपेक्षित असावं. तो उठून पुढं आला. रासूच्या हाताला धरून म्हणाला,

"आपण बाहेरच जाऊ. मला थोडं खाजगी बोलायचं आहे."

आता मात्र रासूला वाटलं की प्रकरण काहीसं गंभीर दिसतं आहे. रासू सारंग आणि नारायणन फॅक्टरीतून निघाले ते सरळ गावाच्या बाहेर खाडीलगत असलेल्या पोफळीच्या राईत येऊन थांबले.

नारायणन आणि रासू एका पडलेल्या माडाच्या खोडावर बसले. नारायणननं रासूचा हात हातात घेतला.

"सारंग, माझ्यावर एक संकट आलेलं आहे."

"कसलं?"

"कसं सांगू? फार फार कठीण अशी समस्या निर्माण झालीय. रविबाबूंच्या स्वभावाची तुला कल्पना आहे?"

"हां. शिकलेले आहेत जास्त. पण व्यवहार फारसा समजत नाही."

"व्यवहार नाही समजू दे. पण एखाद्याचं घर मोडायची वासना बरी का?"

"कुणाचं घर मोडू पाहतात?"

"तुझं! सारंग, रविबाबू सुबीसाठी पागल झालेला आहे." नारायणन एकदम बोलून गेला.

रासू सारंगानं आपल्या हाताची मूठ आवळली आणि तो खोडावर मूठ आपटून म्हणाला,

"काय सांगता?"

"हां! तो शाळा-कॉलेजात हेच करत होता. म्हणून त्याला इथं आणून ही कारखान्याची जबाबदारी टाकली मोठ्या शेठनी."

"मग शिकला कसा इतका?"

"कसा शिकला? सारंग, आजकाल पैसा असला की पदव्या कुणा वाट्टेल त्याला मिळतात! त्यात दिल्ली युनिव्हर्सिटी! अरे, आपल्याकडचा साधा एस.एस.सी. देखील तिथल्या

पदवीधराला सवाई ठरेल. रविबाबू एम.ए. झाला कसा ते सांगीन एकदा सवडीनं. पण आज मला या रविबाबूनं फार मोठ्या संकटात टाकलेलं आहे.''

''अजून त्यांना व्यवहार नाही, मॅनेजर. तुम्ही मोठ्या शेठच्या कानावर ही गोष्ट घाला. सुबीला कारखान्यात पाठवायचं बंद केलंत हे बरंच केलंत. पण सीतूला मात्र त्यातलं काही कळू देऊ नका. तोही अजून लहान आहे. त्याला समजलं हे तर रागाच्या भरात तो काय करील त्याचा नेम नाही.''

''हांऽऽऽ, म्हणूनच ही गोष्ट मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाही बोललो नाही. मी उद्याच जातो मुंबईला. मोठ्या शेठना भेटून सर्व कल्पना देतो. पोराटकी म्हणून ही बाब दुर्लक्षिण्याची मुळीच नाही, हे असं काही घडतं म्हणून समजलं तर!''

रासू सारंग सुरुवातीला तो प्रकार ऐकून संतापला; पण नारायणननं त्याला 'आपण यातून काहीतरी मार्ग काढू.' असं आश्वासन दिल्यानं तो थोडा शांत झाला.

त्यानंतर नारायणन दोन दिवसांनी मुंबईला गेला. शेठ मनमोहनदास यांनी सर्व प्रकार ऐकून घेतला आणि ते आपल्या दिवाणखान्यात हात मागे धरून फेऱ्या काढू लागले.

''असं आहे तर एकूण!'' शेठ म्हणाले.

''हंऽऽ! आपल्याला स्थानिक लोकांना दुखवून चालणार नाही. त्या लोकांत जर प्रक्षोभ माजला तर पदोपदी आपल्या मार्गात अडचणी निर्माण होतील.''

''ते खरं. पण नारायणन, ही बाब तू समजतोस तितकी मला गंभीर नाही वाटत.''

'गंभीर नाही वाटत?''

''मुळीच नाही! रवीचं लग्न मला करून द्यायलाच हवं. पण आमच्या तोलामोलाचं स्थळ मिळाल्याशिवाय मी घाई नाही करणार. पोराची जात आहे. या वयात असं काही करावंसं वाटायचं नाही तर ते केव्हा? त्या पोरीचा त्यानं जर इतका ध्यास घेतला असेल तर तू त्याला ती पोरगी मिळवून द्यायच्या कामी साहाय्य करायला हवं.''

''शेठ काय म्हणता काय आपण?''

''अगदी रास्त असा सल्ला देतो आहे मी. त्या रासू सारंगाच्या तोंडावर एक पाच हजार दे फेकून!''

''पाच नाही, पन्नास हजारानंदेखील ते काम होणार नाही शेठ!'' नारायणन आत्मविश्वासानं म्हणाला.

''अस्सं? पण मला वाटतं, तुझ्यासारख्या हुशार माणसाला रवीची ही एवढी छोटी इच्छा पुरवणं अशक्य होऊ नये.''

''शेठ, ती सुबी सारंगाची सून आहे! सीतूशी झालेला तिचा विवाह आंतरजातीय असला,तरी तो विवाहच आहे. एखाद्याच्या लग्नाच्या बायकोला फूस लावणं किंवा तिच्यावर जबरदस्ती करणं हे जितकं नैतिकदृष्ट्या गैर आहे तितकंच ते कृत्य बेकायदेशीर आहे.''

''कायदा तू मला शिकवतोस? त्या रासू सारंगाला आपण फुकट दोनशे रुपये देतो का? त्याला सांग, तुझ्या पोरानं घरात आणलेली ही पोर त्याची कायदेशीर पत्नी होऊ शकत नाही म्हणून! आणि तेवढ्यानंही जर भागलं नाही तर मग मला सांग. मी बघतो मग!''

नारायणनला पुढं काय बोलावं तेच समजेना. शेठनी तीन-चार लक्ष रुपये खर्च करून निंबर्डीत दोन फॅक्ट्या चालू केल्या होत्या. त्यावर सर्वस्वी नारायणनचं नियंत्रण होतं. रवीला त्याला वर्ष-दोन वर्षं शिक्षण देऊन तयार करावयाचं होतं. पण रवीनं सुरुवातीलाच अशीच काहीतरी चमत्कारिक अडचण निर्माण केल्यानं नारायणन गोंधळून गेला होता. शेठ मनमोहन यातून काहीतरी मार्ग काढतील असं त्याला वाटलं होतं. पण शेठनी उलटाच पवित्रा घेतला-

त्यामुळं नारायणनची पंचाईत झाली.

फिरता फिरता शेठ थांबले आणि नारायणनला म्हणाले,"पण तू असं का करत नाही?"

"कसं?"

"त्या सीतूला कसल्या तरी लफड्यात अडकवून का सोडत नाहीस?"

"मालक!"

"हांऽऽऽ! तू ते काम अगदी बिनबोभाट करू शकशील. खात्री आहे माझी. परवा तू त्या सीतूला आणि बिल गोन्साल्विसला पोलिसांच्या कचाट्यातून सोडवून आणल्यामुळंच त्या लोकांचा तुझ्या चांगुलपणावर विश्वास बसलेला आहे. अशातच तू एखादं कारस्थान रचून त्या सीतूला अडकवलंस की रवीचा मार्ग मोकळा होईल. पण काय रे, खरोखरच ती पोर दिसायला इतकी सुंदर आहे?"

नारायणन गात्रं बधिर झाल्यासारखा बसून होता. तो मनमोहनशेठकडं विचित्र नजरेनं पाहात होता. मनमोहनशेठ धंद्यात तयार होते. धंदा करताना नीती-अनीतीचा विचार करायचा नसतो, या तत्त्वावर त्यांचा विश्वास होता. पण आपल्या पुतण्याला ज्या मुलीविषयी अभिलाषा निर्माण झालेली आहे, तिला मिळविण्यासाठी कुटिल कारस्थान रचावं असा ते सल्ला देतील, याची नारायणनला थोडीसुद्धा कल्पना नव्हती.

नारायणन हाही काही संत-साधू नव्हता. एखादी गोष्ट त्यानं मनावर घेतली की ती तो तडीस नेल्याशिवाय राहणार नाही, अशी मनमोहनशेठना खात्री होती. पण यावेळेस नारायणनचं मन थोडं कचरलं. सीतू हा तसा पापभीरू मुलगा होता. तो कोणाच्या ना अध्यात ना मध्यात असे. सुबी छोट्या शेठला उपभोगायला हवी म्हणून सीतूला कसल्यातरी लफड्यात गुरफटून टाकावं, या कल्पनेला चटकन् होकार द्यायला तो तयार नव्हता. तो विचार करू लागला. 'सीतूला मी कशात तरी गुंतवला तर रासू सारंग गप्प बसेल का? सीतू हा त्याचा एकुलता एक मुलगा. मी निष्कारण त्याच्यावर काही बालंट आणलं अन् ते रासूला समजलं तर तो मला जिवंत नाही सोडणार. फॅक्ट्या बंद पाडेल तो. तशात तो म्हातारा! फादर मॅथ्यूसचा सुरुवातीपासून आमच्या या फॅक्ट्यांना विरोध होता. अनायासेच त्याला संधी सापडेल आम्हा लोकांना बदनाम करायची. काय करावं समजत नाही. मोठे शेठ रवींद्रला बोलावून घेतील आणि चार समजुतीच्या गोष्टी सांगतील ही माझी अपेक्षा होती, ती साफ चुकली. पण काही झालं तरी यातून मार्ग हा निघालाच पाहिजे.'

असा तो विचार करीत उभा असतानाच कोपऱ्यातला फोन खणखणला. शेठ मनमोहननं तो स्वत:च घेतला.

'हॅल्लोऽऽऽ, मनमोहन स्पीकिंग. हूऽऽऽऽ? नारायणन? हांऽऽऽऽ, ही इज हिअर. जस्ट ए मिनिट-" रिसीव्हरवर हात धरून मनमोहन म्हणाले,

"तुझा फोन आहे."

नारायणनला समजेना. कोणाचा फोन असेल असा विचार करीत त्यानं रिसीव्हर कानाला लावला आणि पलीकडून बोलणारी व्यक्ती कोण आहे हे समजताच त्याचा मुळातला कृष्णवर्णी चेहरा अधिकच काळवंडला! एक-दोन मिनिटं तो फोनवर बोलला आणि त्यानं एक दीर्घ नि:श्वास सोडून रिसीव्हर खाली ठेवला. मनमोहन गच्चीत उभे होते. फोनचा रिसीव्हर नारायणननं खाली ठेवताच त्यांनी मागे वळून विचारलं,

"कोण होतं ते?"

"साडेसाती! माझा सावत्र भाऊ कृष्णन आज इथं कडमडलाय! कृपा करून त्याला

माझा निंबर्डीचा पत्ता सांगू नका. अगोदरच माझ्या डोक्याला एक विवंचना लागून राहिलेली आहे. त्यात कृष्णानं आणखीन भर घालायला नको.''

शेठ मनमोहन टाळी वाजवून म्हणाले, ''छान झालं! माणसाची खरी कसोटी अशा वेळीच लागते. नारायण, तू किती धूर्त आहेस हे मी एकटाच जाणतो हे लक्षात ठेव. रवींद्रच्या बाबतीत तू काहीतरी तोडगा काढ.''

''पण शेठ, त्यांचं लग्न टाका ना करून. अद्याप लग्न नाही झालं म्हणून त्यांना असे धंदे सुचतात. एकदा बेडी अडकवली की चार दिवसांत ताळ्यावर येतील!''

''तोही माझा विचार आहे; पण योग्य असं स्थळ मिळाल्याशिवाय मी नाही घाई करणार. ते लग्नाचं तूर्तास राहू दे. रवीला जी मुलगी हवी तिच्यासाठी थोडा प्रयत्न कर ना.''

''तुम्हा शेठ लोकांचा खेळ होईल, पण माझा मात्र जीव जाईल.'' शेठ मनमोहन त्यावर मोठ्याने हसले.

०००

# चौदा

कृष्णन आणि नारायणन या दोघा सावत्र भावांत फक्त सात महिन्यांचं अंतर होतं. त्याचं असं झालं- नारायणनच्या आईला बारा वर्षं मूल झालं नाही, म्हणून त्याच्या आईनंच नवऱ्याला दुसऱ्या लग्नाचा आग्रह केला आणि आपल्या धाकट्या बहिणीशी लग्न लावून दिलं. पण झालं काय, तर दुसरं लग्न झाल्यानंतर आपणच गरोदर आहोत असं नारायणनच्या आईला समजून आलं. पण आता दुसरं लग्न तर होऊन मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. नारायणनच्या आईला आपल्या धाकट्या बहिणीवर अन्याय करावा असं वाटलं नाही. तिनं नवऱ्याला आणि आपल्या बहिणीला तिरुपतीला पाठवलं. हेतू इतकाच की, त्यांना 'प्रायव्हसी' मिळावी. आपल्याला दिवस गेल्याचंदेखील तिनं नवऱ्यापासून आणि आपल्या बहिणीपासून लपवून ठेवलं. प्रवासाला बाहेर पडल्यानंतर तिरुपतीवरून ते दोघे विशाखापट्टणला नारायणनच्या मामाकडं गेले. तो तिथल्या डॉकयार्डवर मोठा अधिकारी होता. तिकडे दोन-चार महिने ते नवरा-बायको राहिले. जेव्हा ते जोडपं परतलं तेव्हा दुसरी बायकोही गरोदर राहिली होती.

नारायणन जन्मल्यानंतर सातच महिन्यांनी कृष्णनचा जन्म झाला होता. नारायणनची आई आणि कृष्णनची आई दोघी सख्ख्या बहिणी. त्या दोघींच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य होतंच. पण सात महिन्यांच्या अंतरानं जन्मलेल्या या दोन मुलांतदेखील विलक्षण साम्य होतं. तोच चकचकीत कृष्णवर्ण, किंचित चपटं नाक, हनुवटीवर खाच आणि केस दाट व कुरळे. लहानपणी हे दोघे सावत्र भाऊ एकत्र शाळेत जाऊ लागले. त्यातला एखादा गैरहजर असला की मास्तरना निश्चित समजत नसे की कोणता गैरहजर आहे- नारायणन की कृष्णन? इतकं विलक्षण साम्य त्या दोघा भावांत होतं, पण हे साम्य फक्त बाह्यात्कारीच होतं. दोघांच्या स्वभावात मात्र विलक्षण तफावत होती. नारायणन अत्यंत धूर्त, धोरणी आणि दूरदृष्टीचा होता, तर कृष्णन काहीसा उतावीळ, अविवेकी आणि मूर्ख होता. वडिलांच्या मागे त्याच्या वाट्याला आलेले पडाव, पैसा सर्व काही कृष्णननं व्यसनात घालवलं. गेली सात-आठ वर्षे तो असाच भ्रमंती करीत नातेवाइकांना पैशासाठी पिडत होता. खुद्द नारायणनकडून त्यानं आतापर्यंत दहा-पाच हजार रुपये उपटले होते. नारायणनला तो म्हणायचा, "तुला पैसा लागतो कशाला? एकटा माणूस तू! शेठ मनमोहनचा तुझ्यावर नितांत विश्वास आहे. त्याला तू सांगशील ती पूर्व आहे. मला बायको आहे. चार मुली आहेत. एवढा मोठा प्रपंच कसा काय चालवायचा मी?"

त्यावर नारायणन म्हणे, "मला प्रपंच नाही म्हणून मी तुझ्या प्रपंचाचा भार सहन करावा, हा कुठला न्याय? तुझ्या वाटणीला आलेल्या सर्व मालमत्तेची तू विल्हेवाट लावलीस. आता मला कशाला पिडतो?"

पण कृष्णनच्या वागण्यात तसूभरदेखील फरक पडला नाही. तो असाच वर्ष-सहा महिन्यांतून नारायणनकडे टपकायचा. शे-पाचशे, हजार-काय मिळतील ते कनवटीला लावायचा आणि रस्ता सुधारायचा. तो त्या पैशांची कशी वाट लावणार आहे याची नारायणनला पूर्ण कल्पना असे; पण ही ब्याद एकदा डोळ्यांपुढून जावी म्हणून तो त्याला जवळ असतील तेवढे

पैसे द्यायला मागे-पुढे पाहात नसे. पण तो आला की नारायणनचं स्वास्थ्य पार बिघडून जात असे.

निंबर्डीला तो गेल्यापासून कृष्णन आला नव्हता. पण आता तो मुंबईला अल्पकाळासाठी आला असताना नेमका कृष्णननं त्याला गाठला. यावेळी नारायणननं अगदी निर्धार केला होता- यापुढे कृष्णनला आपण निंबर्डीत आहोत याचा अजिबात थांगपत्ता लागू द्यायचा नाही.

कृष्णन टॅक्सी घेऊन आला. या वेळेला त्याची पार अधोगती झाल्यासारखी अवस्था झाली होती. टॅक्सीतून उतरल्या उतरल्याच तो नारायणनला म्हणाला,

"तू मला कितीही चकवलंस तरी मी तुला शोधून काढल्याशिवाय राहणार नाही."

"कृष्णन, काय रे तुझी ही अवस्था!" नारायणननं विचारलं.

"याला जबाबदार तूच आहेस!" कृष्णन चटकन बोलला.

"मी? मी काय केलं?"

"वडिलार्जित सोनं-नाणं होतं ते सारं स्वत: घेतलंस आणि मोडके पडाव माझ्या गळ्यात घातलेस. पण लक्षात ठेव- मी माझा हिस्सा तुझ्या बापाला सोडणार नाही!"

"तुझा बाप आणि माझा बाप भिन्न होते का?"

"कुणास ठाऊक! तुझ्या वर्तनावरून माझा जन्मदाता तुझ्या जन्मास कारणीभूत झाला असावा असं काही मला वाटत नाही!"

नारायणनचं माथं भडकलं. त्यानं उठून ताडकन कृष्णनच्या तोंडात ठेवून दिली.

"हरामखोरा, तू काय बोलतोस याचा अर्थ तुला समजतो का?" नारायणन ओरडला.

"चांगला समजतो!" गालावर मारलेल्या जागी हात ठेवून तो म्हणाला.

"ठीक आहे. तुझा बाप आणि माझा बाप जर एक नसतील तर तू माझ्याजवळ मरायला येतोसच का?"

"मरायला आलो नाही! इतक्यात मरायला मी काही तुझ्यासारखा सडाफटिंग मुळीच नाही! मला बायको आहे, मुली आहेत. त्यांची नीट व्यवस्था लावल्याशिवाय तू म्हणालास तरी मरणार नाही. तू एकत्र कुटुंबाच्या मालकीचे दीड लाख रुपये उचलले आहेस. मला त्यातले अर्धे दिल्याशिवाय मी तुझा पिच्छा सोडणार नाही!"

"कृष्णन, तू गांजाबिंजा ओढून आला आहेस काय?"

"मुळीच नाही. आता मी ते सर्व सोडून दिले आहे. कधीतरी एक दोन पेग पितो. खिशात पैसे असले तर. तू पितोस ना? तू काय लक्षाधीश मॅनेजर! स्कॉच पीत असशील! काही का पिईनास! मला घेऊन काय करायचं आहे म्हणा. पण नारायणन, मला माझ्या हिश्श्याचे पाऊण लाख देऊन टाक. मी पुन्हा तुझ्या वाटेला म्हणून येणार नाही. बोलून चालून तू निपुत्रिक! उद्या काहीतरी झालं आणि तू मेलास की तुझी सर्व मालमत्ता कोणीतरी लफंगा उचलेल. त्यापेक्षा माझ्या प्रपंचाला पैसा मिळाला तर सत्कारणी तरी लागेल!"

नारायणनला मोठ्यानं ओरडून त्याला 'गेट आऊट' म्हणून सांगावंसं वाटलं; पण त्यानं आपला क्रोध आवरला. काही क्षण तो विचार करून म्हणाला,

"मुलींची लग्नं नाही केलीस?"

"हां- दोन मुलींची लग्नं झाली. अजून दोन लग्नाच्या आहेत. मुलींचं शिक्षण पैशाअभावी अर्ध्यात सोडावं लागलं. ते काही असो-तुझ्यासमोर तो सारा इतिहास सांगून काही फायदा नाही. ज्याला बायकोचं काही नाही त्याला मुलं किंवा मुलींबद्दल कितीही सांगितलं तरी काय वाटणार? पण एवढं खरंय, निपुत्रिकांना पैशाचा मोह फार मोठा असतो."

"तुझं म्हणणं काय आहे?" नारायणननं विचारलं.

"मला माझ्या हिश्श्याचे पाऊण लाख रुपये देऊन टाक. मग माझं काहीएक म्हणणं नाही."

"माझ्याजवळ हजार-दोन हजार रुपयेदेखील नाहीत. तुला पाऊण लाख देऊ कोठून?"

"ठीक आहे. ते कसे वसूल करून घ्यायचे ते माझे मी बघतो."

"धमकी देतोस मला?"

"धमकीचा सवाल नाही. जगाला तुझं जे रूप दिसतं ते फसवं आहे. मी एकट्यानंच तुला बरोबर ओळखलेला आहे."

"ठीक आहे."

"मग देण्या-घेण्याचं काय ते बोल."

"माझ्याजवळ तितके पैसे नाहीत."

"आज नसतील. पण नंतर दे. आज मला एक हजार रुपये तरी देशील?"

नाराणननं विचार केला, की उगाच इथं मनमोहनशेठच्या घरी तमाशा करण्यापेक्षा याला एक हजार रुपये देऊन पाठवलेला बरा! त्यानं मनमोहनशेठकडून हजार रुपये घेतले आणि ते कृष्णनला देऊन त्याला वाटेला लावलं. तरीही जाताना तो म्हणाला, "पुन्हा येईन तीन-चार महिन्यांनी, तेव्हा निदान दहा-पाच हजारांची व्यवस्था करून ठेव. सगळी रक्कम एकदमच हवी असं काही नाही."

"बरं बरं! पुन्हा ये मग पाहू."

नारायणनला ठाऊक होते, की हे हजार रुपये घेऊन एकदा त्यानं तोंड काळं केलं की चार-सहा महिने तो आपल्याकडं फिरकत नाही.

कृष्णन निघून गेल्यानंतर नारायणन मनमोहनशेठकडं गेला. संध्याकाळ झाली होती. सूर्य अस्ताला गेला की मनमोहनशेठ बाटली खोलत. याही वेळेला त्यांनी आपल्या खोलीत एअर-कंडिशनर सुरू करून तेच सुरू केलं होतं.

नारायणन आत येताच ते म्हणाले,

"काय म्हणतो बंधुराज?"

"काय म्हणणार? पैसे पाहिजेत! आज त्यानं कमालच केली. पाऊण लाखाची मागणी केलीय."

"तू हजारावर भागवलेलं दिसतं. बरं, ग्लास घे तिथला."

नारायणननं कपाटातला ग्लास घेतला. तो मनमोहनशेठ ज्या भारतीय बैठकीवर बसले होते तेथे त्यांच्या शेजारी येऊन बसला. दोघांनीही एक-एक पेग चढवला आणि मग गप्पा रंगल्या.

"नारायणन, मघा मी तू सांगितलेल्या रवींद्रच्या प्रकरणावर बराचसा विचार केला. तू म्हणतोस तसं ते प्रकरण अगदीच काही दुर्लक्षणीय आहे असं काही मला वाटत नाही."

"अहो, ते दुर्लक्षणीय नाहीच. गंभीर रीतीनं विचार करायला हवा म्हणून तर इथं तुमच्यापर्यंत धावत आलो. माझ्या एकट्याच्या हातून त्यात मार्ग निघण्यासारखा असता तर कशाला आलो असतो इथपर्यंत?"

"इतकी सुंदर आहे का रे ती पोर?"

मनमोहनशेठनी विचारलं. नारायणन गालातल्या गालात हसला आणि म्हणाला.

"शेठ, सांगू? खरं त्या पोरीला बघितल्यानंतर माझ्या किंवा तुमच्या वयाच्या माणसालासुद्धा इतक्यात आपले केस पांढरे व्हायला नको होते असं वाटेल! तिच्या सौंदर्यात

उणं शोधून सापडणार नाही. अस्सल सागरी सौंदर्य आहे ते! रविबाबू तरुण आहेत. त्यांना तिचा मोह झाला यात त्यांची तशी काहीच चूक नाही.'' नारायणननं आणखीन एक घोट घेतला. मनमोहनशेठ हसले आणि म्हणाले, ''नारायणन, अरे अशा गोष्टी या वयातच करायच्या असतात त्यातच गंमत असते. तोंडात दात असतानाच खरपूस भाजलेले चणे फोडून खायचे असतात. दात पडले की उगाच तोंडातल्या लाळेत घोळवून घोळवून ते नरम करायचे अन् हिरड्यांनी चघळायचे याला काय अर्थ आहे?''

नारायणन मनमोहनांच्या त्या उपमेला अंगठा आणि तर्जनी यांचा गोल करून 'काय अचूक बोललात' असा आविर्भाव करून हसत राहिला.

''रवी तिथं रमला पाहिजे. त्यासाठी काहीही करावं लागलं तरी हरकत नाही. आपण आठ-दहा लाखांचं भांडवल जिथं गुंतवलं आहे तिथं रवी रमला नाही तर काही उपयोग नाही.''

''ते रमले होते, मालक. त्यांना चर्चच्या टेकडीवरचं आऊट-हाऊस अगदी अद्ययावत करून दिलंय. जेवणासाठी गोव्यातून एक दर्दी असा कुक आणलेला आहे. पण त्यांनी त्या सुबीला बघितल्यापासून एकसारखा तिच्या नावाचा जपच चालवलेला आहे! त्यात ती दुसरी कोणी असती तर पर्वा नव्हती. तिच्या आईबापाच्या तोंडावर दहा-पाच हजार फेकले असते. गप्प बसले असते. पण साला तो रासू सारंग म्हणजे साधा आदमी आहे! दर्यावरून वाहणाऱ्या वाऱ्याचा वास घेऊन सांगतो रापण बरी होईल की वाईट होईल. निंबर्डीच्या लोकांमध्ये त्याच्या शब्दाला फार मोल आहे. तो फादर मॅथ्यूस आहे ना, ते एक प्रस्थच आहे! पहिल्या दिवसापासून आपल्याकडं साशंकतेनं बघतोय थेरडा!''

''पण तू त्याला कह्यात घेतलास ना?''

''माझ्याशी तसा तोंडावर बोलतो-चालतो; पण साल्याच्या मनात काय आहे याचा अंदाज लागत नाही. मी चर्च कौन्सिलकडून त्याच्या ताब्यातले ते क्वार्टर्स घेतले म्हणून माझ्याविषयी त्याच्या मनात आकस असण्याची शक्यता आहे. आणि सीतूचं जमलं ते त्या म्हाताऱ्याच्या घरीच!''

मनमोहनशेठ ग्लास ओठाला लावून म्हणाले,''माणसाला असं एक वय प्राप्त होतं, की त्या वयात आपल्याला जे करता येत नाही ते दुसऱ्याला करायला लावून आपण गंमत बघत बसायला बरं वाटतं! तसलाच प्रकार म्हाताऱ्याने केलेला दिसतो हा.''

नारायणन हसला आणि म्हणाला, ''जोक अपार्ट. पण शेठ, खरंच म्हाताऱ्याचा त्या दोन्ही पोरांवर खूप जीव आहे. ती दोघंही त्याच्यावर प्रेम करतात.''

''ते काही असो- रवी तिथं रमला पाहिजे एवढंच मला ठाऊक आहे''

''पण ती पोर त्यांना सहजासहजी मिळणार नाही हेही तितकंच खरं आहे.''

''पाण्यासारखा पैसा खर्च करू!''

''नाही! शेठ, जगात सर्वांनाच पैशानं विकत घेता येत नाही, तसं असतं तर जगातल्या सर्व सुंदर स्त्रिया पैसेवाल्यांच्या बायका किंवा रखेल झाल्या असत्या. सीतू सारंगाजवळ पैसा नाही. आता कुठं फॅक्टरीत तो कामाला येतो म्हणून चार पैसे मिळतात त्याला. बापाकडं चुकूनही पैसे मागत नाही. अत्यंत स्वाभिमानी आहे.''

''भिकाऱ्यांनी स्वाभिमान का बाळगावा रे?''

नारायणन त्यावर हसला आणि म्हणाला, ''त्यांच्याजवळ स्वाभिमान असतो म्हणूनच आपल्याला आपल्या पैशांचं मोल किती अल्प आहे याची जाणीव होते.''

''साला तू आज असा बोलू लागला आहेस की मला स्कॉचची नशाच चढेनाशी झालीय!''

''ती नशा उतरवण्याचं सामर्थ्य आहे की नाही त्या दरिद्री लोकांत?''

''मला काहीएक सांगू नकोस. सुदैवानं आपल्या फॅक्ट्यांना उत्तम अशी जागा मिळालेली आहे. गेल्या दोन महिन्यांत चाळीस-पन्नास हजारांचा निव्वळ नफा राहिला. व्हाईट प्रॉन्स सीझनला चांगला 'कॅच' झाला तर अमेरिका आणि जपान इथली बाजारपेठ कब्जात घेता येईल आणि हे सर्व व्हायचं असेल तर.....''

''रवी तिथं रमला पाहिजे.''

यावेळी नारायणननं मनमोहनशेठचं वाक्य पुरं केलं तेव्हा मनमोहनशेठनी खूष होऊन नारायणनच्या हातावर टाळी दिली आणि दोघेही मनसोक्त हसले.

जेवायला उठण्यापूर्वी आणखीन एक-एक राऊंड झाला. डायनिंग रूमकडं जाताना नारायणन म्हणाला,

''शेठ, मी एक आठ दिवस गावी जाऊन येतो. कृष्णनच्या दोन पोरींची लग्नं अजून व्हायची आहेत असं आजच त्यानं सांगितलं. मला जरी अपत्यं नसली तरी माझ्या भावाची म्हणून मला त्यांचं काहीतरी पाहणं जरुरीचं आहे.''

''जा!जा! खुशशाल जा! पण परत आल्यानंतर मात्र रवीचं हे निंबर्डीतलं लफडं मिटायला हवं.''

०००

# पंधरा

तसं पाहिलं तर नारायणनला कृष्णनच्या मुलींच्या लग्नाची बिलकूल चिंता नव्हती. पण त्यांना काहीतरी करून उजवून टाकलं की मुलींच्या लग्नासाठी पैसे हवेत म्हणून कृष्णनला वारंवार पैसे मागायला मार्ग राहणार नाही, अशी त्याची समजूत होती.

बऱ्याच वर्षांनंतर तो अर्नाकुलमला येत होता. गावी खूप सुधारणा घडल्या होत्या. नवीन इमारती उठल्या होत्या. उद्योगधंदे निर्माण झाले होते. तो 'सी लॉर्ड' या आलिशान हॉटेलात उतरला. दुपारी तो कृष्णनच्या घरी गेला. पण मुंबईहून हजार रुपये घेऊन गेलेला कृष्णन अद्याप गावी परतला नसल्याचं त्याच्या पत्नीनं नारायणनला सांगितलं तेव्हा त्याला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला,

"काय बेजबाबदार माणूस आहे?"

"तुम्ही त्याला पैसे का देता?" कृष्णनच्या पत्नीनं -राधानं-नारायणनला विचारलं.

"का देता म्हणजे? माझ्या बोकांडी बसून तो पैसे घेतो. या खेपेला तर त्यानं कहरच केला. पाऊण लाखाची मागणी केलीय त्यानं."

"एक पैसा देऊ नका त्याला. त्या नादान माणसानं आमचा सत्यानाश केला!" राधा संतापानं म्हणाली.

"दोन मुलींची लग्न केली ना?" नारायणननं विचारलं.

"कसली लग्नं नि कसलं काय! घर सोडून गेल्या झाल्ं. आता राहिलेल्या दोन मुलींच्या नावावर सगळ्या नातलगांकडून पैसा गोळा करतो आणि नशेत घालवतो."

"कसली नशा करतो?"

"अफू खातो, दारू पितो- नशेचे सर्व प्रकार करतो. मरेल म्हटलं तर मरतही नाही!"

राधा पोटतिडिकीनं बोलत होती. इतक्या वर्षांनी नारायणन गावी येतो आहे, तेव्हा प्रथम जिवाभावाच्या चार गोष्टी कराव्यात याचंही तिला भान राह्यलं नाही. ती एकसारखी बोलत होती.

"गेल्या साली हा नीच माणूस पाच हजार रुपये घेऊन पोटच्या पोरी अरबांना विकायला तयार झाला होता. मुंबईला दोन स्थळं आहेत म्हणून पोरींना घेऊन गेला होता तिकडं; पण पोरींना खरा प्रकार समजताच त्या तिथून पळून आल्या."

"इथपर्यंत त्याची मजल गेली?"

"आजारानं माझं शरीर कृश झालं म्हणून मीही बचावले; नाहीतर मलादेखील यानं धंद्याला लावलं असतं!" राधा अश्रू पुसता पुसता म्हणाली.

"अरेरे! हा कृष्णन इतक्या अधोगतीला गेला असेल याची मला कल्पना नव्हती."

"तुम्ही गाव सोडलंत आणि चांगले सुखात राह्यलात. इकडे मागची माणसं जिवंत आहेत का मेलीत याचीसुद्धा चौकशी केली नाहीत! लग्न करून घेतलं नाही ना?"

"नाही. तो व्याप मागे लावून घेतला नाही हे एका अर्थी बरंच झालं!"

"पण तुमचा भाऊ काय म्हणतो तुमच्याबद्दल, आहे ना ठाऊक!"

''काय म्हणतो?''

''म्हणतो, गरज बाहेरच्या बाहेर भागते. मग लग्नाच्या फंदात कशाला पडेल?''

''असं म्हणतो?''

''तर काय! विचारा तुमच्या पुतण्यांना!'' राधानं कल्याणी आणि सीता यांना बाहेर बोलावलं.

दोघीही वयात येऊन पाच-सहा वर्षं लोटली होती. बाप बेजबाबदार असल्यानंतर मुलींच्या चेहऱ्यावर जीवनाबद्दल जी एक बेपर्वाई दिसते तीच नारायणनला त्या दोघींच्या चेहऱ्यावर दिसली. त्या दोघींच्या चेहऱ्यावरून आणि हावभावांवरून त्या घरच्या दारिद्र्याला वैतागलेल्या दिसल्या. नारायणनला त्या पोरींची ती दशा पाहून वाईट वाटलं- कृष्णनचा मनस्वी संताप आला.

राधा साडीच्या टोकानं अश्रू टिपत म्हणाली,

''या पोरींची मी काहीही व्यवस्था लावेन- पण तो नादान माणूस या घरी परत यायला नको!''

नारायणन सचिंत होऊन बसला होता. काही क्षणानंतर घसा साफ करून तो म्हणाला,

''राधा, चिंता करू नको. या पोरींना उत्तम स्थळ शोधून काढ. लग्नाचा खर्च मी करीन. पण यातलं काहीएक कृष्णनला कळता कामा नये. तो उलट्या काळजाचा आहे. काहीतरी अडचण निर्माण करून ठेवील.''

नारायणननं पँटच्या खिशातून पाकीट काढलं आणि राधाकडं पाचशे रुपये दिले. तो म्हणाला, ''मी एक-दोन महिन्यांनंतर येऊन जाईन, त्यावेळी या दोन्ही पोरींची लग्नं उरकून टाकू. तू स्थळ शोधून ठेव.''

''मी कुठली स्थळं शोधू? तुमच्या भावानं आम्हाला कवडीमोल करून टाकलेलं आहे. आम्हाला कोणी दारात उभं करून घेत नाही. आता अलीकडं केरळात मुलींना फूस लावून पळवून नेण्याचे प्रकार फार वाढलेत. म्हणून या दोघींना मी घराबाहेर सोडत नाही.''

''हांऽऽऽ!'' सिगारेट शिलगावून नारायणन म्हणाला, ''मध्यंतरी मीही पेपरमध्ये वाचलं होतं. मुंबई-कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरी वेशाव्यवसाय करण्यासाठी इथल्या मुलींना पळवून नेणारी एक टोळी पोलिसांनी पकडली होती.''

''त्यासाठीच मी मुलींना घराबाहेर सोडत नाही. पण देवाला स्मरून सांगते हो, तुमचा भाऊ या पोरींना पैशांसाठी विकून टाकेल. तो इकडे परत आला नाही तर फार बरं होईल.''

नारायणननं जळलेली सिगारेट जमिनीवर विझवली. तो म्हणाला,

''तो इकडे आला तर माझ्याकडं पाठवा. तो तुम्हाला पुन्हा उपद्रव देणार नाही याची मी व्यवस्था करीन. येतो मी.''

''थांबा, या घरात येऊन काहीच न घेता गेलात, असं होऊ नये,'' राधा आत गेली. तिच्यापाठोपाठ त्या मुलीही आत गेल्या पण नारायणनला खायला देण्यासारखा एकही पदार्थ घरात शिल्लक नव्हता. परवाच्या वाऱ्यानं परसातल्या माडावरचा एक कोवळा नारळ पडला होता. तेवढाच एक शिल्लक होता. कल्याणीनं ते शहाळं सोललं आणि त्याचं एक बाजूचं टोपण काढून ते नारायणनच्या हाती दिलं. नारायणन ते शहाळं प्याला आणि उठला.

तो जेव्हा हॉटेलवर परतला तेव्हा संध्याकाळ झाली होती. हॉटेलच्या गच्चीवर उभं राहून त्यानं पश्चिमेकडं पाहिलं. इथंही रापणीला गेलेली गलबतं परत किनाऱ्याकडं येत होती. पण त्यात अत्याधुनिक अशा लाँचेस फारच कमी होत्या. केरळात सृष्टिसौंदर्य जसं अमाप आहे तसंच दारिद्र्यही आहे.

जे मुळात श्रीमंत होते ते अधिक श्रीमंत झाले होते आणि जे गरीब होते ते अधिकच दारिद्र्याच्या गर्तेत बुडाले होते. मधला असा वर्गच शिल्लक नव्हता.

नारायणन विचार करू लागला. कम्युनिझम केरळात झपाट्यानं रुजला याचं एकमेव कारण म्हणजे इथलं दारिद्र्य. पोटाला मिळेनासं झालं की लोक कुठल्याही 'इझम' कडे आकर्षित होतात. दोन वेळा पोट भरावं, एवढीच एक इच्छा असते अशा लोकांची.

पण आज नारायणनला केरळच्या आर्थिक अन् सामाजिक स्थितीशी फारसं कर्तव्य नव्हतं. त्याला दोन विवंचना ग्रासत होत्या. त्यातली एक होती रवीची. रवी निंबर्डीत रमायला हवा होता आणि दुसरी चिंता होती कृष्णनच्या मुलींची. त्या सुखरूप राहायच्या असतील तर कृष्णन परत अर्नाकुलमला यायला नको होता.

सूर्य अस्ताला गेल्यानंतर नारायणननं हॉटेलातल्या खोलीतली बेल दाबली. वेटर धावत आला. ''ग्लास और सोडा लाओ,'' नारायणननं ऑर्डर दिली.

त्यानं 'वॅट सिक्स्टी -नाईन' ची बाटली बॅगेतून बाहेर काढली. ज्या ज्या वेळी त्याच्यासमोर एखादी समस्या उभी राहात असे त्या त्या वेळी तो व्हिस्कीचे तीन-चार पेग घेई आणि विचार करीत आरामखुर्चीवर पडून राही. आजही त्यानं तेच केलं.

रवी निंबर्डीत रमेल आणि कृष्णन परत अर्नाकुलमला येणार नाही, या समस्या कशा सुटतील याचा तो बराच वेळ विचार करीत राहिला.

समुद्रावरून येणाऱ्या भिरभिरत्या वाऱ्यानं वॅटची धुंद नशा त्याच्या मस्तकात भिनत होती. ड्रिंक्सनंतर जेवायला हवं याचंही त्याला भान राह्यलं नव्हतं. गच्चीतल्या आरामखुर्चीत त्याला झोप केव्हा लागली, हेच समजलं नाही.

पहाटे तीनला जाग आली. आपण उपाशीच झोपी गेल्याचं त्याला आठवलं. भूक लागली होती. पण हॉटेलात अशा अपरात्री कोणी जागं नसणार म्हणून तो गच्चीतून आत आला आणि कॉटवर आडवा झाला. मघा निद्रेमुळे थांबलेले विचार पुन्हा त्याच्या डोक्यात थैमान घालू लागले. कशा सुटणार या दोन्ही समस्या?

रवी निंबर्डीत रमायला हवा- आणि कृष्णन परत इकडे यायला नको!

०००

# सोळा

निंबर्डीच्या किनाऱ्यावर माणसांची तोबा गर्दी जमली होती. भरती ओसरून गेलेल्या किनाऱ्यावर नारायणनचे प्रेत पडले होते. प्रेताभोवती पोलिसांनी कडे केले होते. लोकांना पुढे जाऊ दिले जात नव्हते. फौजदार इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात गुंतले होते. दोन पंच त्याठिकाणी हजर होते. हवालदार पंचनाम्यातला मजकूर लिहीत होता आणि लिहून झालेले प्रत्येक वाक्य पंचांना वाचून दाखवत होता. पंचनाम्यातला मजकूर हा प्रेताच्या परिस्थितीशी मिळता-जुळता आहे की नाही याची खात्री करून घेत होता. संपूर्ण पंचनामा लिहून झाल्यानंतर त्यानं तो सुरुवातीपासून वाचायला सुरुवात केली.

"आज रोजी आपण आम्हा पंचांस समुद्रकिनाऱ्यावर पंचनाम्यासाठी बोलावलेवरून हजर होऊन लिहून देतो. पंचनामा असा की, निंबर्डी गावच्या पश्चिम किनाऱ्यावर वाळूमध्ये पुरुष जातीचे एक पे्रत पडले असून ते थोडे सडलेल्या अवस्थेत आहे. येथे हजर असणारे कॅनिंग फॅक्टरीचे मालक रवींद्र हे सदरचे प्रेत त्यांचा मॅनेजर श्री. नारायणन यांचे असल्याचे खात्रीपूर्वक सांगत आहेत. प्रेताच्या अंगावरील कपडे, प्रेताच्या हातातील घड्याळ व गळ्यातील सोन्याची चेन या वस्तू मॅनेजर नारायणन यांच्या असल्याच्या व फॅक्टरीचे मालक रवींद्र यांना ओळखत असून प्रेताच्या डाव्या हातातील पट्टीवर 'व्ही. नारायणन' या नावाची इंग्रजी अक्षरे कोरलेली आहेत. या सर्व वस्तूंवरून सदरचे प्रेत हे मॅनेजर नारायणन यांचेच आहे अशी आम्हां पंचांची खात्री झालेली आहे.

मयत सुमारे पन्नास वर्षांचा असून त्याच्या मानेवर चाकूसारख्या धारदार शस्त्राने जखमा झाल्याच्या खुणा दिसतात. सदरचे मॅनेजर..."

त्या प्रदीर्घ पंचनाम्यातल्या मजकुरावरून नारायणन याचा खून करून त्याचे प्रेत कोणीतरी आत समुद्रात नेऊन फेकून दिले असावे, असे स्पष्ट दिसून येत होते. प्रेत सडल्यानंतर ते तरंगत किनाऱ्यावर लागले होते.

हा पंचनामा झाल्यावर फौजदारांनी नारायणनच्या प्रेताचे पोस्टमार्टेम करण्यासाठी तालुक्याच्या डॉक्टरना बोलावले. प्रेताचा काही भाग सडलेल्या अवस्थेत असल्याने पे्रत तपासणीसाठी तालुक्याला घेऊन जाणे अशक्य होते. डॉक्टरांनी नाकाला कापड बांधले होते. तरीही प्रेताची दुर्गंधी मस्तकात जाऊन भिडत होती. तपासणी करताना प्रेताच्या अंगावरच्या वस्तू काढून बाजूला ठेवल्या होत्या. त्या जप्त करून नंतर ताब्यात घेण्यात आल्या. मयतास मृत्यू निश्चित कोणत्या कारणाने आला ते प्रेत सडल्यामुळे सांगणे अशक्य आहे असे डॉक्टरांनी तपासणी करताना सांगितले. पण मॅनेजर नारायणन यांचा खून झाला आहे व खून केल्यानंतर त्यांच्या मारेकऱ्याने त्यांचे प्रेत दूर समुद्रात नेऊन टाकून दिले आहे, अशी फौजदारांची खात्री झाली. प्रेतावर वार झाल्याच्या काही खुणा होत्या.

प्रेताची तपासणी करताना डॉक्टरनी असाही निर्वाळा दिला की, मयतास ठार मारल्यानंतर त्याचे प्रेत पाण्यात टाकून देण्यात आले आहे. प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी प्रेत वारसांच्या ताब्यात देणे प्राप्त होते. पण नारायणनला निंबर्डीत जवळचे कोणीच वारस

नसल्याने रवींद्रने ते अंत्यसंस्कारासाठी स्वीकारले.

त्या दिवशी सकाळी किनाऱ्यावर नारायणनचे प्रेत पाहिल्यानंतर रवींद्रने तात्काळ मनमोहनशेठ यांना मुंबईला ट्रंककॉल करून ही वार्ता कळवली होती. त्यावेळी 'तात्काळ निघतो आहे.' असं त्यांनी फोनवर सांगितलं होतं. पेरताची विल्हेवाट लावण्यासाठी प्रेत जरी रवींद्रने आपल्या ताब्यात घेतले असले, तरी प्रेतावर अंत्यसंस्कार करण्यासाठी त्याने थोडा वेळ थांबण्याचा निर्णय घेतला. मनमोहनशेठ मुंबईवरून खास मोटारीने निघाले होते. नारायणनचे प्रेत थोडेफार सडलेच होते त्यामुळे आणखीन थोडावेळ थांबल्याने फारसे काही बिघडणार नव्हते. तरीही रवींद्रला फार काळ थांबावे लागले नाही. मनमोहनशेठ निंबर्डीला दुपारपर्यंत दाखल झाले.

ज्या नारायणनच्या आधारावर लाखो रुपये निंबर्डीसारख्या आडवळणी गावात गुंतवले होते त्या नारायणनचा असा दु:खद अंत व्हावा या घटनेनं ते शोकाकुल झाले होते. दु:खावेग ओसरल्यानंतर त्यांनी रवींद्रला विचारलं.

"असं कसं झालं हे?"

"गेले दोन दिवस मॅनेजर कुठं दिसलेच नाहीत. खूप शोधाशोध केली; पण ते कुठं गेलेत हेच समजेना. आज सकाळी लोकांना त्यांचं प्रेत आढळलं इथं."

"तपासणी झाली?"

"हो. आताच तपासणी करणारे डॉक्टर गेले. त्यांनी खुनाचा प्रकार असल्याचं मत दिलं आहे."

बाजूलाच तालुक्याचे फौजदार उभे होते. त्यांच्याजवळ जाऊन मनमोहनशेठ म्हणाले,

"अहो, तुम्ही अजून गप्प कसे? माझ्या मॅनेजरचा खून झालाय खून! याचा खुनी कोण आहे तो त्वरित उजेडात यायलाच हवा!"

इतक्यात तिथं हातातली काठी टेकीत टेकीत माथुकाका आले. त्यांनी नारायणनच्या प्रेताकडं पाहून गळ्यातल्या क्रॉसला स्पर्श केला आणि ते तोंडातल्या तोंडात म्हणाले,

"मे हिज सोल रेस्ट इन पीस." जवळ असलेल्या मनमोहनशेठ उद्देशून ते म्हणाले.

"यांच्या मृत्यूनं तुमचं कधीही न भरून येणारं नुकसान झालेलं आहे. मी तुमच्या दु:खात सहभागी आहे."

मनमोहनशेठ भिवया उंचावून म्हणाले, "फादर, अशी मला पोकळ सहानुभूती दाखवून काय कामाची! याचा खुनी कोण आहे ते शोधण्याच्या कामी तुम्ही पोलिसांना साहाय्य करायला हवं आहे."

"आय प्रॉमिस. मी आपणाला सर्वतोपरी साहाय्य करीन. गुन्हेगार कोण आहे हे उजेडात यायलाच हवं. मनुष्यवध हा सर्वांत हीन प्रकारचा गुन्हा आहे. ही शॅल नॉट बी पार्डनड् बाय द लॉर्ड!"

नारायणनच्या प्रेताला त्याच ठिकाणी अग्नी देण्यात आला. सूर्योदयापासून किनाऱ्यावर जमलेल्या लोकांची गर्दी सूर्यास्ताला प्रेत दहन केल्यानंतर ओसरली. निंबर्डीत असा भीषण प्रकार अद्याप घडलेला नव्हता; त्यामुळं तिथली सर्व माणसं भयभीत झाली होती. नारायणनच्या खुनाबद्दल आपापसांत चर्चा करीत, कुजबुजत आपआपल्या घरी ती परतली होती.

तालुक्यावरून जिल्ह्याच्या ठिकाणी एक्सप्रेस रिपोर्ट गेल्याने डी. वाय. एस.पी., सर्कल पोलीस इन्स्पेक्टर असे वरिष्ठ पोलीस अधिकारीही मध्यरात्रीला निंबर्डीत येऊन दाखल झाले. दुसरा दिवस उजाडला. माथुकाकांच्या खोलीत रासू सारंग, सीतू, सुबी हे सचिंत होऊन

बसले होते. गावात चाललेली कुजबूज सीतूच्या विरुद्ध होती. नारायणनने सुबीला कामावरून काढून टाकले म्हणून सीतूनेच त्याचा खून करून त्याचे प्रेत होडीतून खोल समुद्रात नेऊन फेकून दिले असा बऱ्याचजणांचा तर्क होता. काहीजणांनी मॅनेजरची जागा आपल्यालाच हवी म्हणून रासू सारंगानं या खुनाचं कारस्थान रचलं असलं पाहिजे, असा अंदाज करायला कमी केले नाही. काहीजणांनी माथुकाकांचा हात या प्रकारात असावा, अशी शंका व्यक्त केली. कौन्सिलचा दबाव आणून जागेवर कब्जा केला म्हणून माथुकाकांनीच हे कारस्थान रचून रासू आणि सीतू यांच्या मदतीने नारायणनचा खून केला असावा, इथपर्यंत लोकांच्या कल्पनेची भरारी गेली. पण खरंच सत्य काय होतं हे शेवटी पोलिसांनाच शोधावं लागणार होतं आणि पोलिसांनी शोधलेलं ते सत्यच होतं हे शेवटी न्यायालयातच ठरणार होतं.

लोकांतली कुजबूज वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या कानापर्यंत पोहोचायला वेळ लागला नाही. नारायणनबद्दल द्वेष असावा असं पोलिसांना वाटणारी ही तीन माणसं- माथूकाका, रासू सारंग आणि सीतू या तिघांना डी.वाय. एस. पी. नीं बोलावणं केलं. प्रथम त्यांच्यासमोर उभे केले गेले ते माथुकाका!

"येस, फादर-" डी. वाय. एस.पीं. नी विचारलं, "हा खून कोणी करावा? तुमचा काय अंदाज आहे?"

"मी काय सांगू? माझी मतीच चालेनाशी झालेली आहे. नारायणनला मारावं असं वाटणारा एकही माणूस या निंबर्डीत नाही."

डी. एस. वाय. पी. मोठ्यानं हसून म्हणाले, "मग काय त्याला भुताखेतानं मारला?"

"तसं नाही म्हणत मी; पण त्याचा मारेकरी हा निंबर्डीतला नक्कीच नाही."

"फादर, त्याचा मारेकरी निंबर्डीतलाच आहे!"

"मला नाही तसं वाटत."

"सीतूच्या बायकोला नारायणननं कामावरून दूर केलं होतं." पाण्यात गळ टाकावा अन् पाहात राहावं अशा आविर्भावात डी. वाय. एस. पी. माथुकाकांकडे पाहात राहिले.

"हां, ते मला समजलं होतं. पण क्षुल्लक कारणावरून सीतूनं त्याला जिवानिशी मारलं असावं असं वाटतं तुम्हाला?"

"तसं वाटण्याला खूप वाव आहे. आमच्याजवळ जो पुरावा आलेला आहे. त्यावरून नारायणनचा खुनी हा सीतूशिवाय दुसरा कोणीच नाही अशी आमची खात्री आहे."

"काय पुरावा आहे तसा तुमच्याजवळ?"

"थांबा, अरे फटू, इकडं ये."

आतल्या खोलीत फटू भंडारी बसला होता. तो बाहेर आला. त्याला उद्देशून डीवाय. एस.पी. म्हणाले, "सांग, परवा संध्याकाळी काय प्रकार बघितलास?"

"परवा संध्याकाळी सात वाजता मी भाटगरवाडीकडून परत येत होतो, तेव्हा सीतू आणि मॅनेजर वाडीच्या कोपऱ्यावर होडीतून चालले होते."

"पाहा फादर, डॉक्टरांनी नारायणनला मृत्यू आलेली जी वेळ सांगितली आहे ती या वेळेशी मिळती-जुळती आहे. शिवाय आणखीन लाँचवरच्या झिंगू दालद्यानं त्या दोघांना किनाऱ्यापासून आत आठ वाव अंतरावर पाह्यलेलं आहे."

"साफ खोटं! सीतू परवा दिवसभर माझ्याजवळ होता." माथुकाका ताडकन म्हणाले,

"फादर, तुम्ही धर्मगुरू आहात. तुमच्याकडून सत्य लपवण्याचा प्रयत्न अपेक्षित नाही."

"मी सत्य लपवीत नाही. तुम्हाला जे कोणी सांगतात ते धादांत खोटं सांगत आहेत!"

थरथरत माथुकाका म्हणाले.

"ते खरं की खोटं हे आता न्यायालयात ठरेल."

"अहो, पण सीतूला जेव्हा शेटे सावकाराच्या प्रकरणी पोलिसांनी पकडलं होतं, तेव्हा नारायणननेच त्याला सोडवून आणलं होतं. आपल्या उपकारकर्त्यावर तो उलटेल कसा?"

"माणसं कृतघ्न असतात. उपकारकर्त्यांचा घात करायला ती मागे-पुढे पाहत नाहीत."

"पण नारायणनला मारून सीतूला काय स्वार्थ साधायचा होता?"

"स्वार्थ? तो त्याला साधायचा होता की त्याच्या बापाला हे अजून आम्हाला समजलेलं नाही. पण तेही समजेल लवकरच. शिवाय नारायणनच्या खुनाला तुमचंही प्रोत्साहन असावं असं काहीजणांना वाटतं. तुम्ही कंपनीच्या मालकाला राहायला जागा द्यायला तयार नव्हता, म्हणून नारायणननंच चर्च कौन्सिलकडून ती जागा मिळवली म्हणून तुमचाही त्याच्यावर रोष होता.

कपाळावर हात मारून घेत फादर मॅथ्यूस म्हणाले, "ओ लॉर्ड! दे नो नॉट व्हॉट दे आर सेइंग!" त्यांनी हवेत हात उडवले आणि मान हलवीत ते बाहेर पडले.

पोलिसांनी सीतूला अटक केली. सीतू आणि नारायणन यांना होडीतून एकत्र जाताना पाहणारी दोन माणसे होती. एक होता फटू आणि दुसरा झिंगू दालदी.

नारायणननं सुबीला कामावरून काढून टाकली, कारण ती मनापासून काम करीत नव्हती, असं सांगणारे चार-दोन साक्षीदार पोलिसांना मिळाले. रासू सारंगाला मॅनेजरची जागा हवी होती आणि त्यासाठी त्यानं आपल्याकडे तीन-चार वेळा विनंती केली होती असं खुद्द रवीनं पोलिसांना निवेदन दिलं.

डी. एस. वाय. पी. फौजदारांना उद्देशून म्हणाले, "लास्ट सीन टुगेदर आणि इव्हिडन्स ऑफ मोटिव्ह इतका स्ट्राँग असल्यावर आणखीन कशाची गरज आहे?"

"बरोबर आहे सर. पण सीतूचे आणि नारायणनचे संबंध जर बरे नसतील तर ते सीतूसोबत होडीतून एकटे जातीलच कसे?"

"बाहेरून सीतू तसं दाखवत नसेल."

"पण तो पोऱ्या तसा वाटत नाही सर."

"फौजदारी खटल्यात कोणाला काय वाटतं याला महत्त्व नसतं हे ठाऊक आहे ना तुम्हाला?"

"हो."

"मग उगाच पाण्यात चाचपडत बसू नका. याच दिशेनं गुन्ह्याचा तपास करा आणि सीतूवर तीनशेदोन कलमाखाली खटला पाठवून द्या."

"सर!" फौजदार म्हणाले,

"बोला!"

"सीतू वयानं लहान आहे."

"लहान म्हणजे? एकोणीस-वीस वर्षांचा आहे ना?"

"हो."

"म्हणजे तो ज्युव्हेनाईल नाही. रेग्युलरच केस चालेल."

"त्या अर्थानं नाही मी म्हणत. पण असं भयंकर धाडस त्याच्या हातून शक्य आहे का, याचा थोडा सखोल विचार करायला हवा."

"हे पाहा, मी सांगतो ती तपासाची दिशा धरा मग पुढे काय व्हायचं ते होऊ दे."

"येस, सर."

मार्गदर्शन करणाऱ्या डीवाय. एस. पी. नी तसा आदेश दिल्यानंतर फौजदारांना फारसा विचार करायला वाव उरला नाही. रवींद्रनं डी. वाय. एस. पी. साहेबांची उत्तम बडदास्त ठेवली होती. साहेब लाँचमध्ये मुक्कामाला राहिले. रात्री तिथंच मनमोहनशेठ यांच्यासोबत 'ओली' पार्टी झाली. त्या पार्टीत साहेबांनी सीतूला शिक्षा होण्याच्या दृष्टीनं जे जे करणं अत्यावश्यक आहे ते करण्याचं वचनही दिलं.

दुसऱ्या दिवशी त्या गुन्ह्याच्या तपासाने अधिकच गती घेतली. भाटगरवाडीच्या किनाऱ्यावर सीतू आणि नारायणन यांना होडीतून आत जाताना पाहणारा फटू भंडारी सांगू लागला, की ती होडी जेव्हा परत किनाऱ्यावर आली तेव्हा तीत सीतू एकटाच होता. शिवाय नारायणनच्या शरीरावर ज्या जखमा दिल्या त्या ज्या चाकूने केल्या गेल्या तो चाकूही त्या होडीत खालच्या बाजूस खुपसून ठेवला होता. तो सीतूनं पंचांसमक्ष काढून दिला. त्या चाकूला मयताचं रक्त लागलेलं होतं. त्या चाकूचाही पंचनामा करण्यात आला. गुन्ह्याचा तपास इतक्या काटेकोरपणे केला जात होता की, आता सीतूच्या बाजूनं लढायला कितीही मोठा कायदेपंडित आणला तरीही कोर्टात त्याची सुटका होणं शक्य नव्हतं.

रासू सारंग एकटा धावपळ करीत होता. टाहो फोडून लोकांना सांगत होता, माझा सीतू निरपराध आहे. त्यानं हा खून केलेला नाही. पण एकेकाळी त्याच्या अर्ध्या वचनात असलेली निंबर्डी आता फिरली होती. त्याच्या शब्दांवर कोणी विश्वास ठेवायला तयार नव्हतं.

पोलीसखात्यानं केलेला गुन्ह्याचा तपास रास्त आहे असंच प्रत्येकाला वाटत होतं. रासू सारंगाची झोप उडाली. इंचभर दाढीचे खुंट हनुवटीवर वाढले. डोळ्यांत भेसूर छटा दिसू लागली. समुद्रकिनारी बसून तो धाय मोकलून रडत बसू लागला.

फादर मॅथ्यूस! माथुकाकांचीही जवळजवळ तशीच अवस्था झाली होती. पण ते रडत नव्हते. ते एकसारखी प्रार्थना करत होते.

"ओ लॉर्ड! माय चाइल्ड इज इनोसंट. यू अलोन कॅन रेस्क्यु हिम."

पण आज त्यांचा जीझस सीतूची सुटका करण्याला असमर्थ होता खरा.

पदी सुबीच्या गळ्यात पडून अहोरात्र अश्रू ढाळत होती. सीतूच्या हातून असलं अघोरी कृत्य कधीच घडणार नाही याची तिला खात्री होती. पदीला आपल्या मुलावर आलेला आरोप हा खोटा आहे असं वाटणं साहजिक होतं परंतु सीतू निरपराध असल्याची खात्री होती.

सुबीला मात्र सत्य परिस्थिती काहीतरी निराळी आहे याचा संशय येत होता. नारायणननं तिला तडकाफडकी कामावरून दूर करणं हे तिच्या मनाला खटकलं होतं. पण तिला कामावरून दूर करण्याच्या घटनेशी नारायणनच्या खुनाचा काही संबंध असेल असं काही तिला वाटेना. सुबीचा गर्भपात झाला त्या वेळी सीतू ढसाढसा रडला होता, "मी कुणाचं काही नुकसान न करता माझ्यावर देवानं अशी अवकृपा का करावी?' म्हणून त्यानं चर्चमधल्या बाप्पाला कितीतरी वेळा विचारलं होतं. शेवटी माथुकाकांनी त्याची समजूत घातली तेव्हाच तो शांत झाला होता. सीतूचा हळवा स्वभाव तिला पूर्ण परिचित होता. भिकू-सुबीचा बाप-दोरपुलावरून खाडीत पडून मेला तेव्हादेखील सीतू अस्वस्थ झाला होता. चार दिवसांसाठी माथुकाकांकडे राहायला आलेले परदेशी पाहुणे अॅडॅम्स, ब्राऊन आणि रॅटक्लिफ जेव्हा परत जायला निघाले तेव्हादेखील सीतूच्या गालांवरून घळघळ अश्रू वाहिले होते. या जन्मात आता यांची पुन्हा भेट होईल की नाही या जाणिवेनं सीतू केविलवाणा चेहरा करून बसला होता. अशा भावनाप्रधान आणि कोमल मनाच्या सीतूच्या हातून मनुष्यवधासारखा क्रूरपणा कदापिही घडणार नाही अशी तिची मनोदेवता तिला सांगत होती. पण ती बिचारी मूकरुदनाशिवाय दुसरं काहीच करू शकत नव्हती. सुबी पदीला रडू नको म्हणून सांगता सांगता स्वत:च रडत

राहायची.

पोलिसांनी अटक केलेल्या सीतूची मनोव्यथा या सर्वांच्याहून अगदी भिन्न होती. नारायणनला कोणी मारलं, आणि त्याला मारण्याचा आरोप आपल्यावर का यावा याचा त्याला उलगडाच होत नव्हता. माथुकाका त्याला नेहमी सांगत, 'शेवटी जय हा सत्याचाच होतो. या जगात असत्याचा पुरस्कार करणारी काही माणसं विजयी मुद्रेनं मिरवतात; पण ते उसनं अवसान असतं. केव्हा ना केव्हा तो खोटा बुरखा गळून पडतो. चिरंतन अशा सत्याचा साक्षात्कार शेवटी घडतो.' पण आजही तिठ्ठ्यावरच्या पोलीस आऊटपोस्टाच्या खोलीत पोटाशी पाय दुमडून फाटक्या पोत्यावर पडलेल्या सीतूच्या डोळ्यांसमोर अंध:कार दिसत होता.

लहानपणी तो एकटाच होडी घेऊन दोनचार वाव आत गेला होता. गळानं तीन मोठे सुरमई त्यानं पकडले होते.

अचानक वादळी हवा पसरली होडी लाटेवर उसळ्या घेऊ लागली. पण सीतू घाबरला नाही. जातिवंत सारंगाचं रक्त त्याच्या धमन्यांतून वाहत होतं. उसळणाऱ्या लाटांवर हेलावणारी होडी त्यानं कौशल्याने किनाऱ्यावर आणली. पण आज त्यानं काहीही न करता त्याच्यावर आलेलं हे बालंट त्या दिवशीच्या वादळापेक्षा भयानक आहे, असं त्याला वाटू लागलं. सुबीची आठवण झाली. पदीची अवस्था काय झाली असेल या जाणिवेनं त्याचं अंत:करण हेलावून गेलं. पडल्या पडल्या त्यानं वर पाह्यलं. मंगलोरी कौलांचं ते आऊट-पोस्टाचं छप्पर फोडून पळून जावं असाही एक विचार त्याच्या मनात येऊन गेला. पळून पळून मी जाणार कुठे? अन् का? मी काय केलं आहे? मी नारायणनचा खून मुळीच केलेला नाही. विचारांच्या तंद्रीत तो मोठ्यानं ओरडला, "नाही नाही, मी मॅनेजरचा खून केलेला नाही! माझ्यावरचा हा आरोप खोटा आहे!"

बाहेर खोलीवर पहारा करणारा हवालदार त्याच्यावर खेकसला, "ए शिंच्या, तू खून केलेला नाहीस हे इथं कशाला बोंबलतोस? कोर्टात जज्जासमोर सांग."

त्या केसचं कमीटल झालं. सीतूची केस चित्रदुर्गाच्या सेशन कोर्टात चालायला उभी राहणार होती. रासू सारंगानं आपलं किडूकमिडूक विकलं. माथुकाकांनी आपल्या गाठीचे शे-दोनशे दिले आणि सीतूचा बचाव करण्यासाठी एक बऱ्यापैकी वकील नेमला.

सीतूची केस चालू होण्याला चार दिवसांचा अवधी होता. रासू सारंगाला अचानक मनमोहनशेठ यांचं बोलावणं आलं. मॅनेजरचा खून झाल्यापासून रासू फॅक्टरीकडं जात नव्हता. त्याच्या जागी रवींद्रनं फटूची नेमणूक केली होती. रासूला त्याच्या जागी कोणाचीही नेमणूक केली असती तर काही वावगं वाटलं नसतं; पण फटूची नेमणूक केल्याचं पाहून थोडं खटकलं. फटू हा नारायणनच्या खूनखटल्यात सीतूविरुद्धचा साक्षीदार होता.

फटू निंबर्डीतच लहानाचा मोठा झालेला होता. त्याला सत्याची बिलकूल चाड नव्हती. 'खोबरं तिकडं चांगभलं' ही त्याची वृत्ती होती. गावात चुगलखोर म्हणून त्याची ख्याती होती. तेव्हा अशा फटूची आपल्या जागी नेमणूक झाल्याचं पाहून रासू सारंगाला काहीतरी चुकतं आहे, असं वाटू लागलं.

मनमोहनशेठचं बोलावणं आल्यानंतर क्षणभर त्याला संभ्रम पडला. जावं की नको?

पण शेवटी तो गेलाच.

"ये, रासू. अरे असा का अवतार करून घेतलास?" मनमोहनशेठनी स्नेहपूर्ण शब्दात त्याला विचारलं.

रासू मान खाली घालून उभा होता. त्यानं आपल्या पिंजारलेल्या केसांवरून हात फिरवून म्हटलं. "मालक, माझा सीतू."

"हांऽऽऽ, त्यासाठीच मी तुला बोलावलं आहे. घडू नये ते रागाच्या भरात त्याच्या हातून घडलं. नारायणन तर गेलाच; आता सीतूलाही कोणती शिक्षा होते कोणास ठाऊक. खुनाबद्दल फाशी देतात म्हणे! पण त्याचं कोवळं वय लक्षात घेतलं तर त्याला जन्मठेपेची सजा निश्चित होईल. निदान दहा-बारा वर्षांनंतर परत तरी येईल."

"पण मालक, हे सगळं खोटं आहे हो!"

त्यावर मनमोहनशेठ विचित्र हसले आणि म्हणाले, "रासू, अपत्यप्रेमापोटी तुला तसं वाटणं स्वाभाविक आहे. पण मला तुझी आणि सीतूची दया येते. सीतूला या खटल्यातून वाचवायचं असेल तर फक्त एकच मार्ग आहे."

"कोणता?" अगतिक झालेल्या रासूनं विचारलं.

"सीतूनं सुबीला सोडपत्र दिलं होतं असा एक सहा महिन्यांपूर्वीच्या तारखेचा कागद तयार करायचा."

"मग काय होईल?"

"मग सोडपत्र दिलेल्या बायकोसाठी सीतूला राग यायचं कारण नाही असं कोर्टाला दाखवता येईल. शिवाय तसा कागद झाला तर फटू आणि सरकारतर्फेचे इतर साक्षीदारही फितूर करता येतील. सीतू खटल्यातून संपूर्ण निर्दोष सुटेल."

मनमोहनशेठ प्रथम काय बोलताहेत हे रासूच्या लक्षात येईना. पण क्षणभर विचार केल्यानंतर तो म्हणाला, "सुबीला सोडपत्र द्यायचं? पण सोडपत्र आणि तेही जुन्या तारखेचं द्यायला सीतू कुठंय इथं?"

"त्याची चिंता करू नकोस. तू हो म्हण. त्या कागदावर जेलमधून सही आणण्याची जबाबदारी माझी. हांऽऽऽ, आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव- सुबीला सोडपत्र दिल्यानंतर ती कोणाजवळ राहते, काय करते याची तुम्ही लोकांनी पंचाईत मुळीच करायची नाही."

रासू चक्रावला. त्याला या सोडपत्राचा आणि केस सुटण्याचा परस्पर असा संबंध लक्षात येईना. तो म्हणाला,

"मालक, सुबी ही सीतूची बायको आहे. त्याला अगोदर विचारायला हवं."

"तो मूर्ख आहे. त्याला अक्कल असती, तर त्यानं मॅनेजरला ठार मारलं असतं का एवढ्याशा क्षुल्लक कारणासाठी?"

"मग मी काय करू?"

"सीतू जिवंत राहावा किंवा त्याला जन्मठेप होऊ नये असं जर तुला वाटत असेल तर त्यासाठी सीतूला सुबीशी असलेलं नातं तोडून टाकावं लागेल! आहे तयारी?"

"पदीला विचारतो."

"जा. विचारून ये आणि हे सर्व झटपट व्हायला हवं. एकदा सेशन कोर्टात हे खटलं चालायला उभं राह्यलं की मग एक नव्हे, शंभर सोडपत्रं करून देऊ म्हणशील तर उपयोग होणार नाही-लक्षात ठेव."

रासू घरी येण्यापूर्वी टेकडीकडं वळला. रात्रीची प्रार्थना संपवून माथुकाका झोपण्याच्या तयारीत होते. वेड्यासारखा अवतार झालेला रासू सारंग आत आला. त्यानं मनमोहनशी झालेलं आपलं बोलणं माथुकाकांना सांगितलं. त्यांनी ते सारं शांतचित्तानं ऐकून घेतलं आणि ते म्हणाले,

"म्हणजे या सर्व घडामोडी सुबीच्याच पायी घडल्या अशी एका अर्थी आपण कबुली दिल्यासारखी होईल. पण तू सुबीचं म्हणणं काय आहे हे विचारात घेशील तर बरं होईल."

"तुम्ही तिला पटवून द्या. ती तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाचं ऐकायची नाही."

''रासू, अरे तू त्या पोरीला ओळखलेलं नाहीस. सुबी सीतूसाठी प्राण द्यायलादेखील तयार होईल. पण ती सोडपत्र द्यायला तयार होईल की नाही याची मला शंका वाटते.''

''काका, तिनं एवढे आढेवेढे घ्यायला तिचं आम्ही लग्न लावलं होतं का सीतूशी?''

''अरे वेड्या, लग्न हा एक समाजाच्या समजुतीसाठी निर्माण झालेला सोहळा आहे. लग्न म्हणजे दोन जिवांचं मंगल मिलन! ते पती-पत्नीच्या अंत:करणापासून निर्माण झालं की लग्न झालंच असं समजायचं. उलट पतीपत्नीचा पूर्वपरिचय नसताना केवळ रूढी अन् परंपरा यांच्या पारंपरिक प्रभावामुळे लग्न नावाचा जो एक गोंधळ करतात ते खऱ्या अर्थानं 'लग्न' नसतंच. सुबी सोडपत्र द्यायला तयार होईल असं काही मला वाटत नाही.''

०००

# सतरा

उन्हाळा संपला होता. मान्सूनी वारा सुरू झाला. दूर निळ्याभोर सागरक्षितिजावरून पांढरे ढग वेगानं पूर्वेकडे चाललेले दिसत होते. आकाशवाणीवर हवामानखात्यानं लहान-मोठ्या होड्यांना वादळाची सूचना दिली होती.

फॅक्टऱ्यांचे काम थांबले होते. पण खाडीतले गुंजली, पालव, शूतक अशा प्रकारचे मासे पकडण्यासाठी अधूनमधून छोट्या होड्या जात होत्या. कॅनिंग फॅक्टरीतील मशिनरी उकलण्यात आली होती. तिला तेलपाणी करण्याचे काम सुरू होते. कोल्ड स्टोरेजमधील रेफ्रिजरेशनची यंत्रणा बंद झाली होती. या चार महिन्यांच्या कालावधीत कामगारांना घरबसल्या अर्धा पगार देण्याचं उदार धोरण शेठ मनमोहन यांच्या सल्ल्यानं रवींद्रनं जाहीर केलं होतं. त्यामुळं फॅक्टरीचे मालक लोक दयाळू आहेत, अशी उभ्या निंबर्डीची खात्री झाली होती.

चर्चच्या टेकडीवर माथुकाकांसमोर सुबी उभी होती. रडून रडून तिचे डोळे लालेलाल झाले होते. रासूनं आणि पदीनं तिला 'सीतूला मागच्या तारखेचं सोडपत्र द्यायला तयार हो,' असा एकसारखा लकडा लावलेला होता. केवळ त्या मार्गानंच सीतूची ह्या खटल्यातून सुटका होईल अशी सीतूच्या मातापित्यांची खात्री झाली होती. पण सुबी त्यांना म्हणाली होती, "सोडपत्र कशाला पाहिजे? मी चर्चच्या कड्यावरून जीव देऊन मोकळी होते."

त्यावर रासू म्हणाला होता, "तू जीव दिल्यानं सीतू या खटल्यातून सुटणार नाही. ज्या दिवशी हा गुन्हा घडला त्या दिवशी तू सीतूची बायको नव्हतीस असा लेखी पुरावा तयार करणं जरुरीचं आहे."

सुबीला ते काही केल्या पटलं नाही. ती माथुकाकांकडं आली. रडत-रडत तिनं सर्व प्रकार त्यांना सांगितला आणि ती म्हणाली,

"काका, माझा आणि सीतूचा संबंध तोडला की मला कोणाचा आधार उरणार? तुम्हाला ठाऊक नाही काका हे सारं कशासाठी चाललंय."

"कशासाठी?"

"धाकट्या मालकांसाठी!"

"काय सांगतेस?"

"सीतू शप्पथ! ज्यावेळी मी इकडं तुमच्याकडं येते तेव्हा धाकटे मालक व्हरांड्यात उभे राहून माझ्याकडं बघून हसतात. मला खुणा करतात. मला त्यांची फार भीती वाटायला लागलीय."

गंभीर होऊन माथुकाका म्हणाले, "मला तशी अंधुकशी शंका आली होती. पण म्हटलं, प्रत्यक्ष समजल्याशिवाय कोणाविषयी आपलं मत कलुषित करू नये."

"मला आता कुणाचा आधार नाही हो! बाप गेला- आई गेली! आता सीतूची आई आणि बाप माझ्यामुळं आपला पोर खुनाच्या केसमध्ये अडकला म्हणून मला त्रास द्यायला लागले आहेत. मी सीतूची बायको आहे. आज ना उद्या तो सुटून येईल या आशेवर मी जगते आहे; पण हे लोक माझा आणि सीतूचा संबंध तोडू पाहतायेत. मग मी जगायचं कुणासाठी?

कशासाठी?''

माथुकाकांनी सुबीचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं आणि ते म्हणाले,

''सुबी, पोरी मला तुझ्या भावना समजत नाहीत असं समजू नको- पण मीही या प्रकरणी तुझ्यासारखाच अगतिक झालेलो आहे. हे सारं काय चाललं आहे याचा मला उलगडाच होत नाही.''

''आज मला सोडपत्र दे म्हणतात, उद्या मला हे छोट्या मालकांची रखेली हो म्हणून सांगतील. कसं ऐकू मी हे?''

''आयुष्यात अनेक प्रकारचे प्रश्न मी सोडवलेले आहेत पोरी, पण असा भयानक प्रश्न माझ्या पासष्ट वर्षांच्या कारकिर्दीत मला पडलेला नव्हता!''

माथुकाका कपाळाला हात लावून बसले होते. हुंदके देत देत सुबीनं आपली कैफियत त्यांच्यासमोर मांडली तेव्हा त्यांची मन:स्थिती अत्यंत द्विधा झाली. सीतूची सुटका व्हावी असं त्यांना वाटत असलं तरी सुबीचा व सीतूचा संबंध संपुष्टात यावा असं त्यांना वाटणं शक्य नव्हतं. त्यातच रवींद्रची नवीन हालचाल चिंतेत भर घालत होती. सुबीचं सोडपत्र मागण्यामागचा हेतू आता अगदी स्पष्ट झाला होता. सुबीच्या मोबदल्यात सीतूची सुटका करायला मनमोहनशेठ राजी होते. पण कोणाही सुज्ञ आणि नीतीची चाड असणाऱ्याला असली अनैतिक सौदेबाजी पटणार नव्हती. माथुकाकांना तर मुळीच नाही. आपण रवींद्रचं परिवर्तन घडवू असा अनाठायी विश्वास मात्र त्यांना वाटू लागला. सुबीला आपल्या खोलीत बसवून ते पलीकडं रवींद्रच्या क्वार्टरमध्ये गेले. रवींद्रनं टेपरेकॉर्डरवर इंग्रजी संगीत लावलं होतं. त्याच्या टेबलावर मद्याचा अर्धा भरलेला ग्लास होता.

''ओ हो हो! अंकल प्लीज कम इन, व्हॉट ए प्लेजंट सरप्राईज!''

माथुकाकांशी हस्तांदोलन करून त्यानं त्यांना फोमच्या कोचावर अदबीनं बसवलं. रवींद्र राहायला आल्यापासून फादर मॅथ्यूस प्रथमच रवींद्रकडे येत होते.

''बोला अंकल, आपली काय सेवा करू!''

''रवींद्र, मी तुला एक विनंती करायला आलो आहे.''

''आज्ञा म्हणा अंकल. आपण मला विनंती कसली करता?''

''रवी, तू सुबीचा नाद सोड!''

रवींद्र ग्लासातला एक घोट घेऊन मोठ्यानं हसला आणि म्हणाला,

''व्हॉट ए गुड जोक, अंकल! मी तिचा नाद धरलेलाच नव्हता, तर सोडण्याचा प्रश्न येतोच कुठं?''

''रवी, हे चर्चचं आवार आहे. या चर्चचं माहात्म्य फार मोठं आहे. जेव्हा अवर्षण घडलं तेव्हा इथं निंबर्डीच्या लोकांनी सामुदायिक प्रार्थना केली आणि त्याच रात्री इथं वीज पडून जिवंत असा गोड्या पाण्याचा झरा निर्माण झाला. इथं राहून खोटं बोलशील तर तुला पश्चात्ताप होईल. तेव्हा मी सांगतो ते ऐक- सुबीचा नाद सोड.''

रवीनं आता सिगारेट शिलगावली नाका-तोंडातून धूर सोडला. समुद्राकडं तोंड करून तो खिडकीजवळ उभा राहिला. त्याच्या डोक्यावरचे झुळमुळी केस वाऱ्याने हलू लागले. अंगातला 'बोस्की' चा गुरुशर्ट वाऱ्याच्या झोतानं फडफडू लागला. केसांवरून हात फिरवून तो म्हणाला,

''अंकल, खरं बोललो तर राग नाही ना येणार?''

''मुळीच नाही.''

''मग ऐका तर. मला सुबी हवी आहे! रात्रंदिवस तिची प्रतिमा माझ्या डोळ्यांपुढून जात

नाही. मी तिला महाराणीसारखी ठेवीन! मला सांगा त्या सीतूकडं तिला पोटभर अन्न तरी मिळत होतं का? अंगभर कपडे? तेसुद्धा नाहीत! मी सुबीला कोल्ड स्टोअरेजमध्ये सुंगठं सोलताना पाह्यलं आणि त्याच क्षणी वाटलं की.... पण नंतर समजलं की तिचा आणि सीतूचा संबंध होता.''

''संबंध? रवी, अरे ती त्याची बायको आहे बायको!'' माथुकाका भिवया उंचावून म्हणाले,

''आजपर्यंत मी अनेक लोकांना विचारलं. पण कोणीही मला त्यांचं लग्न झाल्याचं सांगितलेलं नाही.''

''मी सांगतो. ते दोघं पतीपत्नी आहेत.''

''तुम्ही लग्न लावलंत त्यांचं?''

क्षणभर विचार करून माथुकाका म्हणाले, ''लग्न मी लावलेलं नाही. पण ते पतीपत्नी आहेत एवढं खरं.''

त्यावर रवी पुन्हा एकदा मोठ्यानं हसला आणि म्हणाला, ''अंकल, उगाच वायफळ चर्चा करण्यात काही अर्थ नाही. मुद्द्याचं काहीतरी बोला.''

''तू सुबीचा नाद सोडून दे!'' माथुकाका हताश होऊन म्हणाले,

''अच्छा आपण असं करू''

''कसं?''

''थोरल्या शेठनी सुचविल्याप्रमाणे सीतूनं सुबीला डायव्होर्स द्यावा- जर खरोखरच तुम्हाला सीतू या केसमधून सुटावा असं अगदी प्रामाणिकपणे वाटत असेल तर!''

''मला दोन्हीही वाटतं- सीतू सुटावा आणि त्यानं सुबीला घटस्फोट देऊ नये.''

''इंपॉसिबल! अंकल, हे अशक्य आहे. खरं म्हणजे सीतूसारख्या मनुष्यहत्या करणाऱ्या गुन्हेगाराला फाशीचीच शिक्षा होणं जरूर आहे. पण थोरले शेठ मनानं अत्यंत दयाळू आहेत, म्हणून त्यांनीच परवा ही सूचना केली. केवळ त्यांच्या विनंतीला मान द्यायचा म्हणून मला ती सूचना मान्य करावी लागली. नाहीतर सीतूला शिक्षा ही होणारच आहे. त्याला जन्मठेपेची शिक्षा झाल्यानंतर सुबीसारखी सुंदर तरुणी त्याची शिक्षा संपेपर्यंत पवित्र राहील अशी तुमची समजूत आहे?''

''रवी! माझी समजूत काय आहे हे तुला सांगून उपयोगाचं नाही. पैशाच्या जोरावर तू इथली माणसं अंकित केलीस; पण सुबी तुला या जन्मात प्राप्त व्हायची नाही! सीतूची अन् तिची कायमची ताटातूट झाली तरीही ती तुला मिळणार नाही!''

''अंकल!'' सिगारेटचा एक दम घेऊन रवी म्हणाला, ''मला वाटतं तुम्हीच काहीतरी तिच्या डोक्यात भरवलेलं दिसतं. पण सुबी माझ्या आश्रयाला आली तर तिच्या जन्माचं कल्याण होणार आहे. तुम्हीच विचार करून पाहा.''

''तू तिच्याशी लग्न करणार आहेस?''

''लग्न? हं! जशी ती सीतूजवळ राहिली तशीच ती माझ्याजवळ राहील.''

''रवी, तू आत्मघात करून घेत आहेस.''

''मुळीच नाही! उलट जे दुर्लभ आहे ते मिळवण्यात मला आनंद वाटतो! सुबीच्या मोबदल्यात तुम्हाला हवं ते मागा, मी देईन.''

''रवी! अरे वेड्या, मी जन्मभर धर्मोपदेश केला. निष्कलंक, चारित्र्यसंपन्न असं जीवन जगलो. आता माझ्या आयुष्यातला सूर्यास्त समोर दिसतो आहे. पृथ्वीतलावरचं कसलंच ऐश्वर्य मला मोहवू शकलं नाही. माझ्या आयुष्याच्या ऐन उमेदीच्या काळात मी विरक्त असा जगलो.

मग आता मरण समोर दिसताना मला कसला मोह होईल असं वाटतं तुला?''

''खरं सांगू अंकल, तुम्ही ज्या खिस्ती धर्माचे उपदेशक होता त्या धर्माशी तुम्ही प्रतारणा केलेली आहे. सीतू सारंग हा गाबित आणि सुबी भंडारी. या दोन भिन्न जातीच्या मुलांवर तुम्ही पे्रम केलंत. त्यांना आपलं मानलंत. तुम्हाला जवळ मुलंच हवी होती तर बिल गोन्साल्विसला का नाही जवळ केलंत?''

माथुकाकांनी रवीकडं पाहात स्मित केलं आणि ते म्हणाले, ''धर्मोपदेशक जरी झाला तरी तो माणूसच असतो आणि मी माणूस आहे. म्हणूनच ती दोन निष्पाप मुलं माझ्या सहवासात आली. त्यांच्यात अन् माझ्यात एक अतूट असा जिव्हाळा निर्माण झाला. एकदा का जिव्हाळ्याची नाती निर्माण झाली की जातिगोतीतील क्षुद्र अशा भिंती जमीनदोस्त होतात. सीतूची जात कोणती, हा विचार कधीही माझ्या मनाला शिवला नाही.

''म्हणजे तुम्ही युनिर्व्हसल ब्रदरहूड मानता तर?''

आपणाला बरंचसं काही ठाऊक आहे अशा आविर्भावात रवीनं विचारलं.

''प्रत्येक सच्चा धर्मोपदेशक विश्वबंधुत्वावर विश्वास ठेवणारा असतो. केवळ माझाच एक धर्म श्रेष्ठ आणि माझ्याच धर्माची माणसं मला जवळ हवीत, असा अट्टाहास करणाऱ्या धर्मोपदेशकाला कोणत्याच धर्माचा अर्थ समजलेला नसतो. प्रत्येक माणसाकडं प्रथम तो मानव आहे अशा नजरेनं मी पाहत आलो आहे. मरेपर्यंत पाहात राहणार आहे.''

''पाहा, पाहा- जरूर पाहा! पण तुम्ही माझ्याकडं का नाही पाहत त्या दृष्टीनं?''

''अरे रवी, मी तुझ्याकडंदेखील त्याच नजरेनं पाहतो आहे. तुझा मार्ग चुकतो आहे म्हणून तुला समजावून सांगायला आलो आहे मी.''

''काही गरज नाही! सुबी मला मिळू नये यासाठी तुम्ही प्रयत्नशील आहात.''

''हो, आहे. दोन प्रेमी जिवांची ताटातूट करण्याचं महापातक माझ्या हातून कदापिही घडणार नाही. तुला एकवेळ सामोपचारानं सांगावं म्हणून इथपर्यंत आलो- पुन्हा येणार नाही.''

''तुम्ही न आल्यानं माझं काहीही बिघडणार नाही!'' ग्लास ओठाला लावून रवी बेपर्वाईनं म्हणाला.

माथुकाका अशा प्रसंगी मनाचा तोल ढळू देत नसत. फॅक्टरीज निर्माण व्हायच्या वेळी उभ्या निंबर्डींनं त्यांच्यावर बहिष्कार घातला होता. पण तेव्हादेखील माथुकाकांनी आपल्या मनाचा तोल ढळू दिला नव्हता. आज मात्र त्यांना तो ढळतो आहे असं वाटू लागलं.

माथुकाकांच्याजवळ काहीतरी दैवी शक्ती आहे अशी सुबीची भावना होती. तेव्हा ते आऊट -हाऊसकडे गेल्यानंतर त्याचं परिवर्तन करूनच परततील, या आशेनं ती वाटेकडं डोळे लावून बसली होती. पण अस्वस्थ होऊन आलेले माथुकाका तिला दिसले. ते आले आणि सरळ आरामखुर्चीत जाऊन पडले. दोन्ही हातांनी त्यांनी आपलं भणभणणारं मस्तक दाबून धरलं होतं. बराच वेळ ते काही बोलले नाहीत. सुबीनं ते पाह्यलं आणि पुन्हा तिच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

माथुकाकांनी सोडपत्राचा प्रस्ताव धुडकावून लावला. त्यांनी शांत चित्तानं विचार करायला सुरुवात केली. ही अशी विचित्र सूचना मनमोहनशेठनी का करावी? काय हेतू असेल या लोकांचा? सुबीचा अन् सीतूचा संबंध तोडण्यानं यांना काय प्राप्त होणार असेल? या सगळ्या प्रकरणात काहीतरी गूढ आहे हे नक्कीच.

सुबीला आता माथुकाकांशिवाय दुसऱ्या कोणाचा आधार उरलेला नव्हता आणि माथुकाकांच्या आश्रयाने राहायचं म्हणजे रवी एकसारखा समोर दिसणार होता. अलीकडं तिला त्याचं तोंडदेखील पाहावंसं वाटत नव्हतं. आपण ज्या माथुकाकांच्या आश्रयाला आलो आहोत

ते वृद्ध आहेत, त्यांच्या पाठीशी माणूसबळ नाही याची सुबीला जाणीव होती. पण तरीही तिच्या मनातल्या एका कप्प्यात माथुकाकांच्याजवळ काहीतरी दैवी शक्ती असावी अशी श्रद्धा होती. माथुकाका रवीकडं जाऊन आल्यापासून डोकं हातात धरून बसल्याचं पाहून मात्र तिचा धीर ढळला.

माथुकाकांनी तिच्या गालांवरून ओघळणारे अश्रू पाहिले आणि ते उठून तिच्याजवळ गेले व तिच्या पाठीवर हात फिरवून ते म्हणाले,

"रडू नको पोरी. आकाशातला देव फार दयाळू आहे. मी तुला माझ्या एका मित्राच्या घरी पाठवतो. तीन मुली आहेत त्याला. पणजीला असतो तो. मी उद्या रात्री त्याला बोलावून घेतो. तू अगदी बिनघोर जा. इकडच्या कसल्याच गोष्टीची चिंता करू नकोस. सीतूच्या खटल्याची सुनावणी जेव्हा होईल तेव्हा मी चित्रदुर्गला जाईन."

माथुकाका दुसऱ्याच दिवशी तिठ्ठ्यावर गेले. बाशामामूच्या हॉटेलातून त्यांनी पणजीला ट्रंककॉल जोडला. बाशामामूवर माथुकाकांचा विश्वास होता. तरीही त्यांनी त्याला सुबीला आपण निंबर्डीतून हलवणार आहोत याची कल्पना दिली नाही. ज्या रासूवर त्यांनी विश्वास टाकला होता त्यानेदेखील त्यांचा विश्वासघात केला होता. सुबीनं सोडपत्र करून द्यायला हवं असं रासूनंसुद्धा सांगायला सुरुवात केली होती. रवी माथुकाकांच्या समोरच्याच आऊट-हाऊसमध्ये राहात होता. त्याच्याकडं आताशी तीन-चार दांडगट अशा लोकांची ये-जा असते हे त्यांनी पाहिलं होतं. दिवसाढवळ्या त्या लोकांकरवी रवीनं सुबीला उचलून नेलं तर आपण त्यांचा प्रतिकार करायला असमर्थ आहोत याची माथुकाकांना जाणीव झाली होती; म्हणूनच त्यांनी सुबीला सुरक्षित अशा ठिकाणी हलवायचं ठरवून टाकलं होतं.

०००

# अठरा

पावसाला सुरुवात झाली होती. अरबी समुद्रावरून काळ्या ढगांच्या राशी पूर्वेच्या रोखानं धावत होत्या. निंबर्डीच्या लाल मातीची धूळ वाहून जात होती. वारा आणि पाऊस यामुळं निंबर्डीतलं कोणीच घराबाहेर पडत नव्हतं. दिवस अन् रात्र पाऊस झोडपत होता.

सुबी निंबर्डीतून नाहीशी झाल्याचं जेव्हा रवीच्या लक्षात आलं तेव्हा त्याच्या तळपायाची आग मस्तकी गेली. त्यानं रासूला बोलावलं. रासूकडं सुबीची चौकशी केली. पण रासूला काहीच ठाऊक नव्हतं. पण यावेळी रासूला रवीची शंका आली. त्याने रवीला विचारलं,

"मालक, सुबीचं सोडपत्र झालं तर सीतूची सुटका होईल असं तुम्ही मागे म्हणाला होता. पण त्यावेळी तुमच्या मनात सुबीविषयी असं काहीतरी असेल असं नव्हतं वाटलं मला."

रवी हसून म्हणाला, "रासूमामा, सुंदर पोरींची सर्वांनाच चिंता असते! त्यात ती तुमच्या सीतूकडं काही काळ होती म्हटल्यावर ती कुठं गेली याबाबत तुम्हाला काहीतरी ठाऊक असेल म्हणून बोलावलं. एवढ्यावरून नसता काही तर्कवितर्क करू नका."

"मालक, माझं एकुलतं एक पोर खटल्यात सापडलेलं आहे. मला काहीचं सुचेनासं झालं. मला जर कुणाची शंका आली तर सरळ मी या जंबियानं त्याला भोसकून ठार मारणार!" रासूनं सहा इंच लांबीचा जंबिया बाहेर काढून म्हटलं. रवी क्षणभर घाबरला, पण आपण मुळीच भ्यालो नाही असं दाखवून तो म्हणाला,

"रासूमामा, सुबी सुंदर आहे, तरुण आहे. अशा सुंदर आणि तरुण मुलीला कोणीही फूस लावून पळवून घेऊन जाण्याची दाट शक्यता असते म्हणून तुमच्याजवळ तिची चौकशी केली. सुबीसारख्या हलक्या जातीच्या पोरीविषयी नाहीतरी मला काय वाटणार आहे?"

रासूनं जंबिया परत म्यान केला आणि तो म्हणाला, "मालक माझं डोकं आता भडकलेलं आहे. माझ्या वाटेला कोणी जायचा प्रयत्न करू नये."

"तुमचं डोकं लवकरच शांत होईल." रवी म्हणाला. आऊट-हाऊसच्या पुढच्या दाराजवळ उभ्या असलेल्या माथुकाकांनी ते शब्द ऐकले आणि त्यांना आश्चर्य वाटलं. कसं काय रासूचं डोकं हा शांत करणार? ते तसेच मागे फिरले.

थोडा वेळ पाऊस थांबला होता म्हणून माथुकाका पाय मोकळे करण्यासाठी व्हरांड्यात फिरत होते. रवीच्या खोलीतून कोणाचा तरी जोरजोरानं बोलण्याचा आवाज येतो म्हणून ते तिकडे गेले हाते. रवीचे ते शब्द त्यांनी ऐकले. तोच पुन्हा पावसाला सुरुवात झाली, म्हणून ते आपल्या खोलीकडं परतले.

रात्रभर पाऊस पडत होता. गार झोंबरा वारा बाहेर तोंड काढू देत नव्हता. माथुकाकांनी कोपऱ्यातली 'हार्थ' पेटवली, अंगात गरम कोट घातला आणि ते थंडीने गारठलेले आपले हात शेकत बसले. सकाळचे दहा वाजून गेले होते. आकाश गच्च भरलेलं होतं. बाहेर कोसळणाऱ्या पावसाच्या धारेला भरतीच्या लाटा साथ देत होत्या. वातावरण अतिशय निरुत्साही अन् निराशामय वाटत होतं. इतक्यात पदी आरडत-ओरडत आली. भिजून चिंब झालेली, केस मोकळे सुटलेले, हातातल्या बांगड्या फुटलेल्या आणि मोठमोठ्यानं आक्रोश करणारी पदी

पाहताच माथुकाका उठून पुढं आले.

"अगं, काय झालं?"

"घात झाला, घात झाला!"

"मला तू काय म्हणतेस ते काही समजत नाही. स्पष्ट सांग बघू."

"सीतूचा बाप मेला!"

"काय म्हणतेस काय?" असं म्हणून माथुकाकांनी कोपऱ्यातला रेनकोट चढवला. पावसाळी टोपी घातली आणि पदीसाठी त्यांनी छत्री घेतली. पण पदी छत्रीखाली आलीच नाही. अक्षरश: तिच्या डोक्यावर आकाश कोसळलेलं होतं. निंबर्डीच्या किनाऱ्यावर जिथं नारायणनचा मृतदेह पडलेला होता त्यापासून अवघ्या वीस हातांवर रासू सारंग छातीत जंबिया घुसलेल्या अवस्थेत उताणा पडला होता. त्याच्या अंगावरून ओघळणारं रक्त पावसाच्या पाण्यानं वाहत समुद्राच्या पाण्यात मिसळत होतं. पाऊस कोसळत असूनही निंबर्डीतली बायामाणसं तिथं जमली होती. त्यांना तो प्रकार भुताटकीचा वाटत होता. ज्या जागेवर नारायणनचं प्रेत पडलं होतं त्याच जागेजवळ रासूचं पे्रत पडलं होतं.

पुन्हा तोच प्रसंग! पोलीस आले. फौजदार आले. पंचनामा झाला आणि जाबजबाबाला सुरुवात झाली.

रवीनं सांगितलं की, "काल संध्याकाळी रासू माझ्याकडं आला होता त्यावेळी तो भ्रमिष्टावस्थेत असल्यासारखा दिसला. हाच जंबिया त्याच्याजवळ होता. बहुधा ही आत्महत्याच असावी."

रवीनं ही सूचना केल्यामुळं की काय न जाणे, फौजदारांनी हा आत्महत्येचा प्रकार असावा अशा दृष्टीने चौकशीस प्रारंभ केला. पोस्टमार्टेम झाले. त्याचा रिपोर्ट आला. तो आल्यानंतर चौकशी करणाऱ्या फौजदारांनी आपला निष्कर्ष वरिष्ठांना सादर केला तो असा:

'रासू सारंग यांचा मुलगा सीतू हा नारायणनच्या खुनाच्या केसमध्ये अटक झाल्यापासून रासू सारंग हा भ्रमिष्टासारखा गावभर भटकत होता. मरणाच्या आदल्या रात्री तो छोटे शेठ रवी यांच्याकडे आला होता. त्यावेळी त्याच्याकडं आत्मघाताच्या वेळी वापरलेला जंबिया होता. यात घातपाताचा काही प्रकार नसून हा सरळ आत्मघाताचाच प्रकार आहे.'

वरिष्ठांकडून त्या रिपोर्टावर शिक्कामोर्तब झाले अन् रासूच्या मृत्यूवर पडदा पडला. पण माथुकाकांना मात्र ती आत्महत्या नाही असं राहून राहून वाटू लागलं. कारण त्यांच्या कानावर रवीचं ते वाक्य घोळत होतं : 'तुमचं डोकं लवकरच शांत होईल!' असं रवी का म्हणाला? याचा अर्थ काय?

माथुकाका अस्वस्थ होऊन खोलीत फेऱ्या घालत होते. रासूच्या मृत्यूमागे कोणतं गूढ असावं याचा ते एकसारखा विचार करीत होते. पण आता त्यांना आपल्याला काय वाटतं हे दुसऱ्याला सांगायचीसुद्धा सोय नव्हती. मरणाला ते भीत होते अशातला भाग नव्हता; पण तरीही फुकट मरून जायला ते केव्हाही तयार नव्हते.

रासूच्या निधनाची वार्ता सीतूला जेलमध्ये कळवण्यात आली. त्याला अतोनात दु:ख झालं. बापाच्या मरणप्रसंगीदेखील आपल्याला तिथं जाता येऊ नये याचं त्याला दु:ख वाटत होतं. त्याला वाटलं, माथुकाका काहीतरी प्रयत्न करतील आणि त्याला चार दिवस तरी जामिनावर निंबर्डीला घेऊन जातील. पण ते अशक्य होतं. सीतूवर जो आरोप होता तो खुनाचा आणि खुनाच्या केसमध्ये आरोपीला जामिनावर सोडता येत नाही. सेशन कोर्टात चौकशीवर त्याची केस लागलेली होती. आठ-पंधरा दिवसांत खटला चालायला उभा राहणार होता. अगोदर जेलचं वातावरण सुतकी, त्यात पावसाळ्याचे दिवस, त्यामुळं ते अधिक भयानक

वाटत होतं.

सीतू भिंतीला टेकून गुडघ्यात मान घालून बसला होता. वेळ सकाळी नऊ साडेनऊ वाजायची असेल. जेलचा शिपाई गजाने कुलूप काढता काढता म्हणाला, ''सीतू सारंग, तुला भेटायला कोणी आलेलं आहे. साहेबांनी ऑफिसात बोलावलंय तुला.''

सीतूकडून माहिती घ्यायला त्याचे वकील एक-दोन वेळा जेलमध्ये आले होते. सीतूला वाटलं, तेच आले असतील, पण जेलरच्या ऑफिसात बसलेल्या गृहस्थाला सीतूनं जन्मात कधी बघितलेलं नव्हतं.

''सीतू सारंग, मी तुला ओळखत नाही. पण मी तुला भेटायला आलो आहे. पलीकडं सुबी बसलेली आहे.''

सुबीचा उल्लेख करताच सीतूच्या अंगावर रोमांच उभे राह्यले. आश्चर्यानं तो म्हणाला,

''सुबी? इथं कशी आली?''

''मी सांगतो चल.'' ते गृहस्थ सीतूच्या पाठीवर हात ठेवून पलीकडच्या व्हिजिटर्स रूममध्ये सीतूला घेऊन गेले. खरंच तिथं सुबी होती. ती त्याला बघताच धाय धाय रडू लागली.

ते गृहस्थ म्हणाले, ''सीतू, तू हिची समजूत घाल. जेलरसाहेबांनी फक्त पंधरा मिनिटं मला वेळ दिलेला आहे. तोवर मी साहेबांच्याकडे थांबतो.'' असं म्हणून ते गृहस्थ निघून गेल्यानंतर सुबीनं सीतूला त्याला पकडून नेल्यानंतर निंबर्डीत काय काय घडलं हे सांगितलं. सोडपत्राची सूचना ऐकताना सीतूलादेखील त्यामागे काहीतरी काळंबेरं असावं असं वाटू लागलं. सुबी पुढं म्हणाली, ''जेव्हा माथूकाकांना छोट्या मालकांच्या हेतूची शंका आली तेव्हा त्यांनी मला पणजीला या गृहस्थांच्या घरी रातोरात पाठवलं. तिठ्ठयापर्यंत हे गृहस्थ मोटार घेऊन आले होते. त्यांना तीन मुली आहेत. माझ्याच वार्गीच्या. त्यांची पणजीत मोठी पिगरी' आहे. सलामी, सॉसेजेस आणि पिकल बनवतात यांच्या घरी. गोव्यातल्या मोठमोठ्यांच्या ऑर्डर्स येतात त्यांना. तुझी सुटका होईपर्यंत मी त्यांच्याकडेच राहणार आहे.''

''पण हे गृहस्थ कसे काय तुला इकडं घेऊन आले?''

''त्याचं असं झालं. मी रोज तुझी आठवण काढून रडायचे. ते त्यांच्या मुलींनी पाहिलं अन् वडिलांना सांगितलं. त्यांचं चित्रदुर्गाला काहीतरी काम होतं. तेव्हा तेच मला म्हणाले, ''चल अनायासे चित्रदुर्गाला चाललो आहे. जेलर चांगला असेल तर तुझी एक पाच मिनिटं सीतूशी भेट घडवून देईन.''

''बरं झालं. पण सुबी, तुला माझा बाप्पा गेल्याचं समजलं?''

''हांऽऽ! आत्महत्या केली त्यांनी!''

''नाही ग तो स्वत:ला मारून घेणाऱ्याच्या जातीतला नव्हता. फार तर त्यानं दुसऱ्याला मारलं असतं.''

''बरोबर बोललास! मला तीच शंका आहे. काळीज फार मोठं होतं त्यांचं. ऐन वादळात मालानं भरलेलं गलबत ते किनाऱ्याला लावत होते. ते स्वत:ला मारून घेतील थोडेच? सीतू, आपलं कसं होणार रे?''

''खरं सांगू सुबी, मी त्या नारायणनला मारलं नाही ग! फटू अगदी धादांत खोटं बोलतो. माझ्याविरुद्ध साक्ष देणारे सगळे लोक खोटं बोलतात. होडीतून मी चाकू काढून दिला म्हणतात हेसुद्धा खोटं आहे. मी त्या मॅनेजरला मारलेलं नाही. तुझ्या गळ्याची शप्पथ!''

सीतूनं सुबीच्या गळ्यावर हात ठेवला. तेव्हा सुबीनं त्याच्या खांद्यावर मान टाकली. त्यानं तिला बाहुपाशात घट्ट धरून हुंदका दिला.

''सुबी, मी सुटून येईपर्यंत तू निंबर्डीला परत जाऊ नकोस.''

"नाही जाणार. पण तू या केसमधून नक्की सुटणार ना?"

"तसं माझे वकील मला म्हणतात. पण प्रत्येक वकील आपल्या अशिलाला असाच भरंवसा देत असतो. निकाल झाल्याशिवाय खरं-खोटं काही समजणार नाही एवढं खरं."

"तू सुटून येईपर्यंत मी पणजीत राहीन. तू सुटलास की सरळ तिकडेच ये. आपण मिळून निंबर्डीत येऊ."

इतक्यात ते गृहस्थ आत आले आणि सीतूला म्हणाले, "मला फादर मॅथ्यूसनी तुझ्याबद्दल सर्व काही सांगितलेलं आहे. आमची सर्वांची जीझसवर श्रद्धा आहे. तो तुझ्यावर अन्याय होऊ देणार नाही याची खात्री बाळग."

असं म्हणून त्यांनी गळ्यातल्या क्रॉसला स्पर्श केला.

सुबीला तेथून जावंसंच वाटत नव्हतं. पण भेटीसाठी दिलेली वेळ संपली होती. सुबीला तेथून जाणंच भाग होतं.

गेल्या महिन्यापासून अव्याहत कोसळणारा पाऊस थांबला होता. कित्येक दिवसांनंतर आकाशाचा निळाभोर तुकडा सीतूला जेलच्या खोलीतून दिसला. 'आज जरा ऊन पडेल तर बरं होईल.' असं तो स्वत:शीच पुटपुटला आणि खरंच आश्चर्य घडलं! दुपारी बारा वाजता चक्क ऊन पडलं यावर्षीच्या पावसाळ्यास सुरुवात झाल्यानंतर सीतूला वाटलं होतं की, यापुढं आकाशातल्या या काळ्याकुट्ट ढगातून सूर्य कधी कधी डोकावणार नाही. कायम असाच अंधार आणि एकसारखा पाऊस कोसळत राहणार आहे. पण त्या दिवशी थोडा वेळ का होईना पण चक्क ऊन पडलं होतं.

सीतू गजाला धरून बाहेर चमचमणारं ऊन पाहात होता. त्या सूर्यप्रकाशात केवढी प्रचंड ताकद होती! गेले चार महिने तो तुरुंगात होता. पावसाला सुरुवात होण्यापूर्वी त्याला अटक झाली होती. तेव्हा उन्हाळा होता. पण त्याला त्यावेळचा प्रखर उन्हाळादेखील आठवत नव्हता. पावसाळ्याच्या कुंद हवेनं आणि वातावरणानं त्याच्या साऱ्या सुखद स्मृतीच नष्ट झाल्यासारख्या झाल्या होत्या. दुपारी त्याचे वडील आले. त्यांनी पुन्हा सीतूकडून माहिती घेतली. त्यांना सीतू म्हणाला, "साहेब, जसा नारायणन मारला गेला तसेच माझे वडीलही मारले गेले आहेत. या दोन्ही प्रकारांमागे कोणीतरी जबरदस्त व्यक्ती असावी अशी मला शंका येत आहे."

"नारायणनला मारण्याचं कारण काय? नारायणनचे आणि तुझे संबंध बिघडले होते म्हणून तूच त्याचा घात केला असा सरकारपक्षाचा पुरावा आहे."

"तो खोटा आहे साहेब. मी त्याला मारलेला नाही. त्याला मारायचं मला काहीएक कारण नव्हतं."

"पण फटू सांगतो ना- शेवटी तूच अन् नारायणन दोघेच समुद्राकडं गेलात, नंतर तू एकटाच परत आलास."

"ते साफ खोटं आहे साहेब! फटू अगदी लबाड माणूस आहे."

"काही म्हण सीतू, मला तुझी केस आताशी अवघड वाटू लागली आहे. त्यात तू तो चाकू होडीतून काढून देताना केलेलं निवेदन फार वाईट आहे."

"साहेब,त्यातलं मला काहीएक माहीत नाही हो. त्या निवेदनपत्रातले पंच लाँचवर काम करणारे आहेत. ते रवीचे नोकर आहेत. रवी बोल म्हणेल ते शब्द ते बोलतील."

"सगळं खरं, पण....."

वकील निघून गेल्यानंतर सीतू फारच नाराज झाला. इतके दिवस 'ही केस आपण चुटकीसरशी सोडवू' असं म्हणणारा त्याचाच वकील खटलं उद्यावर येऊन ठेपल्यानंतर कच

खाऊ लागल्याचं पाहून सीतूला मनस्वी दु:ख झालं. हाताने जेलच्या दाराचे गज घट्ट धरून तो त्यावर डोकं टेकवून अश्रू ढाळू लागला.

तो रडू लागल्याचं पाहून पहाऱ्यावरचा जेलचा एक प्रौढ शिपाई जवळ आला आणि म्हणाला, "बाळ, रडतोस का?"

"वकील म्हणतात, माझी केस कठीण आहे. सुरुवातीला म्हणत होते, या केसमध्ये काडीचा दम नाही. अशी एकाएकी त्यांना माझी केस का कठीण वाटायला लागली समजत नाही."

"सीतू, तुला राग येणार नसला तर एक गोष्ट बोलतो." पहाऱ्यावरचा शिपाई म्हणाला.

"बोल."

"हा आत्ता तुझ्याकडं आलेला वकील मोठा धोकेबाज माणूस आहे. विरुद्ध बाजूनं शे-पाचशे दिले की तो आपल्या पक्षकाराचा घात करायला मागेपुढे पाहात नाही. जिल्ह्यातला अगदी टाकाऊ वकील तुम्ही नेमला आहे. त्याला कसा काय नेमला?"

"हवालदारसाहेब, आमच्या बापजन्मी कधी आम्ही कोर्टकचेरी बघितलेली नाही. माथुकाका अगदी सरळ मनाचा माणूस आहे. वकीलवर्गात अशी विश्वासघातकी माणसं असल्याचं त्या बिचाऱ्या माथुकाकांना बिलकूल ठाऊक नसेल. आता काय करायचं तुम्ही सांगा."

"उद्या कोर्टासमोर खटला चालणार. शिवाय या वकिलानं तुमच्याकडून सर्व फी वसूल केलेली असणार. आता ऐनवेळी तुम्ही दुसरा वकील देणार तरी कसे? दुसऱ्याला पुन्हा दुसरी फी द्यावी लागणार, तशी आहे का तयारी तुझ्या बापाची?"

"अहो, परवाच माझा बाप मेला! आई एकटी आहे घरी."

"आता तुझा तो माथुकाका?"

"त्याचं वय झालंय. थंडीत, पावसात त्यांचे सांधे धरतात. आधाराशिवाय नीट चालताही येत नाही."

सीतूचा बोलता बोलता कंठ दाटून आला.

पुन्हा रात्री पावसाला सुरुवात झाली. बाहेर काळोख दाटला. दुसऱ्या दिवशी अकरा वाजता सेशनकोर्टाकडे आरोपींना नेण्यासाठी पोलिसांची निळी गाडी जेलच्या दारात येऊन थांबली. एकामागून एक असे 'अंडरट्रायल प्रिझनर्स' पोलीस-बंदोबस्तात त्या गाडीत चढले. गाडी सेशन कोर्टाच्या रोखानं निघालेली होती. धो-धो पाऊस कोसळत होता.

०००

# एकोणीस

चित्रदुर्ग हे जिल्ह्याचं ठिकाण, तसंच किनाऱ्यापर्यंत बोट येणारं प्रमुख असं बंदर होतं. चित्रदुर्गाच्या आसपास पन्नास मैलांत बोट थांबत नव्हती. त्यामुळे आजूबाजूच्या मुंबईला जाणाऱ्या लोकांना चित्रदुर्गाच्या धक्क्यावर यावं लागे. चित्रदुर्गाच्या आसपास उत्तम असा हापूस आंबा पिकत होता. प्रत्येक सीझनला चित्रदुर्गावरून लाखो रुपयांचा आंबा मुंबई आणि भारताच्या इतर भागांकडे जात असे. अलीकडं चित्रदुर्गाच्या आंब्याला परदेशातूनही मोठी मागणी येत होती. त्यामुळं चित्रदुर्ग हे, देशाला परदेशी चलन मिळवून देण्याचे एक प्रमुख असे कोकण किनाऱ्यावरचे केंद्र बनले होते.

या चित्रदुर्गावर जिल्हा न्यायाधीशांचं कोर्ट होतं. कोर्टाची इमारत उंचवट्यावर होती. कोर्टाच्या व्हरांड्यात उभं राहिलं की पश्चिमेला पसरलेला अथांग असा अरबी समुद्र दिसत असे.

त्या दिवशी कोर्टात चिक्कार गर्दी जमली होती. कोर्टात चालणारा खटलाही तसा 'सेन्सेशनल' होता. चित्रदुर्गाच्या सेशन कोर्टात आजपर्यंत बरेच गाजलेले खून-खटले चालले होते. पण नारायणनच्या ह्या खून-खटल्याला एक आगळंच महत्त्व प्राप्त झालं होतं. शेठ मनमोहन हा खटला ऐकण्यासाठी मुद्दाम मुंबईवरून आले होते. कोकणकिनाऱ्यावर उद्योगधंद्यासाठी येणाऱ्या कारखानदारीला नारायणनचा हा खून-खटला हे एक आव्हान आहे, असं समजलं जात होतं. सरकारी वकील हा खटला जिद्दीनं लढवणार होतेच; पण तरीही थोरल्या शेठनी मुंबईवरून आपले एक वकील खटल्यात सरकारी वकिलांच्या बाजूला बसण्यासाठी आणले होते. केवळ सधन फिर्यादी पक्षच अशा प्रकारची व्यवस्था करू शकतात.

सीतूला आरोपीच्या पिंजऱ्यात आणलं. कोर्टात माथुकाका आलेले पाहताच त्याला थोडा आधार वाटला. सीतूला माथुकाकांची भेट घेऊन 'आपण आपला वकील बदलता आला तर पाहा' असं सांगायचं होतं. पण माथुकाकांची भेट घ्यायची त्याला संधीच मिळाली नाही. शिवाय जरी संधी मिळाली असती तरीही ऐन केस चालण्याच्या वेळी वकील बदलण्याला परवानगी दिली नसती. आणि प्रयत्न करून जर तशी परवानगी दिली असती, तरीही नवीन वकिलाला द्याव्या लागणाऱ्या फीची व्यवस्था होणे अशक्यप्राय होते. सीतूनं आपल्या नशिबावर हवाला ठेवून जे व्हायचे ते होवो म्हणून स्वस्थ राहण्याचे ठरवले.

बरोबर साडेअकराच्या सुमारास न्यायाधीश चेंबरमधून बाहेर आले. कोर्टात जमलेल्या लोकांनी त्यांना उत्थापन दिले. न्यायाधीशांनी खुर्चीवर बसल्यानंतर खांद्यावरून ओघळणारा आपला गाऊन सावरला आणि सरकारी वकिलांना उद्देशून म्हटलं.

"येस प्रॉसिक्युटर, व्हॉट इज युवर केस?"

सरकारी वकील उठून उभे राहिले आणि अदबीने म्हणाले, "मे इट प्लीज युवर ऑनर," किंचित घसा साफ करून ते बोलू लागले, "चित्रदुर्ग जिल्ह्यात निंबर्डी हे दक्षिण बाजूचं छोटं किनाऱ्यावरचं खेडं आहे. गाव तसं लहान-पण या गावच्या समुद्रात व्हाईट प्रॉन, लॉबस्टर विपुल प्रमाणात मिळतात. म्हणून गेल्या वर्षी मशहूर असे उद्योगपती शेठ मनमोहन यांनी कोल्ड स्टोअरेज आणि फिश कॅनिंग अशा दोन फॅक्टरीज निंबर्डीत सुरू केल्या होत्या. फिशरीजचं

विशेष शिक्षण घेतलेल्या श्री. नारायणन यांची दोन्ही कारखान्यांचा मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यात आली. दोन्ही कारखाने शेठ मनमोहन यांनी आपले पुतणे श्री. रवींद्र यांच्या नावे केलेले आहेत. समुद्रात 'रिच' असा 'कॅच' मिळत होता. पण गावाला दळणवळणाची व्यवस्था नव्हती. म्हणून शेठनी निंबर्डी नदीत आणि गावच्या पूर्वेला असलेल्या खाडीवर पक्का सिमेंट काँक्रीटचा पूलही बांधला.

"स्थानिक लोकांवर बेकारी ओढवू नये या हेतूने निंबर्डीच्या स्थानिक लोकांनाच त्यांनी कारखान्यात कामावर घेतले. कोल्ड स्टोअरेजमध्ये बाया मुलींना सुंगठ सोलण्याचे काम दिले, कॅनिंग फॅक्टरीत पुरुषांना आणि प्रौढांना काम मिळाले.

"या निंबर्डीत रासू सारंग नावाचा एक गाबित होता. त्याला सिक्युरिटी ऑफिसर या हुद्द्यावर नेमला तो एकाच हेतूने, की तो तिथला स्थानिक पुढारी होता अन् स्थानिक लोकांच्या काही अडी-अडचणी असतील तर तो एकटाच त्या मालकांच्या किंवा मॅनेजरच्या निदर्शनाला आणून देऊ शकेल. त्याला नेमल्यानंतर त्याची महत्त्वाकांक्षा वाढू लागली. त्याला वाटू लागले की आपण या फॅक्ट्यांचे मॅनेजर व्हावे, म्हणून तो अधूनमधून दादागिरी करू लागला.

"आरोपी सीताराम ऊर्फ सीतू हा त्या रासू सारंगाचा मुलगा. या सीतूचं सुबी नावाच्या एका भंडारी जातीच्या मुलीवर प्रेम होतं."

"इज शी युवर विटनेस?" न्यायाधीशांनी विचारलं.

"येस सर. पोलिसांनी तिचाही या कामी जबाब घेतलेला आहे. पण तिला या केसमध्ये तपासण्यात काही तथ्य नाही. कारण तिला जर सरकारतर्फे तपासण्यात आलं तर ती 'होस्टाईल' होईल. म्हणून मुद्दामच आम्ही तिची साक्ष घेणार नाही."

"ओकेऽऽ! गो अहेड"

"तर रासू सारंग हा जसा स्वत:बद्दल भलत्या महत्त्वाकांक्षा बाळगू लागला तसा त्याचा मुलगा सीतू आणि त्याची प्रेयसी सुबी हीदेखील."

सरकारी वकील रासू सारंगाची बदनामी करत आहेत असं पाहून माथूकाका स्वत:शीच पुढं बोलू लागले. "ओ लॉर्ड! धिस इज पोस्ट्ह्युमन डिफेमेशन."

सरकारी वकील पुढं बोलू लागले, "स्वत:बाबत ही मंडळी काहीतरी अवास्तव अशा कल्पना करू लागली. सुबी कारखान्यात काम न करताच पगार मागू लागली, म्हणून मॅनेजर नारायणननी तिला कामावरून दूर केलं. रासू सारंगलाही कामावरून काढून टाकण्यात आलं. यामुळे आरोपी सीतू हा मनातून मॅनेजर नारायणनवर चिडून होता. पण त्यानं उघडपणे आपलं वैर कधीही प्रगट केलेलं नव्हतं.

"ज्या दिवशी मॅनेजर नारायणन निंबर्डीतून नाहीसे झाले त्यादिवशी संध्याकाळी फटू भंडाऱ्यानं सीतूला आणि मॅनेजर नारायणनना होडीतून जाताना भाटगरवाडीनजीक पाह्यलं."

"ही भाटगरवाडी कुठं आहे?" न्यायाधीशांनी विचारलं.

"ही निंबर्डीपासून फक्त दोन -अडीच मैलांवर आहे."

"अच्छा पुढे?"

"पुढे मॅनेजर आणि सीतू यांना एकत्र होडीतून जाताना पाहणारा साक्षीदार फटू भंडारी संध्याकाळी निंबर्डीत आला, तेव्हा त्याला सीतू एकटाच त्या होडीतून चर्चलगतच्या खडकाकडे येत असताना दिसला. म्हणजे 'लास्ट सीन टुगेदर' अशा प्रकारचा हा पुरावा आहे. नंतर दुसऱ्याच दिवशी नारायणनचं प्रेत निंबर्डीच्या किनाऱ्यावर पडलेलं आढळलं. ते काहीसं सडलं होतं. माशांनी त्याचे हात-पाय काही ठिकाणी कुरतडले होते. पण नारायणन वापरत असलेली सोन्याची चेन, त्याच्या नावाचे सोन्याचे ब्रेसलेट, शर्टाची बटणं यावरून ते प्रेत नारायणनचं होतं

हे साक्षीदारांना ओळखणे शक्य झाले.''

''प्रेत चेहऱ्यावरून ओळखता येत नव्हतं?''

''येत होतं, पण चेहरा थोडा 'डीकंपोज' झाल्यासारखा दिसत होता. म्हणून मी या आर्टिकल्सचा उल्लेख करतो आहे.''

''आय सीऽऽ! फर्दर?''

''त्यानंतर सीतूला संशयावरून अटक करण्यात आली. अटक झाल्यानंतर त्यानं पोलिसांना 'आपण नारायणनला ज्या चाकूने मारले तो चाकू काढून देतो' असं सांगितलं व त्या होडीच्या आतल्या बाजूला खुपसून ठेवलेला चाकूही काढून दिला. त्या चाकूवर रक्ताचे डाग होते. सीतूच्या घराची घरझडती घेतली तेव्हा त्यानं अडगळीत लपवून ठेवलेली हाफ पँट आणि बनियन मिळाले. त्यावरही रक्ताचे डाग मिळाले. आता मयताच्या अंगावर जे कपडे होते त्यावर असलेले रक्ताचे डाग आणि सीतूनं हजर केलेल्या चाकूवरचे डाग व त्याच्या कपड्यांवरचे डाग एकाच ब्लड ग्रुपिंगचे आहेत असा केमिकल ॲनॅलायझर यांचा रिपोर्ट आहे. यावरून हा खून आरोपी सीतूनेच केलेला आहे हे सिद्ध होईल.''

''येस, कॉल युवर विटनेसेस.''न्यायाधीशांनी सरकारी वकिलांना साक्षीदार बोलावण्याची आज्ञा केली.

सरकारतर्फे फिर्याद दिली होती ती फौजदारांनी व त्यांनीच गुन्ह्याचा तपासही केला असल्याने त्यांना शेवटी बोलवायचं असं ठरलं. सरकार पक्षाचा पहिला साक्षीदार म्हणून फटू भंडारी साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन उभा राहिला.

देवाची शपथ घेऊन सांगू लागला, ''त्यादिवशी मी भाटगरवाडीला चिंतू भंडाऱ्याकडे गेलो तेव्हा.....''

फटूने शेवटी सीतू होडीतून एकटाच निंबर्डीला परतल्याचं सांगितलं. त्याचा उलटतपास करायला सीतूचा वकील उभा राहिला.

''हे बघ, तू सीतू आणि मॅनेजर यांना एकत्र पाहिलंस, नंतर सीतू एकटाच निंबर्डीला परत आल्याचं पाहिलं म्हणतोस, तर ही गोष्ट तू दुसऱ्या कोणाला बोललास की नाही?''

''कशाला बोलू? मी नाही बोललो कोणाला.''

''मॅनेजरला कुठं सोडून आलास, असं का नाही विचारलंस?''

''माझा काय संबंध ते विचारायचा?''

''बरं, मालकांना, रविबाबूंना तू ही गोष्ट का नाही सांगितलीस?''

''सांगितली. दुसऱ्या दिवशी रात्री सांगितली.''

''खोटं बोलतोस तू. ही गोष्ट त्यांना कधीच सांगितलेली नव्हतीस.''

''त्यांना विचारून बघा.'' फटू चट्दिशी बोलून गेला.

यापेक्षा अधिक असे कोणतेच प्रश्न सीतूच्या वकिलानं फटूला विचारले नाहीत. खरं म्हणजे नंतर फटूला रासूच्या जागी नेमण्यात आले, त्यापूर्वी फटू हा लोकांकडून उसने पैसे घ्यायचा व दारूबाजी करायचा, तो एक नंबरचा लोफर होता, अशी बरीच माहिती सीतूनं आपल्या वकिलाला दिली होती. पण वकिलानं फटूची 'व्हेरॅसिटी चॅलेंज' (असल्यास आव्हान) देणारे कोणतेच प्रश्न विचारले नाहीत.

त्यानंतर चाकूजप्तीचे पंच झाले. हे रवीच्या नोकरीतले लाँचवर काम करणारे होते. त्यांच्याही जबाबास हरकत घेणारे महत्त्वाचे असे प्रश्न सीतूच्या वकिलांनी टाळले. सरकारपक्षाच्या अशा एकामागून एक येणाऱ्या साक्षीदारांनी सीतूच्या विरुद्ध भक्कम अशी केस उभी केली. शेवटी न्यायाधीशांनी सीतूचा जबाब घेतला. सरकारतर्फे झालेल्या

पुराव्यासंबंधी त्याला काय म्हणायचे आहे हे विचारले, तेव्हा आपल्या वकिलाच्या पक्षपातीपणाची खात्री पटलेला सीतू म्हणाला, ''साहेब, माझ्यावर अन्याय होतो आहे. मी सांगितलेला एकही प्रश्न माझ्या वकिलांनी साक्षीदारांना विचारलेला नाही. हा खटला पुन्हा चालावा अशी माझी विनंती आहे.

त्यावर न्यायाधीश म्हणाले, ''तुला आता तशी हरकत घेता येणार नाही. केस चालू असतानाच तू हा आक्षेप का नाही घेतलास?''

''तुम्ही न्यायदेवता आहात. तुम्हीच विचार करून पाहा. ज्या तऱ्हेनं माझ्या वकिलांनी माझा बचाव केला तो कुणाही विचारवंताला पटण्यासारखा आहे का?''

''तो मुद्दा आता निर्माण होऊ शकत नाही. तुला सरकारतर्फे झालेल्या पुराव्यासंबंधी काय सांगायचं असेल तर ते सांग.''

सीतू म्हणाला, ''मी निरपराध आहे. माझ्यावर ही खोटी रचना केलेली आहे. ज्या कोणी मॅनेजरचा खून केला आहे त्यानंच माझ्या बापाचाही बळी घेतलेला आहे. मनमोहनशेठ पैसेवाले आहेत. त्यांनी निंबर्डीच्या गरीब जनतेला विकत घेतलेले आहे आणि आज ते माझ्याविरुद्ध निकालसुद्धा विकत घेत आहेत!''

सीतूच्या या वक्तव्यावर न्यायाधीश संतापले. हातातली लेखणी कागदावर आपटून ते म्हणाले, ''धिस इज कंटेम्प्ट ऑफ द कोर्ट!''

बिचारा सीतू पिंजऱ्यात उभा राहून कोर्टात असलेल्या न्यायदेवतेच्या फोटोकडे पाहून अश्रू ढाळत होता. त्याला न्यायदेवतेच्या जागी हातात तराजू घेतलेले मनमोहनशेठ दिसत होते. पण त्यांचे डोळे बांधलेले नव्हते. ते सीतूकडं डोळे किलकिले करून पाहात आहेत आणि गालातल्या गालात हसत आहेत, असा त्याला भास होत होता.

त्यानंतर दोन्ही बाजूंच्या वकिलांच्या तक्रारी झाल्या. सीतूच्या वकिलांनी 'आपला पक्षकार हा अनिभज्ञ आहे; त्याने जाणूनबुजून कोर्टाचा अवमान केलेला नाही, म्हणून त्याला कोर्टाचा अवमान केल्याबद्दल नोटीस काढण्यात येऊ नये' अशी विनंती केली. केवळ आपण आरोपीचे वकील आहोत आणि त्याच्या बाजूने भाषण करणे आपले कर्तव्य आहे या जाणिवेने त्यांनी ''सीतू हा निरपराध आहे, म्हणून त्याला सोडून देण्यात यावे,'' असे चार शब्द उच्चारले.

अन् शेवटी व्हायचं तेच झालं. न्यायाधीशांनी सीतूला नारायणनच्या खुनाबद्दल शिक्षा ठोठावली. ते आपल्या निकालपत्रात म्हणाले,

''खरं म्हणजे नारायणनसारख्या कुशल तंत्रज्ञाचा, प्रामाणिक सेवकाचा अन् गोरगरिबांची आस्था असणाऱ्या एका सज्जन आणि सालस गृहस्थाचा निर्घृण खून करणाऱ्या सीतूला फाशीचीच शिक्षा देणं उचित ठरलं असतं, पण त्याचं कोवळं वय लक्षात घेऊन मी त्याला जन्मठेपेची, म्हणजे चौदा वर्षं कारावासाची शिक्षा फर्मावितो.''

निकाल ऐकताच सीतू पुन्हा मोठ्याने ओरडला, ''मी मॅनेजरला मारलेलं नाही! मला निष्कारण शिक्षा देत आहात!''

कोर्टात लोकांचा गलका झाला. न्यायमूर्ती चेंबरमध्ये गेले. शिक्षा झालेले आरोपी असंच काहीतरी असंबद्ध बरळत असतात असं कोर्टातल्या पट्टेवाल्याला आणि शिरस्तेदाराला वाटलं.

माथुकाका हातातली काठी टेकीत टेकीत सीतूजवळ आले आणि म्हणाले,

''बेटा सीतू, प्रभू इतका आंधळा नाही. तू निष्पाप आहेस. माझी खात्री आहे. पण माणसानं निर्माण केलेली ही न्यायव्यवस्था अपूर्ण आहे याचा मला आता प्रत्यय आलेला आहे.''

''केवळ न्यायव्यवस्था नाही काका, माझी केस चालवणारा तो वकीलसुद्धा या कारस्थानात सामील झालेला आहे. आणि मला वाटतं, न्याय देणाराही.''

माथुकाकांनी त्याला पुढं बोलू दिलं नाही. तोंडावर बोट ठेवून 'शूऽऽऽ' असा इशारा दिला.

अश्रू ढाळणारा सीतू म्हणाला, ''काका, माझ्या सुबीला सांभाळा हो!''

''चिंता करू नकोस पोरा. मी हायकोर्टात अपील करण्याचा प्रयत्न करतो. तुझी सुबी अगदी सुरक्षित अशा जागी आहे.''

''माझी आईऽऽऽ!'' सीतूला या क्षणी पदीचीही आठवण झाली. नवऱ्याच्या मृत्यूचं दु:ख ती सीतू खटल्यातून सुटला असता तर विसरली असती. पण तीही शक्यता संपली. चौदा वर्षांची सजा भोगून आपण परत येऊ तेव्हा आपल्याला आई दिसेल की नाही, याची शंका वाटल्यानं सीतूला दु:ख अनावर झालं.

माथुकाकांच्या गळ्यात पडून पोटभर रडायलादेखील त्याला कोणी सवड दिली नाही. शिरस्तेदारानं त्याचं वॉरंट तयार करून पोलीस हवालदाराकडं दिलं. हवालदारानं त्याच्या हातात बेड्या ठोकल्या आणि त्याला घेऊन तो त्या निळ्या मोटारीकडं निघाला.

माथुकाकांनी त्याला भरल्या डोळ्यांनी निरोप दिला.

माथुकाका जेव्हा निंबर्डीला परतले तेव्हा ही वार्ता त्यांनी पदीला सांगितली. माथुकाकांना वाटलं, ती रडेल, खूप आक्रोश करेल. पण तसं काहीएक तिनं केलं नाही. ती वार्ता ऐकून काही क्षण ती पुतळ्यासारखी निश्चल बसून राहिली आणि मग एकदम मोठमोठ्यानं हसू लागली. हातवारे करू लागली. पदीला वेड लागलं तो निकाल ऐकून.

निंबर्डीत ती रवळनाथाच्या मंदिरासमोर स्वत:शीच काहीतरी बोलत हातवारे करीत असे. कोणी उरलंसुरलं पत्रावळीत घालून तिच्यासमोर ठेवीत. कधी कधी ती िनबर्डीच्या किनाऱ्यावर येऊन डोळ्यांवर हात धरून क्षितिजाकडं पाहात असे. तिला वाटत असे, रासू होडी घेऊन दर्यावर गेलेला आहे. सीतूही त्याच्या समवेत आहे. ते दोघे बाप-लेक परत येतील म्हणून ती त्यांची वाट पाहत किनाऱ्यावर तास न् तास उभी राहत असे. कधी अंधार पडला तरीही ती किनाऱ्यावर दिसे. समुद्राकडे तोंड करून रासूला आणि सीतूला हाकाही मारत असे.

पावसाळा संपला. एके दिवशी किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पदीला भरतीच्या लाटांचंदेखील भान राहिलं नव्हतं. लाटांनी तिला वेढलं. एरवी तहान, भूक, भय यांची अस्पष्ट अशी जाणीव असणारी पदी त्या दिवशी स्वत:ला सावरू शकली नाही. ज्या लाटांनी तिला पाण्यात खेचलं त्याच लाटांनी पुन्हा तिचा मृतदेह निंबर्डीच्या पुळणीवर परत आणून ठेवला. ईश्वराला तिच्या यातना पाहवल्या नाहीत, म्हणूनच भ्रमिष्ट झालेल्या पदीला यातनामुक्त करण्यासाठी त्यानं तिची सुटका केली, असं माथुकाकांना वाटलं.

निंबर्डीच्या गावकऱ्यांनी त्याच जागी तिची चिता रचली. दहनाच्या वेळी माथुकाका टेकडीवरून खाली येऊ शकले नाहीत. त्यांना आता चालता येणंदेखील अशक्य झालं होतं. ते गेले पंधरा दिवस तापानं आजारी होते. अंतोन गोन्साविल्स येऊन जात होता. बिल-त्याचा मुलगा- माथुकाकांसाठी घरून जेवण घेऊन येत असे. पण आताशी जन्म-मृत्यूबद्दल विवेकानं भाष्य करणारा, सत्यावर नितांत श्रद्धा असणारा त्यांच्यातला धर्मोपदेशक निराश झाला होता. एकामागून एक अशा सारंग कुटुंबात घडलेल्या घटना पाहून त्यांचा धीर खचला होता. या जगात 'असत्'चाच प्रभाव अधिक झालेला आहे असं त्यांना वाटू लागलं होतं.

पदीच्या मृत्यूची वार्ता जेव्हा अंतोननं त्यांना सांगितली तेव्हा ते म्हणाले, ''बरं झालं. सुटली बिचारी एकदाची! आयुष्यात जगण्यासारखं काही शिल्लक राहिलं नाही म्हणजे त्या

जगण्याला काहीच अर्थ नसतो.''

संध्याकाळी ते काठीच्या आधारानं उठले आणि टेकडीच्या दक्षिण बाजूला येऊन उभे राहिले. किनाऱ्यावरच्या चितेतली धग आता संपली होती. भरतीच्या लाटा हळूहळू चितेला स्पर्श करू लागल्या. बघता बघता चिता जलमय झाली. एक मोठी लाट आली आणि तिनं तिथं चिता होती की नव्हती करून टाकली. माथुकाका स्वत:शीच म्हणाले,

''बरं झालं, अस्थिविसर्जन कोणीतरी करावंच लागणार होतं, ते सागरानंच करून टाकलं!''

रासू सारंग मेला तेव्हादेखील निंबर्डीत कोणाला फारसं दु:ख झालं नाही. कारण सीतूला शिक्षा झाल्यानंतर तो गुन्हेगार होता, दोषी होता म्हणूनच त्याला शिक्षा झाली असे प्रत्येकाला वाटत होतं. सारंग कुटुंबाविषयीचा आदर नारायणनच्या खुनापासून संपत चालला होता. पदीला वेड लागलं म्हणून निंबर्डीत कोणी फार हळहळ केली नाही. जेवताना एखादं भटकं कुत्रं दिसलं की कोर-चतकोर भाकरी जशी भिरकावतात, त्याच पद्धतीनं पदीला काही दिवस निंबर्डीनं अन्न दिलं. त्यात भूतदयेचा किंवा मानवतेचा लवलेशही नव्हता आणि यामुळंच अंतोननं पदीच्या निधनाची वार्ता जेव्हा माथुकाकांना सांगितली तेव्हा त्यांनी नि:श्वास सोडून म्हटलं, ''बरं झालं. सुटली एकदाची!''

माथुकाका खडकावरून परतले तेव्हा समोरच्या आऊट-हाऊससमोर रवी व्हरांड्यात उभा होता. तो थोडा पुढं आला आणि म्हणाला,

''फादर, वाईट झालं नाही?''

''हंऽऽ!'' माथुकाका हुंकारले.

''पण ती सुबी आहे तरी कुठं?''

''मला तरी काय ठाऊक!''

''हे पाहा फादर, ती कुठंही लपून राहिली तरी मी तिला शोधून काढल्याशिवाय राहणार नाही. केस चालण्यापूर्वी ती सीतूला भेटायला चित्रदुर्गातल्या जेलमध्ये गेली होती हे माझ्या कानावर आलेलं आहे.''

''काढ, काढ, शोधून काढ! तिच्यासाठी हा सारा आटापिटा केलास. ती नाही मिळाली तर काय उपयोग?''

''पण फादर, आपण तुम्हाला मानलं बुवा! तत्त्व म्हणजे तत्त्व! पण काय हो, रासू मेला, पदी मेली, सीतू तुरुंगात गेला. आता ती सुबी एकटीच पडली की नाही?''

''रवी!'' फादर मॅथ्यूस चर्चच्या टोकाकडं पाहत म्हणाले,''अजून तू बच्चा आहेस. तू काय करतो आहेत ते तुझं तुलाच समजत नाही.''

''चांगलं समजतं. आता मी काही प्यालेलो नाही. पण सांगा ना फादर, कुठंय सुबी?''

''ते तू शोधून काढणार आहेस ना?''

''तसं मी म्हणालो हे खरं; पण तरीही ती मला तात्काळ सापडेल असं नाही. तुम्हाला नक्कीच तिचा पत्ता ठाऊक असेल!''

''तसं बेशक समज. मला ठाऊक आहे आणि मी तो तुला सांगत नाही.''

इतकं बोलून माथुकाका आत आले. त्यांना रवीची मनस्वी चीड आली होती. निरपराध सारंग कुटुंबाची वाताहत झालेली असताना या रवीला अजूनही सुबीची आसक्ती सुटू नये याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं.

खोलीतल्या जीझसच्या फोटोकडं पाहत ते उद्गारले, ''अशा गोष्टी जर या भूतलावर मला पाहाव्या लागणार होत्या, तर जन्माला तरी का घातलेस?''

सीतूनं हायकोर्टात जे अपील केलं होतं, तेही फेटाळण्यात आलं. इकडे निंबर्डी सारंग कुटुंबाला विसरली. कारखाने पुन्हा सुरू झाले. व्हाईट प्रॉन्स मोठ्या प्रमाणावर मिळू लागले होते. कर्लीदेखील भरपूर मिळत होती. कॅनिंग फॅक्टरी आणि कोल्ड स्टोअरेज या दोन्हींतून माल मोठ्या प्रमाणात बाहेर पडत होता. नवीन मॅनेजरची नेमणूक झाली होती. रवीच्या देखरेखीवर मनमोहनशेठ खूष होते. पण स्वत: रवी मात्र अस्वस्थ होता. त्याला सुबी हवी होती.

रात्रभर ती त्याला स्वप्नात दिसायची.

०००

# वीस

बाशामामूच्या हॉटेलात उमाजीराव रावराणे एक महिनाभर राह्यले. रोज सकाळी उठून ते निंबर्डीला जायचे. तिथल्या गाबित आणि भंडारी लोकांची त्यांनी ओळख करून घेतली. सीतूच्या जन्मापासून ते त्याला सजा होईपर्यंत निंबर्डीत काय काय घडलं, याची त्यांनी खडा न् खडा माहिती मिळवली. चर्चच्या टेकडीवर जाऊन त्यांनी माथुकाकांचीही भेट घेतली. आपली ओळख करून देताना उमाजीराव रावराण्यांनी निंबर्डीत येण्याचा आपला हेतू मात्र गुप्त ठेवला होता. आपण रेव्हेन्यू खात्यात नोकरीला होतो आणि समुद्रकिनाऱ्याची हवा आपल्या प्रकृतीला मानवते, म्हणून महिना-दोन महिने राहण्यासाठी आलो आहोत, असे त्यांनी सर्वांना भासवले.

साडेपाच फूट उंचीचे रावराणे, साठी जवळ आली होती तरी, ताठ होते, लांब सरळ नाक, टोकदार मिश्या, मध्ये खाच असलेली हनुवटी आणि डोळ्यांना काळा गॉगल, डोक्यावर किंचित तिरकी फेल्ट या वेशामुळं ते खरोखरच कोणी बडे रिटायर्ड रेव्हेन्यू अधिकारी असावेत, अशी खात्री पटायची.

माथुकाकांची त्यांनी प्रथम भेट घेतली तेव्हाही त्यांनी आपण कोण व तिथं का आलो आहोत याचा पत्ता लागू दिला नव्हता.

"हॅलोऽऽ फादर मॅथ्यूस, गुड मॉर्निंग!"

"गुड मॉर्निंग टु यू. मी आपल्याला ओळखलं नाही." माथुकाका चष्म्याची काच पुसून तो चष्मा डोळ्यांवर ठेवता ठेवता म्हणाले,

"कसे ओळखणार? मी मात्र तुम्हाला चांगलाच ओळखतो!" रावराणे पाईप ओढता ओढता म्हणाले.

"एस्क्यूज मी. मला मात्र आपल्याला पाहिल्याचं आठवत नाही."

"बावन्न सालच्या डिसेंबरमध्ये रत्नागिरीला चर्च कौन्सिलचं सेमिनार होतं!"

"ओऽऽह! येस येस! तुम्ही रत्नागिरीला होता तेव्हा?"

"हो. त्यावेळी मी रत्नागिरी डिव्हिजनचा प्रांत ऑफिसर होतो आणि रत्नागिरीचे रेव्हरंड समुद्रे हे माझे मित्र होते."

"आय सीऽऽ! समुद्रे वॉज येट सील!"

"गेले बिचारे! माझी नि त्यांची घनिष्ट मैत्री होती. त्यांच्या घरी मी तुम्हाला तेव्हा पाहिलेलं होतं."

फादर मॅथ्यूस बावन्न सालाला आता किती वर्षं झाली हे मनातल्या मनात मोजत होते. ते मोजून झाल्यावर ते म्हणाले,

"तेवीस वर्षं झाली त्या गोष्टीला. पण इतक्या वर्षांनी मला आपण ओळखलंत? वंडरफुल मेमरी!"

रावराणे पाईप टेबलावर ठेवीत म्हणाले, "आपण दोघेही जवळ जवळ एकाच वयाचे असू; पण आपण मात्र फारच थकल्यासारखे दिसता."

रावराण्यांनी विषयाला हात घालण्याच्या दृष्टीनं म्हटलं.

"गेल्या वर्षापर्यंत माझी प्रकृती अगदी ठणठणीत होती."

"असं काय घडलं एका वर्षांत?" रावराण्यांनी टेबलावरचा पाईप पुन्हा ओठांत धरला. तो शिलगावला आणि झुरका घेऊन विचारलं.

"खूप घडलं! आता त्याची वाच्यता करून काऽऽही उपयोग नाही. कायमचाच पडदा पडला त्या प्रकरणावर."

"म्हणजे? कसलं प्रकरण होतं ते तरी सांगाल की नाही?"

"या जगात न्याय उरलेला नाही!" निराश होऊन खिडकीतून समुद्राकडे पाहात माथुकाका म्हणाले,

"कोणावर अन्याय झाला आहे का?"

तोंडातला पाईप हातात घेऊन खुर्चीवरून थोडं पुढं होत रावराण्यांनी विचारलं.

"काय सांगायचं तुम्हाला साहेब? सांगितलं असतंही; पण आता सांगून काही उपयोग होणार नाही. उगाच त्या आठवणीनं मला मात्र कासावीस व्हायला होतं."

"फादर!" त्यानंतर मात्र आपली खुर्ची माथुकाकांच्या कॉटजवळ ओढून घेत रावराणे माथुकाकांच्या अगदी जवळ जात म्हणाले, "मी रावराणे, रिटायर्ड सी. आय.डी., डी. आय. जी! मोहनराव दिवेकर जिल्हा न्यायाधीश होते. त्यांनी डबल मर्डर केला आणि त्यांना शिक्षा झाली हे ऐकून माहीत आहे?"

हे गृहस्थ प्रथम आपण कोण हे छपवून इथं का आले अशी माथुकाकांना शंका येत असतानाच रावराण्यांनी आपला निंबर्डीत येण्याचा उद्देश माथुकाकांना सांगितला. त्यावर माथुकाका म्हणाले.

"पण आता त्या सुबीच्या खूनप्रकरणी हायकोर्टानंही त्याचं अपील फेटाळून लावलं आहे. त्यात तुम्ही चौकशी करून काय साधणार आहात?"

"फादर! गेला एक महिना मी इथं राहून खडा न् खडा माहिती जमवली आहे. तीस वर्षांचा पोलीसखात्यातला अनुभव माझ्या गाठीशी आहे. मी अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उजेडात आणलेले आहेत आणि या सीतूच्या प्रकरणावरदेखील उजेड पाडण्याची माझी हिम्मत आहे. उद्या मी अर्नाकुलमला चाललो आहे."

"अर्नाकुलमला? कशासाठी?"

"नारायणनची माहिती मिळवण्यासाठी!"

"पण तुम्हाला एक सांगू?" फादर मॅथ्यूस खिडकीतून रवींद्रच्या खोलीकडं पाहात म्हणाले, "काहीएक उपयोग होणार नाही."

"ते माझं मी पाहून घेईन. पण आज मी माझी 'आयडेंटिटी' फक्त तुमच्यासमोर स्पष्ट केलेली आहे. या गावात मी अजूनही रिटायर्ड रेव्हेन्यू ऑफिसर म्हणूनच वावरणार आहे. मला तुमच्याकडून थोडी माहिती हवी होती."

"काय ती सांगा."

"सीतू आणि सुबीचं लग्न झालं होतं का?"

"त्याचं काय झालं. ती दोघं माझ्याजवळच लहानाची मोठी झाली. वयात आल्यानंतर निसर्गनियमानुसार त्यांचा संबंध आला. सुबीला दिवस गेल्याचं समजल्यानंतर मी त्यांना चर्चमध्ये जाऊन 'ओथ' घ्यायला लावली. कदाचित जगाच्या दृष्टीनं ते लग्न कायदेशीर ठरणार नाही. पण पतीपत्नीचं पवित्र नातं त्यांच्यात निर्माण झालेलं होतं."

"अच्छा. सध्या सुबी कुठं आहे?"

या प्रश्नाला माथुकाकांना चटकन उत्तर द्यावे की नाही हे समजेना. कदाचित सत्य

प्रकाशात आणू इच्छिणारा हा गृहस्थ रवीनंच इथं पाठवला नसेल कशावरून, अशी त्यांना अस्पष्टशी शंका येऊन गेली.

माथुकाका म्हणाले, ''सुबी निदान आज तरी एका सुरक्षित जागी आहे. उद्या काय होईल हे सांगता येत नाही. रवीनं परवा माझ्यासमोर प्रतिज्ञा घेतलेली आहे तिला शोधून काढायची.''

त्यावर रावराणे हलकेच माथुकाकांच्या कानाजवळ तोंड घेऊन म्हणाले, ''फादर, कृपा करून मला तिचा पत्ता सांगा. आज ती ज्या ठिकाणी आहे, तिथं जर ती सुरक्षित नसेल, तर तिला तेथून तात्काळ हलवायला हवं. नाहीतरी गेला महिना रात्र न् दिवस जागून जे मिळवलेलं आहे ते, सुबी रवीच्या हाती लागली तर वाया जाणार आहे. आपण माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा. माझ्या हेतूबद्दल कसलीच शंका नसावी.''

माथुकाका रावराण्यांना आपादमस्तक न्याहाळत म्हणाले, ''जन्मभर मी माणुसकीवर विश्वास ठेवला. पण आता माझ्या शेवटच्या काळात तो उडाला आहे. आपण जर खरोखरच सीतूच्या या प्रकरणावर काही प्रकाश टाकण्याच्या सद्हेतूनं इथं आला असाल, तर माझ्या सदिच्छा आपल्या पाठीशी आहेत असं समजा. पण अजूनही मला वाटतं की आपण इथं यायला फार वेळ केलात. सीतूवर जेव्हा तो खटला दाखल झाला होता तेव्हा आला असतात तर काही तरी निराळं निष्पन्न झालं असतं.''

त्यावर रावराणे हसले. त्यांनी विझलेला आपला पाईप छोट्या पिशवीत बंद करून ठेवला आणि ते म्हणाले, ''फादर, ते कसं शक्य होतं? या सीतूला शिक्षा झाली, तो चित्रदुर्गाच्या जेलमध्ये शिक्षा भोगण्यासाठी गेला तेव्हाच त्याची अन् मोहनराव दिवेकरांची भेट झाली. म्हणूनच त्यांनी मला पत्र पाठवून त्या प्रकरणातलं सत्य पडताळून पाहण्याची विनंती केली. मोहनराव दिवेकर 'पिक्चर'मध्ये आलेच नसते तर मी इथं येण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.''

''आपण म्हणता तेही बरोबर आहे.''

''हांऽऽ, कोणत्याही गोष्टीला वेळ यावी लागते. तेव्हा कृपा करून मला आता जास्त वेळ वाया घालवायला लावू नका. मला सुबीची भेट घेणं फार महत्त्वाचं आहे. तिची भेट झाल्यानंतर लगेच मला अर्नाकुलमला जायला हवं आहे. तिथं गेल्यावर मला आणखीन महत्त्वाची अशी माहिती मिळण्याची शक्यता आहे.''

माथुकाकांनी आपला उजवा हात रावराण्यांच्या समोर पसरला. रावराण्यांनी त्यांचा तसं करण्यामागचा हेतू ओळखला.

माथुकाकांना आता रावराण्यांकडून वचन हवं होतं. रावराण्यांनी क्षणाचाही विलंब न लावता माथुकाकांच्या हातावर हात ठेवला. काही क्षण दोघांपैकी कोणीच बोलले नाही. त्यानंतर माथुकाकांनी सुबी पणजीला ज्या ठिकाणी होती त्या ठिकाणचा पत्ता रावराण्यांना सांगितला आणि ज्यांच्या घरी सुबी होती त्या गृहस्थांनाही माथुकाकांनी रावराण्यांसाठी एक ओळखपत्र दिले.

पणजीपासून सहा मैलांवर डिसूझावाडी होती. रोमेल डिसूझांची 'पिगरी' होती. त्यांच्या घराच्या भोवतालीही इतर 'डिसूझा' लोकांची घरं होती. बहुतेकांच्या घरी काजूच्या दारूच्या भट्ट्या होत्या. उन्हाळ्यात जेव्हा काजूची बोंडं मिळायची तेव्हा ती साठवून ठेवायची व त्यांची फेणी बनवायची हा त्यांचा धंदा होता. बऱ्याचजणांकडे अशा प्रकारचं मद्य बनवायचं लायसेन्सही होतं. बनवलेली फेणी मातीच्या मडक्यात घालून जमिनीत पुरून ठेवली जायची. फेणी जितकी जुनी तितकी ती अधिक मोलाची असं समजलं जाई. परंतु रोमेल डिसूझा यांचा

धंदा मात्र निराळा होता. त्यांनी शे-दोनशे अमेरिकन डुकरं पाळलेली होती. घराच्या मागे छोटा कत्तलखाना होता. डुकराच्या मांसापासून 'सलामी', 'सॉसेजेस' आणि 'स्पायसी पिकल' बनवण्याचा त्यांचा धंदा होता. प्रत्येक खिसमसला त्यांचा धंदा तेजीत येई. दरसाली पाच-पन्नास हजार रुपयांचा माल विकला जाई. हा रोमेल डिसूझांचा घरगुती धंदा होता. पण त्यांच्या मालाचा दर्जा इतका उच्च होता, की गोव्याच्या परिसरात खिसमसच्या पार्टीला रोमेल डिसूझांच्याकडे बनवलेले सॉसेजेस किंवा सलामी असणं हे प्रतिष्ठेचं लक्षण समजलं जाई.

या रोमेल डिसूझांची आणि फादर मॅथ्यूस यांची गेल्या चाळीस वर्षांची मैत्री होती. माथुकाका ज्या ज्या वेळी पणजीला येत तेव्हा त्यांचा मुक्काम रोमेल डिसूझांकडेच असे. तेव्हा सुबीला रवीच्या दुष्ट नजरेपासून कुठंतरी सुरक्षित अशा ठिकाणी नेऊन ठेवावं असं माथुकाकांना वाटलं, तेव्हा त्यांना प्रथम आठवण झाली ती रोमेल डिसूझांची!

सुबी रोमेल डिसूझांच्या घरी अगदी सुरक्षित होती. तिथं डिसूझावाडीत जशा काही परवानधारकांच्या दारूभट्ट्या होत्या तशा काही विनापरवानाही भट्ट्या चालत होत्या. त्या भट्ट्या चालवणारे काही आडदांड असे 'दादा' लोक होते. रोमेल डिसूझांना ते सर्व लोक अतिशय मानत होते. आपल्या घरी विश्वासानं फादर मॅथ्यूस यांनी ठेवलेल्या सुबीला कोणीही इथून जबरदस्तीनं घेऊन जाणार नाही, याची रोमेल डिसूझांना खात्री होती. रोमेल डिसूझांचं चित्रदुर्गाला जेव्हा काम निघालं होतं तेव्हा त्यांनी सुबीला आपल्यासोबत नेऊन तिची आणि सीतूची भेटही घडवून आणली होती. सुबी डिसूझांच्या मुलींशी मिळून मिसळून राहात होती. प्रथम काही दिवस तिला त्यांच्या घरची गोवानीज कोकणी भाषा समजली नाही. परंतु हळूहळू सरावानं ती सफाईदारपणे त्यांची भाषा बोलू लागली. आपण आता विनाआधार आहोत. सीतू जन्मठेपेला गेला. आई पदी मरून गेली. माथुकाका वृद्ध झालेले आहेत. आपल्या असहायतेचा फायदा घेऊन रवी आपल्याला निष्कलंक चारित्र्यानं जगू देणार नाही. म्हणूनच माथुकाकांनी आपल्याला अशा सुरक्षित अन् अज्ञात स्थळी पाठवलेलं आहे, याची तिला जाणीव होती. रोमेल डिसूझांच्या मुलींनाही सुबीची ही पार्श्वभूमी समजल्यामुळं तिच्याबद्दल सहानुभूती वाटत होती. त्या तिच्याशी अत्यंत प्रेमानं वागत होत्या. सुबी त्या घराशी एकरूप झाली होती. रोमेल डिसूझा सुबीला आपली चौथी मुलगीच समजत होते.

उमाजीराव रावराण्यांना डिसूझांचं घर मिळायला खूप कष्ट घ्यावे लागले. त्यांच्या वेशभूषेवरून ते कोणीतरी गुप्त हेर असावेत असंच भट्ट्या चालवणाऱ्या डिसूझा लोकांना वाटलं, 'तुम्ही कोण?' इथे कशाला आलात?' 'कोणाला भेटायचं आहे?' 'काय काम आहे?' अशा प्रश्नांच्या सरबत्तीला तोंड देत शेवटी कसेबसे उमाजीराव रावराणे रोमेल डिसूझांच्या घरी येऊन पोहोचले. डिसूझांनी संशयानं रोखून पाहात त्यांच्याशी हस्तांदोलन केलं. रावराण्यांनी माथुकाकांचं ओळखपत्र डिसूझांच्या हाती दिलं. ते वाचून पाहिल्यानंतर रोमेल डिसूझांची चर्या फुलली. त्यांनी पुन्हा एकदा रावराण्यांशी हस्तांदोलन केलं आणि त्यांनी अत्यंत आदरानं दंडाला धरून आपल्या बैठकीच्या खोलीत आणलं.

रोमेल डिसूझांनी मुद्दामच सुबीला चहा घेऊन यायला सांगितलं. सुबीला मात्र अंकल रोमेलकडे कोण पाहुणे आलेले आहेत याची यत्किंचितही कल्पना नव्हती. ती चहाचा ट्रे टीपॉयवर ठेवून आत जायला निघाली तेव्हा अंकल रोमेल म्हणाले, "बेटी सुबी, यांना तू ओळखत नाहीस- पण हे तुलाच भेटायला आले आहेत."

"मला?" छातीवर हात ठेवून किंचित बावरल्यासारखी चर्या करीत सुबीनं विचारलं.

"हो, तू यांना जी माहिती हवी आहे ती अगदी विनासंकोच दे. तुझ्या माथुकाकांचं ओळखपत्र आणलेलं आहे यांनी."

आपल्या हातातलं पत्र अंकल रोमेलनी सुबीला दाखवलं. माथुकाकांच्या नावाचा उल्लेख होताच तिची चर्या आनंदित झाली.

"कशी आहे काकांची तब्येत?" सुबीनं रावराण्यांना विचारलं.

"बरी आहे. पण त्यांना तुझीच चिंता आहे."

"माझी काही चिंता करू नका म्हणावं."

"ते खरं. पण आज मी इथं आलो आहे ते तुझ्याकडून काही माहिती घेण्याच्या उद्देशानं."

"कसली माहिती?"

"मी सीतूवर झालेल्या शिक्षेबाबत पुन्हा चौकशी सुरू केली आहे."

"पण आता काही उपयोग होईल का त्याचा?" डिसूझांनी विचारलं.

"पाहू. प्रयत्न चाललेला आहे. माथुकाकांच्या शब्दांत सांगायचं म्हणजे 'डिव्हाईन जस्टिस' हे माणसाच्या न्यायव्यवस्थेपेक्षा अधिक प्रभावी असतं. मी प्रयत्न करतो आहे तो ते 'डिव्हाईन जस्टिस' अस्तित्वात यावं या उद्देशानं."

"ठीक आहे. आपण सूबीला जे काही विचारायचं आहे ते अगदी बेशक विचारा. मी जरा स्लॉटर हाऊसमध्ये जातो आहे." असं म्हणून रोमेल डिसूझा निघून गेले.

रावराण्यांनी आपल्या सुटकेसमधून माहितीची फाईल काढली. डोळ्यांवर चष्मा चढवला. पाईप भरला आणि तो शिलगावून एकदोन झुरके घेऊन सुबीला विचारलं,

"सुबी, सीतूनं कधी तुझ्याजवळ नारायणनविषयी अपशब्द काढले होते का?"

"कधीच नाही."

"तुला कोल्ड स्टोअरेजमधून काढून टाकण्यात आलं हे समजल्यानंतर सीतू काय म्हणाला?"

"त्याला मी कारखान्यात काम करणं पसंतच नव्हतं. मला मॅनेजरनं कामावरून दूर केल्याचं त्याला समजताच त्यानं मॅनेजरला धन्यवादच दिले."

"काय सांगतेस काय?"

"सीतूची शप्पथ!"

"बरं, आता मला सांग, तू मॅनेजरचं प्रेत पाहिलं होतंस?"

"हो; पण मी फार जवळ गेले नाही."

"का?"

"मला पे्रताची भीती वाटते. मी ते दुरून पाहिलं."

"ते पे्रत मॅनेजरचं होतं?"

"म्हणजे? सगळ्या गावानं ओळखलं की."

"ओळखू दे. मला शंका आहे."

"कसली?"

"ते आज नाही सांगत. मला अजून थोडी खात्री करून घ्यायची आहे. बरं, ते राहू दे, सुबी, तुझं आणि सीतूचं मॅनेजरच्या संबंधात काही बोलणं झालं होतं?"

सुबीनं क्षणभर विचार करून आठवण्याचा प्रयत्न केला आणि ती म्हणाली, "मला तसं काही आत्ता आठवत नाही. पण सीतू मॅनेजरसंबंधी बोलताना नेहमी आदरानं बोलायचा. म्हणायचा- मॅनेजर फार चांगला माणूस आहे."

"बरं, छोट्या शेठबद्दल सीतूला काय वाटत होतं?"

"काही नाही."

"छोट्या शेठनं सीतूशी मैत्री करायचा प्रयत्न केला होता का?"

"नाही. सीतू छोट्या किंवा मोठ्या मालकांना भेटतसुद्धा नसे."

"बरं, आता मला एक शेवटचं सांग, छोट्या मालकांबद्दल तुला काय वाटतं?"

सुबीची चर्या क्षणभर बावरली. पण लगेच ती स्वत:ला सावरून म्हणाली, "त्याला मी हवी होते."

"हे तुला केव्हा समजलं?"

"कारखान्यात मी कामाला असले की तो तिथं येऊन माझ्याकडे रोखून पाहायचा. माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करायचा. मी माथुकाकांच्याकडे निघाले की माझ्याकडं पाहून हसायचा. कधी कधी खुणा करायचा."

"मग ही गोष्ट तू सीतूला सांगितली नव्हतीस?"

"नाही सांगितली!"

"का नाही सांगितलीस?"

"ते शेठलोक मोठे होते. सीतूनं काही भांडण उकरून काढलं असतं तर त्याचा निभाव लागला नसता. सीतूच्या जीविताचं त्यांनी काहीतरी बरंवाईट केलं असतं."

"सीतूच्या जीविताला धोका होऊ नये म्हणून तू ती गोष्ट कोणाला बोलली नाहीस तर?"

"हो, त्याचीच मला चिंता वाटत होती."

"सीतूनं मॅनेजरचा खून करावा असं काही घडलं होतं का?"

"काही नाही."

"मॅनेजरनं लग्न केलेलं नव्हतं. त्यानं कधी तुझी किंवा कोल्ड स्टोअरेजमधल्या इतर पोरी-बाळींची छेड काढण्याचा प्रयत्न केला होता?"

"मुळीच नाही. उलट मला कामावर येऊ नको म्हणून सांगताना त्याला कठीण वाटत होतं. त्याचे डोळे भरून आले होते मला तसं सांगताना."

"ठीक आहे. सुबी, तू मला मोलाची अशी काही माहिती आज दिलेली आहेस. माझ्या मनात ज्या शंका घोळत होत्या त्यांचं आता निरसन झालेलं आहे. आता मला अर्नाकुलमला जायला हरकत नाही."

रावराण्यांनी टेबलावर पालथा ठेवलेला पाईप हातात घेऊन पुन्हा शिलगावला. इतक्यात स्लॉटर हाऊसकडे गेलेले रोमेल डिसूझा परत आले आणि म्हणाले, "आय होप यू हॅव फिनिश्ड."

"हो होऽऽ!" रावराणे हसून म्हणाले, "जे काही विचारायचं होतं ते संपलेलं आहे. आता मला आपण एक मदत करा."

"बोला."

"मला इथून सरळ अर्नाकुलमला जायचं आहे. इथून बोट केव्हा जाते?"

"बोटीनं जाणार? फार विलंब लागतो."

"लागू दे ना. मी आजवर जी माहिती मिळवलेली आहे तीवर विचार करायला एक-दोन दिवस बोटीच्या प्रवासात निश्चितच सवड मिळेल. शिवाय मला बोटीचा प्रवास आवडतो."

"मग काही हरकत नाही. पण आपण आज इथून जाऊ शकणार नाही."

"का?"

"माझ्याकडं येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला इथं एक मुक्काम केल्याशिवाय जाताच येत नाही!"

हसून रावराणे म्हणाले,"अशा अर्थानं म्हणता होय? मग राहीन. पण मला मग बोट केव्हा?"

"इथून पहाटे पाचला 'केप केमोरिन' नावाची बोट सुटते. उद्या पहाटेला तुम्हाला बोटीवर बसवण्याची व्यवस्था केली की पुरे की नाही?"

"थँक्स अ लॉट!"

रावराणे रोमेल डिसूझांच्या सोबत बाहेर आले. चोहोबाजूंनी गर्द वाढलेल्या झाडीत त्यांचा बंगला होता. बंगल्याभोवती ओळीनं नारळीची झाडं लावलेली होती आणि त्या झाडांमुळे कुंपण तयार झालेलं होतं. मंद वाऱ्यावर नारळीची पानं सळसळत होती. आकाश निरभ्र होतं. पलीकडं कोणीतरी फेणीची भट्टी लावली होती. त्यामुळं हवेत एकप्रकारचा गंध दाटला होता. रावराण्यांनी तो एक वेळ हुंगला आणि डिसूझांच्याकडं पाहात म्हटलं, "मद्यनिर्मिती चाललेली दिसते."

"होय. आमची ही डिसूझावाडी म्हणजे एक प्रचंड डिस्टिलरीच आहे. बऱ्याच भट्ट्या आहेत भोवताली. इथल्या या लोकांचा हा वंशपरंपरागत धंदाच आहे. आपल्याला कदाचित कल्पना नसेल, पूर्वी इथं पोर्तुगीजांचा अंमल असताना इथली फेणी परदेशी रवाना व्हायची. पॅरिसमध्ये ती 'इंडियन डेलिकसी' या नावानं ओळखली जायची. परदेशात स्कॉचचं जे स्थान तेच या काजूफेणीचं इथं होतं."

"वाऽऽ! अजूनही या धंद्याकडं लक्ष दिलं तर आपल्या देशाला खूप परकीय चलन मिळू शकेल."

"नक्कीच!"

बोलत बोलत ते झाडी ओलांडून समुद्रकिनारी आले. अर्धा-पाऊण तास दाट झाडीतून चालत आल्यानंतर एकदम अफाट अशा निळ्याभोर सागराचं दर्शन फारच प्रसन्न वाटलं. रावराणे एका खडकावर बसले. रोमेल डिसूझा त्यांच्यासमोर उभे होते. त्यांनी पाईप भरणाऱ्या रावराण्यांना विचारलं, "आपण ज्या प्रकरणाची चौकशी करता आहात त्याची फलनिष्पत्ती काय होणार आहे?"

पाईपमध्ये तंबाखू भरता भरता रावराणे थांबले आणि स्मित करून डिसूझांना म्हणाले,

"माझ्या अंदाजाप्रमाणे जर सर्व व्यवस्थित घडले तर माझ्या चौकशीची ही फलनिष्पत्ती एक प्रचंड वादळ निर्माण करेल."

रोमेल डिसूझांना त्या वाक्याचा उलगडा झाला नाही. रावराणे मात्र दूर क्षितिजाकडे पाहात धूम्रपानाचा आस्वाद घेत बसले होते. त्यानंतर त्या दोघांनी गोवामुक्ती चळवळीनंतर तिथं घडलेल्या सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतराबद्दल चर्चा केली. सूर्यास्तानंतर ते दोघे परतले तेव्हा डिसूझांच्या घरातून तळलेल्या सरंग्याचा वास सुटलेला होता.

रावराण्यांचे घाणेंद्रिय फार तीक्ष्ण होते. त्यांनी कोणता मासा तळला जात आहे हे अचूक ओळखलं, तेव्हा डिसूझा म्हणाले, "मानलं बुवा! वासावरून कोणता मासा तळला जात आहे हे उभा जन्म गोव्यात घालवूनही आम्हाला जमलं नाही."

त्यावर रावराणे म्हणाले, "पोलीसखात्यात असता तर तेही जमलं असतं! पोलीस अधिकाऱ्याला आपली पंचेंद्रिये नेहमीच जागृत ठेवावी लागतात!"

"आता आपण निवृत्त आहात."

"म्हणून काय झालं? तीस वर्षांची सवय अशी दोन-चार वर्षांत विसरते की काय?"

आत डायनिंग टेबलवर काचेच्या प्लेटस् मांडल्या जात असताना डिसूझांनी रावराण्यांना विचारलं,

''पन्नास वर्षांची जुनी फेणी थोडी घेणार का?''

''द्या. गोव्यात येऊन मद्य घेतलं नाही तर तुम्ही काय म्हणाल? माणसानं कसं वागावं- व्हेन इन रोम, बी लाईक ए रोमन! खरंय ना?''

''ॲबसोल्युटली!'' हसत हसत रोमेल म्हणाले आणि बाटली आणण्यासाठी आत गेले.

ooo

# एकवीस

'केप केमोरीन' नावाची प्रचंड बोट दक्षिणेच्या दिशेनं समुद्राच्या लाटा कापीत चालली होती. सेकंडक्लासच्या डेकवर रावराणे पाईप तोंडात धरून सीतूच्या प्रकरणी जमवलेली माहिती लक्षपूर्वक वाचत होते. एकदम त्यांना आठवला तो मॅनेजरच्या मृत्यूचा प्रसंग. नारायणनचे दोन फोटोही त्यांना मिळाले होते. त्याचा जिवंतपणीचा फोटो आणि पोलिसांनी निंबर्डीच्या किनाऱ्यावर त्याच्या प्रेताचा घेतलेला फोटो. रावराणे जाड भिंगातून लक्षपूर्वक न्याहाळून पाहत होते. नारायणनच्या शर्टाचं बटन, त्याचे कुरळे केस, किंचित चपटं नाक, जाड ओठ यावरून ते प्रेत नारायणनचंच होतं, असं दिसत होतं.

पण तरीही रावराण्यांना एक दाट शंका होती- हा प्रेताचा फोटो नारायणनसारखा दिसतो खरा. पण हा त्याचाच असेल का?

रावराण्यांनी फाईल मिटली आणि डेकवरून समोर पसरलेल्या सागराकडे नजर वळवली. काही क्षण आकाशाकडं पाहिलं. आकाश आणि सागर दोन्ही अथांग, अफाट! दूर धूसर दिसणाऱ्या क्षितिजावर एक किंचित जांभळी छटा असलेला पट्टा उमटला होता अन् त्यातच आकाश आणि सागर एकमेकांना भिडले होते. कुठंतरी आकाश हे सागराला भिडलेलं असणार हे सत्य होतं. पण तरीही ते नजरेला दिसत नव्हतं. निसर्गाचं हे कोडं रावराण्यांच्या मनातल्या कोड्याचं प्रतीक होतं की काय न जाणे. सीतूच्या प्रकरणी सत्य काहीतरी निराळं आहे, याची त्यांना खात्री पटत चालली होती. पण तरीही ते निश्चित कसं उजेडात आणायचं, याचा मार्ग त्यांना सापडत नव्हता. निंबर्डीतल्या आपल्या महिनाभराच्या वास्तव्यात त्यांनी सीतूच्या जन्मापासून ते अगदी त्याच्यावर खटला होऊन ते अगदी त्याच्यावर खटला होऊन तो शिक्षेला जाईपर्र्यंत ज्या ज्या घटना घडल्या होत्या त्या सर्व नोंद करून घेतल्या होत्या. सीतूच्या हातून मॅनेजर नारायणनचा खून घडणं असंभवनीय वाटत होतं त्यांना.

बोटीवरच्या रेस्तोराँमधून चहाचा ट्रे घेऊन बेअरा आला. त्यानं बाजूचं पांढरं स्टूल ओढून त्यावर ट्रे ठेवला आणि रावराण्यांना अदबीनं विचारलं,

"लंच किती वाजता आणू?"

"लंच आणू नकोस. मी तिकडं डायनिंग हॉलमध्येच येईन. एकट्यानंच घेणं बरं वाटत नाही मला."

बेअरा हसला आणि तिथून निघून गेला. रावराण्यांनी चहा बनवला आणि एक 'सीप' घेऊन त्यांनी समोर पाहिलं. तर बोटीचे कॅप्टन आपल्या पांढऱ्याशुभ्र वेशात वरच्या केबिनमधून खाली उतरून येत असलेले दिसले. कॅप्टन साहेबांनी रावराण्यांच्याकडे पाहून स्मित केले तेव्हा रावराण्यांनी आपला कप खाली ट्रेमध्ये ठेवून त्यांना विचारलं,

"वुड यू माइंड ए कप ऑफ टी?"

"सर्टनली!" असं म्हणत कॅप्टन त्यांच्यासमोर येऊन बसले. रावराण्यांनी त्यांच्यासाठी एक कप चहा बनवला. चहाचा एक घोट घेऊन कॅप्टनसाहेबांनी त्यांना विचारलं, "काय सहज पर्यटनावर निघालात?"

रावराणे हसून म्हणाले, "सहज कोण जातो? एक काम आहे म्हणून चाललो आहे. अर्नाकुलमला ही बोट केव्हा पोहोचेल? किती अंतरावर आहे?"

"पणजी ते अर्नाकुलम बरोबर साडेपाचशे किलोमीटर इतकं अंतर आहे. उद्या दुपारी चारला ही अर्नाकुलमला टच होईल."

"तिथं काही हॉटेल्स वगैरे आहेत?"

"हो. तिथं मलबार, कॅझिनो, सी लॉर्ड अशी मोठी हॉटेल्स आहेत, शिवाय 'साऊथ स्टार' नावाचं एक मोठं हॉटेल आहे- तिथं जा."

"पण तिथं जागा मिळेल का?"

त्यावर कॅप्टन हसले आणि म्हणाले, "जागा नक्कीच मिळेल आणि जागेची अडचण भासली तर माझं नाव सांगा. कॅप्टन श्रीनिवास अय्यर. तुमची ताबडतोब व्यवस्था होईल."

"साऊथ स्टार'चा मालक माझा जिगरी दोस्त आहे. पूर्वी तो नेव्हीत होता. एका छोट्या अपघातात तो जखमी झाला- त्यामुळं त्याला नेव्हीतून डिस्चार्ज घ्यावा लागला. त्यानंच ते हॉटेल सुरू केलं आहे. चांगलं चाललं आहे त्याचं. दोन बसेस घेतल्या आहेत. चार टॅक्सीज आहेत. अर्नाकुलमच्या परिसरातील प्रेक्षणीय स्थळं दाखवण्याची हॉटेलमार्फत व्यवस्था केली जाते."

"आय सीऽऽ! मग तुमची ओळख झाली हे फार छान झालं. मी प्रथमच चाललो आहे तिकडं."

"डोंट वरी! अगदी आपुलकीनं 'ॲडमिरल' तुमची व्यवस्था करील."

"ॲडमिरल? एवढ्या मोठ्या हुद्यावर होते ते?"

"छे होऽऽ! आम्ही त्याला गमतीनं ॲडमिरल म्हणायचो. पण माणूस मैत्रीला अगदी ए वन!"

"ठीक आहे. मी आपली ओळख सांगतोच त्यांना. माझ्या कामात त्यांचा उपयोग होईल."

"जरूर! तुमची -त्याची जर रास जमली तर तो तुम्हाला हवी ती मदत करील. अगदी विनाअपेक्षा! आपल्या कामाचं स्वरूप काय आहे हे मी विचारलं तर आपल्याला राग तर येणार नाही ना?" कॅप्टन श्रीनिवास अय्यरनी पाचशेपंचावन्नची आपली सिगारेटची पेटी उघडून रावराण्यांच्यापुढे धरून विचारलं, "नो, थँक्स" असं म्हणून रावराण्यांनी आपला पाईप बाहेर काढला व त्यात तंबाखू भरायला सुरुवात करीत म्हटलं, "कॅप्टनसाहेब, तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही. मी एका कठीण अशा कामासाठी तिकडं चाललो आहे. एक मर्डर झालेला होता. त्या कामी एका तरुणाला जन्मठेप झालेली आहे. परंतु त्या केसमध्ये सत्य काहीतरी निराळंच असावं असं माझ्या एका न्यायाधीश मित्राने सांगितल्यावरून मी त्या प्रकरणावर काही नव्यानं प्रकाश टाकता येईल की काय याची चौकशी करण्यासाठी चाललो आहे. मी रिटायर्ड सी. आय. डी., डी. आय. जी. आहे."

"ओऽहोऽऽ! वंडरफुल! आपल्यासारख्यांची ओळख होणं हे मी माझं भाग्यच समजतो!"

"पण मी माझ्या कामासाठी आपणाला त्रास तर देत नाही ना?"

"मुळीच नाही. त्यात त्रास कसला आला आहे? अहो, रात्रंदिवस आमचा या सागराशी संबंध! त्यामुळं तुमच्यासारख्या पोलीस अधिकाऱ्याकडून एखाद्या गुंतागुंतीच्या खटल्याची हकिगत ऐकायला मिळाली तर तेवढाच विरंगुळा! आपली काही हरकत नसेल तर मीही ती हकिगत ऐकायला अत्यंत आतुर आहे."

रावराण्यांनी शांतपणे पाईपचे दोन-चार झुरके घेतले आणि विचार केले. हा या बोटीचा कॅप्टन. याच्याशी मी या प्रकरणाबद्दल बोललो तर काहीच हरकत नाही.

रावराण्यांनी कॅप्टन श्रीनिवास अय्यर यांना सीतूचं ते प्रकरण सुरुवातीपासून सांगायला सुरुवात केली. कॅप्टन अगदी तन्मय होऊन ती हकिगत ऐकत होते. मध्येच त्यांना कसलीशी आठवण झाल्यानं ते म्हणाले, "एस्क्यूज मी. जरा केबिनमध्ये माझ्या असिस्टंटला थोड्या सूचना देऊन येतो."

"या. पण माझ्यामुळं तुमच्या कामात व्यत्यय येणार नाही हे पाहा."

"ओह नो, नो! सर्टनली नॉट!"

कॅप्टन ज्या शिडीवरून खाली उतरले होते त्याच शिडीनं ते आपल्या केबिनमध्ये गेले. त्यांनी 'व्हील' वर असलेल्या आपल्या सहकाऱ्याला काही सूचना दिल्या. स्टीम प्रेशर किती आहे हे पाहिलं, होकायंत्राच्या डायलमध्ये आपली बोट इच्छित मार्गानंच जात आहे, याची खात्री करून घेतली आणि बाजूच्या बिनतारी संदेश देण्याच्या खोलीत प्रवेश केला. तिथून त्यांनी काहीतरी संदेश दिला आणि परत ते सेकंडक्लासच्या केबिनसमोर रावराणे बसले होते तिथं आले.

"एस्क्यूज मी, सर. खरोखरच तुम्ही सांगितलेली ही हकिगत अतिशय मनोवेधक आहे. आपण आता या प्रकरणावर नव्यानं प्रकाश टाकणार म्हणजे काय करणार हे मात्र मला समजलं नाही." खुर्चीत आरामशीर बसता बसता कॅप्टन श्रीनिवास म्हणाले.

"हे पाहा या फाईलमधील हे फोटो. हा मॅनेजर नारायणनच्या प्रेताचा फोटो. आता हे प्रेत थोडेसे 'डीकंपोज' झालेले होते. किंचित सडलेले होते. पण, तरीही हे प्रेत मॅनेजर नारायणनचंच असावं असं दिसतं. आता हा नारायणनचा जिवंत असतानाचा फोटो पाहा." असं म्हणून रावराण्यांनी नारायणनचे पूर्वीचे दोन फोटो कॅप्टन श्रीनिवास यांना दाखवले. ते दोन्ही फोटो जवळ घेऊन अगदी बारकाईनं त्यांचं निरीक्षण करीत कॅप्टन श्रीनिवास म्हणाले, "मला वाटतं, मी या गृहस्थाला पाहिलेलं आहे."

"कुठं? अन् केव्हा?" रावराण्यांनी चटकन विचारलं.

"तीन आठवड्यांपूर्वी- दमणला."

"नक्कीऽऽ?"

"मोस्ट सर्टनली! आणि माझी खात्री आहे की हाच तो माणूस असावा! अगदी असेच कुरळे केस, किंचित सावळा रंग, चपटं नाक. पण त्यानं डोळ्यांवर गॉगल चढवलेला होता. मला आठवतं. फॅक्टरीमध्ये मी आणि मिस मार्कोनी गेलो होतो तेव्हादेखील यानं आपल्या डोळ्यांवरचा गॉगल काढलेला नव्हता. गरज नसतानादेखील डोळ्यांवरचा गॉगल तसाच ठेवून तो आम्हाला माहिती देत होता."

"कसली?" रावराण्यांनी अधीर होऊन विचारलं.

"कोल्ड स्टोअरेजची"

रावराणे आपली खुर्ची पुढं ओढून म्हणाले,

"कॅप्टनसाहेब, तुम्ही जे बोलता जे सत्य आहे ना? का केवळ तसा भास होतो आहे तुम्हाला?"

"ओह! नो, नो! सर, मी अगदी पूर्ण शुद्धीवर आहे. मिस मार्कोनी ही माझी मैत्रीण आहे आणि गेल्या महिन्यात ती माझ्यासोबत कच्छमध्ये कांडला बंदरावर आली होती. येताना दमणला आम्ही थोडावेळ थांबलो होतो. तिथं कोल्ड स्टोअरेजमधून लॉबस्टर आणण्यासाठी आम्ही दोघं गेलो होतो. त्यावेळी मी हा फोटोतला माणूस बघितल्याचं मला पक्कं स्मरतं

आहे.''

''कॅप्टनसाहेब, कधी कधी दोन माणसांत विलक्षण साम्य आढळतं.''

''कबूल आहे मला; पण इतकं साम्य मुळीच आढळणार नाही.''

पुन्हा मॅनेजर नारायणनचा तो फोटो न्याहाळत कॅप्टन श्रीनिवास म्हणाले, ''त्या मॅनेजरचा सावत्र भाऊदेखील दिसायला अगदी त्याच्यासारखाच होता. कदाचित तोही दमणला असण्याची शक्यता आहे.''

''ते काही मला ठाऊक नाही. पण साहेब, मी अगदी आत्मविश्वासानं सांगू शकतो की, या फोटोतल्या माणसाची चर्या त्या माणसाच्या चर्येशी बिलकूल मिळती-जुळती आहे. तुम्ही एकदा दमणला जाऊन खात्री का नाही करून घेत?''

''दमणलाच काय, दमास्कसलासुद्धा जाईन. पण तत्पूर्वी मला थोडी खात्री करून घ्यायची आहे?''

''कोणती?''

''मॅनेजर नारायणनचा भाऊ कृष्णन सध्या कुठं आहे हा?''

''आय सीऽऽऽ! म्हणून तुम्ही अर्नाकुलमला चालला आहात तर?''

''दॅटस् इट! कृष्णन मला भेटल्यानंतर माझ्या चौकशीला अधिक सुसूत्रता लाभणार आहे. शिवाय मला सारखी एक गोष्ट खटकते आहे.''

''कोणती?''

''हा कृष्णन चार-दोन महिन्याला नारायणनकडे येऊन पैशांसाठी त्याला उपद्रव देत असे. तो गेल्या सहा महिन्यांत निंबर्डीला भावाच्या चौकशीसाठी का आला नाही? की कृष्णननच नारायणनचा खून केला म्हणून तो तिकडे फिरकला नाही? अशा अनेक शंकाकुशंकांची उचल मला कृष्णन भेटल्याशिवाय होणार नाही. शिवाय आत्ताच तुम्ही दमणला मॅनेजर नारायणनसारखा माणूस पाहिल्याचं सांगून माझ्या कल्पनाशक्तीला एक निराळीच दिशा दाखवून दिली आहे.''

''पण मी सांगतो ते खरं की नाही याची आपण जरूर प्रचिती घ्या.''

''घ्या म्हणजे? घ्यायलाच हवी! अहो, मी गेले दोन महिने ही सर्व माहिती जमा केलेली आहे तिचा हेतू काय मग? मॅनेजरच्या मृत्यूचं गूढ उकलण्याचाच हेतू आहे माझा. आता प्रथम मी अर्नाकुलमला जातो आहे. तिथं मी त्या कृष्णनचं घर शोधणार, त्या कुटुंबाची माहिती घेणार आणि त्यानंतर तुम्ही ज्या मॅनेजरसदृश माणसाला पाहिलं आहे तो कोण आहे हे पाहण्यासाठी दमणला जाणार. पण मला आपण सांगा- या मिस मार्कोनी कोण?''

''ही एक अशीच पोरगी आहे. खलाशी लोक घरदार सोडून चार-चार, सहा-सहा महिने बाहेर राहतो. मग अशा मैत्रिणी भेटतात आम्हाला!''

गालांतल्या गालात कॅप्टन श्रीनिवास हसले. रावराण्यांना त्यांचा स्पष्टवक्तेपणा फार आवडला. ते म्हणाले,

''जरूर पडल्यास मला मिस मार्कोनी थोडं साहाय्य करू शकतील का?''

''सर्टनली! तशी ती फार जॉली आहे. तुम्ही तिला माझं नाव तर सांगा.''

''अहो, पण तिचा पत्ता सांगितल्याशिवाय मी तिला भेटू कसा?''

''खरंच की! घ्या-मिस मार्कोनी, कोलाबा रोमन कॅथॉलिक चर्चमागे. मुंबई.''

''अच्छा! मी म्हणतो, जर या मार्कोनीबाई दमणला माझ्यासोबत आल्या आणि त्यांनी तो नारायणनसारखा दिसणारा माणूस मला दाखवून दिला तर फार बरं होईल. मला अधिक शोधाशोध करावी लागणार नाही.''

''अगदी बरोबर, तुम्ही मिस मार्कोनीला हा फोटो दाखवा ना. तीसुद्धा माझ्याप्रमाणेच सांगते की नाही बघा.''

''पण गुप्तता राखू शकेल ना ती?''

''तिच्याइतकी गुप्तता तुम्हालासुद्धा राखता येणार नाही साहेब! काल तिच्याकडं कोण येऊन गेला याचा आज जाणाऱ्याला मुळीसुद्धा थांगपत्ता लागू देत नाही ती. जाणाऱ्या माणसानं आम्हाला सांगावं तेव्हाच समजणार. तशी फार विश्वासू आहे.''

''हांऽऽ! नाही तर काय होईल- मी इतके कष्ट घेऊन ही माहिती मिळवलेली आहे. ती जर बाहेर फुटली तर माझे सारे कष्ट वाया जातील.''

''माझ्यावर विश्वास ठेवा. मिस मार्कोनी हा धंदा करते. पण ही गोष्ट फारच थोड्या लोकांना ठाऊक आहे. मला तिच्याबद्दल खात्री आहे.''

''ते ठीक आहे पण अशा माझ्या कामासारख्या बाबतीत अद्याप कोणी तिचं साहाय्य मागितलेलं नसेल.''

''पण खरं सांगू- तुम्ही हे जे सर्व सीतू प्रकरण सांगितलं आहे ते ऐकल्यावर मला असं वाटलं की, आपण सर्वतोपरी तुम्हाला साहाय्य करावं, तसं मिस मार्कोनीलादेखील नक्कीच वाटेल.''

''थँक्स. आपली ही भेट मला फार मोलाची ठरणार आहे.'' कागदपत्रांची फाईल बंद करून ती अटॅचीमध्ये ठेवून रावराणे म्हणाले, ''साडेअकरा वाजले.''

''हो ना. दोन तास कसे गेले समजलंसुद्धा नाही.'' कॅप्टन श्रीनिवास आपली पांढरी-निळी पी-कॅप व्यवस्थित डोक्यावर ठेवून म्हणाले, ''आता आपण मिळूनच लंच घेऊ.''

''ओकेऽऽ!'' रावराणेही त्यांच्या पाठोपाठ उठले.

०००

# बावीस

दुसऱ्या दिवशी अर्नाकुलमला बोट पोहोचली ती अपेक्षित वेळेपेक्षा थोडी लवकरच. बोट किनाऱ्यावर लागली. कॅप्टन श्रीनिवास रावराण्यांच्या सोबत बंदरावर उतरले तेव्हा समोरून एक निळ्या सूटमधले तरुण गृहस्थ हसत हसत पुढे आले. त्यांनी कॅप्टन श्रीनिवासनना हस्तांदोलन करून विचारलं, "कोण मेहमान घेऊन आलात?"

"हे काय- मिस्टर रावराणे, रिटायर्ड डी. आय. जी., सी. आय. डी! साहेब, हे पाहा आमचे ॲडमिरल-'साऊथ स्टार' हॉटेलचे मालक!"

"अरे हो! पण हे कसे काय नेमके आले इथं?" रावराण्यांनी विचारलं.

"काल बोटीवरून मी वायरलेस मेसेज पाठवला होता ना इथल्या हार्बरवर."

"कमाल केलीत कॅप्टसाहेब!" रावराणे आश्चर्यचकित होऊन म्हणाले,

"त्याचं असं आहे साहेब, एका मुरब्बी पोलीस अधिकाऱ्याचा सहवास लाभल्यानंतर मलाही थोडेसे दुसऱ्याला आश्चर्याचे धक्के देण्याची इच्छा होणं साहजिक आहे की नाही? शिवाय असाही विचार केला, की तुम्ही इकडं पहिल्यांदाच येता आहात: आणि सत्वर राहण्याची व्यवस्था झाली की ज्या महत्त्वाच्या कामासाठी तुम्ही इकडं आलात त्यासाठी तुम्हाला स्वास्थ्यही लाभेल."

"तुमचे उपकार कोणत्या शब्दांनी मानावेत हे काही समजत नाही मला." रावराणे कृतज्ञता व्यक्त करीत म्हणाले.

"साहेब, आयुष्यात अशा गाठीभेटी क्वचित पडतात. न जाणो पुन्हा या आयुष्यात आपली भेट होते की नाही! तुम्ही पुन्हा 'केप केमोरीन' या बोटीनं प्रवास कराल याची खात्री कोणी द्यावी?"

"खरंय ते. पण तुम्ही मात्र दीड दिवसाच्या भेटीत दीड तपाची आपली मैत्री असल्यासारखे वागलात माझ्याशी."

"थँक्स फॉर द कॉंप्लिमेंटस्. सो ॲडमिरल, यू विल डु ऑल धिस जंटलमन!"

"ऑफ कोर्स!" ॲडमिरल म्हणाले.

अर्ध्या तासानं 'केप केमोरिन' ही बोट इंधन घेतल्यानंतर पुढे निघाली. ती पुढे कन्याकुमारीवरून थेट कोलंबोला जाणार होती. परतलेले कॅप्टन श्रीनिवास बोटीच्या वरच्या डेकवरून हात हलवून रावराणे आणि 'ॲडमिरल' यांचा निरोप घेत होते. सुटण्याच्या वेळी बोटीचा प्रचंड भोंगा वाजला आणि त्या ध्वनीने बंदरावरचे वातावरण कंपायमान झाले.

ॲडमिरल आपली गाडी घेऊनच बंदरावर आले होते. ते स्वत:च गाडी चालवायला बसले. रावराणे त्यांच्याशेजारी पुढे बसले. गाडी समुद्रकिनाऱ्याशी समांतर असलेल्या डांबरी रस्त्याने निघाली.

केरळला दक्षिणेचे काश्मीर का म्हणतात याचा रावराण्यांना अनुभव येऊ लागला. जागोजागी पाणी होतं. भोवताली ओळीनं नारळाची झाडं उभी होती. त्या झाडांतून पिवळ्याजर्द पानांची, लाकडाच्या खोडावर उभी अशी किनाऱ्यावर राहणाऱ्यांची घरं दिसत

होती. मध्येच एखादी होडी त्या शांत जलपृष्ठावर तरंग उठवीत इकडून तिकडे जात होती. तिकडं महाराष्ट्रातही असाच समुद्रकिनारा होता, पण रावराण्यांना केरळच्या समुद्रकिनाऱ्यात एक आगळंच सौंदर्य दिसू लागलं.

झाडीचा प्रदेश ओलांडून गाडी भातशेतीच्या परिसरातून चालली. मघा डोळ्यांसमोर निळीभोर सरोवरं दिसली. आता ही हिरवीगार मैलच्या मैल पसरलेली भातशेतीदेखील हिरव्यागार सरोवरांसारखीच भासू लागली. मध्येच बांधावर एखादं पामचं झाड डोलताना दिसत होतं.

''अजून किती दूर जायचंय?''

''ती बघा समोर दिसते तीच 'साऊथ स्टार' ची इमारत.''

''अरे वा! भलतीच उंच आहे!''

''सातमजली आहे. इकडच्या भागात अशी बरीच मोठी हॉटेल्स आहेत.''

''पण प्रवासी लोक मोठ्या संख्येनं येतात इकडं?''

''हो. जास्त करून परदेशी प्रवासी येतात. आता हॉटेलमध्ये गेल्यानंतर बघा ना- हॉलंड, बेल्जम, नॉर्वे, स्वीडनपासून ते थेट अमेरिकेपर्यंतचे प्रवासी दिसतील. केरळच्या सीनरीवर ते लोक फार खूष होतात. निरभ्र आकाश, भोवताली ही बारमाही हिरवळ आणि मैलच्या मैल पसरलेला हा बीच. त्या लोकांना बीचवर लोळायला फार आवडतं ना! आमच्या 'साऊथ स्टार' च्या मागेच बीच आहे. खुश्शाल बिअर पीत लोळत असतात बीचवर.''

''हे लोक इकडं येऊन खातात काय?''

''काय वाट्टेल ते खातात. त्यांना पाश्चात्य पद्धतीचं जेवण पाहिजे असं काही नाही. आमच्याकडचं सास अन्नम किंवा फिश-करी आणि राईससुद्धा अगदी आवडीनं खातात.''

''कमाल आहे त्या लोकांची!''

''पण त्या लोकांचा एक गुण मात्र अगदी घेण्यासारखा आहे. पैसे खूप कमावतात आणि त्या पैशांचा पुरेपूर उपभोगही घेतात. नाही तर आम्ही भारतीय! कमवायचं, कमवायचं, मरेपर्यंत कमवायचं आणि त्या पैशांचा उपभोग न घेता एक दिवस मरून जायचं! युसलेस!''

''त्याचं काय आहे ॲडमिरलसाहेब...''

''अरे, हे काय?तुम्हीसुद्धा मला ॲडमिरल म्हणू लागलात? अहो, माझं नाव आहे सी. चंद्रशेखर.''

''पण ॲडमिरल म्हणायला बरं वाटतं!'' हसत हसत रावराणे म्हणाले.

''मग बेशक म्हणा. तुमची आणि आमच्या श्रीनिवासची गट्टी फारच जमलेली दिसते.''

''गट्टी कुठली. कालच सहज येता येता ओळख झाली. पण त्या गृहस्थानं माझ्यासाठी खूपच केलं हं. काल दोन्ही वेळच्या जेवणाचं बिल मला देऊ दिलं नाही. वायरलेस मेसेज देऊन तुम्हाला बंदरावर बोलावून घेतलं. एवढं आजच्या जगात कोण कोणासाठी करतो?''

''त्याचा स्वभाव तसा आहे साहेब. आम्ही पूर्वी नेव्हीत एकत्र होतो. याच्या दिलदार स्वभावाला तोड नव्हती. पण बिचाऱ्याला संसाराचं सुख लांभलं नाही हो! पहिल्या बाळंतपणात पत्नी वारली.''

''दुसरं लग्न नाही केलं?''

''नाही केलं. म्हणतो, मरताना मागे कोणाचाच पाश नसावा. तेव्हापासून अगदी 'हॅपी गो लकी' वागतो आहे. पण काही म्हणा, अगदी लव्हेबल चॅप आहे.''

''त्यात वादच नाही. पण त्यांचं संसारी जीवन उद्ध्वस्त झालं आहे याची थोडीसुद्धा छटा त्यांच्या चेहऱ्यावर दिसली नाही.''

"दिसणारच नाही. बोटीतून प्रवास करणाऱ्या लोकांशी हसून ओळखी करतो. त्यांच्यासाठीच जे काही करता येणं शक्य आहे ते करतो. लहान मुलं दिसली की हा भलताच रंगतो. त्यांना बोटीवरच्या स्टॉलवर नेऊन चॉकलेटस् देईल, फ्रूट ज्युस देईल- काय वाट्टेल ते करील त्यांच्यासाठी."

"अरेरे!"रावराणे किंचित भारावल्यासारखे होऊन म्हणाले, "अशा माणसाचं वैयक्तिक आयुष्य खरं म्हणजे सुखी असायला हवं होतं."

इतक्यात 'साऊथ स्टार' हॉटेलपाशी ती फियाट कार येऊन थांबली. पोर्चमध्ये उभ्या असलेल्या नोकरानं पुढं येऊन अदबीनं गाडीचं दार उघडलं.

रावराण्यांच्या सोबत ॲडमिरल स्वत: त्यांच्या रूमपर्यंत पोहोचवायला आले. सहाव्या मजल्यावरची खोली रावराण्यांच्यासाठी त्यांनी राखून ठेवली होती. इथून अर्नाकुलम शहराचा सर्व भाग दिसत होता. पश्चिमेचा कित्येक मैलांचा सागरकिनाराही तिथल्या खिडकीतून दिसत होता. खोलीतली व्यवस्थाही सुरेख होती.

"कशी काय वाटली जागा?"

"फारच छान!"

"आपण आता आराम करा. मी थोडं खाली कामाचं पाहतो."

"पाहा. पण मला इथं कृष्णन आणि नारायणन या दोघा भावांबद्दल थोडी माहिती हवी होती."

"पण या नावांवरून काय माहिती मिळणार?"

"हे दोघे एकमेकांचे सावत्र भाऊ होते. त्यांच्या मालकीचे काही पडावं होते. शिवाय ते इथल्या मट्टमचेरी भागात राहात होते. इतक्या माहितीवर त्यांचं घर मिळेल का?"

"नक्की. उद्या सकाळपर्यंत तुम्हाला त्या घरी पोहोचवण्याची व्यवस्था होईल. इथली काही माणसं बोलावून घ्यावी लागतील मला."

"अत्यंत आभारी आहे."

त्या रात्री रावराण्यांनी पुन्हा एकदा ती फाईल उघडली. त्यातला नारायणनचा फोटो घेऊन तो कॉटवर उभा लावूनठेवला आणि त्याच क्षणी ते विचार करू लागले. कॅप्टन श्रीनिवास यांनी दमणच्या कोल्ड स्टोअरेजमध्ये बघितला तो कोण? नारायणन की कृष्णन? की त्यांच्यासारखा दिसणारा कोणीतरी तिसराच? जगात एकसारखी अशी दिसणारी खूप माणसं असतात. पण तोही माणूस तिथल्या कोल्ड स्टोअरेजमध्येच कसा? एकसारखं दिसणं हा एक योगायोग असेल- पण कोल्ड स्टोअरेजचा योगायोग कसा?

खूप वेळपर्यंत रावराणे विचार करत बसले होते. इतक्यात त्यांच्या खोलीतली फोनची बेल खणखणली.

"सर, मी ॲडमिरल बोलतो आहे."

"बोला."

"तुमचं काम झालं. तुम्हाला हवं ते घर मिळालेलं आहे. पण-"

"पण काय?"

'पण त्या घराबाबत इथं फारसं चांगलं बोललं जात नाही म्हणे."

"म्हणजे?"

"त्या घरातल्या दोन मुली दुबईला धंदा करण्यासाठी गेल्या. दुसऱ्या दोनदेखील त्याच मार्गाला लागलेल्या आहेत."

"मला त्या मुलींशी कर्तव्य नाही. त्या मुलींचा बाप कृष्णन याला भेटायचं आहे मला."

''त्याचा काही ठावठिकाणा मिळाला नाही. पण तुम्हाला त्याच्या घरी जाऊन चौकशी करायची असेल तर उद्या माझा ड्रायव्हर तुम्हाला तिकडे घेऊन जाईल.''

''ओके! थँक्स अ लॉट!''

''जेवायला किती वाजता येणार?''

''अर्ध्याएक तासात.''

''खाली बार आहे. सगळा विदेशी पाहुणे तिथं जमतात. गम्मत म्हणून थोडा वेळ तिथं येणार असाल तर या.''

''येतो, येतो.''

तळमजल्यावरून आणखीन खाली एका जिन्यानं गेल्यानंतर 'साऊथ स्टार' चा आलिशान बार होता. बारच्या दारावरच ॲडमिरल रावराण्यांची वाट पाहात उभा होता. बंद काचेच्या दाराजवळ निळ्या वेशातला बेअरा उभा होता. त्यानं कमरेत वाकून अभिनंदन केलं आणि बारचं ते काचेचं दार उघडलं. ॲडमिरलच्या सोबत आल्यामुळं बारच्या कौंटरवरची मंडळी रावराण्यांच्याकडं हे कोणीतरी शाही मेहमान आहेत, अशा नजरेनं पाहू लागली. लाल गालिच्यावरून ते दोघे बाजूच्या एका मोकळ्या टेबलापाशी येऊन स्थिरावले. बारमधलं वातावरण न पिताच चढत होतं. रेकॉर्ड प्लेअरवर धुंद करणाऱ्या पाश्चात्य संगीताचे सूर तरळत होते. जागोजागी बसलेले परदेशी पर्यटक आपल्या मैत्रिणींच्या कमरेला विळखा घालून मदिरेची लज्जत चाखत होते. दुसऱ्याला उपद्रव होणार नाही इतक्या हळुवार आवाजात त्यांचं संभाषण चाललं होतं. शिवाय मद्यप्राशन करता करता एखाद्यानं आपल्या प्रेयसीशी काही चाळे केले तर दुसऱ्यांना दिसू नये म्हणून की काय, बारमधले विजेचे दिवे झुरल्यासारखा मंद प्रकाश देत होते. बारच्या भिंतीवर संपूर्ण नग्न अशा युवतींची रासक्रीडा चित्रित करण्यात आली होती.

रावराण्यांना ते नवखं नव्हतं. नोकरीवर असताना त्यांनी पुण्या-मुंबईत चोरून चालणाऱ्या अशा गुत्त्यांवर धाडी घातल्या होत्या. रावराण्यांना ॲडमिरलनी विचारलं, ''काय घेणार आपण?''

हसून रावराणे म्हणाले, ''तसं म्हणाल तर मी मद्यप्रेमी नाही; पण कंपनीसाठी म्हणून एखाद-दुसरा पेग घेईन व्हिस्कीचा.''

''ओकेऽऽऽ!''

ॲडमिरलनी बाजूला उभ्या असलेल्या वेटरला दोन 'व्हाईट हॉर्स' आणायला फर्मावले. रावराण्यांनी पाईप भरता भरता विचारलं.

''हे केस वाढवलेले हिप्पी प्रवासी दिसताहेत. यांच्याजवळ पैसा येतो कुठून?''

'घेऊन येतात येताना.''

''पण हे असे दरिद्री का दिसतात? एकाच्या तरी अंगावर चांगले कपडे आहेत का बघा ना.''

''त्याचं काय आहे साहेब. ही तरुण पिढी वडीलधाऱ्यांच्या वागणुकीनं त्रस्त झालेली आहे. त्यांना या पिढीतल्या दांभिकतेवर प्रहार करायचा आहे.''

''ते खरं; पण असं गांजेकसारखं वागून कसा काय प्रहार करणार ते? साले जवळून निघाले तर उकिरड्यावर लोळणाऱ्या डुकरासाठी घाण येते त्यांच्या अंगाला!''

ॲडमिरल हसत हसत म्हणाले, ''हे लोक म्हणतात, अंघोळी करणं हीच अनैसर्गिक गोष्ट आहे! जंगलातले प्राणी रोज अंघोळ करतात का? असं हे विचारतात!''

''जंगलात असतात ती जनावरं; तुम्ही लेको माणसं आहात!''

''पण माणसांनी ज्या रूढी आणि संस्कार घडवले ते अनावश्यक आहेत असं यांना

वाटतं. फ्री सेक्स लाईफ असावं असं मानणारे काहीजण आहेत यांच्यात.''

''फ्री सेक्स लाईफ? म्हणजे कोणत्याही बाईनं कोणत्याही पुरुषाबरोबर जावं?''

''होऽऽ! नीती-अनीती हे सर्व थोतांड आहे म्हणतात.''

ॲडमिरल त्यावर हसले. इतक्यात बेअराने व्हिस्कीचे ग्लास आणि सोडा आणून ठेवला. ॲडमिरलनी रावराण्यांना किती हवा तो सोडा त्यांच्या ग्लासात ओतला. आपल्याही ग्लासात घेतला. नंतर एकमेकांनी 'चिअर्स' करून ग्लास ओठाला भिडवले.

रावराण्यांनी पाईपचा एक झुरका घेऊन विचारलं,

''इतक्या तातडीनं तुम्हाला त्या कृष्णनच्या घराची माहिती कशी मिळाली?''

''त्याचं काय आहे साहेब, या हॉटेलच्या धंद्यामुळे समाजातल्या सर्व स्तरांतल्या लोकांच्या ओळखी होतात. हॉटेलमध्ये येणारे काहीजण अतिमद्यप्राशन करून धिंगाणाही घालतात. तेव्हा त्यांचं मानगुट पकडून त्यांना पलीकडे बीचवर नेऊन सोडण्यासाठी काही दादालोकांचं साहाय्य घ्यावं लागतं. या दादालोकांना गावातली बरीच माहिती असते. कुठं गुत्ते आहेत, कुठं चोरून धंदा करणाऱ्या बाई- पोरी आहेत, कुठं जुगार चालतो- सारं सारं त्यांना ठाऊक असतं. तुमच्या त्या कृष्णनच्या दोन पोरी दुबईला गेल्या. दुसऱ्या दोन असाच थिल्लरपणा करतात असं समजलं.''

''म्हणजे मुलींच्यामुळे बापाचा पत्ता मिळाला तर?''

''हो.''

''ठीक आहे. मी उद्या समक्षच जातो ना.''

''पण काय काम तरी काय आहे?''

त्यावर रावराणे म्हणाले, ''फार गुंतागुंत आहे ती. तुम्हाला सविस्तर सांगेन नंतर. ती सर्व हकिगत सांगत बसलो तर ही स्कॉच निष्प्रभ होईल!''

या रावराण्यांच्या वक्तव्यावर ॲडमिरल हसले आणि म्हणाले, ''काही हरकत नाही. पण श्रीनिवासननं मला तुम्हाला हवी ती मदत देण्याबद्दल सांगितल्यानं मला ती करणं भागच आहे.''

त्यानंतर इकडच्या तिकडच्या गप्पा मारता मारता दोन-दोन पेग संपले. रात्री दहाच्या सुमारास जेवणंही झाली. ॲडमिरलनी रावराण्यांना अत्यंत अदबीनं वागवलं. रात्री त्यांना गुडनाइट' म्हणून खोलीकडं झोपायला जाताना रावराणे म्हणाले,

''मी सकाळी नऊला तयार आहे. आपण ड्रायव्हरला सांगून ठेवा.''

''डोंट वरी. सकाळी ठीक नऊ वाजता ड्रायव्हरच तुमच्या खोलीकडं येईल, मग तर झालं?''

''थँक्स!''

रावराण्यांनी सहाव्या मजल्यावरच्या आपल्या खोलीतली पश्चिमेकडची खिडकी उघडली. थंड अशा वाऱ्याचा सुखद झोत अंगावर आला. वरून किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटा अंधारातदेखील स्पष्ट दिसत होत्या. आकाश ग्रह-ताऱ्यांनी भरलेलं होतं. दूर समुद्रातून चाललेल्या बोटीवरचा लाल दिवा कृत्रिम उपग्रहासारखा फिरत असल्याचा भास होत होता. रावराणे बराच वेळ खिडकीजवळ उभे होते. मोहनराव दिवेकरांनी त्यांना चित्रदुर्गाच्या जेलमधून ते पत्र पाठवलं नसतं तर त्यांना इतकी भिन्न स्वभावाची माणसं भेटलीच नसती. निंबर्डीचे ते माथुकाका, बाशामामू, फटू भंडारी, कॅप्टन श्रीनिवासन् आणि आज भेटलेले हे 'ॲडमिरल!' रावराणे विचार करू लागले. ही माणसं ना माझ्या जातीची ना गोताची; पण किती जिव्हाळा लावला मला त्या कॅप्टननी आणि या ॲडमिरलनी! ज्यावेळी मी सत्तेवर होतो तेव्हा माझ्या

भोवतालची माणसं माझ्याशी अशीच अदबीनं वागायची पण ती अदब, तो मान-सन्मान- सारं झूट होतं. आज मी सत्तेवर नसताना जी माणसं मला पे्रमानं वागवतात त्यांचं ऋण मला कसं विसरता येईल? हा कॅप्टन श्रीनिवन! आयुष्यात याला मी कधी बघितलेला नव्हता. पण किती जीव लावला त्यानं मला! स्वत:चं वैवाहिक आयुष्य उद्ध्वस्त झाल्याची यत्किंचितही छटा मला त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली दिसली नाही. या देशात अशी कित्येक माणसं असतील; पण प्रांत, जात आणि धर्म यांनी ती एकमेकांपासून दुरावलेली आहेत. हे सर्व भेदाभेद केव्हा नष्ट होतील? माथुकाकांच्यासारखे सर्वधर्मीयांवर प्रेम करणारे धर्मोपदेशक या देशातल्या प्रत्येक धर्मात का नाही निर्माण होत?

क्षणभर रावराण्यांना आपण अर्नाकुलमला का आलो आहोत, याचंही विस्मरण झालं. बराच वेळ खिडकीतून येणारं थंड वारं अंगावर घेतल्यामुळं त्यांचे डोळे जड झाले. ते अंथरुणावर येऊन आडवे झाले.

०००

# तेवीस

केरळच्या सृष्टिसौंदर्यानं रावराण्यांना भुरळ पाडली. पण इतक्या सुंदर अशा भूप्रदेशातले लोक सुखी नाहीत हे पाहून त्यांना दु:ख झाले. बहुसंख्य लोक कम्युनिस्ट आणि नक्षलवादी का व्हावेत हे त्यांना कळेना. त्यांनी गाडीच्या ड्रायव्हरला जाता जाता विचारलं, ''इथले लोक घातपात का करतात?''

ड्रायव्हर गालांतल्या गालांत हसत म्हणाला,

''एक माणूस पंचपक्वान्नांचं ताट समोर घेऊन खात बसतो आणि दुसरा उपाशी त्याच्याकडं आशाळभूत नजरेनं पाहात राहतो. असं जर नित्यनियमानं घडू लागलं तर तो उपाशी माणूस किती दिवस स्वस्थ बसेल?''

रावराणे क्षणाचाही विलंब न लावता म्हणाले,

''तो उपाशी माणूस स्वस्थ बसणार नाही. एक ना एक दिवस तो पंचपक्क्वान्न खाणाऱ्यावर तुटून पडेल.''

''मग नेमकं तेच घडलेलं आहे इथं! तुम्ही जी ही भातशेती, नारळाच्या बागा, रबराचे प्लँटेशन्स, नारळापासून बनवल्या जाणाऱ्या वस्तूंचे कारखाने पाहता त्यांचे मालक पिढ्या न् पिढ्या मालकच राहिले. त्यांच्या संपत्तीत भर पडत राहिली आणि जे मजूर होते ते अधिकाधिक दरिद्री होत राहिले. जोपर्यंत या मजुरांना आणि कष्टकरी जनतेला दोन वेळेपुरतं मिळत होतं तोपर्यंत ती गुरासारखी राबत होती. पण जेव्हा यांना शिक्षण मिळालं अन् एकवेळपुरतं देखील पोटाला मिळेना, तेव्हा त्यांनी हाती शस्त्र घेतलं! काही लोक त्यांना कम्युनिस्ट म्हणतात, काही नक्षलवादी म्हणतात झालं. सारी किमया शिक्षणानं केली. केरळमध्ये शिक्षणाचं प्रमाण जवळजवळ शंभर टक्क्यापर्यंत येऊन पोहोचलेलं आहे.''

''आता यातून काही मार्ग?'' रावराण्यांनी विचारलं.

''मार्ग खूप आहेत; पण ते शोधण्याची तळमळ नेतेमंडळीत नाही. जो तो नेता आपला स्वार्थ कसा साधेल याचा विचार करीत असतो.''

''मग अशा स्वार्थी लोकांना नेते म्हणून लोकांनी मान्यता द्यावीच कशाला?''

''कोण देतो मान्यता? स्वत:च डांगोरा पिटत राहतात - आम्ही गरिबांचे वाली, आम्ही जनतेचे कैवारी म्हणून! साहेब, तुम्ही इथं आल्यापासून 'साऊथ स्टार' मधलं वातावरण बघितलंत. आता तुम्हाला इथल्या दारिद्र्याचं प्रदर्शन पाहायचं असेल तर चला माझ्यासोबत.''

''पाहायलाच हवं कशाला? तुम्ही सांगता त्यावर माझा विश्वास आहे. पोलीस अधिकारी या नात्यानं मी पुण्या-मुंबईतल्या झोपडपट्ट्यातलं वातावरण अगदी जवळून पाहिलेलं आहे. त्यातल्या आणि इथल्या वातावरणात फारसा फेरक नसावा.''

''मुंबईतल्या फोरास रोडवर कधी धाडी घालण्याचा प्रसंग आला होता का?''

''हो! वेश्यावस्तीत अधूनमधून खूप गुन्हे घडायचे.''

''मग तिथल्या बहुसंख्य वेश्या कुठल्या प्रांतातून आलेल्या आहेत याची चौकशी कधी केलीत का?''

"ठाऊक आहे मला. केरळमधल्याच जास्त आहेत."

"मग सांगा-पोट भरण्यासाठी देहविक्रय करण्याची वेळ ज्या समाजावर मोठ्या प्रमाणावर येते त्या समाजाची अवस्था काय असेल?"

"बरोबर आहे. अति दारिद्र्यावस्थेत असल्याशिवाय आपल्या पोरीबाळींनी वेशाव्यवसाय स्वीकारावा असं कोणाही सुज्ञ आईबापाला वाटणार नाही."

"हांऽऽऽ आता काही नादान बाप पैसा मिळतो म्हणून आपल्या मुलींना दुबईसारख्या ठिकाणी नेण्यासाठी विकतात ही गोष्ट निराळी."

"म्हणजे? तुम्हाला अशी काही इथली उदाहरणं माहिती आहेत?"

"तुम्ही ज्या कृष्णनकडे चालला आहात त्यानं काय केलंय? थोरल्या दोन मुली अरबांना दहा हजार रुपयांना विकल्या. लहान दोन आहेत त्यांनाही तोच मार्ग दाखवायच्या तयारीत होता."

"आता त्यानं तो विचार बदलला आहे की काय?"

"ते काही ठाऊक नाही. अलीकडं चार-सहा महिन्यांत तो हॉटेलकडं फिरकला नाही एवढं खरं."

"हॉटेलकडं? कशाला यायचा?"

"साहेब, तुम्हाला खरं सांगितलं तर कदाचित आवडणार नाही."

"मला आवडण्याचा अगर न आवडण्याचा प्रश्न नाही. तुम्ही जे बोलाल त्यातलं अवाक्षरही फुटणार नाही."

"आमच्या हॉटेलात येणारी बरीचशी गिऱ्हाइकं इथं चैन करायला येतात. बरेच युरोपियन आणि अमेरिकन खलाशी 'ब्लॅक ब्युटी' साठी वेडे झालेले असतात! आपल्याला आश्चर्य वाटेल, बायकांच्यासाठी शेकडो रुपये ते लोक खर्च करतात."

"ॲडमिरल हे सर्व इथं चालू देतात?"

"ते काय करणार? आलेल्या गिऱ्हाइकानं एखादी पोरगी आणली तर मालकाला 'का' असं विचारता येत नाही. आजकाल एखाद्याचं हॉटेल फार जोरात चाललं आहे असं कोणी म्हणालं, की बेशक ओळखावं की भरपूर प्रमाणात तिथं वेशाव्यवसाय चाललेला आहे!"

"बरोबर आहे. पण तुमची आणि कृष्णनची ओळख होण्याचं कारण काय?"

"तो साला फालतू माणूस आहे! वडिलार्जित प्रॉपर्टी पार खलास करून टाकली. शेवटी पोरी विकायला सुरुवात केली बेट्यानं! या हॉटेलातले काही वेटर्स त्यानं धरून ठेवले होते. गिऱ्हाइकांना पोरी आणून देण्यात तो पटाईत होता. आम्ही त्याला 'चित्र्या पिंप' म्हणत असू. पण आपण त्याच्या घरी काय काम काढलेलं आहे?"

रावराणे म्हणाले, "तुम्ही त्याच्या भावाला-नारायणनला- ओळखत होता?"

"नाही. मी त्याला पाहिलेलं देखील नाही. तो कुठे तिकडे महाराष्ट्रात कोणी सिंधी शेठकडे नोकरीला असतो म्हणे."

"असतो नव्हे, होता म्हणा. मेला तो! खून झाला त्याचा!"

"असं? त्याचं इकडं येणं-जाणं फारसं नव्हतंच. परस्पर तो कधी 'चित्र्या पिंप'कडे येऊन जात असेल तर आपल्याला काही कल्पना नाही."

वेलिंग्टन आयलंड भाग ओलांडून गाडी एका दाट वस्तीच्या जागी येऊन स्थिरावली. ड्रायव्हरनं गाडीतून बोट करून रावराण्यांना एक जुनाट असं दुमजली घर दाखवलं.

"तीच माडी. डाव्या बाजूनं जिना आहे. मी इथंच गाडीत थांबतो."

"ठीक आहे. मलाही फारसा वेळ नाही लागणार. अर्ध्या-एक तासात मी येईन परत."

असं म्हणून रावराणे हातातली कागदपत्रांची फाईल घेऊन त्या घराच्या दिशेनं निघाले. जिना चढून रावराणे वर आले तो दाराच्या तोंडाशी एक मध्यम वयाची बाई डोळ्यांना चष्मा लावून फाटलेले ब्लाऊज शिवत असलेली दिसली. आपल्याकडं कोणीतरी नवखा माणूस येतो आहे, हे पाहून त्या बाईनं शिवणकाम थांबवलं आणि चेहऱ्यावर कुतूहल आणून विचारलं,

"कोण हवं तुम्हाला?"

"कृष्णनचं घर हेच ना?"

"हो. काय पाहिजे तुम्हाला?"

"कृष्णनना भेटायचं होतं मला."

"पण ते परगावी गेले आहेत."

"कोणत्या गावी गेलेत?"

"ते काही ठाऊक नाही."

"केव्हा येतील?"

"काही सांगता येत नाही."

"किती दिवस झाले त्यांना जाऊन."

"सहा-सात महिन्यांपूर्वी गेले आहेत."

"बाई, मी निंबर्डीहून आलो आहे. मॅनेजर नारायणन आपले दीर होते ना, त्यांच्या गावाकडून." नारायणनचे नाव काढताच त्या बाईचे डोळे भरले. बहुधा नारायणनचा खून झाल्याची हकिगत तिच्या कानावर आली असावी. त्या बाईनं साडीच्या टोकानं डोळे टिपले आणि इतका वेळ उभ्यानंच संभाषण करणाऱ्या रावराण्यांना आत येण्याविषयी विनंती केली. रावराणे आत आले आणि एक जुनाट शिसवीच्या खुर्चीवर बसले. बाजूच्या टेबलावर त्यांनी हातातली अॅटॅची ठेवली.

"बाई, नारायणन यांचा खून झाल्याचं केव्हा कळलं आपल्याला?"

"नक्की तारीख वार आठवत नाही. पण सहा महिन्यांच्यावर दिवस झाले असतील. मरणाच्या अगोदर चारच दिवस पोरींच्या लग्नासाठी त्यांनी दहा हजार रुपये पाठवले होते."

पुन्हा त्या बाईला हुंदका आला.

"असं? दहा हजार? कोणाकडून?"

"माझ्या दोन्ही मुलींच्या नावावर पाच-पाच हजार रुपये ड्राफ्टनं पाठवले होते."

"कोणत्या बँकेचा ड्राफ्ट होता, आठवतं?"

"मला त्या बँकेचं नाव आठवत नाही. पण माझ्या मुलींना ठाऊक असेल. थांबा हं, विचारते."

"सीताऽऽ, ओ सीताऽऽ!"

एक तेवीस-चोवीस वर्षांची काळी -सावळीच पण नाकी-डोळी अगदी तरतरीत अशी मुलगी पुढं आली.

"तुझ्या काकानं तो ड्राफ्ट पाठवला होता, तो कोणत्या बँकेच्या नावे आला होता?"

"का?" रावराण्यांकडं संशयानं पाहात मुलीनं विचारलं.

"थोडं काम आहे."

"स्टेट बँक ऑफ इंडिया." सीता रावराण्यांकडं पाहात बोलून गेली चटकन.

"अच्छा, त्या ड्राफ्टसोबत एखादं पत्रबित्र आलं असेल की."

"ड्राफ्टसोबत पत्र नाही आलं. पत्र आलं होतं आमच्या वडिलांचं. पण ते ड्राफ्ट आल्यानंतर पंधरा दिवसांनी."

"म्हणजे नारायणन यांचा खून झाल्यानंतर ते पत्र आलं होतं?"

"हो. काकांच्या खुनाची वार्ता आम्हाला समजल्यानंतर पुढे आठ दिवसांनी आमच्या बाबांचं पत्र आलं होतं."

"ते आहे का?"

'हो, आहे."

"मला जरा दाखवाल ते पत्र?"

"होऽऽ! पण तुम्ही ही सारी चौकशी कशासाठी चालवलेली आहे?"

सीताच्या या प्रश्नावर रावराणे क्षणभर विचार करून म्हणाले,

"नारायणन यांचा खून झाला. त्याचा वहीम ज्या एका तरुण कोळ्याच्या मुलावर होता त्याला जन्मठेपेची शिक्षा झालेली आहे. खरं तर या प्रकरणावर आता पडदा पडल्यासारखा झालेला आहे. परंतु या प्रकरणाची मी पुन्हा चौकशी सुरू केलेली आहे आणि या चौकशीत विलक्षण असं सत्य बाहेर येण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. नारायणनचा खून झाला असं त्या केसमध्ये सिद्ध झालेलं आहे; परंतु सत्य निराळंच आहे असं माझ्या चौकशीतून स्पष्ट होणार आहे. म्हणून मी इतक्या दूर तुमच्यापर्यंत आलो आहे. या कामी तुम्ही लोकांनी मला मदत करावी अशी विनंती आहे."

"पण समजा, या खटल्यातलं सत्य हे उजेडात आलं तर त्याचा आम्हाला काय फायदा?" सीतानं विचारलं.

रावराणे हसले आणि म्हणाले, "फायदा? पैशाच्या स्वरूपात मोजता येणारा फायदा निश्चित होईल. शिवाय तुम्ही लोक ज्या एका संभ्रमात आहात तो संभ्रमसुद्धा दूर होईल."

"तुम्ही संदिग्ध भाषेत न बोलता स्पष्ट बोलला तर बरं होईल." सीता म्हणाली.

"हे पाहा, तुमचा आर्थिक फायदा होईल असं जे मी म्हणालो ते एवढ्यासाठी, की नारायणन अविवाहित होते. फिशरीजमधले ते भारतातले एक तज्ज्ञ मानले जात होते. शेठ मनमोहन त्यांना दरमहा अडीच-तीन हजार रुपये पगार देत होते. मरणसमयी त्यांच्या नावे किमान तीन ते पाच लाखांची हार्ड कॅश असण्याची दाट शक्यता आहे. त्यांचा जर खून झाला असं मानलं, तर त्यांच्या संपत्तीचा वारसा अगदी सरळ तुमच्याकडेच यायला हवा; तो का आलेला नाही?"

त्या दोघी माय-लेकी तोंडाकडे पाहत राहिल्या. 'तीन ते पाच लाख' या शब्दांनी त्यांच्या तोंडाला पाणी सुटलं. शिवाय रावराणे जे सांगत होते ते बुद्धीला पटण्यासारखंच होतं.

"नारायणनचा जर खून झाला तर त्याची सर्व संपत्ती वारसाहक्कानं त्याचा भाऊ कृष्णन आणि त्याच्या मुलींकडेच यायला हवी होती."

"यासाठी आम्ही आपल्याला कोणती मदत करावी अशी आपली अपेक्षा आहे?" राधानं विचारलं.

"नारायणन यांचा खून झाला त्यावेळी कृष्णन कुठे होते याची मला माहिती हवी आहे."

"अहो, आमच्या काकांचा खून होण्यापूर्वी आठ दिवसच अगोदर आमचे वडील इथून गेले होते. अजून ते परत आलेले नाहीत."

"ते अद्याप परत आले नाहीत याबद्दल तुम्हाला काही वाटत नाही?"

"ते असेच भटकत राहतात महिनोन् महिने!" तुच्छता आणि अगतिकता यांचं प्रदर्शन करीत सीता म्हणाली.

"आजपर्यंत इतके दिवस म्हणजे जवळ जवळ सात-आठ महिने ते बाहेर राहिले

होते?''

''यावेळेस ते जास्त राहिले ही तर गोष्ट खरी; पण ते इकडं न येते तरी आमचं काही अडून राहात नाही. उलट ते इथं असले तरच आमच्यामागे कटकटी लागतात.''

''एक्झॅटली! मी नारायणन यांच्या खूनप्रकरणावर जो प्रकाश टाकणार आहे त्याचा मूळ पाया तुमच्या वडिलांच्या स्वभावावर आणि हालचालींवर असाच उभा आहे.''

त्या दोघींना त्या विधानाचा फारसा अर्थबोध झाला नाही. परंतु नारायणनच्या संपत्तीचा वारसा आपल्याला मिळायला हवा आणि तो मिळण्यासाठी या गृहस्थांना मदत करायला हरकत नाही- अशी त्या दोघींची समजूत झाली.

सीतानं आतून ते पत्र आणून दिलं. ते इंग्रजी पत्र कृष्णननं लिहिलेलं होतं. त्यात त्यानं आपण नारायणनकडून दहा हजार रुपये घेतलेले आहेत व ते सीता व कल्याणी या दोघींच्या लग्नखर्चासाठी पाठवत आहे- असा उल्लेख केला होता. ते पत्र वाचताच रावराणे गालांतल्या गालांत मिस्कीलपणे हसत म्हणाले, ''हे तुमच्या वडिलांचं पत्र आहे यावर तुमचा विश्वास बसला?''

''हो.'' सीता म्हणाली, ''हे आमच्या बाबांचं अक्षर आहे. सहीही त्यांची आहे.''

''नारायणनना जर तुमच्या लग्नासाठी पैसे पाठवायचे होते, तर ते ती रक्कम तुमच्या वडिलांच्या हाती देतील यावर तुमचा विश्वास बसला?''

''का बसू नये? पत्र आणि पैसे सोबतच आले होते.''

नकारार्थी मान हलवीत रावराण्यांनी पाईप भरायला सुरुवात केली आणि ते म्हणाले,

''नारायणनना आपल्या भावाचा स्वभाव पुरेपूर ठाऊक होता. त्यांना कृष्णननी हजार-पाचशे रुपयांवर कधीही अधिक रक्कम दिलेली नव्हती. इतकी रक्कम त्यांच्या हाती देणं हे अगदी अशक्य वाटतं.''

''अशक्य कसं म्हणता? रक्कम आमच्याकडे आलेली आहे ना!''

''आलेली असेल; पण ती पाठवली कोणी व का, हा खरा प्रश्न आहे. माझी खात्री आहे, ती रक्कम तुम्हा लोकांची दिशाभूल करण्यासाठी पाठवली गेली आहे.''

पुन्हा त्या दोघींना रावराण्यांना निश्चित काय म्हणायचं आहे ते समजेना. तरीही त्या दोघींना नारायणनचा मृत्यू आणि कृष्णनने ती दहा हजारांची रक्कम पाठवणं यात काहीतरी गूढ असावं, असं वाटू लागलं.

रावराणे ते पत्र खिशातली लेन्स काढून अत्यंत सूक्ष्म नजरेनं न्याहाळू लागले. इतक्यात दुसरी मुलगी कल्याणी आली. आपल्या घरी कोणीतरी परका माणूस आलेला आहे, बहिणीची आणि आईची चर्या काहीशी सिंचत दिसते आहे असं पाहून तिनं उजव्या हाताच्या तळव्यानं खुणेनंच 'कोण हे गृहस्थ' असं सीताला विचारलं.

तोच रावराण्यांचं कल्याणीकडे लक्ष गेलं. सीतानं तिची रावराण्यांशी ओळख करून देत म्हटलं,

''ही कल्याणी- माझी धाकटी बहीण. हे गृहस्थ काकांच्या खून प्रकरणात काहीतरी गूढ आहे याची चौकशी करण्यासाठी इकडं आलेले आहोत.''

रावराण्यांनी ते पत्र वारंवार वाचलं आणि ते म्हणाले, ''या पत्राची तुम्हाला फारशी आवश्यकता नसेल तर हे पत्र मला हवं आहे.''

''घ्या. आम्हाला त्याचा आता काही उपयोग नाही.''

''थँक्स. जरूर तर मी पुन्हा आपल्याशी पत्रानं संपर्क साधण्याचा प्रयत्न करीन. पण आपण एक गोष्ट मात्र न चुकता करावी.''

''कोणती?'' सीतानं विचारलं.

''यदाकदाचित माझे काही आडाखे चुकले आणि कृष्णन इकडं परत आले तर मला या पत्त्यावर तार करून कळवा. हे खर्चासाठी'' असं म्हणून रावराण्यांनी वीस रुपये सीताकडे देण्याचा प्रयत्न केला तेव्हा सीता म्हणाली,

''पैसे कशाला देता? तारेला असा किती खर्च येणार आहे?''

''असू द्या. ठेवा हे पैसे.''

सीताला शेवटी रावराण्यांच्या आग्रहास्तव ते पैसे स्वीकारावे लागले. कल्याणीनं रावराण्यांना चहा करून दिला. जाताना सीता त्यांना म्हणाली.

''आमच्याकडून आणखीन काही मदत लागली तर कळवा.''

''नक्कीच कळवीन. परंतु तशी फारशी गरज लागेल असं वाटत नाही.''

रावराणे त्या सर्वांचा निरोप घेऊन बाहेर पडले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक सूक्ष्म असं स्मित प्रतिबिंबित झालेलं होतं. आजवर त्यांनी त्या प्रकरणात जे अंदाज केले होते, ते तंतोतंत खरे ठरले होते. आज इथं कृष्णनच्या घरी मिळालेल्या त्या पत्रामुळं त्यांच्या निष्कर्षांना पुष्टी मिळाली होती.

ड्रायव्हर त्यांची वाटच पाहात होता. रावराणे जवळ येताच त्यांनी गाडीतून उतरून त्यांच्यासाठी दार उघडलं अन विचारलं.

''झालं काम?''

''होऽऽ! अगदी अपेक्षेच्या बाहेर!'' पुढे रावराणे म्हणाले,

''आता मला इथून लवकरात लवकर निघायला हवं. मला दमणला जायला हवं.''

''रात्री बोट आहे ना.''

''आता मला लवकरात लवकर दमणला पोहोचायला हवं. इथं प्लेन सर्व्हिस नाही?''

गाडी स्टार्ट केल्यानंतर ड्रायव्हर म्हणाला,

''कोचीनवरून प्लेन्स जातात. आपल्याला कोचीनला जायला हवं.''

''इथून कोचीन किती दूर आहे?''

''कोचीन आणि अर्नाकुलम ट्विन सिटीज आहेत.''

''ठीक आहे. आता हॉटेलात परतल्यानंतर प्लेनचं टायमिंग विचारून घ्यायला हवं.''

''अहो, ती चिंता करू नका आपण. ॲडमिरलसाहेबांच्या इंडियन एअरलाईन्समध्ये अगदी खालपासून वरपर्यंत ओळखी आहेत. परवा सव्वीस नोव्हेंबरला ॲडमिरलसाहेबांचा वाढदिवस होता, तेव्हा 'साऊथ स्टार' च्या गच्चीत चहापार्टीसाठी लोक जमले होते. त्या सुमाराला मुंबईवरून कोचीनला जाणारं प्लेन 'साऊथ स्टार' जवळ इतकं खाली आलं की काही विचारू नका. आम्ही सर्व घाबरलो. आम्हाला वाटलं, विमान हॉटेलवर कोसळतं आहे. पण त्या विमानातून फुलांचे हार खाली फेकले गेले आणि Happy Birthday' असे शब्द छापलेल्या रंगीबेरंगी चिठ्ठ्या फेकल्या गेल्या. नंतर आम्हाला समजलं, ॲडमिरलसाहेबांचा जानी दोस्त गांगुली हा त्यो विमानाचा पायलट होता.''

''वंडरफुल! बाकी तुमच्या ॲडमिरलसाहेबांच्या असंख्य ओळखी आहेत हे मात्र पटलं.''

''हे शिकायला सिमल्याला होते. नंतर नेव्हीत गेले. तिथं दहा-बारा वर्षं सर्व्हिस झाली. मग या हॉटेलच्या धंद्यात पडले. समाजातल्या सर्व स्तरांत त्यांच्या ओळखीपाळखी आहेत.''

''गॉड ब्लेस हिम!'' रावराणे पाईप पेटवून म्हणाले,

गाडी पुन्हा 'साऊथ स्टार' समोर येऊन उभी राहिली. काऊंटरच्या बाजूला 'टाइम्स

ऑफ इंडिया' वाचत बसलेल्या ॲडमिरलचे रावराण्यांकडे लक्ष जाताच ते म्हणाले, "हॅलोऽऽ! हाऊ इज द मिशन?"

"फाईन! अपेक्षेच्या बाहेर यशस्वी झालं."

"व्हेरी गुड! आता आल्यासारखे निवांत चार-सहा दिवस राहा आमच्या केरळमध्ये."

"चार-सहा दिवस? ॲडमिरलसाहेब, खरं म्हणजे मी आजच निघायला हवं आहे."

"का?"

"इतकी मोलाची माहिती मला मिळालेली आहे की ती आता तात्काळ पडताळून पाहिल्याशिवाय मला चैन पडणार नाही. मला उद्या कोचीनवरून मुंबईला जाणाऱ्या प्लेनचं एक तिकीट रिझर्व्ह करून द्या. तुम्हालाच त्रास द्यावा लागतो आहे."

"त्याची चिंता करू नका. मला श्रीनिवासनं तुम्हाला आवश्यक ती सर्व मदत करायला बजावून ठेवलं आहे. तुम्हाला प्लेनचं तिकीट मिळालं असं समजा. मग झालं ना?" काऊंटरवर बसलेल्या त्यांच्या रिसेप्शनिस्टला उद्देशून ते म्हणाले, "चंदा, प्लीज कनेक्ट मी टु कोचीन एअरपोर्ट."

रिसेप्शनिस्टनं फोनची डायल फिरवायला सुरुवात केली तेव्हा ॲडमिरल म्हणाले,

"तुम्ही पोलीस अधिकारी म्हणून खूप गुंतागुंतीचे खटले उजेडात आणले असतील, नाही?"

"हो, खूप. तीस वर्षांच्या कारकिर्दीत किमान दोन-तीन हजार गुंतागुंतीचे खटले मी उजेडात आणलेले आहेत. पण खरं सांगू? या सीतूचं हे प्रकरण त्या सर्वांवर मात करणारं आहे."

"असं म्हणता? मग मला आज रात्री ते सांगाच तर."

"जरूर!"

"कॅप्टन श्रीनिवास मला जाताना म्हणाला होता, त्यांनी सांगितलं तर ते ऐक. ट्रुथ इज स्ट्रेंजर दॅन फिक्शन' हे कसं असू शकतं, याची खात्री पटेल."

"ओकेऽऽ- आज रात्री! पण आपल्याला उद्याचं प्लेनचं तिकीट मात्र हवं हं."

"यू वुईल गेट इट. त्याची तुम्ही चिंताच करू नका. आज रात्रीच ते तिकीट तुम्हाला देण्याची व्यवस्था करू का?"

"काही गरज नाही. माझा तुमच्यावर संपूर्ण विश्वास आहे."

त्या रात्री रावराण्यांनी आपल्या खोलीत ॲडमिरलना सीतूचं सर्व प्रकरण ऐकवलं व आपण त्यावर पुन्हा कसा प्रकाश टाकणार आहोत हे त्यांनी सांगितल्यावर ॲडमिरल म्हणाले,

"साहेब, आपण खरोखरच कमाल केलीत! पण तुम्हाला नक्की वाटतं, की नारायणन जिवंत आहे?"

"हंड्रेड पर्सेंट! तो जिवंत आहे! कॅप्टन श्रीनिवासनी त्याला दमणला पाहिल्याचं जरी मला सांगितलं नसतं तरीही मी त्याला शोधून काढला असता."

"पण दमणला श्रीनिवासनं बघितलेला नारायणनच कशावरून?"

"मी श्रीनिवासना नारायणनचा फोटो दाखवला तेव्हा त्यांनी सांगितलं, की याच चेहऱ्याचा माणूस आपण दमणला कोल्ड स्टोअरेजमध्ये पाहिला."

"पण समजा, तो दुसराच कोणी तरी निघाला तर?"

"शक्यच नाही! याच चेहऱ्याचा माणूस इतरत्र दिसला म्हणून त्यांनी सांगितलं असतं तर मला कदाचित शंका वाटली असती. पण त्याच चेहऱ्याचा माणूस त्यांनी कोल्ड स्टोअरेजमध्ये बघितला म्हटल्यावर माझी खात्रीच पटली. पण तरीही उद्या दमणला जाऊन मी

त्याला समक्ष बघणार आहे.''

''अहो, मग निंबर्डीच्या किनाऱ्यावर मिळालं ते प्रेत कोणाचं?''

''सांगतो. प्रथम थोडी व्हिस्की मागवा.''

''बाय ऑल मीन्स!'' असं म्हणून ॲडमिरलनी खाली काऊंटरवरून फोन केला व वेटरकडून व्हिस्की वर मागवली आणि त्याचबरोबर रिसेप्शनिस्टला सांगितलं,

''आता माझ्याकडे कोणी आलं तर मी बाहेर गेलो आहे असं सांग.''

रावराण्यांनी पश्चिमेकडची ती खिडकी उघडली. चित्तवृत्ती प्रसन्न करणारा समुद्रवाऱ्याचा झोत अंगावर आला. परत खुर्चीवर बसून त्यांनी पाईप भरायला सुरुवात केली. इतक्यात वेटर 'टीचर्स स्कॉच' व्हिस्कीची बाटली, सोडा आणि ग्लासेस घेऊन आला.

ॲडमिरलनी ग्लास भरले. एकमेकांनी चिअर्स केल्यानंतर रावराण्यांनी एक मोठा घोट घेतला, पाईपचे एक-दोन झुरके घेतले आणि म्हणाले,

''निंबर्डीच्या किनाऱ्यावर जे प्रेत मिळालं ते कोणाचं होतं असा तुमचा प्रश्न आहे. त्याला माझं उत्तर आहे की, ते प्रेत कृष्णनचं होतं.''

ॲडमिरल आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''काय सांगता? हे कसं शक्य आहे?''

''हे पाहा, कृष्णन व्यसनाधीन होता. त्यानं आपल्या हिश्श्याच्या सर्व प्रॉपर्टीची धूळधाण केली होती. पैसे कमी पडू लागल्यानंतर त्यानं आपल्या पोटच्या पोरीही अरबांना विकायला कमी केले नव्हते. शिवाय अधूनमधून तो नारायणनकडे पैसे मागायला जायचा. नारायणनला त्याची कटकट वाटायची. शिवाय स्वत:च्या त्या मुली विकणारा हा अधम मेला तर निदान दुसऱ्या दोन मुलींची तरी सुटका होईल अशी नारायणनची भावना झाली होती.''

''बरं मग?'' ॲडमिरलनी विचारलं.

''त्याच वेळेला रवीनं, म्हणजे शेठ मनमोहनच्या पुतण्यानं सुबी आपल्याला मिळायला हवी असा हट्ट घेतला. त्याने तो हट्ट सोडावा म्हणून नारायणन मुंबईला जाऊन मनमोहनशेठना भेटला. पण मनमोहनशेठनी 'काही झालं तरी रवी तिथं निंबर्डीत रमण्यासाठी जे जे करावं लागलं ते ते तू केलंच पाहिजेस' असं नारायणनला आग्रहानं बजावलं होतं. त्यामुळे नारायणन विचारात पडला होता, की आता यातून मार्ग कसा काढायचा? शेठ मनमोहनचा नारायणनवर नितांत विश्वास होता. शेठनी कॅनिंग फॅक्टरी आणि कोल्ड स्टोअरेजमध्ये दहा पाच लाखांचं भांडवल गुंतवलं होतं ते रवीसाठी! तो जर निंबर्डीत रमला नाही तर त्या दोन फॅक्ट्यांच्या लोकांच्या स्वाधीन कराव्या लागणार होत्या.

''मुंबईत नारायणन अशा द्विधा मन:स्थितीत असतानाच त्याला कृष्णन तेथे भेटला.''

''हे तुम्हाला कसं कळलं?''

''रवीचा जुना स्वयंपाकी त्यावेळी मुंबईला मनमोहनशेठकडे होता. त्याच्याकडून बरीच मोलाची अशी माहिती मला मिळालेली आहे. मुंबईला शेठ मनमोहनना 'मध्यस्थी करा व रवीला सुबीच्या मोहापासून परावृत्त करा' म्हणून सांगण्यासाठी गेलेला नारायणन त्यादिवशी मुंबईत शेठ मनमोहन यांच्या ग्लासाला ग्लास भिडवून प्याला आणि त्या नारायणननेच मनमोहनशेठना हातावर टाळी देऊन सांगितलं, की सुबी रवीला मिळेल अशी व्यवस्था करतो.''

''माय गॉड!'' ॲडमिरल सिगारेटचा धूर सोडून म्हणाले, ''साहेब, कमाल आहे! मग पुढं काय झालं?''

''मग नारायणननं कृष्णनला निंबर्डीला सोबत नेलं. त्याला दोन दिवस बाशामामूच्या हॉटेलात ठेवलं. नंतर त्याला तिसऱ्या दिवशी रात्री निंबर्डीत बोलावून घेतलं असावं. नारायणननंच तिथं त्याचा खून केला असावा अन् त्याला आपले कपडे चढवले असावेत.

हातातलं आपल्या नावाचं ब्रेसलेट घातलं आणि त्याचं प्रेत समुद्रात नेऊन टाकलं. नारायणननं त्याच रात्री निंबर्डी सोडली.''

''अशा तऱ्हेनं त्यानं कृष्णनच्या प्रेताची विल्हेवाट लावली. ते प्रेत जेव्हा किनाऱ्यावर येईल तेव्हा ते स्वत:चंच आहे असं लोकांना वाटेल याची नारायणनला खात्री होती. दोघां भावात विलक्षण साम्य होतंच; शिवाय तसा थोडाफार फरक असलाच तर कृष्णनचं प्रेत डीकंपोज झाल्यानंतर कोणाही निकटवर्तीयांना ते नारायणनचं नाही हे म्हणण्याचं धाडस होणार नव्हतं. पेरताच्या अंगावर स्वत:चे कपडे चढवले होते. आपल्या नावाचं हातातलं सोन्याचं ब्रेसलेट त्यानं त्या प्रेताच्या हातात घातलं होतं. शिवाय फटू भंडाऱ्यासारख्या सत्याची चाड नसलेल्या माणसाला त्यानं हाताशी धरल्यानं त्यानंही धडधडीत खोटी जबानी द्यावी तशी व्यवस्था केली. सीतूवर आपल्या खुनाचा आरोप येईल आणि पुढं तो न्यायालयात देखील सिद्ध होईल, हे कारस्थान नारायणननं आपल्या अक्कलहुशारीने रचलं आणि त्याच्या अंदाजाप्रमाणे ते बरोबर पारही पडलं. पण नारायणननं त्याला नेमकं कोणत्या तऱ्हेनं ठार मारलं हे मात्र मला अद्याप गूढच राहिलेलं आहे.''

''पण आता तुम्ही काय करणार?''

''आता मी तो नारायणनच जिवंत आहे ही एकच गोष्ट सिद्ध करणार. त्यामुळे त्याच्या खुनाचा हा जो खटला रचला गेला होता, सीतूला जी शिक्षा झाली, हे सर्व बेकायदेशीर घडलेलं आहे असं दाखवून देणार.''

''पण आपण अद्याप नारायणनला जिवंत असल्याचं न पाहताच कसे काय हे निष्कर्ष काढता आहात?'' ॲडमिरलनी शंका काढली.

''हे पाहा, माझे निष्कर्ष तंतोतंत पटवून देतो. हा कृष्णन गेले सात-आठ महिने कुठं आहे त्याचा ठावठिकाणा नाही. शिवाय नारायणननं आपल्या मृत्यूनंतरदेखील कृष्णन जिवंत होता हे दाखविण्यासाठी ते दहा हजार रुपये व कृष्णनच्या हस्ताक्षरातलं ते पत्र पाठवलं. माझी खात्री आहे, ते हस्ताक्षर कृष्णनचंच आहे.''

''ते कसं शक्य आहे? कृष्णनचा खून झाल्यानंतर पैसे व पत्र अर्नाकुलमला आलेलं आहे म्हणता ना?''

''ते पत्र नारायणननं कृष्णनकडून निंबर्डीत त्याला मारण्यापूर्वी लिहून घेतलं असलं पाहिजे. मात्र पोस्टात नारायणननं ते टाकलं नंतर. कारण त्याला इकडे अर्नाकुलमला कृष्णनच्या घरी व सर्वांनाच असं भासवायचं होतं की, आपला खून झाल्यानंतरदेखील कृष्णन जिवंत होता.''

''माय गॉड! साहेब, माणूस कोणत्या थराला जाऊ शकेल, कल्पनाच करता येत नाही.''

''हा नारायणनचा प्रयत्न म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारायचा हेतू होता. एकीकडे घराण्याची बेइज्जत करणाऱ्या कृष्णनचा कायमचा काटा काढावा आणि त्याचवेळी खुनाच्या आरोपाखाली सीतू पकडला जावा. त्यामुळं रवीचा सुबीला हस्तगत करण्याचा मार्ग सुलभ होणार होता. फार विचारानं त्यानं हा बेत आखलेला होता.''

''आपलं काही डोकंच चालत नाही साहेब!'' ॲडमिरल आपला ग्लास संपवून म्हणाले.

''या पाहा या माझ्या नोटस्. गेले दोन महिने अव्याहत कष्ट करून मी ही माहिती मिळवलेली आहे. आता त्या नारायणनला प्रत्यक्ष बघितल्यानंतर काय करायचं, हा मोठा प्रश्न आहे. तो तिथं निश्चित आहे. सीतूला जन्मठेपेची सजा झालेलीच आहे. पण त्याचा हेतू मात्र अद्याप पूर्ण झालेला नाही. सुबी रवीला मिळालेली नाही. ती फादर मॅथ्यूसनी अत्यंत सुरक्षित

अशा जागी पणजीला ठेवलेली आहे. बिचारी मला माहिती सांगताना धाय-धाय रडत होती. तिला काहीएक कल्पना नाही हे कारस्थान कसं शिजलं याची.''

''साहेब, खरोखरच तुमच्या बुद्धीचं आणि चिकाटीचं कौतुक करावं तितकं थोडं आहे. मी माझं भाग्य समजतो, की या खटल्याच्या सत्यशोधनात आपणाला माझी अल्पशी मदत झाली.''

रावराणे आपला रिकामा ग्लास ॲडमिरलपुढे करीत म्हणाले, ''त्याचं श्रेय मी कॅप्टन श्रीनिवासना देईन. त्यांनीच तर तुम्हाला माझी ओळख करून दिली.''

''आता आपण काय करणार आहात?''

''मी आता प्रथम उद्या विमानानं मुंबईला जाणार. तिथं मिस मार्कोनीला भेटणार. कॅप्टन श्रीनिवासनी मला तिला भेटायला सांगितलं आहे. तिच्याशी थोडी बातचीत करून तिचा अगोदर अंदाज घेणार- ती माझ्या उपयोगी पडेल की नाही याचा. त्यानंतर तिची मदत जरुरीची आहे असं तिला वाटलं तर तिला घेऊन दमणला जाणार.''

''तिलाच कशाला न्यायला हवं?''

''हे पाहा दमणला दहा-पाच कोल्ड स्टोअरेज आणि कॅनिंग फॅक्ट्या आहेत. आता मला या प्रकरणात जास्त वेळ घालविण्याची इच्छा नाही. मिस मार्कोनी श्रीनिवाससोबत ज्या फॅक्टरीत गेली होती ती फॅक्टरी तिच्याकडूनच मला चटकन समजेल. मी एकदा त्याला समक्ष पाहून घेतो आणि मग हा गौप्यस्फोट कसा करायचा हे ठरवतो. पण ॲडमिरलसाहेब, माझी खात्री आहे- कॅप्टन श्रीनिवासनी पाह्यला तो नारायणनच असला पाहिजे. आता ती कोल्ड स्टोअरेजची फॅक्टरी कोणाची आहे, तो तिथं किती दिवसांपासून आहे- ही सर्व माहिती गौण स्वरूपाची आहे. आय मस्ट कॅच होल्ड ऑफ दॅट बगर फर्स्ट ऑफ ऑल.'' आज रावराणे मोठ्या खुषीत आले होते. कधी कधीच मद्य घेणारे ते- पण आज त्यांनी तिसऱ्या पेगसाठी आपला ग्लास ॲडमिरलांसमोर सरकवला आणि ते म्हणाले,

''हाऊ लास्ट वन- अँड वुई गो फॉर डिनर.''

०००

# चोवीस

कोचीनच्या एअरपोर्टवर जाण्यासाठी खाली टॅक्सी येऊन उभी राहिल्याचा निरोप रावराण्यांना येताच त्यांनी सूट चढवला, टाय बांधला. आरशात बघून डोक्यावर किंचित तिरकी अशी फेल्ट घातली. कागदपत्रांची बॅग घेऊन ते लिफ्टमध्ये येऊन उभे राह्यले. वेटरने त्यांची कपड्यांची बॅग केव्हाच टॅक्सीमध्ये नेऊन ठेवली होती.

बिल देण्यासाठी ते कॉटवर आले तेव्हा ॲडमिरलनी सर्व बिल चुकतं झाल्याची पावती त्यांच्या हाती दिली. त्यावेळी रावराणे म्हणाले, "हे काय, दोन दिवस अगदी ऐषआरामात राह्यलो आणि तुम्ही एकही पैसा घेत नाही?"

"साहेब", रावराण्यांच्या हाताला धरून ॲडमिरल त्यांना बाहेर घेऊन येत म्हणाले, "मी हॉटेल उघडलं ते पैसे कमावण्यासाठीच. देवदयेनं मला भरपूर पैसा मिळतो आहे. तुमच्यासारखे प्रवासी या हॉटेलात येणं हे मी माझं भाग्य समजतो. एका गरीब पोरावर अन्याय झाला, म्हणून हे तुमचं वय दगदग घेण्याचं नसतानाही तुम्ही गेले दोन महिने अहोरात्र कष्ट घेऊन या प्रकरणाची चौकशी केलीत. उद्या सर्वांना सत्य काय आहे हे समजेल. सीतूची सुटकाही आपण कराल. या प्रयत्नात माझं थोडं सहकार्य झाल्याचं समाधान लाभावं ही इच्छा निर्माण झाली म्हणून मी तुमच्याकडून बिल घेतलेलं नाही, समजलं?"

"आता मला काही जास्त बोलता येत नाही. पण तुम्ही आणि कॅप्टन श्रीनिवास या दोघांनी मला जे बहुमोल साहाय्य केलं ते मला कधीही विसरता येणार नाही. थँक्स अ लॉट! गॉड ब्लेस बोथ ऑफ यू!"

रावराण्यांनी दुनिया खूप बघितलेली होती; पण पैसे कमावणारा असा एखादा माणूस जेव्हा आपली माणुसकी व्यक्त करायचा तेव्हा त्यांना भारावल्यासारखं वाटायचं.

ॲडमिरलनी प्लेनच्या तिकिटाची व्यवस्था केली असल्यामुळं रावराण्यांना एअरपोर्टवर धावपळ करावी लागली नाही. गेल्या गेल्या त्यांना त्यांचा सीट नंबर मिळाला. चेकिंग -रूममध्ये त्यांच्याजवळ काही आक्षेपार्ह आहे की काय याची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांना सहज विचारलं,

"ऑन बिझिनेस टूर?"

"येस, ऑन ए व्हेरी इंपॉर्टंट बिझिनेस टूर!"

"आय सीऽऽ!" असं म्हणून तो हसला.

केरळच्या भूमीवरून विमानानं उड्डाण करताच रावराण्यांनी बाजूच्या काचेतून खाली पाहिलं. केरळची ती निसर्गरम्य भूमी मागे पडत होती. समुद्रकिनाऱ्यावरची दाट नारळीची झाडं, कॉफी, रबर यांच्या प्रचंड बागा, कोचीन आणि अर्नाकुलम या दोन जुळ्या शहरांना जोडणारा तो प्रचंड पूल, वेलिंग्टन आयलंड, सी लॉर्ड हॉटेल, मलबार हॉटेल, वँâझिनो हॉटेलच्या प्रचंड इमारती विमानातून इवल्याशा दिसू लागल्या. थोडीशी बाजूला नजर वळवल्यानंतर त्यांना महाराजा पार्क आणि मट्टमचेरी विभाग दिसला. या मट्टमचेरी विभागाशेजारीच कृष्णनचं घर होतं. रावराण्यांनी आपल्या चौकशीचा शेवटचा टप्पा इथल्या कृष्णनच्या घरातच पूर्ण केला

होता. ज्यावेळी त्यांना ते कृष्णनच्या हस्ताक्षरातलं पत्र पाहायला मिळालं, त्याचवेळी त्यांना मनाशी बांधलेले सर्व आडाखे जुळल्याची खात्री झाली होती. नारायणननं कृष्णनचा खून केला या त्यांच्या निष्कर्षावर त्या पत्रानं शिक्कामोर्तब केलं होतं पण तरीही ते सीताला किंवा राधाला उघडपणे तसं बोलले नाहीत. वेळ येईल तेव्हा सत्य काय आहे, हे त्यांना समजल्याशिवाय राहवणार नाही याची त्यांना खात्री होती.

ज्या प्रवासाला मोटारीला बारा तासांपेक्षा अधिक काळ लागला असता ते अतर विमानानं अवघ्या एका तासात काटलं. सांताक्रुझवरून ते सरळ कुलाब्याला मिस मार्कोनीच्या घरी निघाले.

मिस मार्कोनी पंचवीस- सव्वीस वर्षांची, तांबूस गौरवर्ण असलेली, बॉबकट केलेली, नेहमी डोळ्यांत धुंदी असल्यासारखी दिसणारी अशी छकडी पोरगी होती. ती फालतू गिऱ्हाइकं करत नव्हती. नेव्हल किंवा आर्मी ऑफिसर्स, पायलट्स आणि क्वचितप्रसंगी मोठे बिझनेस मॅग्नेटस्, हे तिचं भक्ष्य असे. अशा अगदी शेलक्या गिऱ्हाइकांवर उपजीविका करणाऱ्या मिस मार्कोनीकडं तशी नेहमीच वर्दळ नसे. महिन्यातून दोन किंवा तीन वेळा जरी ती 'एंगेज' झाली तरी महिनाभर खर्चाला पुरेल इतकं ती सहजच कमावत होती. शिवाय तिचा आणखीन एक जोडधंदा होता. ती विदेशी प्रवाशांसोबत गाईड म्हणून फिरायची. यासाठी तिनं प्रâेंच, झेक, बेल्जियन आणि डच अशा भाषा आत्मसात केलेल्या होत्या. ताज, ग्रीन्स, एक्सेलमिअर, ओबेरॉय शेरेटन अशा हॉटेलमध्ये तिच्या ओळखी होत्या. 'बॉम्बे इन वन डे' अशा परदेशी पाहुण्यांना ती डीलक्स कोचमधून प्रमुख स्थळे दाखवत असे. प्रवाशांच्या मातृभाषेत. तिला महिन्यातून तीन-चार वेळा गाईड म्हणून पाचारण केले जाई. अलीकडं जवळजवळ महिनाभर तिच्याकडं कोणी खास असं गिऱ्हाईक आलं नव्हतं किंवा तिला गाईड म्हणूनही बोलावलं गेलं नव्हतं.

दारावरची बेल वाजवल्यानंतर आपली निळसर रंगाची मॅक्सी सावरीत, हातातला 'फेमिना' चा अंक तसाच धरून ती दाराचा बोल्ट काढायला पुढं गेली. मुंबईच्या बंदरावर कोलंबिया नावाची मोठी बोट येणार असल्याची वार्ता तिला लागली होती. तिनं मोठ्या अपेक्षेनं दार उघडण्यापूर्वी बाजूच्या आरशात आपले केस आणि लिपस्टिक व्यवस्थित आहे की नाही याची एकवार खात्री करून घेतली अन् मगच दाराचा बोल्ट काढला.

दारात उभे असलेले साठ वर्षांचे रावराणे पाहून मिस मार्कोनीला वाटलं, अंकल बहुधा घर चुकलेले दिसतात.

"कोणाकडे आलात आपण?"

"तुमच्याकडेच!" स्मित करून रावराणे म्हणाले.

"माझ्याकडे?" डावा हात उरोजावर ठेवून पुन्हा ती म्हणाली,

"माझ्याकडे? ... या, कोठून आलात?"

"एक ग्लासभर थंड पाणी मिळेल का?"

"ओह शुअर! चहा, कॉफी काही घ्याल?"

"घेईन, पण इतक्यात नाही. तूर्तास एक ग्लास पाणी द्या."

रावराण्यांनी बॅगेवर ठेवलेली फेल्ट दूर केली आणि बॅगेतून ती कागदपत्रांची फाईल बाहेर काढली. मिस मार्कोनीच्या दिवाणखान्याकडं नजर फिरवली. त्या छोट्या दिवाणखान्यात मोजकंच पण अत्यंत सुबक असं फर्निचर होतं. खाली निळसर असा इराणी गालिचा होता. भिंतीवर दोन सुंदर लँडस्केप्स होती. हे घर एका वेश्येचं आहे असं वाटण्यासारखी एकही खूण तिथं नव्हती. बाजूला काचेचं कपाट होतं आणि कपाटात जेम्स हॅडले चेस आणि ॲगाथा

खिस्ती यांच्या डझनावारी कादंबऱ्या ओळीनं लावलेल्या होत्या. त्या पाहून रावराण्यांनी स्वत:शीच म्हटलं, 'ही एक गोष्ट उत्तम झाली.' त्यांनी खिशातून पाईप आणि तंबाखूची पिशवी काढायला प्रारंभ केला. इतक्यात छोट्या ट्रेमधून पाण्याचा ग्लास घेऊन मिस मार्कोनी आली. अजूनही तिच्या चेहऱ्यावर रावराण्यांच्याबद्दल कुतूहल होतं.

"थँक्स अ लॉट!" ट्रेमधून तो ग्लास उचलून ओठाला लावण्यापूर्वी रावराणे म्हणाले.

"प्लीज मेन्शन नॉट!" असं म्हणून मिस मार्कोनी गोड हसली आणि बाजूच्या कोचावर बसली. पाणी पिऊन झाल्यानंतर रावराण्यांनी तिला विचारलं,

"मी पाईप ओढला तर चालेल ना?"

"बाय ऑल मीन्स!" असं म्हणून तिनं कपाटातला ॲश-ट्रे त्यांच्या समोरच्या स्टुलावर आणून ठेवला.

"मिस मार्कोनी, तुम्हाला डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचण्याचं वेड दिसतं." पाईप शिलगावून रावराणे म्हणाले,

"हो. तो माझा आवडीचा छंद आहे."

"पण वेळ मिळतो का?" भिवया उंचावून रावराण्यांनी विचारलं.

"वेळ मिळाल्याशिवाय कशी काय वाचणार? मे आय नो...?"

"येस, सर्टनली! यू वुईल नो व्हाय आय केम हिअर."

मिस मार्कोनीची जिज्ञासा फार ताणून धरण्यात अर्थ नाही असं वाटल्यानं रावराणे पाईपचे एक-दोन झुरके घेऊन झाल्यानंतर तो पाईप ॲशट्रेवर पालथा ठेवून दोन्ही हातांची बोटं एकमेकांत रुतवून मिस मार्कोनीकडं पाहात म्हणाले,

"श्रीनिवास, 'केप केमोरिन' बोटीचे कॅप्टन, यांच्या सांगण्यावरून मी आपल्याकडे आलो आहे."

श्रीनिवास यांच्या नावाच्या उल्लेखानंच मिस मार्कोनीची चर्या प्रफुल्लित झाली. लगेच ती म्हणाली,"श्री हॅज सेंट यूऽऽ?"

"दॅट्स ट्रूऽऽ! माझी त्यांची चारच दिवसांपूर्वी बोटीवर भेट झाली. मिस मार्कोनी, तुम्ही आजपर्यंत खूप रहस्यमय कादंबऱ्या वाचलेल्या असतील. आज माझ्या तोंडून अशीच एखादी रहस्यमय घटना आपणाला ऐकायला आवडेल का?"

"मला आपण ऐकवणार?" पुन्हा तिनं आपली नेलपेंट केलेली डाव्या हाताची चार बोटं छातीवर ठेवली. आश्चर्य व्यक्त करण्याची बहुधा ती तिची स्टाईलच होती.

"हो, तुम्हाला ऐकवावी अशी इच्छा आहे आणि त्यामागे तुमच्या थोड्याशा सहकार्याचीही अपेक्षा आहे."

"रहस्यमय प्रकरणात मी कसली मदत करणार?" किंचित घाबरल्यासारखी चर्या करीत मिस मार्कोनीनं विचारलं.

"प्रथम मी आपणाला सर्व हकिगत सांगतो. माझं इथं येण्याचं प्रयोजनही सांगतो आणि त्यानंतर मला मदत करावी असं वाटलं तरच निर्णय घ्या. माझी आपणाला कसलीच सक्ती नाही. प्रलोभन नाही. शिवाय कॅप्टन श्रीनिवास यांनी तुमच्याकडे अगदी आवर्जून जा म्हणून सांगितलं म्हणून आलो. नाही तर या जन्मी आपली ओळख करून घेण्याचा प्रसंगच माझ्यावर आला नसता."

"ठीक आहे. पण अद्याप आपण आपलं नावदेखील सांगितलं नाही."

"सांगतो, सागंतो. थोडा वेळ थांबा. मी कोण हे सांगण्यापूर्वी मी तुम्हाला चित्रदुर्गाच्या जेलवर काय घडलं इथपासून सुरुवात करणार आहे."

असं म्हणून रावराण्यांनी मोहनराव दिवेकर आणि सीतू यांच्यापासून हकिगत सांगायला सुरुवात केली. ती हकिगत ऐकत असताना मिस मार्कोनी एकाग्र होऊन गेली होती. उजव्या हाताच्या तळव्यावर हनुवटी टेकवून ती रावराण्यांचा शब्द न् शब्द लक्ष देऊन ऐकत होती. सांगता सांगता शेवटी त्यांनी नारायणननं सीतूवर खोटा आरोप सिद्ध होण्यासाठी रचलेलं कारस्थान ऐकताना पुन्हा तिनं आपला डावा हात छातीवर ठेवून विचारलं,

"अंकल, तुम्ही सांगता हे सर्व सत्य?"

"शब्द न् शब्द सत्य आहे, मुली. मीही पोलीसखात्यात तीस वर्ऱ्षं नोकरी केली. एकापेक्षा एक अशा गूढ गुन्ह्यांची उकल मी केली. पण असा मेंदू पाघळवणारा प्रकार अद्याप माझ्या आढळात आलेला नव्हता. आता हा फोटो पाहा. हाच तो नारायणन!"

त्या फोटोकडे लक्ष देऊन पाहात मिस मार्कोनी म्हणाली, "मी या गृहस्थाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतंय."

"त्यासाठीच मी तुझ्यापर्यंत आलो आहे. तू आणि कॅप्टन श्रीनिवास दोन महिन्यांपूर्वी दमणला गेला होता, तेव्हा तिथं तुला बोटीवर तळण्यासाठी प्रॉन्स हवे होते."

"एक्झॅटली!" ताडकन खुर्चीवरून उठत मिस मार्कोनी म्हणाली,

"या फोटोतल्या गृहस्थानं त्यावेळी डोळ्यांना गॉगल लावलेला होता. मी श्रीला म्हणाले देखील, 'अंधारात गॉगल लावून याला दिसतं तरी कसं?' आठवलं, आठवलं! अंकल, हाच जर नारायणनचा फोटो असेल तर तो निश्चितच जिवंत आहे असं समजा."

"मिस मार्कोनी, याच गोष्टीची शहानिशा करण्यासाठी मी तुझ्याकडं आलो आहे. मला लवकरात लवकर नारायणन जिवंत आहे हे एकदा प्रत्यक्ष डोळ्यानं पाहायला हवं आहे."

"पण मी सांगते ना तो आहे म्हणून!" पुन्हा छातीवर हात धरून मिस मार्कोनी म्हणाली.

"ते खरं, माझा तुझ्यावर आणि कॅप्टन श्रीनिवासच्या सांगण्यावर विश्वास नक्कीच आहे. परंतु मी आहे पोलीस ऑफिसर. शिवाय उद्या तो नारायणन जिवंत आहे याची खात्री पटल्यावर केंद्र सरकारतर्फे मला हालचाली कराव्या लागतील, त्यासाठी ज्याला 'बियाँड रीझनेबल डाऊट' असं इंग्रजीत म्हणतात, त्या तऱ्हेची खात्री करून घ्यायला हवी."

"मग केव्हा निघूया दमणला?" उतावीळपणे मिस मार्कोनी म्हणाली.

"जितक्या लवकर जाता येईल तितक्या लवकर निघायला हवं."

"माझी आत्ता, या क्षणीदेखील निघायची तयारी आहे."

"पण एक लक्षात ठेव. आपला जर का त्याला संशय आला तर तो तेथून क्षणाचाही विलंब न लावता गुल होईल."

"त्याला संशय येणार नाही याची मी हमी देते तुम्हाला अंकल. त्या बिचाऱ्या इनोसंट सीतूला आपण लवकरात लवकर मुक्त करायला हवं."

"अगं, पण त्यातदेखील एक अडचण निर्माण होणार आहे. एकदा हायकोर्टानं सीतूच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केल्यानंतर तो निकाल रद्द ठरवण्याची तरतूद आपल्या राज्यघटनेत नाही. अमेरिकन राज्यघटनेत मात्र एकदा निकाल झालेली केस न्यायाचा हेतू फसला असेल तर पुन्हा 'रिओपन' करता येते."

"असं कसं? ज्याचा खून झाला तो माणूस जिवंत आहे हे सिद्ध झालं तरी?"

"त्याच गोष्टीचा विचार करतो आहे मी. नारायणनच जिवंत आहे हे सिद्ध केल्यानंतर सीतूची खरं म्हणजे तत्काळ सुटका होणं इष्ट आहे. परंतु आपल्या राज्यघटनेत तशी तरतूद नाही. फार तर सरकारला अशा स्थितीत राहिलेली सर्व शिक्षा माफ करण्यासाठी विनंती

करावी लागेल.''

''बरं, मी निघायची तयारी करते.''

''तयारी करशील; पण मला प्रथम हे सांग की, दुसऱ्यांदा पुन्हा तू त्या नारायणनजवळ गेलीस की त्याला शंका नाही का येणार?''

''मुळीच येणार नाही! मी त्याला सांगणार, मागे तू दिलेले 'प्रॉन्स' इतके सुरेख होते. पुन्हा मला तसलेच दे.''

''अगं, पण तो तुझ्यापेक्षा शतपटीनं हुशार आहे. केवळ प्रॉन्ससाठी तू दमणला आलीस हे त्याला खरं वाटेल का?''

''मग कसं करायचं?''

''तू मला दुरून ती फॅक्टरी दाखव. तिथं दमणला आठ-दहा फॅक्ट्या आहेत. मी उगाच शोधाशोध करत बसण्यात काही अर्थ नाही. म्हणूनच मी तुझं साहाय्य घेण्याचं ठरवलेलं आहे.''

''ठीक आहे. पण तुम्ही कोणत्या कारणानं तिथं जाणार?''

''कोणतंही कारण सांगेन. मी नारायणनला अद्याप प्रत्यक्ष बघितलेला नाही. तोही मला ओळखत नाही. अशा स्थितीत त्याला माझी शंका घेण्याचं कारण नाही. पण तू मात्र सोबत आलीस की कदाचित आपलं गणित चुकेल.''

''ठीक आहे अंकल, ॲग्रीड. मी तुम्हाला तो ज्या फॅक्टरीत आहे ती फॅक्टरी दुरूनच दाखवते. मग पुढं तुम्हाला जसं सुचेल तसं करा.''

मिस मार्कोनीनं आपली बॅग भरायला सुरुवात केली. बॅग भरता भरता काहीतरी आठवलं म्हणून ती बाहेर रावराणे बसले होते तिथं आली आणि म्हणाली,

''अंकल, तुम्ही काही खाणार का?''

''काय आहे तुझ्याकडे?''

''परवा माझा बर्थ-डे झाला, त्यावेळी आणलेला थोडा केक आहे. देऊ?''

''वाऽऽऽ! आणखी काय हवं? त्याबरोबर झक्कपैकी चहा मात्र हवा हं!''

रावराण्यांना मिस मार्कोनी ही अपेक्षेपेक्षाही सुस्वभावी वाटली. अशा पोरीनं लग्न करून घ्यावं, एक-दोन कच्चीबच्ची व्हावीत, सुखानं राहावं असं त्यांना वाटलं. तो कॅप्टन श्रीनिवास! त्याची पहिली पत्नी गेली म्हणून वेड्यानं आयुष्यभर लग्न करायचं नाही असं ठरवलेलं आणि ही ही अशीच! कधी गाइड म्हणून परदेशी प्रवाशांसोबत फिरणार, किंवा नेव्हीतल्या अधिकाऱ्यांची शय्यासोबत करणार! आता एक ठीक आहे. अंगात उसळतं रक्त आहे, जवानी आहे, सौंदर्य आहे. उद्या हेच शरीर जीर्ण झाल्यावर काय करणार?

रावराणे असा विचार करत असतानाच दारावरची बेल वाजली. रावराणे स्वत:च उठून दाराचा बोल्ट काढण्यासाठी निघाले. इतक्यात आतून मिस मार्कोनी ट्रेमधून चहा व केक घेऊन बाहेर आली होती. बेलचा आवाज ऐकून ती म्हणाली, ''आपण थांबा अंकल, मी पाहते.''

''कोण आहे ते?'' असं म्हणून ती दाराकडं गेली.

दारात पांढऱ्या वेशातले नेव्हीतले तीन तरुण अधिकारी उभे होते.

''हॅल्लोऽऽऽ हनीऽऽऽ!'' एकानं आत येता येताच तिचा गालगुच्चा घेतला. दुसरा त्याला रावराण्यांच्याकडं पाहत म्हणाला,

''जॉन, बिहेव्ह प्लीज.''

''अरे, पण मी काय वावगं वागलो?''

तिसरा तरुण म्हणाला, ''मिस मार्कोनी, आम्ही तुला लोणावळ्याला न्यायला आलोय. चल.''

"सॉरी, मी येऊ शकत नाही."

"एंगेज्ड आहेस?"

"हो, तसं समज."

पहिला जाम प्याला होता. तो रावराण्यांच्याकडं बोट दाखवून म्हणाला,

"या म्हाताऱ्याबरोबर?"

असं म्हणून तो स्वत:च्या विनोदावर खो-खो हसू लागला. तेव्हा मिस मार्कोनीनं ताडकन् त्याच्या थोबाडीत मारली. दुसरे दोघे मध्ये पडले. त्यातला समजूतदार होता तो म्हणाला, "मार्कोनी, तुला यायचं नसेल तर सरळ नाही म्हणून सांग. पण हे वागणं शोभत नाही तुला."

त्यावर इतका वेळ शांत बसलेले रावराणे पुढं आले आणि म्हणाले,

"जंटलमन, तुमची नावं कृपा करून सांगा. नेव्हीमध्ये असं एखाद्याच्या घरी घुसून कोणाचाही उपमर्द करण्याचं तुम्हाला शिक्षण दिलं जातं का याची चौकशी करायची आहे मला. हे माझ्या नावाचं कार्ड."

"ते कार्ड हाती घेऊन त्यावरचे रिटायर्ड सी. आय. डी., डी. आय. जी. हे शब्द वाचताच ते लोक तत्काळ ताळ्यावर आले.

रावराणे त्यांना उद्देशून म्हणाले, "वेश्या झाली तरी तिला स्वतंत्र अस्तित्व असतं. शिवाय इथं येऊन तुम्ही तिची बदनामी करून थांबला नाहीत, तर माझीही निष्कारण बदनामी केलीत. 'डिफेमेशन' खाली मी तुमच्यावर खटला भरू शकतो. पाहायचं आहे का?"

"ओऽजंटलमन! सॉरी! जातो आम्ही."

ते तिघेही आले तसे निघून गेले.

मिस मार्कोनी डोळ्यांत पाणी आणून म्हणाली,

"आपल्याला माझ्यामुळं त्रास..."

"डोंट वरी. मी पोलीस अधिकारी म्हणून तीस वर्षं काढलेली आहेत. तशी माझी कातडी जाड आहे. शिवाय अशा फालतू माणसांचं बोलणं मनावर घ्यायचं नसतं. हा प्रकार पाहून एवढंच वाटतं की अजून वय गेलं नाही तोवर या आयुष्याला निराळं वळण लावण्याचा विचार केलास तर बरं होईल."

"कसं शक्य आहे ते अंकल? सारं जग मला ओळखतंय."

"वेडी आहेस! पब्लिक मेमरी इज व्हेरी शॉर्ट. आज लोकांना तुझ्याबद्दल जे वाटतं ते आणखी चार-दोन वर्षांनी वाटेलच असं नाही. मघा तू आत गेलीस तेव्हा नेमका हाच विचार माझ्या डोक्यात आला होता. तुझ्यातून एक गृहिणी का निर्माण होऊ शकणार नाही?"

मिस मार्कोनीच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रू वाहत होते. रावराणे उठून पुढं आले आणि तिच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, "इतकं भावनाप्रधान असून या जगात चालत नाही आणि तू जो व्यवसाय पत्करलेला आहेस त्यात तर मुळीच नाही. चल, आवर, वॉश घे आणि हे बघ, माझा चहा निवून गेला-मला दुसरा बनवून दे."

त्यावेळी मिस मार्कोनीला आपल्या असहायतेची जाणीव झाली. अंकलसारखा जिवाभावाचा पुरुष घरात असणं किती आवश्यक असतं याचंही मोल तिला समजलं.

ती वॉश घेण्यासाठी गेल्यानंतर रावराणे स्वत:शीच हसले. नोकरीवर असताना त्यांनी 'प्रिव्हेन्शन ऑफ प्रॉस्टिट्युशन ॲक्ट' खाली पुणे, मुंबई, सोलापूर यासारख्या मोठमोठ्या शहरांतून वेश्यांच्या मोहल्ल्यांवर धाडी घातल्याचं त्यांना आठवलं. कित्येक तरुण अन् कोवळ्या पोरींची 'आयां' च्या जाळ्यातून त्यांनी सुटका केली होती. पण इतकं करूनही त्यांना

कधी कधी वाटे की, वेशाव्यवसाय ही संस्था समाजातून समूळ नष्ट होणे कदापिही शक्य नाही. पण ज्यांना शक्य असेल त्यांनी मात्र हा मार्ग त्याज्य करावा असं त्यांना त्यावेळीही वाटलं होतं अन् आजही वाटत होतं.

मिस मार्कोनी पुन्हा तयार होऊन बाहेर आली. भरलेली बॅग तिनं हातात घेतली आणि रावराण्यांना उद्देशून ती म्हणाली,

"चला. त्या हरामखोरांनी माझा मूड थोडावेळ खराब केला."

रावराणे त्यावर किंचित स्मित करून म्हणाले,

"म्हणूनच म्हणतो, की जो मार्ग तू स्वीकारलेला आहेस तो बदलण्याचा प्रयत्न कर."

त्यावर मिस मार्कोनीनं फक्त मान हलवली- होकारार्थी!

०००

# पंचवीस

गोवा, दीव आणि दमण ही तिन्ही ठिकाणं खूप वर्षे पोर्तुगीजांच्या अमलाखाली होती. त्यामुळं तिथल्या वास्तूंवर फिरंगी संस्कृतीचा ठसा उमटलेला होता. जुनी चर्चेस, दारांना जाळ्या असलेले कौलांचे बंगले यांचा घाट खास पोर्तुगिजी दिसत होता. दमणला ते दोघे पोहोचले तेव्हा पहाट झाली होती. रावराण्यांनी एका हॉटेलात खोली घेतली. हॉटेलच्या रजिस्टरवर त्यांनी मिस्टर खिस्तोफर मार्कोनी आणि मिस नीना मार्कोनी अशी नावं नोंदवली होती. रावराण्यांनी काही काळापुरतं मिस मार्कोनीचं पितृत्व स्वीकारलेलं होतं. नाहीतरी तिचे वडील शोभण्यासारखंच त्यांचं वय होतं. त्यांचा वेष, पाईप ओढायची ती स्टाईल, इंग्रजीवर प्रभुत्व यामुळं ते खिश्चनच असावेत असा कोणालाही सकृतदर्शनी भास होत असे.

अंघोळ आणि ब्रेकफास्ट घेऊन ते हॉटेलमधून बाहेर पडले. मिस मार्कोनी काल मुंबईत घडलेल्या प्रकारामुळं जरी थोडी नाराज झालेली होती, तरी ज्या कामासाठी आपण इथपर्यंत आलेलो आहोत, त्याची पूर्तता व्हावी यासाठी ती उत्सुक होती.

हार्बरलेनवरून चालता चालता ती ठरावीक ठिकाणी येताच थबकली आणि म्हणाली,

"अंकल, मी इथंच थांबते. तो समोर बोर्ड दिसतो आहे ना, तेथून उजव्या बाजूने आत वळा. समोरच ते कोल्ड स्टोअरेज आहे. तुम्ही परत येईपर्यंत मी त्या बाजूच्या रेस्तोराँमध्ये थांबते."

"ओकेऽऽ!"

"विश यू बेस्ट ऑफ लक. अंकल."

तिच्यापासून निघालेल्या रावराण्यांना उद्देशून ती म्हणाली. पुढे पाहून चाललेल्या रावराण्यांनी क्षणभर मागे वळून पाहिलं आणि कपाळाला हात लावून तो हात उंचावून 'थँक यूऽऽ' असं खुणेनेच व्यक्त केलं.

पाऊण तास मिस मार्कोनी त्यांची वाट पाहत त्या हॉटेलमध्ये बसून होती. तास झाला तरीही रावराणे आले नाहीत तशी ती अस्वस्थ झाली.

यदाकदाचित नारायणनला रावराणे हे आपल्या पाळतीवर आहेत अशी शंका आली तर तो त्यांच्या जीविताचं काहीतरी भलंबुरं करायला मागेपुढे पाहणार नाही, अशी तिला भीती वाटू लागली. तासाभरात तिने या रेस्तोराँमध्ये चार वेळा चहा घेतला. शेवटी तिला असह्य झालं. ती उठली आणि काऊंटरवर बिल देऊन बाहेर आली. तोच समोरून येणारे रावराणे तिला दिसले. त्यासरशी तिचा जीव भांड्यात पडला. ती त्यांच्याजवळ गेली आणि अधीर होऊन तिनं त्यांना विचारलं,

"काय झालं?"

"सांगतो, चल. ती टॅक्सी बोलाव."

मिस मार्कोनीनं टॅक्सी बोलावली. टॅक्सीत बसल्यानंतर डोक्यावरची फेल्ट काढून त्यांनी मांडीवर ठेवली, गळ्याचा टाय सैल केला आणि एक प्रदीर्घ नि:श्वास सोडून म्हटलं,

"तोच आहे तो!"

"मी म्हणाले ते बरोबर आहे ना?"

"शंभर टक्के!"

"तुम्ही बोललात त्याच्याशी?"

"हो! फारच तयारीचा आहे. माझं अगदी बारकाईनं निरीक्षण करत होता. आता आपल्याला वेळ दवडून उपयोगी नाही."

"काय करणार आपण आता?"

ते बोलत असताना पोलिसानं त्यांची टॅक्सी रोखली. क्रॉस रोडवरून सायरन वाजवत एक जीप निघून गेली. त्या जीपच्या पाठोपाठ एक ब्यूक गाडी निघून गेली. गाडीपाठोपाठ सात-आठ मोटारींच्या रांगा त्याच दिशेनं निघून गेल्या. रावराण्यांनी टॅक्सी ड्रायव्हरला विचारलं,

"कौन गये इस गाडीमे?"

"नायब राज्यपाल! गव्हर्नर!"

"अच्छाऽऽऽ! वो किधर जाऐंगे अब?"

"जाऐंगे नही, कल शाम को उनका प्रोग्रॅम है ना! वो आज की रात सफेद बंगले मे रहेंगे."

"क्या वो पब्लिक को मिलते है?"

"जरूर! आप मिलना चाहते है?"

"हां."

मिस मार्कोनी रावराण्यांच्या तोंडाकडेच पाहात राहिली.

हॉटेलवर परत आल्यानंतर रावराणे म्हणाले,

"मार्कोनी, मी राज्यपालांना भेटून त्यांना विनंती करायची म्हणतो...!"

"कसली?"

"नारायणननं आपला खून झाला अशी बतावणी करून निरपराध अशा सीतूला खुनाच्या आरोपात गोवलं- स्वत: आपल्या भावाचा-कृष्णनचा खून केला. रवी, मनमोहन, आणि फटू यांनी खोट्या साक्षी दिल्या. उघड उघड त्या सर्वांनी एका भारतीय नागरिकाचं स्वातंत्र्य धोक्यात आणलं. ही बाब अत्यंत गंभीर असून राज्यपालांनी यात लक्ष घालावं- अशी मी त्यांना विनंती करणार आहे."

"राज्यपाल लक्ष घालतील?"

"त्यांना लक्ष घालावं लागेल! राज्यपाल हे आपल्या राष्ट्राध्यक्षांचे प्रत्यक्ष प्रतिनिधित्व करतात. तेव्हा राज्यघटनेनं एका नागरिकाला मिळालेलं स्वातंत्र्य हिरावून घेतलं गेलं आहे हे त्यांच्या निदर्शनास आणल्यानंतर त्या प्रकरणाची गंभीर दखल त्यांना घ्यावीच लागेल."

त्या संध्याकाळीच रावराणे गव्हर्नरला भेटण्यासाठी सफेद बंगल्यावर गेले.

राज्यपालांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनी रावराण्यांच्या नावाची चिठ्ठी आत दिली. चिठ्ठीवरील रिटायर्ड सी. आय. डी., आय. जी. ही उपाधी पाहताच त्यांनी रावराण्यांना आत पाठवण्याविषयी सूचना दिली.

रावराण्यांनी गव्हर्नरना अभिवादन केले आणि अगदी थोडक्यात असं सीतूचं ते प्रकरण त्यांना सांगून म्हटलं,

"भारताच्या एका निरपराध नागरिकाचं स्वातंत्र्य हिरावून घेतलं गेलेलं आहे आणि ज्याचा खून झाला असं सिद्ध झालेलं आहे, तो गृहस्थ इथं दमणमध्ये एका कोल्ड स्टोअरेजमध्ये काम करतो आहे."

"या बाबतीत मी काय करावं अशी तुमची सूचना आहे?" गव्हर्नरनी विचारलं.

"इथल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना आपण आदेश द्यावा आणि त्या नारायणनला ताब्यात घेण्याच्या सूचना द्याव्यात."

"ठीक आहे."

गव्हर्नरनी आपल्या पी.ए. ला बोलावून घेतलं आणि त्याच्यामार्फत दमणच्या पोलीस कमिशनरला पाचारण केलं. पंधरा मिनिटांच्या आत पोलीस कमिशनर आणि इतर चार पोलीस अधिकारी तिथं हजर झाले. रावराण्यांनी त्यांना आपल्याजवळचे सर्व कागदपत्र आणि नारायणनचे फोटो दाखवले. गव्हर्नर त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना म्हणाले,

"निरपराध माणसाला खुनासारख्या खटल्यात गोवणाऱ्या या नारायणनला तुम्ही तात्काळ ताब्यात घ्यावे आणि त्याच्याविरुद्ध योग्य अशी न्यायालयीन कारवाई केली जावी असा मी तुम्हाला आदेश देतो आहे."

पोलीस कमिशनर आणि त्यांचे चार साहाय्यक अधिकारी यांनी नारायणन ज्या कोल्ड स्टोअरेजमध्ये काम करीत होता, त्यावर अचानक छापा घातला. नारायणनला ही गोष्ट अगदी अनपेक्षित होती. त्याला ज्यावेळी बेड्या ठोकण्यात आल्या तेव्हा त्याला दरदरून घाम फुटला.

नारायणनला अटक केल्यानंतर त्याला समजलं, की त्याच्या कारस्थानावर प्रकाश टाकला तो रावराण्यांनी.

"हॅल्लो नारायणन, हाऊ आर यू?" रावराण्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं,

तेव्हा त्यांच्याकडं पाहत नारायणन म्हणाला,

"फाईन! पण तुम्ही कमाल केलीत. मी मनातून म्हणत होतो, मी आता सुटलो. सत्य कधीही उजेडात येणार नाही."

"तू तशी खूप खबरदारी घेतली होतीस. पण आता मला एक सांग, तूच कृष्णनचा खून केलास यात वाद नाही; पण तो कोणत्या तऱ्हेनं केलास एवढं सांगशील तर बरं होईल."

नारायणननं ओळखलं, आता आपली यातून सुटका होणं अशक्य आहे. निदान फाशी चुकावी आणि जन्मठेप व्हावी म्हणून प्रयत्न करायला हवा. त्यानं रावराण्यांना आपण कृष्णनला कसं मारलं याची इत्थंभूत हकिगत निवेदन केली. तो म्हणाला,

"कृष्णन वेळोवेळी मला पैशांसाठी दमवत असे. तो आला की मी त्याला थोडेफार पैसेही देत असे. पण शेवटी त्यानं माझ्याकडं लाख रुपयांची मागणी केली आणि मला तो म्हणाला, "आपण एकाच बापाची मुलं आहोत की नाही याची मला शंका वाटते.' हा त्यानं माझ्या मृत आईच्या शीलाबाबत केलेला गंभीर असा आरोप होता. त्यानं आपल्या दोन मुलींना अरबांना विकल्याची हकिगत मला राधाच्या तोंडून ऐकायला मिळाली होती. दुसऱ्या दोन्ही मुलींचीही तो तशीच वाट लावण्याच्या तयारीत होता. याचवेळी 'रवी निंबर्डीत रमायला हवा' असं मनमोहनशेठनी मला आग्रहानं सांगितलं होतं. मनमोहनशेठनी माझ्यावर खूप उपकार केले होते. त्यांचा माझ्यावर नितांत विश्वास होता. त्यांच्यासाठी मला काहीतरी करणं भाग होतं. अन् मग मी हा कट रचला. कृष्णनला मी निंबर्डीला आणलं. दोन दिवस बाशामामूच्या हॉटेलात ठेवलं. तिथं तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत पीत राहायचा. तिसऱ्या दिवशी रात्री मी त्याला निंबर्डीला बोलावून घेतलं. त्याला लाख रुपये हवे होते. त्यातले पन्नास हजार देऊन टाकायचे आहेत असं त्याला सांगितलं. त्याला माझ्या हेतूची यत्किंचितही कल्पना नव्हती. थोडा नशेतच होता तो.

"मी त्याला कोल्ड स्टोअरेजमध्ये नेलं. त्यावेळी तिथं कोणीही नव्हतं. 'माझ्याजवळ काही काळा पैसा आहे आणि तो मी कोल्ड स्टोअरेजमध्ये दडवून ठेवलेला आहे.' असं त्याला सांगितलं तेव्हा तो म्हणाला, "तसा तू फार हुशार आहेस. पण तुला पैसा घेऊन करायचा आहे

काय, हेच समजत नाही. ते काही असो, मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. चल, देऊन टाक पैसे.''

''कोल्ड स्टोअरेजचं दार उघडून मी आत गेलो. तोही माझ्या पाठोपाठ आत आला. पण मी त्याला चटकन ओढून खाली पाडलं अन् काय घडतं आहे हे कळायच्या अगोदरच मी बाहेर आलो आणि कोल्ड स्टोअरेजचं दार बंद करून टाकलं. तुम्हाला कल्पना असेलच,कोल्ड स्टोअरेजमध्ये माणूस प्राणवायूच्या अभावी फार काळ जिवंत राहूच शकत नाही.''

''बरोबर आहे. रेफ्रिजरेटमध्ये कोंडल्यासारखे आहे ते. बरं मग?''

''अर्ध्या तासाने मी दार उघडलं तेव्हा कृष्णन मरून गेला होता. त्याच ठिकाणी मी त्याचे सर्व कपडे उतरवले आणि माझे कपडे त्याच्या अंगावर चढवले. ब्रेसलेट त्याच्या हातात बांधलं. पहाटेच्या वेळी मी त्याचं प्रेत होडीतून आत नेऊन टाकलं.''

''आणि त्या चाकूच्या खुणा?''

''त्याही मीच पोलिसांची आणखीन थोडी दिशाभूल व्हावी म्हणून केल्या. प्रेताची विल्हेवाट लावल्यानंतर मी वेषांतर केलं आणि तिठ्ठयावर आलो. तिठ्ठयावर एक सरदारजी मुंबईला जायच्या तयारीत होता. त्याला मी माझी बेयको मुंबईस आजारी असल्याची थाप मारली. त्यानं मला मुंबईला ट्रकमधून न्यायचं कबूल केलं.''

''अच्छा. मग दमणला कसा आलास?''

''दमणला जी कोल्ड स्टोअरेजेस आहेत तिथं माझ्या थोड्या ओळखी होत्या. मुंबईपेक्षा मला दमण हे सुरक्षिततेच्या दृष्टीनं अधिक बरं वाटलं.''

''पण तुला कृष्णनला मारल्याबद्दल कधी पश्चात्ताप नाही वाटला?''

''मुळीच नाही. तो नालायक होता. पण खरं सांगू- मला वाईट वाटत होतं ते सीतूबद्दल. एका निष्पाप आणि निरपराध मुलाला मी माझ्या मालकाच्या प्रेमाखातर जन्मठेपेला पाठवला याबद्दल नंतर मला वाईट वाटू लागलं. मी खून केला कृष्णनचा- पण तीन जीव तडफडत असल्याचा मला सारखा भास होत होता.''

''तीन जीव? कोणाचे?'' रावराण्यांनी विचारलं.

''सीतू, सुबी आणि माथुकाका.''

''अच्छा.''

''खरं सांगतो साहेब, माणसानं या जन्मी येऊन कसलाही गुन्हा करावा. पण निष्पाप माणसाला दु:ख होईल असं काहीही करू नये. अशा गुन्ह्याच्या मोबदल्यात मिळणारं सुख हे फार अल्पजीवी ठरतं. सीतू एकसारखा माझ्या स्वप्नात यायचा अन् ओरडून मला विचारायचा,''सांग, मी तुझा कोणता अपराध केला म्हणून तू मला जन्मठेपेला धाडलंस?'' स्वप्नातून मी दचकून कित्येक वेळा उठायचो. सुबी रडत बसलेली आहे आणि माथुकाका तिचं सांत्वन करताहेत असाही एकसारखा भास व्हायचा. पण आता मला बरं वाटतंय. माझ्या मनावरचं दडपण गेलं. मी न्यायालयातसुद्धा हेच सांगणार. पण साहेब, मला फाशी मात्र होऊ नये.''

''ती होणार नाही. कृष्णनच्या खुनाचा आरोप मात्र आता तुझ्यावर ठेवला जाईल. शिवाय तू सीतूविरुद्ध खोटा पुरावा तयार करून त्याला जन्मठेपेची शिक्षा व्हायला कारणीभूत झालास म्हणून तुझ्यावर पिनल कोडमधल्या एकशे चौऱ्याण्णव कलमाखालीही दोषारोप ठेवला जाईल. यदाकदाचित सीतूला कृष्णनच्या खुनाबद्दल फाशी झाली असती आणि नंतर हे तुझं कारस्थान उजेडात आलं असतं तर मात्र तुला फाशी झाली असती. तशी त्या कलमात तरतूद आहे.''

"पण मला जगायची इच्छा आहे हो!"

"ती प्रत्येकाला असते. जगायची एवढी जबर इच्छा असणाऱ्यानं दुसऱ्याच्या जगण्याच्या हक्कावर गदा आणण्यापूर्वी शंभर वेळा विचार करायला हवा. ओ. के. मी चलतो. मला ताबडतोब सीतूच्या सुटकेबाबत प्रयत्न करण्यासाठी मुंबईला जायला हवं."

कृष्णनला कोणत्या मार्गानं नारायणननं मारलं याचं गूढ अखेर अशा तऱ्हेनं रावराण्यांना उलगडलं गेलं. ते कस्टडीजवळून जायला निघाले इतक्यात त्यांना आठवलं ते कृष्णनच्या सहीचं राधाला पाठवलं गेलेलं पत्र आणि दहा हजारांचा तो ड्राफ्ट. परत वळून त्यांनी अश्रू पुसत उभ्या असलेल्या नारायणनला त्याबद्दल विचारलं, तेव्हा तो म्हणाला,

"माझ्या तथाकथित खुनानंतरदेखील कृष्णन जिवंत होता हे दाखवण्यासाठी मी ते पत्राचं नाटक रचलं होतं. शिवाय कृष्णनचा खून केल्यानंतर देखील त्याच्या दोन अविवाहित मुलींच्या लग्नाची जबाबदारीही अप्रत्यक्षरीत्या पार पडावी हाही एक दुसरा हेतू होताच."

"अच्छा. थँक्स अ लॉट. गॉड ब्लेस यू. मीही तुझ्या त्या वागण्याबद्दल अंदाज केलेला होता तो बरोबर ठरला."

हसत हसत रावराणे तेथून निघाले.

नारायणनला पकडल्याची वार्ता मुंबईत मनमोहनशेठ यांनी ऐकली आणि त्यांचे 'पल्पीटेशन' वाढले. त्यांनी तात्काळ रवीला निंबर्डी सोडून मुंबईला येण्याबद्दल तार केली. रवी लागलीच मुंबईला येऊन पोहोचला.

निंबर्डीत ही वार्ता जेव्हा पसरली तेव्हा तिथून फटू भंडारी बेपत्ता झाला. याच फटूनं नारायणन आणि सीतू यांना होडीतून जाताना शेवटी बघितल्याची खोटी साक्ष दिली होती. निंबर्डीच्या गाबितांना जेव्हा समजलं की सीतू निरपराध आहे आणि त्याला खुनाच्या केसमध्ये अडकवण्याचे कारस्थान छोट्या आणि मोठ्या शेठनी नारायणनच्या मदतीनं रचलं होतं तेव्हा सारी निंबर्डी क्रुद्ध झाली. लोक कोल्ड स्टोअरेज आणि कॅनिंग फॅक्टरी जाळायला उठले. काहीजण सुरुंग लावून ती उडवून द्यायच्या तयारीला लागले.

चर्चच्या टेकडीवर माथुकाकांना ही वार्ता समजली तेव्हा काठी टेकत टाकत ते खाली उतरले आणि संतापलेल्या लोकांना शांत करीत ते म्हणाले,

"अरे वेड्यांनो, माझा सीतू निष्पाप आहे, निरपराध आहे याची मला पहिल्यापासूनच खात्री होती; परंतु ते सत्य उजेडात यायला थोडा विलंब लागला इतकंच. आता ते शेठलोक इकडं येऊ शकत नाहीत. दोन्ही कारखाने आता निंबर्डीच्या मालकीचे झाल्यासारखे आहेत. त्या कारखान्यांचं नुकसान करून तुम्ही स्वत:च्या पायावर दगड पाडून घ्याल."

लोकांना माथुकाकांचे म्हणणे पटले. इतके रामायण घडल्यानंतर मनमोहनशेठ किंवा रवी पुन्हा निंबर्डीत येण्याला धजणार नव्हते. ते कारखाने दुसऱ्याला कोणाला विकावे म्हटले, तर तेही शक्य नव्हतं.

चित्रदुर्गाच्या जेलवर मोहनराव दिवेकरांना ही वार्ता समजली तेव्हा त्यांनी सीतूला बोलावून सांगितलं,

"बेटा सीतू, तू खरोखरच नशीबवान आहेस. तुझ्यावर जी खोटी रचना केली होती तिच्यावर माझ्या मित्राने प्रकाश टाकलेला आहे. चार-सहा दिवसांत तुझ्या सुटकेचा आदेश येईल. माझ्या अगोदरच तू सुटशील."

"पण साहेब, हे सर्व केवळ तुमच्यामुळं घडलं. तुमचे उपकार मी कसे फेडू?" त्यांच्या पायावर डोकं टेकवून सीतू आपली कृतज्ञता व्यक्त करू लागला.

"मी यात फारसं काही केलेलं नाही. तुला उपकारच मानायचे असतील तर

रावराण्यांचे मान. त्यांनी अविरत असा प्रयत्न करून सत्य उजेडात आणलेलं आहे.'' त्याला उठवत दिवेकर म्हणाले,

देसाई जेलरनी त्या प्रसंगी किनाऱ्यावरून मिठाई आणून जेलच्या सर्व कैद्यांना वाटली. त्यांनीही मोहनराव दिवेकरांचे आभार मानले. जन्मठेपेला आलेला कैदी न्यायालयाच्या अंतिम निकालानंतरदेखील दोषी नव्हता हे सिद्ध झाल्याचा तो 'न भूतो न भविष्यति' असा प्रसंग होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमाराला लाँच चित्रदुर्गच्या किनाऱ्यावरून जेलकडं येत होती. ही नेहमीच येणारी लाँच होती, पण या लाँचवर त्यादिवशी बरीच अनोळखी माणसं जेलच्या शिपायांना दिसत होती.

लाँच जवळ येताच पहारेकऱ्यानं खिडकीतून पाहिलं. त्यात चित्रदुर्गाचे कलेक्टर होते. त्यांच्यासोबत जेल-पोलिसांना ठाऊक नसलेले रावराणे, फादर मॅथ्यूस, मिस मार्कोनी आणि सुबी हीही मंडळी होती. ही सर्व मंडळी साहेबांच्या सोबत आली असल्यानं पहारेकऱ्यानं लोखंडी गजाचा दरवाजा उघडला.

माथुकाकांना जेलच्या साडेतीनशे पायऱ्या चढून वर जाणं शक्य नव्हतं. म्हणून त्यांना वर चढण्यासाठी लाँचमधून एक खुर्ची आणली होती. लाँचमधल्या कर्मचाऱ्यांनी खुर्चीची डोली करून माथुकाकांना जेलकडे पायऱ्या चढून न्यायला सुरुवात केली. कलेक्टर रावराणे आणि सुबी पायऱ्या चढून वर आले तेव्हा तिथला दरवाजाही खोलण्यात आला.

कलेक्टरसाहेबांना पाहताच देसाई जेलरनी पुढं होऊन नमस्कार केला.

''मिस्टर देसाई, सीतू सारंग, कैदी नं. ३३ याची तत्काळ सुटका करण्याबद्दलचा आदेश मी घेऊन आलो आहे. महाराष्ट्र राज्याचे नामदार गव्हर्नर यांनी त्याच्या सुटकेचा पाठवलेला आदेश घेऊन मी आलो आहे.''

''आम्ही हा आदेश आपण केव्हा घेऊन येता याचीच वाट पाहत होतो.''

''असा प्रकार अद्याप महाराष्ट्रातल्या कुठल्याच खटल्यामध्ये घडलेला नाही. हे एकमेव उदाहरण आहे.''

जेलर देसाईंनी सीतूला पुढं बोलावलं. सीतूसोबत मोहनराव दिवेकरही पुढे आले. सुबीनं आणलेला हार तिनं दिवेकरांच्या गळ्यात घातला तेव्हा ते म्हणाले,

''काहीतरीच काय करतेस पोरी? हा हार या सीतूच्या गळ्यात घाल.''

असं म्हणून त्यांनी सुबीला तोच हार सीतूच्या गळ्यात घालायला लावला. बाजूच्या कैद्यांनी टाळ्या वाजवल्या.

मोहनराव दिवेकर रावराण्यांना कडकडून भेटले आणि म्हणाले,

''मित्रा, फार छान केलंस! न्यायालयात झालेला अन्याय दूर केलास.''

''अहो, पण त्याचे सारे श्रेय तुम्हालाच द्यावे लागेल. तुम्ही मला पत्र पाठवून या प्रकरणी चौकशी करायला सांगितलं नसतं तर?''

''ते काही असू दे. पण तू खूप कष्ट घेतलेस या कामी.'' सारी मंडळी बोलत बोलत देसाई जेलरांच्या घरासमोर आली.

इतक्यात माथुकाकांची डोलीही वर आली. सीतू त्यांच्या पायावर डोकं ठेवून धाय-धाय रडला, तेव्हा माथुकाका म्हणाले,

''रडू नको पोरा. तो आकाशस्थ प्रभू अत्यंत कनवाळू आहे. तुझ्यावर झालेला अन्याय दूर करण्याची प्रेरणा त्यानं प्रथम या दिवेकरसाहेबांना दिली. त्यांच्या आदेशानुसार या रावराण्यांनी अविश्रांत श्रम घेऊन सत्यावर प्रकाश टाकला. त्यांना कॅप्टन श्रीनिवास, ॲडमिरल आणि या मिस मार्कोनीसारख्या व्यक्तींनी साहाय्य केलं. म्हणून तुझी सुटका होऊ शकली.

माझे पाय धरण्यापेक्षा तू या लोकांचे पाय धर.''

रावराणे पाईप पेटवता पेटवता म्हणाले, ''दॅटस् इनफ, फादर, पुरे झालं आता. त्या दोघांना एकमेकांशी दोन शब्द बोलू द्या.''

सुबीचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. चौदा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झालेला सीतू अचानक भेटेल याची तिला बिलकूल आशा नव्हती.

मिस मार्कोनीकडं लक्ष जाताच दिवेकरांनी विचारलं,

''या बाई कोण?''

त्यावर रावराणे हसून म्हणाले, ''सीतू-सुबीची जशी एक जोडी जमवली तशी आणखीन एक जमवायची आहे. कॅप्टन श्रीनिवासची वाट पाहतोय मी. कोलंबोवरून विशाखापट्टणला गेलाय तो.''

त्यावर मिस मार्कोनी लाजली.

देसाई जेलरनी सर्वांच्या जेवणाची व्यवस्था आपल्या बंगल्यावर केली. कलेक्टरना घाई असल्यानं ते सीतूच्या सुटकेचा हुकूम बजावून तत्काळ जायला निघाले तेव्हा दिवेकर त्यांना म्हणाले, ''आपणही जेवून गेला असता तर बरं झालं असतं.''

''सॉरी. सरकारचा दुसरा एक हुकूम अंमलबजावणीसाठी चित्रदुर्गाच्या डी. एस.पींनी आणलेला आहे. याची त्वरित अंमलबजावणी होणं आवश्यक आहे.''

''कसला?''

''तो मनमोहनशेठ आणि रवी कुठे बेपत्ता झालेले आहेत त्यांना अटक करण्याचा हुकूम आलेला आहे.''

''ते जाऊन जाऊन कुठं जातील?''

''सांगता येत नाही. कदाचित परदेशालासुद्धा पळून जातील. त्यांच्याजवळ व्हिसा आणि पासपोर्टदेखील आहे. तोही रद्द केल्याचा हुकूम जारी करायचा आहे.''

''समजा, ते एखाद्या देशाला पळून गेले तरीही आपणाला 'एक्ट्रॅडिशन ॲक्ट' खाली त्यांना त्या देशाकडे आपल्या ताब्यात द्यावे अशी मागणी करता येईल.'' दिवेकर जज्ज म्हणाले.

''ते खरं हो. पण ते जर अद्याप गेले नसतील तर त्यांना जाता येणं अशक्य करणं हे अगत्याचं आहे ना?''

''बरोबर आहे.''

नंतर सारी मंडळी त्या चर्चेत सामील झाली. पण सीतू आणि सुबी मात्र तिथं दिसत नव्हते.

देसायांच्या बंगलीमागे ते दोघे एकमेकांना घट्ट बिलगून होते आणि दोघांच्याही डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.

चित्रदुर्ग जेलच्या खडकाळ पायथ्याशी पुन्हा एकदा भरतीच्या लाटा आदळत होत्या. फेसाळत होत्या आणि फुटत होत्या-तुषार उडत होते.

सीतूच्या बाहुपाशात गुरफटलेल्या सुबीला हे सत्य की स्वप्न हे कळत नव्हतं. ती रडत होती आणि रडता रडता हसतही होती. तिला नेमकं काय होतं आहे, हे समजत नव्हतं.

बंगल्याच्या पुढे बसलेली माणसं त्या खटल्यातून निर्माण झालेल्या क्लिष्ट परिणामांची चर्चा करीत होती. पण खाली होणाऱ्या लाटांच्या तांडवनृत्यात सीतू अन् सुबीला काहीही ऐकायला येत नव्हतं! किंबहुना कोणाचाही आवाज त्यांच्या कानावर पडू नये म्हणून लाटा आज कधी नाही इतका प्रचंड ध्वनी निर्माण करत होत्या!

ती दोघे बराच वेळ कुठं दिसली नाहीत म्हणून माथुकाका त्या दोघांना शोधण्यासाठी काठी टेकत टेकत आले. त्या दोघांचं त्यांच्याकडे लक्ष गेलं तेव्हा ती दोघं त्यांच्याजवळ गेली. मघा सर्वांसमक्ष त्या माथुकाकांविषयीच्या भावना व्यक्त करता आल्या नव्हत्या.

माथुकाकांनी त्या दोघांना आपल्याजवळ घेतलं तेव्हा त्यांचेही डोळे ओलावले. ते कापऱ्या आवाजात म्हणाले,

"आता मी मोकळा झालो!"

"कशाला?" सीतूनं विचारलं,

आकाशाकडं बोट दाखवून ते म्हणाले, "तो मला एकसारखा बोलावतो आहे; पण मी ज्या क्षणासाठी थांब म्हणून त्याला विनंती करत होतो तो क्षण आला आहे. त्यानं माझं ऐकलं- आता मला त्याचं ऐकावं लागेल!"

"नाही नाही! काका, आम्ही तुम्हाला मरू देणार नाही!" असं म्हणून सीतूनं माथुकाकांच्या कमरेभोवती विळखा घातला.

लाँचमधून सीतू, सुबी, माथुकाका, रावराणे आणि मिस मार्कोनी जेव्हा जायला निघाले तेव्हा चित्रदुर्गाच्या सर्व कैद्यांनी त्यांना निरोप दिला.

दिवेकर निरोपादाखल रुमाल हलवत होते. देसाई जेलर त्यांच्या बाजूला उभे होते. ते म्हणाले,

"साहेब, जेलर म्हणून मी सत्तावीस वर्षे काम करतो आहे, पण असा प्रसंग माझ्या आयुष्यात कदापिही आलेला नव्हता. केवळ आपण इथं होता म्हणूनच या दोन निष्पाप जिवांचं पुनर्मिलन होऊ शकलं असावं."

"कदाचित ते व्हावं म्हणून नियतीनं मला इथं पाठवलेलं असावं." हसत हसत दिवेकरसाहेब म्हणाले.

"काहीही म्हणा, पण सारं श्रेय तुम्हाला आहे." देसाई म्हणाले.

०००

# सव्वीस

निंबर्डीत निर्माण झालेलं हे तुफान आता शमलं आहे.

आता त्या गोष्टीला दोन वर्षं होऊन गेली. या दोन वर्षांत निंबर्डीत आणखीन काही घटना घडल्या.

सीतूच्या सुटकेनंतर चार महिन्यांतच माथुकाका खिस्तवासी झाले. चर्चच्या आवारात त्यांचं दफन करण्यात आलं. उभा गाव त्या वेळी लोटला होता. सुबी आणि सीतू या दोघांना अतिशय दु:ख झालं. त्या दोघांना आपल्या जन्मदात्या आई-बापांपेक्षा माथुकाका अधिक जवळचे होते. माथुकाकांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी होते, म्हणूनच आपण शिक्षा होऊनही सुटू शकलो अशी त्यांची श्रद्धा होती.

माथुकाकांना ज्यादिवशी जास्त झालं त्या दिवशी सीतू आणि सुबीला आपल्याजवळ बोलावून घेतलं. त्यांना खूप काहीतरी बोलायचं होतं; पण दम्यामुळं त्यांच्या मुखातून एकही स्पष्ट असा शब्द उमटत नव्हता. त्यांची ती अवस्था पाहून त्या दोघांना काय करावं सुचत नव्हतं. सुबीला दिवस गेले होते. तिला जवळ बोलावून रडणाऱ्या सुबीच्या पोटाकडे बोट दाखवून माथुकाकांनी तेच बोट स्वत:च्या छातीकडे नेलं. तेव्हा निंबर्डीतला एक म्हातारा म्हणाला, "काका म्हणतो, मी मेल्यावर तुझ्या पोटाला येणार आहे."

ते शब्द ऐकून सुबी अचानक रडायची थांबली. माथुकाकांच्या त्या जीर्ण शरीराकडं एकाग्र होऊन पाहात राहिली. जणू काही माथुकाकांच्या शरीरातून कणाकणाने बाहेर पडणारे प्राण ती आपल्या नजरेद्वारे उदरात वाढणाऱ्या गर्भात साठवून ठेवीत होती. त्या रात्रीच माथुकाकांनी निंबर्डीचा आणि या पृथ्वीतलाचा निरोप घेतला. अन्तोन गोन्साल्विस आणि निंबर्डीतल्या इतर खिश्चनांनी माथुकाकांचं दफन केलं. त्या जागी संगमरवरी थडगेही बांधण्यात आले. त्यावर अक्षरं कोरली होती :

'ज्यांनी निंबर्डीवर जन्मभर प्रेमाचा वर्षाव केला ते
फादर मॅथ्यूस उर्फ माथुकाका इथं चिरनिद्रा घेत आहेत.'

शिवाय खाली एक इंग्रजी ओळ होती- Thine shall be done.

खिस्ती धर्माप्रमाणे माथुकाकांचं क्रियाकर्म झालं, दफन झालं, पण निंबर्डीच्या हिंदू लोकांचं समाधान नव्हतं. गाबित आणि भंडारी लोकांनी मिळून आऊटहाऊसच्या मागे ज्या खडकावर नेहमी माथुकाका बसावयाचे त्या खडकाभोवती एक छोटंसं देवालय बांधलं. माथुकाकांची स्मृती चिरंतन जतन करायची, हाच त्यांचा हेतू होता.

मनमोहनशेठ आणि रवी कुठं परदेशाला पळून गेले नव्हते. ते विजयवाड्यात काही दिवस लपून राहिले होते. पण नंतर स्वत: होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले. नारायणनवर इ.पि.को. क्र. १९४, ३०२ व २०१ कलमांखाली खटला भरण्यात आला. मनमोहनशेठ आणि रवी यांनाही त्या खटल्यात आरोपी करण्यात आले होते. पण त्या दोघांवर जो कट केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता तो सिद्ध होऊ शकला नाही. ते दोघे सुटले. नारायणनला मात्र चौदा वर्षांची शिक्षा झाली.

निंबर्डीचे ते दोन कारखाने गावच्या मालकीचे झाले. त्यावर हक्क सांगण्यासाठी मनमोहनशेठ किंवा रवी इच्छा असूनही येऊ शकत नव्हते. कारखाने सहकारी धर्तीवर सुरू झाले. सर्वजण त्या कारखान्यांचे मालकही होते आणि कामगारही होते. सहा लाँचेस आणि पाच-सात लाख रुपये खर्चून उभे केलेले हे दोन कारखाने गावच्या मालकीचे झाले. सीतूला सर्व तांत्रिक ज्ञान होते, त्यामुळे ते कारखाने चालवण्याच्या कामी त्यालाच पुढाकार घ्यावा लागला.

माथुकाकांच्या निधनानंतर तिकडे कोणी धर्मोपदेशक आलाच नाही.

सीतू अन सुबी आता त्या आऊट-हाऊसमध्ये राहतात. सुबीला मुलगा झाला. त्याचं नाव ठेवलं आहे मथुरदास; कारण हेच नाव माथुकाकांच्या नावाच्या अगदी जवळचं आहे असं त्यांना वाटलं.

फटू भंडारी बरेच दिवस बेपत्ता होता. तो एकदा अचानक गावात प्रकटला. अंगावरचे कपडे चिंध्या चिंध्या झालेले, दाढी वाढलेली, केस पिंजारलेले. तो छातीवर हात बडवून मोठमोठ्यानं ओरडत असे, "मी राशा सारंगाला मारला! मी खोटी साक्ष दिली! आता गावच्या इरुद साक्ष देनाराला फाशी होनारऽऽऽ!"

मध्येच तो मोठ्याने हसतो, मध्येच तो गळा काढून रडतो. तो वेडा झालेला आहे म्हणून कदाचित त्याला पोलीस पकडणार नाहीत असं गावकऱ्यांना वाटलं पण पोलिसांनी त्याला पकडलाच. त्याच्यावर खटलाही झाला, खोटी साक्ष दिल्याबद्दल. पण त्या केसच्या वेळी तो ठार वेडा आहे अशी न्यायाधीशांची खात्री झाल्यावरून त्याला येरवड्याला ठेवण्यात आले. पण तिथं त्यानं भिंतीशी टक्कर देऊन आत्महत्या केली.आता निंबर्डी शांत आहे. आठवड्यातून एक दिवस दोन्ही कारखाने बंद असतात. त्यादिवशी सीतू आपल्या लहान बाळाला कडेवर घेऊन त्या छोट्या मंदिराकडं जातो. ज्या खडकावर माथुकाका बसत होते त्या खडकावर लहान मथुरदासला धरून बसवतो आणि तो म्हणतो,

"काका, तू कधी मोठा होणार? कधी मला सीतू म्हणून हाव मारणार?"

यावेळी त्याचे डोळे ओलावतात; अन् गळ्यात असलेल्या छोट्या क्रॉसशी चाळा करणारं ते बाळ खुदकन हसतं.

खडकाच्या खाली लाटांचं नृत्य चालूच असतं. फेसाळलेल्या लाटा खडकावर आपटून फुटतात, फेस अन् तुषार उंच उडतात. अन् सीतू माथुकाकांच्या आठवणीनं जड झालेला ऊर घेऊन आऊट-हाऊसकडं परत येतो.

बाळाला पाजवून बराच वेळ झाला म्हणून सुबी आऊट-हाऊसच्या व्हरांड्यात येऊन एकसारख्या हाका मारीत असते...

"बाळाला नेऊन काय करतोस रे तिकडे?"

"त्या खडकावर बसायला मागतो."

अन् ते सीतूचे शब्द ऐकून सुबीच्या डोळ्यांच्या कडा ओलावतात. बाळाला सीतूकडून घेताना ती काहीसं अस्पष्ट असं बोलते. पण खाली घोंगावणाऱ्या लाटांच्या ध्वनीत काहीच ऐकू येत नाही.

०००००